१९६६
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १६०५

साधक-संवाद

(साधकांची पत्रें)

REFBK-0015226

संग्राहक-
डॉ. श्रीकृष्ण पंडित
तथा डॉ. अप्पा महाराज
M. B. B. S.
कोल्हापूर

संपादक
ग. वि. तुळपुळे
सांगली

୮୭୨୫୮
ତାରିଖ
୧୬୦୫
୧୩୩୯

साधक - संवाद

(साधकांचीं पत्रें)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५२२८
संद. शाखा (स्थळ प्रत)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .... वि: ....
क्रमांक .... नों: दि: ....

REFBK-0015226

संग्राहक ...

डॉ. श्रीकृष्ण पंडित
तथा डॉ. अप्पा महाराज
M. B. B. S.

पो. कोल्हापूर.

संपादक -

ग. वि. तुळपुळे
पो. सांगली.

१९६६

प्रकाशक
सौ. इंदिराबाई ग. तुळपुळे
१४५, शिवाजीनगर
पो. सांगली.

प्रथमावृत्ति : १९६६

मुद्रक :
श्री. बाबुराव ठाकुर
तरुण भारत मुद्रणालय,
बेळगाव.

[किंमत – रु. २. ५०]

साधक-संवाद

(साधकांचीं परमार्थपर पत्रें)

प्रस्तावना

परमार्थाला सत्संगति अत्यावश्यक आहे. म्हणून साधक वेळोवेळीं एकत्र जमतात व परस्परांशी विचार-विनिमय करून, आपले संशय, विकल्प दूर करुन घेतात. "एकमेका करूं सदा सावधान। नामाचें अनुसंधान तुटों नेदू॥ हें परस्परांना साधावयाचे असतें. यात कोणाला मोठेपणाची भावना नसते. हेंच कार्य, कांहीं प्रमाणांत, पत्रांनींहि होत असतें. अशा पत्रांचा संग्रह - प्रस्तुत पुस्तकांत केला आहे. अशा स्वरूपाचीं कांहीं पत्रें साधक बंधूंनी परस्परांनां लिहिलीं. तेव्हां, नियमानें अशीं पत्रे लिहून परस्परांचे विचार कळलें तर परमार्थाला उपयुक्त होतील, असें वाटून, नियमितपणें पत्र लिहण्याची कल्पना निघाली व तीं लिहिलीं गेलीं. पत्रांचे लेखक व ग्राहक याशिवाय इतरांच्याहि तीं पाहण्यांत आलीं. कारण त्यांत खाजगी असें कांहींच नव्हतें. हीं पत्रें छापलीं तर बहुसंख्य साधकांना तीं उपयोगी पडतील, असें कांहीं साधकांचें मत पडलें व ती छापून पुस्तकरूपानें प्रकाशित करावी, असा त्यांनीं आग्रह केला. खाजगी प्रकाशन म्हणून त्यांचा खाजगी प्रसार (Private circulation) करावा; पुस्तकें विक्रीला देवूं नयेत, अशी प्रथम कल्पना होतीं. परंतु, यामुळें पुष्कळ जिज्ञासूंच्या हातीं ती पडणार नाहीं; तेव्हां ती विक्रीसाठीं प्रसिद्ध करावी असा निर्णय ठरला. त्याचें फळ म्हणजे वाचकांच्या हातीं आज दिलें जाणारें हें लहानसें पुस्तक होय.

या पत्ररूप विचारविनिमयांत परमार्थ मार्गावरील यात्रिकांना परि-चित असे अनेक विषय आले आहेत. सद्गुरूवरील श्रद्धा, नामस्मरणाचें महत्व, त्यातील अडचणी, त्यांच्या परिहाराचे उपाय, सत्संगाची आवश्यकता, अंतर्मुखता व अंतर्निरीक्षण, स्वदोषदर्शन व परदोषदर्शन, साधकांची वृत्ती व आचार इत्यादि अनेक विषय साधकांनी यथामति चर्चिले आहेत. सामान्य साधकांनी सामान्य साधकांना लिहिलेलीं हीं पत्रें आहेत; उच्च साधकांचीं

वा सद्‌गुरूंचीं नाहींत; अर्थात् त्यांत दिसणाऱ्या विचारांच्या उंचीला निश्चित मर्यादा आहेत. निःसंदिग्ध सिद्धांत मांडण्याची त्यांत भूमिका नसून सत्य-संशोधनासाठीं विचारविनिमयाची आहे. या दृष्टीनेंच या पत्राकडे पहावें अशी वाचकांना विनंति आहे, त्यांतील कांहीं विचार अपक्व, चुकीचेहि असतील; कारण चाचपडत परमार्थ मार्गावर चालणाऱ्या साधकांचे ते विचार आहेत. श्रेष्ठ साधकांना यांत उपयुक्त असे विशेष दिसणार नाहीं. परंतु, बहुसंख्य साधक सामान्यच असतात. त्यांना हें पत्ररूप विचार-मंथन उद्बोधक व विचार प्रवर्तक वाटेल, अशी आशा आहे. पत्रें काल्पनिक नसून प्रत्यक्ष लिहलीं गेलेली आहेत. लिहितांना, तीं छापण्यात येतील अशी कल्पना असणें शक्यच नाहीं. ह्मणून साहजिकच तीं अगदी मोकळेंपणें घरगुति स्वरूपांत, लिहिलेलीं दिसतात. हा मोकळेपणा, निःसंकोचवृत्ती, हेंच त्यांचे वैशिष्टय आहे. मुमुक्षूना व सामान्य साधकांना त्यांचा किती उपयोग होतो, तें असे वाचक ठरवितीलच. वाच-कांनीं त्यांचे स्वागत केलेलें आढळले, तर आणखीहि अशीं पत्रें प्रसिद्ध करतां येतील. पुस्तक विशेष मोठें होऊं नयें म्हणून संग्रहातील सर्व पत्रें प्रकाशना-साठीं घेतली नाहींत.

प्रस्तुत पत्रांचा संग्रह आस्थेने डॉ. अप्पा महाराज (कोल्हापूर) यांनीं स्वतःच्या उपयोगासाठी केला. त्यावेळीं त्यांच्या मनांत प्रकाशनाची कल्पनाहि नव्हती. इतर साधकबंधूना त्यानींच तीं वाचावयास दिलीं; त्यांत हेतु हा कीं आपल्याला या पत्रांचा परमार्थ-चिंतनाला उपयोग झाला, तसा आपल्या साधकबंधूंनाहि व्हावा. पुढें त्यांतून प्रकाशनाची कल्पना निघाली, हें वर सांगितलेंच आहे. संपादकाचें काम माझ्याकडे दिलें गेलें.

पत्रांत थोडा फार खाजगी मजकूर असतोच. तो अवश्य तितका गाळला आहे. पुस्तक प्रकाशनाला डॉ. अप्पामहाराजांनीं आर्थिक साहाय्यहि केलें आहे. अनेक गुरुबंधूचें अन्य प्रकारें साह्य मिळाले आहे. परंतु, त्यांचा नामनिर्देश होऊं नये अशी त्यांची इच्छा आहे; म्हणून, तो करीत नाहीं. पुस्तक छपाईचें काम तरुण भारत या छापखान्यानें काळजीपूर्वक, थोडया वेळांत, उत्तम प्रकारें केलें, याबद्दल छापखान्याचे मालक व कामगार यांचे आभार मानणें

अवश्य आहे. श्री. जी. एस. छत्रे व सौ. छत्रे यांनीं मुद्रणें तपासण्याचें काम करण्यास संमति दिली व तें काम प्रयत्नपूर्वक पुरें केलें. श्री. जगन्नाथराव परुळेकर यानीं सर्वप्रकारे अविरत श्रम करून पुस्तक थोडया वेळांत पूर्ण करुन घेतलें. याबद्दल या सर्वांचा मी आभारी आहे. स्वतःचें काम म्हणूनच त्यानीं तें केलें; आभाराचीहि त्याना अपेक्षा नाहीं, हें मी जाणून आहे.

साधकांमध्ये असा पत्रव्यवहार पुष्कळ झालेला असेल. परंतु तो प्रकाशित झालेला नाहीं. थोर पुरुषांचीं पत्रें प्रसिद्ध होतात; सामान्यांचीं झालेलीं नाहींत. या दृष्टीनें प्रस्तुत पुस्तक कदाचित् कांहींशा नव्या प्रकारचे ठरेल. कांहीं पत्रांत बरेंच मनोविश्लेषणहि वाचावयास मिळेल; हें मनोविश्लेषण मुख्यत्वें नैतिक दृष्टीनें केलेलें आहे. हें तत्वज्ञानाचें शास्त्रीय पुस्तक नाहीं. पारमार्थिक स्फुट विचार हें त्याचें स्वरुप आहे. तें क्रमानें संपूर्ण वाचण्याचें कारण नाहीं; कोठेंहि केव्हांहि उघडून एकदोन पत्रें वाचली तर तीं विचार प्रवर्तक वाटतील, चिंतनाला उपयोगी पडतील. या संग्रहांत प्रस्तुत संपादकाचीं पत्रें आहेत, हें नमूद करणें इष्ट वाटतें. पत्रांच्या संपादनाशी त्याचा संबंध येण्याचें हें एक कारण आहे.

ग. वि. तुळपुळे.

सांगली { **गुरुदेव रानडे**
२९-५-१९६६ } **पुण्यतिथि**

पत्रांत उल्लेखिलेल्या थोर व्यक्तींचा परिचय

(१) **श्री. निंबर्गी महाराज** :– निंबर्गी सांप्रदायाचें संस्थापक, थोर साक्षात्कारी संत ; गु. रानडे यांचे आजे-गुरु. यांची समाधि निंबर्गी येथें आहे.

(२) **श्री. भाऊसाहेब महाराज उमदीकर (महाराज)**:– श्री. निंबर्गी महाराजांचे पट्ट शिष्य; गु. रानडे यांचे सद्गुरु; यांची समाधि इंचगेरी येथें आहे.

(३) **श्री. अंबूराव महाराज (श्री बाबा)** :– श्री. भाऊसाहेब महाराजांचे थोर शिष्य; यांची समाधि इंचगेरी येथे आहे.

(४) **डॉ. प्रा. रा. द. रानडे (गुरुदेव)** :– सुप्रसिद्ध साक्षात्कारी तत्त्वज्ञ; डेक्कन एं. सोसायटी व अलाहाबाद युनिव्हर्सिटींत प्राध्यापक. यांची समाधि निंबाळ येथें आहे.

निंबर्गी, इंचगेरी व निंबाळ ही गांवें विजापूर जिल्ह्यांतील इंडी तालुक्यांत आहेत.

(१) **राधास्वामी महाराज** :– पंजाबमधील राधास्वामी सांप्रदायाचें संस्थापक. बियास (पंजाब) व दयाळ बाग, आग्रा येथे यांचे मुख्य आश्रम आहेत.

(२) **स्वामीजी जमालसिंग महाराज (बाबाजी महाराज)** :– श्री राधास्वामी महाराजांचे पट्ट शिष्य.

(३) **स्वामीजी सावनसिंगजी महाराज** :– जमालसिंग महाराजांचे पट्टशिष्य.

(४) **स्वामीजी चरणसिंग महाराज** .– श्री. सावनसिंग महाराजांचे नातू ; बियास आश्रमांतील सांप्रतचे सद्गुरू.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .... वि: ....
क्रमांक .... नों: दि: ....

साधक - संवाद

साधकांचीं परमार्थपर पत्रें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 95226
संदर्भ शाखा (स्थळप्रत)

पत्र नं. १

श्री

१७-४-६२

सा. न. वि. वि.

आज निंबरगी महाराजांची पुण्यतिथि. जुने निश्चय किंवा जुनेच न पाळलेले निश्चय नव्यानें करण्यासाठीं, असे शुभ दिवस ठेविलेले असतात. आपला निश्चय एकच, 'प्रंपच ओसरो। चित्त तुझे पायीं मुरो'॥ या दृष्टीनें सर्व करावयाचे.

ज्ञा. अध्याय १३ मध्यें ज्ञानाचे लक्षणांत 'स्थैर्य' व 'मयि चानन्य-योगेन भक्तिरव्यभिचारिणी' हे दोन सद्‌गुण आहेत. 'देवास चिकटल्यामुळें स्थैर्य, अचांचल्य. ज्ञान म्हणजे साक्षात्कार, त्याच्या प्राप्तीनें आनंदमय ईश्वराला मन चिकटतें ; मगच स्थैर्य प्राप्त होऊं शकतें. तोपर्यंत आपण प्रयत्न करावयाचा,—– आणि प्रयत्नांतहि भर आध्यात्मिक प्रयत्नावरच-– नाम व भक्ति वाढविण्यावर– असला पाहिजे. इतर प्रयत्न स्वतंत्रपणें फार अल्पांशानें उपयोगी पडेल. तेव्हां राग आला किंवा इतर कोणताहि विकार आला तरी निराश वा त्रस्त न होतां, नामाकडे वळणें, हें एकच कर्तव्य

राहतें. निश्चय पाळण्यांत अपयश येणारच, त्यानें निराश होण्याचें कारण नाहीं; 'अयशः प्रकृतिः विकृतिर्यशः।' असें आपण आपल्या साधकावस्थेंत म्हणणे चूक नाहीं. कारण ज्ञानाचीं लक्षणें ज्ञान नसतां कशीं प्रकटणार? मात्र वाटचाल यशाकडे आहे, इतकें समजलें पाहिजे. 'तुम जीती बाजी हरोजी,' जिंकण्याचें बाजूनें हरलास तर हरकत नाहीं, पडलास तरी वाट-चाल चढण्याकडे ठेव. या पार्श्वभूमीवर 'स्थैर्य' यावरील ओव्या देतों.

देह तरी वरलीयेकडे। अपुल्यापरी हिंडे। परी बैसका न मोडे मानसाची॥ --- ये पांच भौतिकी उर्सी। चळेचीना॥ --- तैसा उपद्रव उमाळे। न लोटे जो॥ दैन्यदुःखीं न तपे। भयशोकीं न कंपे। देह मृत्यु न वासिपे। पातलेनी॥ --- निंदा निस्तेज दंडी। कामलोभा वरपडी। परी रोमा नव्हे वाकुडी । मानसाची॥ ---तैसा नोहटे दुर्वाक्यशैली॥ से लिला सांता॥ ज्ञा. अ. १३-४८५-९६

याचें नांव स्थैर्य. मानसींची बैठक मोडत नाहीं, असें पहिल्या ओवींत म्हटलें आहे. ही मनाची बैठक ईश्वर होय. मन ईश्वरावर बसल्यामुळें असें स्थैर्य लाभतें. हीच अव्यभिचारिणी भक्ति. मग हे दोन सद्‌गुण नाण्याची दोन अंगेंच नव्हेत काय? अव्यभिचारिणी - भक्तीच्या ओव्या पुढें देतों--

आणि मीवांचून कांहीं। आणिक गोमटें नाहीं। ऐसा निश्चयोचि तिहीं। जयाचा केला॥ शरीर वाचा मानस। पियाली कृतनिश्चयाचा कोश। एक मीवाचूनी वास। न पाहति आणिकांची॥ ज्ञा. १३-६०३-४.

आपण बुद्धीनें देवाला उच्चत्तम मूल्य मानतों. पण मन, वाचा, शरीर, यांनीं मानीत नाहीं. शरीराला विषयच गोमटें; यामुळें वाचेनें तीच भाषा; मनांत तेच संकल्प-विकल्प, यामुळें स्थैर्य नाहीं. यावर उपाय नामस्मरण ; गुरुपदीं शरणागति. येथें उतावळेंपण कसें चालेल? शरीर बदलायचें आहे. त्याला काळ लागणारच. आमच्याजवळ ज्ञान नाहींच, अज्ञान आहे. म्हणून अज्ञानाचें लक्षण अस्थैर्य हेंहि आहे. पहा अशांति ज्ञा. १३-६६४-६७.

'साधक-संवाद'

अस्थैर्य (१३-६८४-९१) अभक्ति (१३-८०७-२१); या शेवटच्यापासून (अभक्ति) आपण बरेंच मुक्त आहोंत व हेंच आशास्थान आहे. सर्व क्षेम

आपला

x x x

पत्र नं. २

श्री

२-५-६२

सा. न. वि. वि.

पातंजल–योगांत. अविद्या, अस्मिता (मी ही जाणीव) रागद्वेष व अभिनिवेश (दृढदेहभाव) हे पांच मूळ क्लेश, म्हणजे क्लेशांची कारणें सांगून त्यांच्या निरसनाचा उपाय प्रतिपादिला आहे. तो चिंतनीय आहे. अविद्या व अस्मिता फार सूक्ष्म; त्यांचा नाश आत्मदर्शनानेंच होणार. पण राग-द्वेष व अभिनिवेश यांची स्थूल रूपें आपणांमध्यें पहातों. तीं ध्यानानें सूक्ष्म किंवा तनु विरळ करावी, असें म्हटलें आहे, त्यांनीं अनेक ध्यानें सांगितलीं आहेत. आपल्याला ध्यान म्हणजें नामस्मरण. ध्यानानें हे क्लेश विरळ होतात, त्यांचें बळ कमी होतें. हा मानसशास्त्रदृष्टचा फार मनोरंजक विषय आहे. ध्यानानें मनाचें या क्लेषापासून Diversion होतें. मन त्यांचें चिंतन सोडतें. त्यांचें बळच काय पण त्यांची उत्पत्ति व जगणें हेंहि मनाच्या प्रेरणेनें होतें. मन प्रतिक्षणीं त्या त्या विकाराला प्रेरणा देत राहतें; म्हणून तो प्रवाहरूपानें जगतो. आपल्याला मात्र मनानें प्रतिक्षणीं दिलेली प्रेरणा समजत नाहीं. तो स्वयंभू प्रवाह आहे, असें वाटतें. परंतु हा भस्मासुर आपल्या मनानें दिलेल्या प्रेरणारूपी वराचेंच अपत्य आहे आणि आपल्या डोक्यावर हात ठेवून, आपल्याला मारण्याचा प्रयत्न तें करतें. तेव्हां अहंकारानें राग आला तर केवळ न बोलतां तो सोसणें, हें पुरें होणार नाहीं. ताबडतोब नामस्मरण,

परमार्थपर वाचन–चिंतन–भजन या मार्गानें Diversion झालें पाहिजे. नुसत्या स्वस्थ बसल्यानें मनाची प्रेरणा थांबत नाहीं. ती उच्चारली जात नाहीं, एवढेंच. "To treat with contempt it deserves," ही वृत्तीहि अयोग्य. यामुळें क्रोधाचें रूपांतर द्वेषांत व अहंकारांत होतें. To ignore (उपेक्षा करणें) ही वृत्ति योग्य; एक क्षुल्लक, निरुपयोगी गोष्ट म्हणून दुर्लक्ष करणें ; पण दुर्लक्षहि वरील अहंकारयुक्त चिंतनानें करावयाचें नाहीं. तर परमार्थचिंतनानें––नामस्मरणानें––करावयाचें; म्हणजे तें योग्य, Healthy झालें; हेंच खरें दुर्लक्ष. श्री बाबा म्हणत, 'कल्पनेचें भूत दारावरून गेलें तर त्याला घरांत बोलावूं नये, तसेंच दारासमोरून जाऊं द्यावें.' याचा हाच अर्थ. परमार्थ हें आपलें खरें घर. कल्पना, क्रोध,अहंकार हीं भूतें कधीं कधीं प्रगट होतात. त्यांना नुसतें जाऊं द्यावें. हें भूत कां व कोठून आलें याचा विचार करणें, म्हणजे, त्याला घरांत बोलावणें. नामस्मरण किंवा अन्य पारमार्थिक कार्य–लिहिणें देखील–करूं लागणें, म्हणजे त्याला सरळ दारावरून जाऊं देणें. सारांश, सत्त्य जीवनमूल्यावर मन केंद्रित ठेवणें, हाच दुर्गुण–त्यागाचा उच्चतम व योग्य मार्ग. विकाराच्या या स्थूल रूपांना ज्ञानेश्वरांनीं 'बळ' म्हटलें आहे. त्याचें वर्णन व नाश याविषयी ते सांगतात –' (बळ) हा विषय –विषाचा अथावो । अवघिया दोषांचा रावो । परि ध्यान-खड्गाचा घावो । साहेल कैसा ।। (ज्ञा. १८–१०५४) श्रीबाबा म्हणत, 'नामाच्या बळापुढें कल्पनेंचें बळ क्षुद्र.' सर्वक्षेम

आपला

x x x

पत्र नं ३

श्री

१६–५–६२

सा. न. वि. वि.

जीव–भाव, फार खोलवर शिरलेला असतो. परमार्थ म्हणजे देखील A new feather in my cap होय, या दृष्टीनें किती तरी काल साधक तिकडे पहात असतो. हा जीवभावच. हें feather नव्हें; cap च खाऊन टाकून ईश्वरत्व देणारें तत्त्व आहे, हें समजण्यालाहि,बौद्धिकज्ञानालाहि काळ लागतो. कित्येकांना हें कळतच नाहीं; निष्काम भक्ति म्हणजे शेवटीं 'मी' चाच लोप, ही कल्पनाच येत नाहीं. मी निष्काम कर्म करणार असा अहंकाराधिष्ठित कर्मयोग मनाला कळतो. कारण 'मी' ला सोडून विचारच करतां येत नाहीं. याचा अर्थ सत्त्वगुणापर्यंत मनुष्य पोहोंचतो. तोहि बुद्धीनें; कृतीनें नव्हे; निस्त्रैगुण्य होऊं शकत नाहीं.

अहंकार–मी ही जाणीव–मरावयास तयार नसते. ती परमार्थांत मानसिक प्रत्यवाय आणते, असें श्री बाबा सांगत. कारण परमार्थांत माझें मरण आहे, हें जीवभावाला ठाऊक आहे. माझें कर्तव्य, माझा देश, समाज, माझा त्याग अशीं मोठीं नांवें घेऊन तो (अहंकार) जगण्याचा प्रयत्न करतो. ईश्वर कर्ता, मी निमित्तमात्र, हें मान्य व सहन करीत नाहीं. ईश्वर कर्ता, हें मान्य केलें कीं, 'मी' चें मरण आलें; मग तें तो कसें मान्य करील?

आतां 'मी' च्या खोटेपणाची व शेवटच्या धडपडीची जाणीव झाली आहे, त्या दिशेनें पाऊलें पडत आहेत, हेंच भाग्य मानून, 'उचलल्या पाऊलीं' चालण्याचा प्रयत्न केला पाहिजे. एवढेंच आपल्या हातीं आहे. All the rest rests on the knees of God. इतर सर्व ईश्वराधीन. ज्ञानेश्वर म्हणतात त्याप्रमाणें, जमीन कसून बीं पेरलें तरी अमाप फळ येण्याला वसंत ऋतूची वाट पहावी लागणारच;

Time element राहणारच. साधनांत तातडी पण फळप्राप्तीविषयीं धीर, अशा विरोधी भावना ठेवाव्या लागतात. पश्चात्तापानें साधनांत तीव्रता यावी, General depression येऊं नये. या पश्चात्तापाच्या भावनेच्या मर्यादा आहेत. सर्व क्षेम.

आपला

x x x

पत्र नं. ४

श्री

१४–६–६२

सा. न. वि. वि.

चार दिवस परमार्थांत आनंदानें घालवून, त्याचेंच 'संस्मृत्य–संस्मृत्य' समाधान मानून आपण पुन : रोजच्या व्यवसायाला लागला असाल. हें पुन :– स्मरण व पुन : पुन : स्मरणच अशा प्रसंगांचें पारमार्थिक लाभदायक स्वरूप होय. परत गेल्यावर सर्व जे विसरतात, त्यांना या संस्कारांचा पुरेसा फायदा होत नाहीं. हें पुन : पुन : स्मरण होण्यास संस्कारहि फार खोल पोहोंचावे लागतात. विषय व परमार्थ यांचा मानसशास्त्राचा नियम दोन्हीकडे सारखाच पारमार्थिक व नैतिक दृष्टया दोहोंत अत्यंत फरक; दुर्जनांच्या व सज्जनांच्या संगाइतका. एक संगतीनें मारणारा; दुसरा विरहानें. असो, प्रथम स्वत : च्या ईश्वरत्वाची अनुभूति आल्यानंतरच, सर्व ब्रम्ह, हा अनुभव येऊं शकतो, असें कां? ("आदौ ब्रह्माहमस्मीत्यनुभव उदिते खल्वहं ब्रह्मपश्चात्") ईश्वर मानवांत व सृष्टींत सर्वत्र आहे, मग त्याचा अनुभव बाहेरच प्रथम कां येऊं नये ? याचें कारण हें कीं, आपली संवित्, चित्त वा मन, जाणीव–कोणतेंही नांव द्या–या तत्त्वांतच ब्रम्हदर्शन होतें. ही जाणीव स्वरूपाकार झाली, संवित् ही विषयांचा आकार न घेतां आत्म्याचा आकार

घेऊन बसली कीं तीच ब्रम्ह किंवा स्वसंवित्, आत्मसंवित्. ती संवित् स्वरूपाकार करण्यांसाठींच आपण नैतिक दृष्टीनें तिच्यांतील अनात्मभाग (विषय) दूर करतो व नामस्मरण, स्वरूपानुसंधान नादानुसंधान करून तिला स्वरूपाकार बनविण्याचा प्रयत्न करतों. आतां चित्त संवित्, जाणीव ज्याची त्यालाच समजणार. इतर मनुष्यांच्या किंवा प्राण्यांच्या ठिकाणीं संवित्, चैतन्य आहे, हा त्याचा तर्क Inference आहे; अनुभव नाहीं. अर्थात् आपलीच संवित् स्वरूपाकार झालेली अनुभवाला येईल; इतरांची संवित् समजणार नाहीं. म्हणून ईश्वर प्रथम स्वतःच्या अंतरीं पाहिला पाहिजे. मग सर्वत्र दिसेल. सर्व क्षेम.

आपला

x x x

पत्र नं. ५

श्री

२७-६-६२

सा. न. वि. वि.- आपलें पत्र पोचलें; वाचून समाधान वाटलें.

The will to be good (चांगलें होण्याची इच्छा) जागृत झाल्यावर यश निश्चित आहे. ती will मात्र काम करीत राहिली पाहिजे; अंतराय येतां उपयोगी नाहीं. त्याचबरोबर, आपल्या दोषांची खंत मर्यादेंतच राहिली पाहिजे. नाहीं तर ती खंत नामस्मरणांत विघ्न होईल. 'मी नामस्मरण करीन, सग्दुरूंची कृपा आहे; दोष जातीलच;' असा विश्वास धरला म्हणजे दोषांची खंत मर्यादेंत राहते. परमार्थांत कोणताही Extreme (अतिरेक) चालत नाहीं. एक नामस्मरण खेरीज करून इतर सर्व क्षेत्रांत Golden mean (सुवर्णमध्य)– युक्ताहार विहार– ठेवावा लागतो. श्री बाबा म्हणत असत, "नामाच्या सामर्थ्यापुढें कल्पनेचें सामर्थ्य किती? नामा-

पुढें कल्पना टिकणार नाहीं." ज्ञानेश्वरींतही 'बल' या रिपूला 'विषय विषाचा अथावो। आघविया दोषांचा रावो। असें म्हणून शेवटीं, 'परी ज्ञानखड्गाचा घावो। साहेल कैसा,' असें ध्यानाचें, नामस्मरणांचे, सामर्थ्य निःसंदिग्धपणें प्रतिपादिलें आहे.

साधक या नात्यानें आपल्याला या श्रद्धेवर भर द्यावयाचा आहे; ही श्रद्धा दृढ करावयाची आहे. म्हणून दोषांची खंत मर्यादेंत ठेवून, सद्‌गुरुकृपेवरची व नामस्मरणांच्या प्रभावावरची श्रद्धा विवेकांनें, श्रवणानें व चिंतनानें दृढ केली पाहिजे.

या दृष्टीनें स्वामी विवेकानंदांनीं ख्रिश्चन धर्मांतील I am a sinner या सतत चिंतनाला दोष दिला आहे. दोषांची जाणीव पाहिजे. परंतु "दोष विनाशी आहेत; आत्मा–ईश्वर–अविनाशी आहे. त्याची प्राप्ती मी करून घेणार आहे; मग दोष संपलें," ही Healthy (निरोगी) श्रद्धा अवश्य आहे. त्यांतही तुमच्या आमच्यासारख्या साधकांच्या आचारांत दोष शिरत नाहींत; आम्ही अनैतिक आचार करीत नाहीं. आमच्या विचारांत दोष, अनैतिकता असते. श्री बाबांच्या म्हणण्याप्रमाणें व श्री गुरुदेवांचे मतेंहि मानसिक दोष हें पापच नव्हें, शारीरिक पापाच्या तुलनेनें तें अति क्षुद्र. त्याच्या विचारानें मनाला त्रास करून घेऊं नये. मात्र मनांतील विचार आपल्या वृत्तीची दिशा दाखवितात. तेव्हां वाईट विचार हे Danger signals (धोक्याची सूचना). त्यांचा तसा उपयोग करून घ्यावा. त्या विकारांच्या आधीन न होण्याची दक्षता व जागृति ठेवावी. मुख्य भर ईश्वराचें श्रवण, मनन, चिंतन, स्मरण. त्यांतहि स्मरण; यांवर भर असावा. मग 'आठव तो ब्रह्म। नाठव तो भवभ्रम॥ या नियमानें हळू हळू ब्रम्हरूपता प्राप्त झाल्याशिवाय राहणार नाहीं. वेळ फार लागेल. लागो बिचारा. सर्व क्षेम

आपला

x x x

'साधक–संवाद'

पत्र नं. ६

श्री

११-८-६२

सा. न. वि. वि.

माझें मागील पत्र पोहोचलें असेलच. ऑपरेशन झालें कां व कसें काय झालें तें ताबडतोब कळवावें.

श्री बाबा 'पादसेवन' याचा अर्थ तुझ्या इच्छेनें माझें सर्व कांहीं होऊं दे; माझ्या आचरणाला तूंच प्रेरणा दे, असा करीत असत. पाय हें आचरणाचें प्रतीक. तेव्हां पादसेवन, 'मला ठाव द्यावा पायीं' व 'माझें पाय तुझे डोई', या सर्वांचा बाबांचा अर्थ सख्य-भक्ति, शरणागति, या स्वरूपाचा असे. पाद-सेवन म्हणजे नितांत आदर, अनन्य भाव. तेव्हां 'पादसेवन' करणें म्हणजे सद्‌गुरूंची आज्ञा शिरसावंद्य मानणें. त्यांची आज्ञा कोणती? अनन्य भावानें अखंड नामस्मरण करा; आकाश कोसळलें, धरित्री दुभंगली, तरी नाम सोडूं नका. नामच तारतें, नामाचेंच बळ आहे, (ॐ नाम कायुवदु नामद बलवु) हीच त्यांची कल्याणकारी, मंगलमय आज्ञा होय. ती आचरणांत आणण्याचा आटोकाट प्रयत्न करणें, हेंच पादसेवन होय.

यांत नाम तारीलच, 'पडतां जडभारी। दासें आठवावा हरी।' हेंहि आलेंच. संकट दिसतांच प्रथम नाम-सद्‌गुरु यांची आठवण व्हावी. तें दूर होतांच त्यांच्या कृतज्ञतेनें अतःकरण भरून यावें. नंतर सर्व कार्यांत स्वतः निमित्तमात्र होऊन, ज्यांच्या हस्तें संकट दूर झालें त्यांच्याबद्दल सतत कृत-ज्ञता. ही वृत्ति वाढत गेली तर नामाचें व सद्‌गुरूंचें अखंड स्मरण राहील. सर्व स्थितींत मनाला समाधान व आश्वासन वाटेल. सारांश, पादसेवन म्हणजे सेवा, दुसऱ्यासाठीं कांहीं करावयाचें, असें दिसत असलें तरी, अंतीं तें साध-काच्या परम कल्याणाचें ठरणारें आहे. म्हणून नवविधा भक्तींत त्याला स्थान मिळालें आहे. कांहीं चांगलें घडलें तर तें सद्‌गुरुकृपेनें घडलें, ही भावना

परमार्थाला किती उपकारक आहे, हें स्पष्टपणें जाणवत आहे. एकाद्या गोष्टीची फार काळजी वाटत असावी, प्रयत्न करून ती दूर होण्याचा मार्ग दिसूं नये व अनपेक्षितपणें ती दूर करणारी वार्ता यावी; मग सद्गुरुचरणीं विनम्र भाव व त्याबद्दल कृतज्ञता वाटून दीर्घकाळ स्मरण राहतें, असा कांहीं सामान्य गोष्टीवरून अनुभव येतो. असा जो एकादा अनुभव परमार्थाला लाभदायक होतो, त्याची स्पष्ट जाणीव राहिली म्हणजे, तो पुनः पुनः परमार्थाच्या विकासाला योजतां येतो, ती वृत्ति वाढविता येते, याला थोडें शास्त्रीय स्वरूप येतें. सर्व क्षेम.

आपला

x x x

पत्र नं. ७

श्री

१५–८–६२

सा. न. वि. वि.

आपणा उभयतांचें पत्र वाचलें. आपली सख्यभक्ति पाहून अंतःकरण गहिवरलें.

मैत्रीकरुणामुदिताउपेक्षाणां सुखदुःखपुण्यापुण्यविषयाणां भावनातः चित्तप्रसादनम् ।' असें पातंजली यो. सू. (१–३३) आहे. त्याचा शद्बशः अर्थः- सुख–दुःख, पुण्य, पाप, या चार विषयाविषयीं मैत्री, करुणा, हर्ष व दुर्लक्ष या भावना केल्या म्हणजे चित्त प्रसन्न, मलरहित राहतें.' अर्थात् सुखी दुःखी पुण्यवान व पापी व्यक्तीविषयीं या भावना करावयाच्या आहेत. सामान्यतः, सुखी व पुण्यवान् मनुष्य पाहून मत्सर, हेवा, त्यामुळें निंदावृत्ति' अशा भावना उत्पन्न होण्याचा संभव असतो. त्याला आहे, मला नाहीं, या कल्पनेनें वरील विचार येऊन मन कलुषित, मलीन होतें. परंतु सुखी व पुण्यवान मनुष्य आपला मित्र असेल तर अशा भावना येणार नाहींत. पुण्य–

वान पुरुषाला पाहून हर्ष वाटला तर त्याच्याबद्दल मत्सर मनांत न येतां, पुण्यवान व्हावें अशी वृत्ति उत्पन्न होईल. म्हणजे मत्सर, द्वेष हे मळ न येतां, प्रेम व सद्भावना (पुण्य करण्याची) निर्माण होईल. हीच चित्ताची प्रसन्नता किंवा निर्मलता. दुःखी मनुष्य पाहून त्याच्याबद्दल तिरस्कार, तुच्छता व स्वतःच्या सुखाचा अहंकार हे दोष सामान्यतः येतात. पण त्याच्याबद्दल दया वाटली तर मार्दव उत्पन्न होईल. सहानुभूति, परदुःखानें दुःखी होणें हा सद्गुण निर्माण होईल. म्हणजेच चित्त शुद्ध प्रसन्न होईल. पापाबद्दल उपेक्षा, त्याबद्दल दुर्लक्ष, असलें म्हणजे पापाचा विचार, पापी जीवाबद्दल घृणा व स्वतःच्या शुद्धतेचा गर्व निर्माण होत नाहीं; अहंकार व पाप यांच्या स्मरणानें चित्त कलुषित, गढूळ होत नाहीं. म्हणून वरील सूत्रांत भिन्न व्यक्तींच्या ठिकाणीं या भिन्न भावना ठेवण्याचा अभ्यास करावा असें सांगितलें आहे. (सवय हेंच शील) अभ्यासानें या भावना स्वाभाविक बनतात. **Habit is Character** हेंच तत्त्व येथेंहि आहे व **Habit** (सवय) चा तपशील सांगितला आहे. या चार प्रकारच्या व्यक्तींचा व्यवहारांत नेहमीं संबंध येतो, तेव्हां, असा प्रयत्न सतत करणें अवश्य असते. यावर गुरुदेवाच्या खालील उपदेशाचा विचार केला तर आणखीच फायदा होईल. 'प्रत्येक व्यक्ति आपल्या परमार्थाला कितपत उपयुक्त होईल तेवढ्यापुरतांच तिचा विचार करावा. इतर पंचाईत करूंच नये.' हा सुवर्ण उपदेश होय. परमार्थांत आलेल्या मनुष्यानें पापाकडे दुर्लक्ष व पापी मनुष्याच्या दुःखाबद्दल करुणा, या भावनांची कटाक्षानें जोपासना केलीं पाहिजे. कारण आपल्या पुण्याचा अभिमान त्याला वाटण्याची भीती फार. सर्वक्षेम.

"सद्‌रूंचें जें मनोगत । तेंचि आपुलें उचित ।" ही वृत्ती पाहून 'गुरुच्या उपकारा, नाहीं पारावारा' या पदाचें स्मरण झालें. क्रोधोऽपि देवस्य वरेण तुल्यः ॥ तो क्रोध नसतोच, वर देण्याचा एक प्रकार असतो.

ऑपरेशनच्या रिपोर्टची वाट पाहत आहे.

आपला

x x x

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ......२९३२८........ वि: .... [illegible]
क्रमांक ......१७०५...... नों: दि: [illegible]

'साधक-संवाद'

पत्र नं ८

श्री

१८-८-६२

सा. न. वि. वि.

आपलें पत्र मिळालें श्री. x x ची नामप्रीती Subconscious पर्यंत जाऊन पोहोचली आहे, हें त्या वर्णनावरून दिसले. शुद्धीवर नसतांनाहि ते माळ व फोटो यांना विसंवत नव्हते हें सानंदाश्चर्य आहे.

" प्रत्येक नुकसानीची देव भरपाई करीत असतो; " ही इमर्सनची कल्पना. तो ह्मणतो, 'एक मोठें दु:ख असलें ह्मणजे अनेक लहान Worries विसरल्या जातात, हें मोठ्या दु:खाचें Compensation किती खरें आहे. दु:खांत आपण खऱ्या जगांत वावरतों. ह्मणून देवाजवळ जाणें शक्य होतें. बाह्य सुखाच्या काळांत आपण काल्पनिक जगांत वावरतों, नुसत्या Worries (त्रास) उत्पन्न करतों. दुसरी गोष्ट, संकटकाळीं अनेक व्यक्तींचें अव्यक्त असलेलें प्रेम व्यक्त होतें. प्रेम असतेंच पण occasion (संधी) नसल्यानें व्यक्त होत नाहीं. मग त्याच्या अस्तित्त्वाचीच शंका येऊं लागते. संकटानें तें व्यक्त होते व शंका, विकल्प नष्ट होतात हेंहि Compensation (भरपाई) च. सर्व क्षेम.

या ऑपरेशनच्या संकटामुळें जागृत झालेले विवेकवैराग्य, निष्ठा इत्यादि पारमार्थिक सद्‌गुण असेच वाढत जावोत व ध्येयसाधन सुकर करोत हीच समर्थचरणीं प्रार्थना.

आपला

x x x

पत्र नं. ९

श्री

६-१०-६२

सा. न. वि. वि.

दसरा ह्मणजे सीमोल्लंघन; देहभावाच्या सीमा उल्लंघून शिवभावाकडे वळणें. अेका प्रकारच्या मूल्याच्या सीमा, तुरुंग सोडून, बाहेर अनंताच्या मूल्यांत पाऊल टाकणें. हें पाऊल टाकलें ह्मणजे लौंकिकाचे पाश कसे तुटतात, त्याचे सुंदर वर्णन तुकारामांच्या एका अभंगांत आहे. 'माझिया देहाची मज नाहीं चाड। कोठें करूं कोड आणिकांचे ॥ इच्छितां तें मागा मान देवापाशीं। असा संचितासी गुंतले हो ॥ देह आह्मी केला भोगाचे सांभाळी। राहिलों निराळी मानापमाना ॥ तुका ह्मणे कोणें वेचावें वचन । नसतां तो शीण वांढवावा ॥' आपल्या देहभावाची चाड नाहीं असें झालें ह्मणजे लौकिकाचा विचार सत्यतः दूर होतो आणि लोकांचा संबंध भूतदयेपुरता उरतो. यांत दुसरा विनयाचा विचार असा आहे कीं लोकांना मानापमान, सुख, दुःख, देव देतो. मी पामर काय देणार? लोक संचित कर्मांत गुंतले आहेत. त्यांतून दूर झाल्यावांचून शांति मिळणार नाहीं. हें जाणून मी देह भोगाचे स्वाधीन केला. 'भागा आलें तें करीतों। तुझें नाम उच्चारितों ॥' या वृत्तीनें वागुं लागलों. देहाचें काम भोगणें, माझें काम नाम घेणें, अशी वाटणी केली, सुखी झालों. लोक हें करण्यास तयार नाहींत. देहाला संचितांत अडकवून, मन देवासाठीं मोकळें ठेवण्याला ते तयार नाहींत. मग मी त्यांना सुखी कसें करणार? सुख मिळण्याचा कांहीं कायदा आहे. तो न पाळणारासाठीं दुःख केलें, तर आपल्याला त्रास होईल; काळ व्यर्थ जाईल; त्याला कांहींच लाभ नाहीं. पथ्य पाळून औषध घेणें, हें करण्याला तयार नसलेल्या रोग्यापुढें डॉक्टर काय करणार? या तुकारामांच्या विचारांत निष्ठुरता नाहीं, तर प्रेम आहे, नम्रता आहे. आपल्या मर्यादा व कर्तव्य यांची तीव्र जाणीव आहे. जगाबद्दल कटुता नाहीं. आपण जगांबद्दल उदासीन वृत्ति

दाखवितो, ती जग आपणाला मान देत नाहीं; आपल्या मनासारखें करीत नाहीं, आपल्या अपेक्षा अपूर्ण राहतात, ह्मणून; तें केव्हांहि क्षम्य नाहीं, परमार्थाला घातक आहे; तेव्हां स्वतः मानापमान, सुखदुःख याबद्दल उदासीन होऊन मन देवाला वाहिल्यावरच जगाबद्दल उदासीन होण्याची पात्रता येते. तेंही भूतदयेचा त्याग करावयाचा नाहीं, तर जगाशीं संबंध आल्यानें देहभाव वाढुन देव दुरावेल अशी भीति आहे, त्या पुरतें दूर व्हावयाचें. त्याच प्रमाणें एवढया मोठ्या जगाला मी किती सुखी करुं शकणार, करील तर देवच करील, ही नम्रताहि त्यांत यावी. मग भूतदयेनें तळमळणारें मन देवाचीच प्रार्थना करील, 'देवा त्यांना सुखी कर, ज्ञान–विवेक दे.' हेंच संतांनीं केलें; ऐहिक दुःख निवारण व सुखदानहि केलें; नाहीं असें नाहीं. पण त्याच्यावर त्यांचा भर नव्हता. Secular altruism (निधर्म परोपकार) च्या मर्यादा व त्याचा पोकळपणात त्यांना पूर्ण ज्ञान असल्यानें, तें जगाला उपदेश करीत राहिले; 'सांग सांगोनी दमलों;' पण तें कार्य सोडलें नाहीं. याच दिशेनें आपणहि सीमोल्लंघन करूं या. हें सीमोल्लंघन सर्वांना कल्याणप्रद व शुभद होवो.

हें पत्र आपणाला दसऱ्याला मिळेल. आज रात्रीं मी पुण्याला जाण्याला निघत आहे. सर्व क्षेम.

आपला.

x x x

पत्र नं १०

श्री

१५–१०–६२

सा. न. वि. वि.

परमार्थाकडे अधिकअधिक लक्ष जाऊं लागलें म्हणजे संगतीहि साधकांचीच हवीशी वाटूं लागतें; परमार्थप्रवृत्ति वाढत असल्याचें हें एक गमक

आहे. आज एक गृहस्थ म्हणाले, 'मी एक दोन वेळां निंबाळास गेलों होतों; तेथें परमार्थाव्यतिरिक्त कांहीं फायद्याच्या अपेक्षेनें बरेच लोक येतात, असें मला वाटलें, गुरुदेव असतांना ते गेले होते; त्यांचें म्हणणें अगदींच चुकीचें नाहीं. पण पाहण्याची दृष्टि बदलली पाहिजे. तुम्हांला आम्हांला सर्वांना देह आहे, प्रपंच आहे, तिकडे लक्ष जाणारच. परंतु गुरुदेवांनीं म्हटल्याप्रमाणें भक्ति केवळ सकाम नसावी; सकाम-निष्काम मिश्रित असावी. तिची वाटचाल निष्कामतेकडे असावी. साधकांपैकीं बरीच मंडळी या कोटींतील असतात. आपणहि याच कोटींतील आहोंत. कांहीं अपवादात्मक माणसें दांभिक असतील, तीं सर्वत्र राहणारच. इतर सर्व आपापल्या बुद्धिशक्ति-प्रमाणें अधिक चांगलें; अधिक भक्ति-भावपूर्ण होण्याचा प्रयत्न करीत आहेत, यांत संशय नाहीं. यश कमी अधिक प्रमाणांत येत असेल त्याला साधक तरी काय करणार ? 'माझें मज कळो येती अवगुण। काय करूं मन अनावर ।।' हीच सर्वांची स्थिती आहे. म्हणून साधकांच्या दोषांकडे पाहून त्यांना तुच्छ लेखूं नये. असें मी त्यांना सांगितलें. जें नाम आप-ल्याला मिळालें तें एक दिवस आपणाला देवपद देणार आहे, या गोष्टीवर भर देऊन त्याचें मूल्य मनांत रुजविलें पाहिजे. गुरुबंधूंच्या बद्दलच जर तिर-स्कार व तुच्छता वाटूं लागली, तर हें कसें जमणार ? 'साधकांचें जेवण हें अमरभोजन आहे; तें डोळ्यांनीं पाहिलें पाहिजे' असें गुरुदेव एकदां म्हणाले; सप्ताहाच्या रात्रीचें साधकांचे चरणरज त्यांनीं जपून ठेविले; त्यांना आमचे Actual (प्रत्यक्ष) गुणदोष कळत होतेच; परंतु Potentially (बीजरूपानें) आम्हीं काय आहोंत (नाम मिळाल्यानें) हे त्यांच्याइतकें कोण जाणणार ? म्हणून वर सांगितल्याप्रमाणें त्यांची वृत्ति होती, तीच आपण ठेवावयास नको कां ? हें सर्व मी त्या गृहस्थांना सांगितलें. त्यांना सांगितलेली आणखी एक गोष्ट म्हणज, ''परस्परांचा गुणलेश परमार्थाला उपयोगी पडेल, या एकाच दृष्टीनें साधकांशी संबंध ठेवावा, त्याचें दुर्गुण मनांत आणूंहि नयेत. दुर्गुण शोधावे लागत नाहींत. ते वरच पडलेले अस-

त्तात. त्यांतून गुणलेश शोधून त्याचा उपयोग केला पाहिजे; '' हा गुरुदेवांचा सिद्धांत. सत्पुरुषांच्या सर्व थोर सद्‌गुणांची सामान्य साधकांत अपेक्षा करावयाची व ते त्यांत नाहींत म्हणन त्याला दूषण द्यावयाचें, हा अन्याय आहे. सर्वक्षेम

आपला

x x x

पत्र नं ११

श्री

२१–१०–६२

सा. न. वि वि.

विशिष्ट परिस्थितींत उभ्दवलेली पारमार्थिक उत्कटता, ही टिकाऊ नव्हे. ती कांहीं मदत करते. वृत्तींत थोडाफार फरक करते; परंतु ती परिस्थिति बदलल्यावर, ती उत्कटता राहणें शक्य नाहीं. त्याबद्दल खंत करण्याचें कारण नाहीं. परिवाराच्या वृत्तीतील फरकहि नैसर्गिकच आहे. तुळसीदासाचें पद आठवतें ना? बालकाची जी काळजी माता घेते, ती प्रौढ मुलाची घेत नाहीं. त्यांत प्रौढांचें हित आहे. हीच गोष्ट आजाराची आहे. फार आजारी बाल; सुधारलेला प्रौढ.

नामस्मरणाचा निश्चय केला, तरी तो वरचेवर दृढ करण्यासाठीं त्याला विवेक–वैराग्याची जोड द्यावी लागते व तुकारामांच्या जीवनांत त्यांनीं हेंच केल्याचें दृष्टीस पडतें. 'आतां सर्व भावें हा माझा निर्धार "(सा. प. तु. १००) असा नामस्मरणाचा दृढ निश्चय केल्यावरहि, 'देवाचिया पायीं देई मना बुडी,'(सा. प. तु. ९७) चा विवेक मनाला शिकविला. या उपदेशांत सर्व सुखें, अमरत्व, जन्ममरणापासून सुटका, ही भक्तिभावानें प्राप्त होतात; देहभावामुळें केवळ दुःखच वाटयाला येतें, हा सारासार विचार, नित्यानित्य

विवेक आला आहे. हाच अंतःकरणांत पुरता ठसला म्हणजे बुद्धीला तरी वैराग्य पटतें व त्यामुळें देहाविषयीं उदासीनता वाटूं लागते. म्हणून 'देवाचें निर्माल्य कोण शिवे यासी । ' वाहिलें देह देवा एकसरें' (सा. प. तु. ८७) असा कठोर वैराग्याचा विचार तुकारामांनीं व्यक्त केला आहे. तरीहि नामस्मरणाचा निश्चय, विवेक व वैराग्य स्वतःच्या सामर्थ्यानें सतत टिकवितां येत नाहींत; कारण त्यांचा नाश करणाऱ्याच सर्व गोष्टी भोंवताली असतात. म्हणून आपल्याला परमार्थाला अनुकूल असें वातावरण शोधून, त्यांत स्वतःला कोंडून घ्यावें लागतें; कारण बाहेर आल्यास Infection (विषारीजंतूंचा स्पर्श) होईल म्हणून सर्व जेथें Disinfected (जंतुरहित) आहे अशा सत्संगांत राहावें लागतें; तसा निश्चय करून, तो आचरणांत आणावा लागतो. तुकाराम म्हणतात, 'जे गाती अखंड विठोबाचें गीत। त्यांचे पायीं चित्त ठेवी माझें.'

आपलीं दोन्हीं पत्रें पोहचलीं; त्यांत विचारांत दिसणारा फरक अपरिहार्य आहे, 'कारण वर आलेंच आहे. सर्वक्षेम

आपला

x x x

पत्र नं. १२

श्री

२८-१०-६२

सा. न. वि. वि.

नेमासाठीं दुसऱ्याचा गैरसमज झाला तरी चिंता नाहीं; निष्कारण मात्र होऊं नये. नेमासाठीं देखींल अटळ असेल तरच गैरसमज राहूं द्यावा. तो उत्पन्न न होणें उत्तम. भोवतालचें वातावरण जितकें शांत, प्रसन्न व मोकळें असेल तितका परमार्थाला त्याचा उपयोग होतो. तें तसें नसेल तर मन विच–

लित किंवा खिन्न झाल्यावाचून राहत नाहीं व त्याचा नेमावर अनिष्ट परिणाम होतो. थोडा वेळ Will च्या जोरावर तिकडे दुर्लक्ष केलें, तरी कांहीं काल गेल्यावर त्याचा मनावर परिणाम होतोच. तेव्हां वातावरण मोकळें ठेवण्याची दक्षता घेतली पाहिजे. ते करण्यांत परमार्थाकडे दुर्लक्ष होऊं द्यावयाचें नाहीं, इतकीच काळजी घ्यावयाची. नाहीं तर परमार्थाच्या नांवाखालीं तुसडेपणा व Cynicism (तुच्छतावृत्ती) वाढेल. परमार्थाच्या नांवाखालीं कठोरपणा वाढलेला दृष्टीस पडतो. ‘निष्ठूर हें जगीं प्रेमसुख ’, हें खरें आहे. पण त्या निष्ठुरपणाचें दुःख स्वतः सोसावयाचें असतें; इतरांना तें कळण्याचें कारण नाहीं. जीवनमूल्यें बदलतांना जुन्यांना मृत्यू येतो; त्याचें हें दुःख असतें. नव्यांच्या जन्माच्या या प्रसूति वेदना असतात. इतरांना हें जन्म–मृत्यु कळण्याचें कारण नाहीं, बाह्यआचार पूर्वीसारखेच राहूं शकतात. किंबहुना स्वार्थ कमी झाल्यानें, त्यांत अधिकच मार्दव येतें. नेमाला अवश्य असेल तेव्हां मात्र निष्ठुर झालें पाहिजे. त्याची भरपाई इतर वेळां करतां येते. गरुदेव असें करीत असत. अर्थात् त्यांचा अधिकार मोठा असल्यानें व परमार्थाचा व्याप फार म्हणून त्यांना बाह्यतः निष्ठूर व्हावें लागे. परंतु केवळ कृपादृष्टीनें ते त्याची पूर्ण भरपाई करूं शकत. बाह्यतः कांहीं करण्याचें कारण नसें. आपल्या सारख्यांची गोष्ट तशी नाहीं. आपण आत्मवंचना करून दोषांना परमार्थाचें स्वरूप देण्याची शक्यता असतें. ‘ध्यानामिषें निद्रा, मुक्तिमिषें निरर्गलता, प्रवचनमिषें निंदा ’ होण्याची शक्यता रामदासांनीं सांगितलेली आहे. तेव्हां ‘जिवलगासी तुटी’ होत असेल, तर ती देवाच्या सख्यत्वासाठींच आहे ना, त्या सख्यत्वासाठींच सर्वस्व व प्राण अर्पण करण्याची सिद्धता आहे ना, हे सतत पाहिलें पाहिजे. नाहींतर प्रपंच परमार्थ दोन्हीवरहि अनिष्ट परिणाम होतील. अर्थात् परमार्थ करतांना आपलें मन साक्षी ठेवावयाचें असतें. त्याची साक्ष घेत काय तें करावें हें जाणतच आहां.

आपला

x x x

‘ साधक-संवाद ’

पत्र नं. १३

श्री

१-२-६३

सा. न. वि. वि.

'अठरा पुराणांच्या पोटीं। नामाविण नाहीं गोष्टी ॥' (नामदेव). या वचनाचा अर्थ जितका विस्तृत करावा तितका, तो विशाल होतो. व साधकाला उपकारक ठरतो, असें वाटतें. महाराजांच्या पत्रांवरुन नामस्मरण हें ७२ रोगांवर उपयोगी पडणारें औषध आहे,हें कळतें. हाच वरील वचनाचाहि अभिप्राय आहे. पुराणें मानवाच्या हितासाठीं, दुःखनिवृत्तीसाठीं व सुखप्राप्तीसाठीं आहेत. त्यांचा आशय एकच-नाम; नामस्मरणानें दुःखनिवृत्ति, त्यानेंच सुखप्राप्ति; याच तत्त्वाचें एक विशिष्ट उदाहरण अनुभवाला आलें; तें असें:- कित्येक वेळां वैफल्याच्या वेदनांमुळें शून्यत्व, निराशा वाटून Empty stomach feeling (अत्यंतनिराशा) उत्पन्न होते. भकासपण भीतिदायक वाटतें. वैफल्यानें मनाची पकड घेतली व त्यांतून सुटण्याला मार्गच नाहीं असें वाटलें, म्हणजे ही मनःस्थिति निर्माण होते. हातापायांतील बळ नष्ट होतें. वाचन-चिंतन कांहींच करावेसें वाटत नाहीं. All is lost (सर्वनाश झाला) असे Depression (नैराश्य) पराकाष्ठेचें येतें. अशा वेळीं विचार करण्याचें (वैफल्यांतून मार्ग काढण्याचें) सोडून नामस्मरण Mechanically करूं लागलें व तेंहि 'हरी भक्तीचा घाव घाली निशाणी' याचा बाबांनीं जो अर्थ केला आहे त्याप्रमाणें, 'नामावर नाम घेतलें,' म्हणजे १०-१५ मिनिटांत ती वैफल्याची व भकासपणाची अवस्था लोपते; मन व बुद्धि पुन्हा कार्य करण्याला तयार होतात. आणि All is lost हें feeling हि जातें. जीवन इतकें संकुचित नाहीं, ज्या गोष्टीच्या वैफल्यानें वैफल्य व नैराश्य व तत्जन्य भकासपण आलें, ती जीवनाचा एक अल्पांश व तोहि गौण अंश आहे, असा विश्वास उत्पन्न होतो. नैराश्याखालीं दबलेलें मन व बुद्धि जागृत होतात व योग्य कार्माला लागतात. Self starter (सेल्फ-

स्टार्टर) बंद पडला म्हणजे ढकलून मोटार सुरुं करावी, तसें हें आहें. नामाचा वेग प्रेमभक्तीच्या आनंदानें वाढवावा हें खरें व उत्तम.परंतु अडचणीचा उपाय म्हणून Mechanically (यांत्रिकरीतीनें) नामावर नाम घेऊन तो वेग वाढविला, तर त्यामुळें या वेगाशीं संलग्न असा पूर्वीचा आनंदाचा अनुभव व त्याबरोबर उत्साह, प्रेम जागृत होतात, असा अनुभव येतो.

आपला

x x x

पत्र नं. १४

श्री.

६-२-६३

सा. न. वि. वि.

आपलें पत्र काल मिळालें. त्यांतील तळमळ सात्विक आहे.

चित्तशुद्धीचा तीव्र प्रयत्न करण्याला सात्विक तळमळ लागणें अटळ आहे. नैतिक व अध्यात्मिक प्राप्तिसाठीं द्यावी लागणारी ती किंमत आंहे. 'सर्वारंभाहि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः।' यावर बोलतांना गुरुदेव एका बैठकींत म्हणाले, "वाईट कल्पना व तळमळ नेमांत होते; हें सर्व पुढें प्रकटणाऱ्या ज्वालेला धुरासारखें, अटळ व अवश्य आहे. धूर आल्यावर पुढें विस्तवाला ज्वाला येते. तेव्हां त्याबद्दल वाईट वाटण्याचें कारण नाहीं. ते टाळतांहि येणार नाहीं.हीच Dark night of the soul (पारमार्थिक निराशेची तळमळ) तिच्या समाप्तीनंतर सूर्योदय!" या त्यांच्या व इत-रांच्या (संतांच्या) वचनावर श्रद्धा ठेवून नेम करणें, येवढेंच तुमच्या आमच्या हातीं आहे. तें आपण यथाशक्ति करीतच आहोंत. 'स्वतः नेम करणें, सदाचार राखणें व दुसऱ्याच्या परमार्थाला सर्वोतोपरी शक्य तोवर साह्य करणे, या तीन गोष्ठी आपण करीत राहिलों तर गुरुकृपेचा उपयोग

होत आहे, योग्य मार्गानें आपण जात आहों, असें मानण्यांस हरकत नाहीं." अशा तऱ्हेचे विचार गुरुदेवांनीं एका पत्रांत लिहिलेले होते. या तीनहि गोष्टी आपणाकडून होत आहेत. तेव्हां निराशेचें कांहींच कारण नाहीं. आशेला चांगला आधार आहे.

श्री. ××× निंबाळला मला म्हणाले, "त्यांच्याविषयीं मला खरोखर आदर वाटतो. दोष टाकून सद्‌गुण संपादण्याची त्यांची तळमळ स्पृहणीय आहे. दोष प्रत्येकांत असतात; परंतु त्यांची जाणीव व ते टाकण्याची तीव्र उत्कंठता क्वचित्‌च आढळते." या त्यांच्या विचारांत अर्थात्‌ फार विवेक भरलेला आहे. गुरुदेव तुकारामांच्या विषयीं एकदां म्हणाले, " तुकारामांनीं आपल्या अभंगांत स्वतःची फार निर्भर्त्सना केली आहे; स्वतःला नीच, पापी, विषयी, दुर्गुणी, असें पश्चात्तापपूर्वक म्हटलें आहे. परंतु, दुसऱ्या कोणी त्यांच्या अभंगांच्या कबुलीजबाबावरुन ती विशेषणें त्यांना लावलीं असती, तर ते हसून म्हणाले असते, "हे बघ,तूं म्हणतोस तसा मात्र मी नाहीं. तुझ्या अर्थानें मी नीच, पापी नाहीं; तुझ्या अर्थानें मी चांगलाच आहे. माझ्या Standard प्रमाणें मी वाईट आहे." कारण ईश्वर--प्राप्तीला अवश्य त्या शुचितेचें व सद्‌गुणांचें ध्येय त्यांच्या दृष्टीसमोर होतें; त्या ध्येयाच्या तुलनेनें ते स्वतःला निंदीत होते.साधकानें हें तारतम्य ध्यानांत ठेवावें. कारण आत्मदोषदर्शनाचाहि अतिरेक होतां कामा नये. त्यानें Depression (नैराश्य) येऊन साधनाला उत्साह राहत नाहीं. येथे Golden mean (सुवर्णमध्य) राखला पाहिजे. सर्व क्षेम

आपला

x x x

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.......................... दि: ....
क्रमांक .... नों: दि: ....

पत्र नं. १५

श्री

१३-२-६३

सा. न. वि. वि.

परमार्थमार्ग हा संघर्षाचाच आहे. त्यांत 'जन आणि मनासवें' युद्धाचा प्रसंग अटळ आहे. तुकारामासारखी तीव्र मुमुक्षुता असती, तर तो संघर्ष, आहे त्यापेक्षांहि, तीव्र झाला असता. परंतु मंद मुमुक्षुतेमुळें संघर्ष मंद आहे. तरी, तुकारामांच्या मागोमाग पाऊलें टाकीतच साधकमात्राला जावयाचें आहे; म्हणून त्यांनीं कसा निश्चय केला, हें ध्यानांत ठेवून, तो आदर्श मानणें अवश्य आहे. तुकारामांचे कांहीं अभंग वाचीत असतां मनांत आलेले हे विचार आपल्याला सादर करीत आहे. कारण, तसा संकेत ठरलाच आहे. 'स्नेहवादें दु:ख जडलें अंतरीं। निष्ठुर हें जगीं प्रेमसुख ॥' स्वकीयांच्या प्रेमाचें सुखहि निष्ठुर असतें. त्यासाठीं त्याग, दु:ख सहन करावें लागतें. मग देवाचें प्रेम मिळविणें किती कष्टाचें, त्यागाचें असेल ? ते निष्ठुर आहे. तेथें Compromise (तडजोड) नाहीं; वाटेकरी चालत नाहीं. 'अनन्यता' हा तेथें परवलीचा शद्ब आहे. अर्थात् त्यापूर्वी अंत:करणांत दृढ झालेल्या सर्व प्रकारच्या आसक्ति–सात्त्विक आसक्ति – देखील–त्यागणें अवश्य आहे. नाहींतर अनन्यता कशी लाभेल ? येथेंच त्या प्रेमाचें निष्ठुरत्व आहे. सतीचें वाण देखील तितकें कठीण नाहीं. कारण मृत्युबरोबर तें संपतें; येथें मरेपर्यंत स्वत:ला Mortify (मारणें) करावयाचें आहे. One must die daily (रोज मेलें पाहिजे) म्हणून 'निंदा स्तुति करी कोणी दयामाया। न धरी चाड या सुखदु: खा ॥ व 'तुका म्हणे मना पाही विचारुनी। होई या कठीण वज्रा ऐसा ॥' असें मनाला सतत शिकविणें, जागृति देणें अवश्य आहे. ही अभावात्मक– Negative बाजू झाली. याप्रमाणें निश्चयाच्या प्रयत्नानें मन थोडें स्थिर करुन, "तुका

म्हणे ऐसें चिंतुनिया देवा । मी–माझे हा ठेवा सोडोनिया ।।" नामस्मरणाच्या Positive मार्गाला मन लाविलें पाहिजे. नुसतें Negative (अभा–वात्मक) कार्य तगणार नाहीं. Positive (भावात्मक) साठीं ती आवश्यक· तयारी आहे, इतकेंच. वैराग्याचें चिलखत घालून, विवेकाच्या मुठींत ध्यानाचें खड्ग घट्ट धरावयाचें व त्यानें सर्व शत्रूंचा निःपात करावयाचा, हें राजयोगी वीराचें कार्य आहे. नामस्मरण ही खड्ग Positive क्रिया होय· दुसरी गोष्ट म्हणजे मागें केलेले निश्चय पूर्णत: अमलांत आले नाहींत, याचीहि विशेष खंत करूं नये. सामान्य निश्चय यशस्वीपणें पार पडतात. पारमार्थिक निश्चय सर्वंकष, सर्वस्पर्शी असल्यामुळें अपयश अटळ आहे. परंतु अपयशहि पूर्ण नसतें. व अपूर्ण अपयश म्हणजे अंशतः यश; तेव्हां यशच लाभदायक.

'तुम जीती बाजु हरोजी;' या वचनांत प्रतिपादन केले हें यश आहे; जसें 'अल्पस्वल्प कळोनि राहे. । समाधानें ।।' तसेंच अल्पस्वल्प यशानें समाधान मानावें लागतें. सर्व क्षेम

आपला

x x x

नं १६ पत्र

श्री

२०–२–६३

सा. न. वि. वि.

"कर्तव्यासी ओळखावें । त्यास विवेक म्हणावें ।" या समर्थांच्या वचनाचा विचार करीत असतां, दिसून आलें कीं, खरोखर 'कर्तव्यासी ओळखावे'। हाच विवेक; कारण हा विवेक अंतरीं बिंबला, तर जीवनांत क्रांति होऊन मनुष्य ईश्वरोन्मुख झाल्यावाचून राहणार नाहीं. बालपणांपासून,

'मी कर्ता' या वृत्तींत, अभिनिवेशांत , भ्रमांतच, मनुष्य असतो. त्याला चांगलें होण्यांस सांगणारेहि त्याचा अहंकर्तृत्वाचा अभिमानच वाढवितात. फार तर त्याला सात्त्विक वळण देतात.पुढें तो विद्वान्,कर्तृत्ववान् झाला,तर या अभिमानाला बाळसें चांगलेंच येऊं लागतें. त्यांतून बाहेर पडणें अशक्यप्राय होतें. परंतु भाग्यानें संतवचनांवर विश्वास बसला,त्याहीपेक्षां सद्भाग्यानें संतांची भेट झाली, कृपा झाली व 'राम कर्ता, मी नव्हें, आपण,' हें बौद्धिक ज्ञान होऊन ती वृत्ति वाढत गेली,तर जीवनांत आमूलाग्र फरक होईल. या विचाराला दुसरी एक जोड पाहिजे. ती म्हणजे 'ईश्वर हा भक्त–वत्सल,शरणागता शरण्य, दीन दयाळ, पतितपावन आहे,' या संतांच्या सिद्धातावर श्रद्धा. मग प्रपंच व परमार्थ दोन्हीं क्षेत्रांत आपल्या इच्छा - आकांक्षा पूर्ण होण्यासाठीं तो देवाकडेच पाहील. कारण आपले प्रयत्न व्यर्थ; त्याचप्रमाणें इतरांचें सहाय्यहि दुबळेंच; तेव्हां एक देवच कर्ता, त्याचीच कृपा संपांदन करावी; हीच त्याची वृत्ति होईल. निदान झाली पाहीजे. त्याबरोबरच ती कृपा साध्य करण्याचा मार्ग शोधून, त्या मार्गाला लागणें, हेंहि क्रमप्राप्तच आहे. कारण प्रपंच परमार्थांत कांहीं इच्छा–वासना मनुष्याला असणारच व त्या तृप्त करून घेण्याची खटपट केल्याशिवाय तो रहणार नाहीं. ही खटपट म्हणजे ईश्वरी कृपा संपादन करण्याचा प्रयत्न, भक्ति, देवाची भक्ति करण्याला साहजिकच असा मनुष्य लागेल. "ततः परं देवो वेत्ति।," प्रबळ शत्रु 'अहंकार' (मी कर्ता), हा दुर्बळ झालेलाच असतो. तेव्हां भक्ति–मार्गांतील मूळ अडचण थोडी दूर होते. त्याचप्रमाणें 'देवकर्ता' या वाढत्या भावनेनें माणसा–बद्दल राग-द्वेषादि कमी झाले पाहिजेत. दुसऱ्यांकडून दुःख, त्रास, नुकसान झाल्यास तो निमित्त मात्र आहे; 'हें देवानें केलें आहे' असा विवेक जागृत होईल. 'देव करील तें उत्तम,' या श्रद्धेची जोड मिळाली तर दुधांत साखरच पडली. या प्रमाणें नैतिक व अध्यात्मिक विकासाला व प्रगतीला हा 'विवेक' अत्यंत उपकारक आहे. समर्थांची 'कर्तव्यासी ओळखावें।' म्हणजे 'विवेक' ही व्याख्या या दृष्टीनें अगदीं सार्थ, समर्पक आहे. असें मला वाटलें. तें कळवित आहे.

'साधक–संवाद'

आपलें भावनापूर्ण, प्रेमळपत्र आलें; त्याबद्दल फार आभारी आहे. आपल्या पत्रांतील कांहीं भाग म्हणजे आपल्या श्रेष्ट मूळपुरुषाचे आपल्या मुखांतून आलेले आशीर्वादच होत. क. लो. अ. ही. वि.

आपला

x x x

पत्र नं. १७

श्री

५-३-६३

सा. न. वि. वि.

आपलीं दोन्हीं पत्रें वाचून सर्वांना आनंद झाला. चढता वाढता भाव त्यांत स्पष्ट दिसतो. माझ्या पत्रांत १९६४ चा उल्लेख आपण कां केलात? कोणी भविष्यवाद्यानें भविष्य केलें कीं काय? त्या काळाचा विचार करण्यांचें कांहींच कारण नाहीं. ईश्वर इच्छेनें जेव्हां जें घडावयाचें तें घडेल. " अजुनि थोडा दिवस उरला, चाल बाबा तोवरी । कां उगा तूं ध्यास धरिला पातली ही शर्वरी ।।" श्री भाऊसाहेबांनीं एका पत्रांत लिहिल्या प्रमाणें देहाचें सुख-दुःख, लाभ-तोटा, हा त्याचा भोग, तो भोगील. आपला त्याच्याशीं संबंध नाहीं. आपला संबंध केवळ सद्गुरुवचनाप्रमाणें नामस्मरण करणें याच्याशी आहे. " साधकानें जीवनाचें दोन Clear cut (अगदीं तुटक) भाग करावयाचे. एक सुखदुःख भोगणारा, दुसरा नेम करणारा. पहिल्याशीं त्याचा संबंध Passive, (तटस्थ) दुसऱ्याशीं क्रियाशील. त्या विषयीं वृत्ति "भोग भोगावरी द्यावा । संचिताचा करुनी ठेवा ।। आपण करावी हरिकथा ।' किंवा नेमास बसलेल्या कबीरांचें वचन " कुत्ता जाने चमडा जाने ।" हें फार अवघड आहे; परंतु तितकेंच अवश्य आहे. त्या दिशेनें पाऊलें टाकतां येतील तितकीं टाकावीं, इतकेंच आपलें कर्तव्य. 'ततः परं देवो वेत्ति'।

' साधक-संवाद '

सप्ताह फारच आनंदोत्साहानें पार पडला." आतां जावयाचें म्हणून वाईट वाटतें." या श्री×××च्या शद्बांत त्याचें सूत्रमय वर्णन येतें. ताम्हणकर बंधूंचा अबोलपणा व कर्तृत्व, नेमांत व्यत्यय आणूं न देतां परमार्थाची उपाधी उत्कृष्टपणें करणें, कोणाचेंह्रीं मन न दुखवितां कार्यक्रम व्यवस्थित पार पाडणें, इ. गुण अनुपम आहेत. त्यामुळें अनेक साधकांना येथें उत्कृष्ट साधनाचा लाभ घेतां येतो. पुन्हां हे बंधु. हें सर्व स्वात्म-सुखायच करतात. क. लो. अ. ही. वि.

आपला

x x x

पत्र नं १८

श्री

८-५-६३

सा. न. वि. वि.

ज्याप्रमाणें विस्मरणाचा उपाय अन्य वस्तूचें स्मरण, त्याप्रमाणेंच अन्याश्रयांच्या त्यागाचा एकमेव उपाय म्हणजे एकाचा आश्रय,-नामस्मरण, परमार्थ,- चिंतन, श्रवण-मनन वगैरे 'मामेकं शरणं व्रज,' हें मुख्य, कोठें मनांत अन्य धर्मासंबंधी कांहीं आसक्ति, त्यागाची भीति राहिली असेल तर ती दूर करण्यासाठीं 'ते सर्व टाक' (सर्वधर्मान्परित्यज्य). हा आदेश; शरणागतीच्या धर्माला मनाची तयारी करण्याला, पूर्वीचे चुकीचे जुने ग्रह दूर करण्याला त्याची अवश्यकता आहे. तेव्हां तेथें अन्य आश्रय are to be crowded out by God (देव भरून हाकलून देणें). तो मुख्य प्रयत्न. देवाचा आश्रय यांत नाम मुख्य; त्यानंतर, वर सांगितल्याप्रमाणें श्रवण-कीर्तन-चिंतन सर्व नवविधाभक्ति येते. कारण बहुविधतेशिवाय भक्ति-आचारांत, विचारांत, सर्व काळ जाऊं शकत नाहीं. नामाच्या उंचीवर राहणें अशक्य झाले, कीं एक एक पायरी उतरत यावयाचें; पण दृष्टी देवाकडे ठेवावयाची;

राजासमोरुन जातांना, पाठीनें मागें जाण्याची संस्थानांत पद्धत आहे. त्याप्रमाणें पायऱ्या प्रकृति–स्वभावाप्रमाणें ज्याच्या त्यानें ठरवावयाच्या. हें मुख्य साधन करीत असतांना जुने आश्रय मनांत येणारच. त्यावेळीं विवेकाचा उपयोग आपण लिहिल्याप्रमाणें करावयाचा (१) सर्व देवाचें, त्यानेंच दिलें. –कृतज्ञता (२) त्यानें नेलें–तो स्वामी, तक्रार नाहीं. त्यांतहि आनंद; कारण अंतीं हें माझ्या हिताचें आहे. (३) आलें गेलें तरी नश्वरच. त्याचें विशेष सुखदु:ख मानणें अयोग्य. कालानें सुख-दु:ख जातेंच. बिवेकाचें साह्य काळाला देऊन हें प्रकरण लवकर संपवावयाचें व आपल्या अविनाशी कर्तव्याला वृत्ति मोकळी करावयाची. असें, ज्यावेळीं जें सुचेल तें करावयाचें; त्याची सामान्य पार्श्वभूमी गुरुदेवांचें तत्वज्ञान वाचून तयार झालीच आहे. समर्थांनीं दासबोधांत तीन प्रकारांनीं आत्मनिवेदन प्रतिपादिलें आहे. (दा. बो. द. १२–६–१६. २०) तें खालीं देत आहे.

"पदार्थ मनें, काया, वाचा। मी हा अवघाची देवाचा। जड आत्मनिवेदनाचा। विचार ऐसा.।। चंचल कर्ता तो जगदीश। प्राणींमांत्र त्याचें अंश। त्याचा तोचि आपणास। ठाव नाहीं ।। चंचल आत्मनिवेदन। याचें सांगितलें लक्षण। कर्ता देव तो, आपण। कोठेंच नाहीं ।। चंचल चळे स्वप्नाकार। निश्चळ देव तो निराकार। आत्मनिवेदनाचा प्रकार। जाणिजे ऐसा ।। ठावचि नाहीं चंचळाचा। तेथें आधीं आपण कैंचा। निश्चळ आत्मनिवेदनाचा। विवेक ऐसा।। तिही प्रकारें आपण। नाहीं नाहीं दुजेपण।" आत्मनिवेदन म्हणजे आत्मसमर्पण अर्थात, अन्याश्रयाचा त्याग व देवाला शरण. जाणे. जड विश्व, चंचल जीव व निश्चल ब्रह्म या तीन दृष्टींनीं समर्थांनीं आत्मसमर्पणाचा विचार केला आहे. आपल्यांतहि या तीन गोष्टी आहेत: (१) जड देहादि सर्व (२) चंचल जीवात्मा (३) निश्चल जीवात्माचें मूळचें ब्रह्मस्वरूप. विश्वांतहि याच तीन गोष्टी आहेत. पिंडीं व. ब्रह्मांडीं. जडाचा विचार आला कीं, 'पदार्थ, देह, मन या सर्वांसकट मी देवाचा.' हा विचार करून, सर्व झाडून टाकावें–येथें 'माझें' संपलें. चंचलांत

कर्तृत्वाचा विचार येतो. तेथे 'चंचल ईश्वर वा आत्मा कर्ता, मी कर्ता नव्हे,' हा विवेक प्रसिद्धच आहे. कर्तृत्व टाकलें की अहंकार गेला. Possession पेक्षां कर्तृत्वाचा अहंकार टाकणें कठीण; तेव्हां चंचल आत्मनिवेदन ही त्याची वरची पायरी. शेवटची पायरी, 'सर्व आत्माच आहे, मीं नाहींच'; विवेकानें त्याची जागृति ठेवावयाची; पुढें अनुभवानें ती स्थिति अनुभवावयाची. म्हणून समर्थांच्या वरील तीन ओव्यांत, संक्षेपानें, सर्व आश्रय अंतर्भूत होतात. त्यांना सोडण्याचा मार्गहि दिसतो. विवेकाचा नेम हा मुख्य मार्ग, हें सागणें नलगें. क. क्षेमसमाचार कळवावा.

आपला

x x x

पत्र नं १९

श्री

१५-५-६३

सा. न. वि. वि.

आपलें प्रेमळ पत्र वाचून आनंद झाला. आपल्या आपुलकीच्या भावना वाचून कृतज्ञता वाटते. यंदा सप्ताहाला येतां आलें नाहीं, म्हणून दुःख झालें. पण नाइलाज होता.

२-३ वर्षे परीक्षेची व कष्टाची जातील, असे आपण म्हणता. परंतु सद्गुरूंच्या कृपेवर सर्व सोपविण्याची वृत्ति धरण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मग ती परीक्षा सौम्यच ठरेल. ' Imagination makes cowards of us ! ' (कल्पनेमुळें नसती भीति वाटते) अशा अर्थाचें मॅकबेथमध्यें एक

वाक्य आहे. कल्पनेच्या ऐवजीं नाम, भविष्याच्या कल्पना ऐवजीं नेम, परमार्थचिंतन करण्याचा प्रयत्न केला तर, प्रारब्ध नकळत भोगून संपेल. श्री बाबांना हिवताप आल्याची गोष्ट स्मरणांत असेलच.

–गांवास 'शरणागति' हा विषय प्रवचनासाठीं मुद्दाम घेतला होता. त्यांतील एक महत्वाचा मुद्दा हा, कीं मनुष्याला कोणाला तरी शरण जावेंच लागतें; आश्रय घ्यावाच लागतो. (शरण–आश्रय). 'सुख पाहिजे' ही मनुष्याची अगदी मूलभूत प्रवृत्ति (**Urge**) आहे. ती बदलतां येणें शक्य नाहीं. सुखाचा प्रकार बदलतां येईल. विवेकानें कोणत्या प्रकारचें सुख कल्याणप्रद, हें ठरवून त्याच्या प्राप्तीचा प्रयत्न करणें, हेंच मनुष्यजन्माचें एकमेव कर्तव्य आहे. सामान्यपणें मनुष्य सुखासाठीं दृश्य जगाला, अनात्म्याला, विषयाला शरण जातो. शारीरिक, बौद्धिक, कलाविषयक, परोपकारजन्य सुख. त्याला दृश्य जगाचा आश्रय केल्याशिवाय मिळूं शकतच नाहीं. परंतु हा आश्रय घेणें म्हणजे गुलामगिरीच होय.

'इंद्रियांचीं दीनें । आम्ही केलों नारायणें' किंवा

'विषयदास म्हणविला गेला । तो भगवद्दास होईल कैसा ॥'

त्याचें त्याला भानच नसतें. हा गुलाम स्वतःला स्वामीच समजतो. व त्या भावनेनें बेभान राबत असतो. 'जिंकावा संसार । तेणें नावें तरी शूर । येरकाय ती बापूडी ' कीर अहंकाराची घोडी ॥' अहंकार आपल्या पाठीवर स्वार होऊन आपल्याला टाचा मारून मरेपर्यंत चौखूर पळवीत आहे, हें आपल्याला कळतच नाहीं. शरण जाणें प्राप्तच आहे, आश्रय घेतलाच पाहिजे; मग संताच्या उपदेशाप्रमाणें, आत्म्यालाच शरणजाणें सर्वथा हितकर नव्हे कां? त्याचा आश्रय म्हणजे, (द्वैताची भाषा आहे तो पर्यंत) चुकलेल्या बालकाला लाभलेला आईचा आश्रय. तो हक्काचा, प्रेमाचा आहेच. इतरांचे आश्रय–चांगल्यांचेहि–किती उपयोगी पडणार? तेव्हां 'आत्म्याचा आश्रय घे. विषयांचा आश्रय तर 'विश्वासें मारी त्या रिपूचा.' त्यापासून घातच पदरीं पड-

णार.' हा मृत्युलोक अनित्य, असुख आहे. तेव्हां 'इमं प्राप्य भजस्व माम्' कारण नित्यानंद हें माझें स्वरूप आहे." असा श्रीकृष्णाचा आदेश आहे.

क. ही. वि. सवडीनें पत्र यावें.

आपला

x x x

पत्र नं. २०

श्री

२२-५-६३

सा. न. वि. वि.

आपलें पत्र पोहोंचलें

नेमाची सतत जागृति राहिली म्हणजे सर्व गोष्टींची जागृति साहाजीकच राहते. नाहींतर 'नेमस्तासी नकळे'; या वचनाच्या महाराजांच्या अर्थाप्रमाणें, ज्याच्या नेमाचाच अस्त झाला, त्याला कांहीं कळण्याची शक्यताच कोठें राहणार ? त्याच्या विचारांना त्या दिशेनें गतीच मिळत नाहीं. विचार दृश्य जगाच्या जाळ्यांत अडकून राहतात. परमार्थाला Introvertion and Introspection अवश्य आहे असें गुरुदेवांनीं उपनिषद्रहस्यांत लिहिलें आहे. हीच ज्ञानेश्वराची 'मनोमार्गे गति' पण ही मनोमार्गे गति नामस्मरणानेंच अधिकाधिक स्पष्ट होत जाते. Introvertion (अंतर्मुखता) व Introspection (अंतर्निरीक्षण) नामस्मरणानेंच वाढत जातात. शरणागति ही नामस्मरणानेंच वाढते. त्याला विवेकाची जोड आपण देतो. नामस्मरणाशिवाय नुसता विवेक विशेष उपयोगी पडणार नाहीं. मन नामांत अधिकाधिक मुरणें, शिरणें हीच खरी शरणागति. विवेक केवळ दिशा दाखवील, काय चुकतें तें सांगेल. पण वाटचाल तो करूं शकणार नाहीं. विवेकानें व श्रद्धेनें वाढलेल्या Will च्या सामर्थ्यावर नामस्मरणाच्या वाटेवर चालणें, अवश्य आहे. गुरुदेवांनी लिहिलें आहे,

त्या प्रमाणें " Surrender philosophically Interpreted means unision " (देवाला शरण जाणें म्हणजे देवाशी ऐक्य, अर्थात् नामाशी, वस्तूशी हळूहळू unision (ऐक्य) होत जाणें, हेच शरणागतीचें स्वरूप व साध्य होय. याची सुरवात व वाटचाल नामस्मरणानेंच होणार. पुढें अिश्वरकृपेनें तेजनादरुप यांची जोड त्याला मिळेल, तेव्हां हें unision चें कार्य अधिक सुकर, सुलभ, सुखद व प्रभावी ठरेल. पण तें अिश्वरकृपाधीन आहे. आज आपलें काम 'टाकी तूं माप । सळ धरली विठ्ठलें ॥' हेंच आहे याच्या तुलनेंनें इतर सर्व गौण; ह्मणजे त्याला उपयुक्त या स्वरूपाचें उपयुक्त ह्मणून स्वीकारावयाचें. ' Introspection is not an end in itself त्याचप्रमाणें " पश्चात्तापही " is not an end in itself " खऱ्या पश्चात्तापाच्या चटक्यानें Will बलिष्ठ होते. हें दुःखपुन्हा नको ह्मणून निमूटपणें मन नेम करू लागतें. सारासाराची जाणींव खोल जाते; हें पश्चात्तापाचें कार्य आहे. या पलीकडे तो गेला तर Brooding (कुढणें) and morbidity आणि (रोगटवृत्ति) ठरेल तेव्हां मुख्य नेम; इतर साधने गौण होत, हें स्मरण आपण नेहमीं ठेवलें पाहिजे त्याचप्रमाणें सद्गुरूंच्या कृपेपुढें दोषांचें बळ किती हा आशावाद वाढवीत राहिलें पाहिजे; ह्मणजे योग्य समतोल येईल. नवल विशेष कांहीं नाहीं.

आपला

x x x

१) अंतर्निरीक्षण हें स्वतंत्र ध्येय नाहीं.

पत्र नं २१

श्री

२५-८-६२

सा. न. वि. वि.

आपलें जोड पत्र वाचून आनंद झाला. अनेक ennobiling परमार्थ विषयक भावना अंत:करणांत निर्माण झाल्या.

आपल्या दासाला आपणाकडे ओढण्यासाठीं तो परमकृपाळु सद्‌गुरु काय उपाय योजील, तें त्याचें त्यालाच ठाऊक. पुष्कळ वाचन-साधनानें जितका भाव वाढला नसता, तितका या संकट-विमोचनानें झाला. 'भयकृत् भयनाशन: ' हीं नांवें सार्थच आहेत ; आणि हें सर्व 'भक्त-कृपाळ' या नांवाला विरोध न होता सत्य ठरतें. 'स्वयमेवात्मनात्मानं वेत्थ त्वं पुरुषोत्तम। भूतभावन भुतेश देवदेव जगत्पते'॥ हेंच शेवटीं सत्य. त्याच्या भव्योदात्त स्वरूपांचें व लक्षणांचें विनम्र, कृतज्ञभावानें स्मरण-चिंतन करीत परमार्थमार्ग आक्रमीत राहणें, येवढेंच आपलें कर्तव्य व जीवन-साफल्याचें साधन होय. 'अल्पस्वल्प कळोनि राहे। समाधानें॥' कारण हें अल्पस्वल्पच आपलें पोट भरून, पुरून उरणारें आहे. आपल्या अल्पांशानें ज्यानें विश्व व्यापिलें आहे, ज्याच्या ज्ञानाच्या दृष्टीनें व्यास, शुक हे ही गुळाच्या पर्वतांतून गुळाचे खडें घेऊन जाणारे डोंगळे होत. त्याचें अल्पस्वल्प चिंतनहि आपल्या सारख्यांना पूर्णत: कृतार्थ करण्याला उपयोगी पडल्या-वांचून कसें राहील ?

सर्व इंद्रियें शाबूत आहेत तोंच भक्ति कर, 'कोण वेळ येईल कैसा॥ याचा नाहीं बा भरवसा॥' येचि क्षणीं मरोनि जासी। तरी भगवंतीं 'अंतरलासी॥' या संतांच्या अमृत-वाणीचें महत्त्व प्रसंगावाचून ध्यानीं येत नाहीं. हें केवळ मामुली विचार वाटतात. इतका मनुष्य अदूरदृष्टि ; डोक्यावर प्रत्यक्ष आघात आल्यावाचून जागा न होणारा मूर्ख प्राणी आहे.

'साधक-संवाद'

'पुढील सर्व अनुमाना आणून सोडी,' हा विवेक विरळा-एखाद्या रामदास-ज्ञानेश्वरांतच आढळतो. दीर्घायुष्य व त्यांत शारीर-दार्ढ्य व अदैन्य, हें आपले जन्मसिद्ध हक्क, असें मनुष्य मानतो ; हें कशाच्या आधारावर ? अज्ञान व अविचार यांच्याच आधारावर, दुसऱ्या कशाच्या ? All that flesh is heir to' (मानवाच्या वाट्याला येणारें सर्व दुःख) तें सर्व मला होईल, याची जाणीवच होत नाहीं. दीर्घकाळ ईश्वरानें वैभव, अदैन्य, देहदार्ढ्य दिले, त्याबद्दल कधीं कृतज्ञता वाटत नाहीं. यांचा उपयोग त्याच्या सेवेसाठीं करावा अशी उत्कट भावना उत्पन्न होत नाहीं. परंतु यांतील एखादे कांहीं नष्ट होण्याचा प्रसंग आला म्हणजे मनुष्य जागा होतो. क. लो. अ. ही. वि.

आपला.

x x x

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम .... दि: ....
क्रमांक .... नों: दि: ....

पत्र नं. २२

श्री

२६-९-६२

सा. न. वि. वि.

आपलीं दोन्हीं कळकळीचीं पत्रें वाचून आनंद झाला. आपला अत्यंत ऋणी आहे.

आपण जें सोसलें त्या मानानें माझा त्रास म्हणजे Pin Prick होय. तरी, तो सहन करतांना देखील आपल्या वृत्तीचें स्मरण होत होतें. 'निज-घरीं' जाता येत होते, त्या घराचा रस्ता दाखवून, सद्‌गुरूनीं त्याचें दारही उघडें करून दिलें आहे ; दारवंटा सदा उघडा ठेविला आहे. परंतु कठिण प्रसंग येईपर्यंत आम्ही त्याचेकडे वळत नाहीं; भाड्याच्या मोडक्या-पडक्या

घरांतच मौज आहे, असें मानतो. त्याला सद्‌गुरुनीं काय करावें? असो, कठिण प्रसंगी तरी, सर्वांची सोडल्यावर आईकडे जावें तसें त्या घराकडे वळतो व तेथें दुःखाचा परिहार–थोडा फार विसर–होतो; हें अनुभवाला आल्यावर तेथेंच राहण्याचा नेटानें प्रयत्न करावयाला नको कां? पण Man has Short memory (माणसाला विस्मरण फार) त्याचेंच भाषांतर स्मशान–वैराग्य–पुराणवैराग्य. आजारांत कांही मानसिक घटनांकडे अधिक लक्ष गेलें. आत्मनिरक्षण त्या दृष्टीनें झालें. दुःख असतांहि बामच वन्हे तर नाद–तेज यांचीहि अनुभूति राहूं शकते व त्यात मन सहजतेनें गुंततें; त्यामुळें त्रास कमी होतो, सह्य होतो. हें पूर्वीहि घडत असें, परंतु आतां लक्ष गेल्यानें, त्या अवस्थेंत राहण्याचा प्रयत्न होई. कारण दुःख कमी व्हावयाला हवें ना ? पाऊस पडण्याच्यावेळीं उघडचा घरांत कोण शिरणार नाहीं? तें उघडें आहे याची जाणीव असल्यावर मनुष्य प्रयत्नपूर्वक त्याकडे वळतो. हा उपयोग आपल्या पत्रांचा झाला. 'राम हमारा जप करे। हम बैठे आराम'। या वचनाची चर्चा करीत असतांना, अखंड अनाहत नाद, अखंड रुपदर्शन होणें म्हणजेच रामानें जप करणें, असें मी म्हटलें होतें. जप म्हणजे स्मरण. राम नादाच्या व तेजाच्या रुपानें स्मरण देऊं लागला म्हणून त्यानेंच जप केला. अनाहत नादांत तर हे फारच जाणवते. या तापांत ' राम हमारा जपकरें' हें वचन आठवत होतें व दुःख कमी करण्याच्या दृष्टीनें रामाचे हे केवढे उपकार असें वाटत होतें. दुःख आपल्या कष्टांच्या तुलनेनें क्षुद्र पण तेंहि असह्य वाटे. कमी व्हावें असें वाटें. राम करतो तो जप 'आराम बैठके' ऐकूं लागलें म्हणजे त्रास कमी होई. असा 'शरीर, मन, अंतःकरण,' यांना आरोग्य देणारा परमार्थ करावासा वाटत नाहीं, हे काय अंधत्व! ' तुलसी यह संसारको भयो मोतिया बिंद'। इकडे सर्वांचें कुशल आहे.

आपला

x x x

पत्र नं. २३

श्री

३-११-६२

सप्रेम सादर नमस्कार.

श्री×××यांच्या पत्नींना देवाज्ञा झाली. त्यांना भेटण्यास एक दिवस जाणार आहे.

ईश्वर करतो तेंच आपल्या अंतिम हिताचें; म्हणून, आपल्या अज्ञानामुळें व देहावरील आसक्तीमुळें दुःखाचे प्रसंग वाईट आहेत, असे वाटले, तरी ती भावना सोडून देण्याच्या इच्छेनें वर्तण्यास सिद्ध व्हावे असें संत सांगतात.

स्वामी सावंतसिंगांचा पाय, घोड्यावरून पडल्यामुळें, मोडला होता. त्याप्रसंगाला उद्देशून बाबा महाराज लिहतात, "परमकृपाळु, दीन दयाळ ईश्वरानें जें केलें, त्याला वाईट कसें म्हणता येईल? त्याच्या आज्ञेशिवाय काहींच घडत नाहीं. तो जे करतो, घडवितो, तें सर्वांच्या हितासाठींच करतो. मग तें वाईट कसें असूं शकेल? आपलें अंतिम अध्यामिक हित (श्रेयस्) साधण्यासाठीं दुःख देणें आवश्यक असेल, तर तो दुःखाचे प्रसंग आणतो; सुख देणें आवश्य असेल, तर सुखाची परिस्थिति आणतो. परंतु देहासक्तीमुळें आपल्याला दुःख सहन होत नाहीं. नादानुसंधान, नामानुसंधान इकडे ध्यान लागलें म्हणजे देहाचें स्मरण होत नाहीं. मग दुःख सहन करणें सोपें होतें. म्हणून साधनांत लीन व्हावें." येथें प्रथम विवेक; त्यामुळें मनाला विशिष्ट वळण–देवाच्या इच्छेनें वागण्याचें–व त्याच्या बळावर साधन, हीच प्रक्रिया आहे. नुसता विवेक उपयोगी पडत नाहीं. साधनाला अवश्य अशी ती बौद्धिक शिदोरी आहे. स्वामी सावंतसिंगांनीं पाय मोडल्याचें घरीं कळविलें नव्हतें. त्या संबंधी श्री बाबाजी महाराज लिहतात, "घरीं कळविलें नाहींस हें उत्तम केलेंस. ८–१० दिवस आजारी पडले तर काय घरच्या लोकांना कळवून–त्यांना मनस्ताप द्यावयाचा? असें मुळींच करूं नये. त्यांना क्षेमसमाचार कळ-

वीत जावा. मागील कर्माचा नाश दुःखाचे भोगभोगूनच करावा लागतो. तें आपण सोसले पाहिजे." या बरोबर त्यांनीं असेंहि लिहलें आहे कीं, "सद्गुरू प्रत्यक्ष देव," ही निष्ठा असलेल्या साधकाचें कर्म त्यांच्या कृपेनें जळून जातें. पण असें साधक विरळा.' तेव्हां 'प्रारब्ध क्रियमाण । भक्तासंचित नाहीं जाण ।' हा सिद्धांतच त्यांनीं मांडला आहे. शेवटीं 'भक्ति' कर्मापेक्षा प्रभावी आहे. परंतु ते शस्त्र वापरतां येत नाहीं; म्हणून कर्मरूपी शत्रु दुर्जय वाटतो. कळावे.

आपला

x x x

पत्र नं. २४

श्री

२८-११-६२

सा. न. वि. वि.

आपल्या पत्रांतील वृत्ति दृढ होत जाईल यात शंका नाहीं. स्वतःच्या निजहितासाठीं वृत्ति बदलावयाची, हें मनुष्याला समजू लागलें, म्हणजे ती बदलण्याच्या मार्गाला लागली; कारण भाव बदलला, value बदलली. मोठेपणासाठीं, चांगलें होण्याचा प्रयत्न केला, तर तो सफल होणें कठीण. कारण मोठेपणा–मग तो कुटुंबातील लोकांत किंवा त्यापेक्षां मोठ्या क्षेत्रांत अपेक्षित असो–म्हणजे लोकांच्या दृष्टीनें स्वतःकडे पहाणें, स्वतःचें मूल्यमापन करणें. त्या प्रयत्नाला दुसऱ्याच्या कडून response मिळत नाहींत, लोक चांगले म्हणत नाहींत, असें दिसतांच निराशा होते; चिडखोर वृत्ति बनते. परंतु देवाला–सद्गुरुंना आवडण्यासाठीं करावयाचें, असें म्हटल्यावर इतर कोणाचाहि प्रश्नच येत नाहीं. माझ्या नामस्मरणाच्या आड येईल ती

वृत्ति मी टाळली पाहिजे, हें ठरलें म्हणजे, नीति आत्मनिष्ठ झाली. ती टिकून राहील, यशस्वी होईल. कारण, यामुळें इतरांत फरक पडला कीं नाहीं, इकडे लक्ष देण्याचें कारण नाहीं. माझ्या soul-force नें इतर लोक बदलतील ही भावना आहे, तो पर्यंत निराशा अटळ आहे. 'मन्सूर' होणें शक्य आहे 'अलम्गीर' होणें अशक्य आहे. तो प्रयत्न दुःखालाच कारण होईल. आपली मुलें, आपले आप्त वगैरे कांहीं मातीचें गोळे नाहींत, कीं त्यांना आपल्याला अभिप्रेत तो आकार देतां येईल. त्यांना आत्मा-व्यक्तित्व आहे. त्या व्यक्तित्वाच्या प्रकृति-धर्माला साहय्य देतां येईल तेवढें देणें, येवढेंच कर्तव्य देवानें आपल्यावर टाकलें आहे. दुसऱ्या पक्षीं, आपण दिलेला आकार त्यांनीं घेतला तर तो तरी निर्दोष, पूर्णतः श्रेयस्कर निश्चितपणें ठरेल कां? खलिल जिब्रानचें " Fill each others cups, don't drink from each other's cup (परस्परांना साहय्य करा; केवळ सुखाचें साधन करू नका.) हें वाक्य स्मरत असेलच. दुसऱ्याला पूर्णत्व देण्यांला साहय्य करावयाचें. तें करण्याचें आपलें साधनहि ठरलेलें आहे. स्वतः नेम करून पूर्ण होण्याचा प्रयत्न करणें Example, not precept.

निश्चय केला तरी Lapses होणारच. त्याचीहि विशेष खंत मानूं नये. प्रकृतिधर्म आहे. इतरांनींही तें जाणावें व जाणतीलहि. असा प्रसंग त्या वेळेंपुरता संपवावा. त्यांत दीर्घकाळ मन घालावयाला आपल्याला वेळच कोठे आहे? काम फार पडले आहे. आयुष्य केव्हांही थोडेच-कामाचें मानानें-आतां तर फारच थोडें उरलें खरें ना?

आपला

x x x

'साधक-संवाद'

पत्र नं. २५

श्री

१९-१२-६२

सविनय नमस्कार

आपलें पत्र वाचून वाईट वाटलें. इतकें उदास होण्याचें खरोखर कारण नाहीं. 'त्यक्त्वा हृदयदौर्बल्यं' परमार्थ केला पाहिजे. जीवन विना–दैन्येनच गेलें आहे व जात आहे. परंतु hyper sensitive (अतिहळवें) झाल्यामुळें, लहान सहान निराशा मोठ्या वाटतात. मनुष्य अधिक साधन करूं लागला, ह्मणजे तो अधिक sensitive(हळवा) होतो. प्रा.×× ह्मण–तात त्याप्रमाणें, त्याचे भावात्मक जीवन घुसळून निघते. व supressed emotions (दाबलेल्या भावना) वर येतात. त्या नष्ट होण्यासाठीं, किंवा sublime (उन्नत) होण्यासाठींच वर येतात. परंतु कांहीं काल त्यांचा त्रास होतो. त्यावर उपाय–उत्कट नामस्मरण व Prayer, surrender, begging His grace & mercy (प्रार्थना, शरणागति, देवाच्या कृपेची व दयेची याचना) यांत त्यानें जें दिलें आहे, त्याबद्दल कृतज्ञता येतेच भोवतालच्या जगाचा थोडा विचार केला, तर ईश्वराची किती कृपा आपल्या–वर आहे याचें स्पष्ट ज्ञान होण्यास वेळ लागणार नाहीं. परंतु उद्वेग व विषण्णता यांचा स्वभावच असा आहे, कीं त्या बुद्धीला थोडा वेळ अंधेरी आणतात. ह्मणून उद्वेगावर मात केली पाहिजे. ' हरि नो मारग छे शूरांनों ;' हृदय–दौर्बल्य टाकलें पाहिजे; तें आलें व त्याला कुरवाळीत बसलें, तर मुख्य कार्य–ईशसेवा नामस्मरण–कसें होणार?

दुसऱ्या दृष्टीनें One who never hopes is never disappointed (जो आशा ठेवत नाहीं त्याला निराशा नाहींच.) आपलें कल्याण नेहमीं दुसऱ्यावरच अवलंबुन ठेवावयाचें कां? 'यद् यद् परवशं दुःखं। यद् यदात्मवशं सुखं॥' सॉटर रिझ़ार्टर या ग्रंथांत कार्लाईलचा हिरो आपल्या

दुःखी व खिन्न राहणाऱ्या मनाला ह्मणतो 'Despicable biped, what is it that thou art afraid of? Death? If so, it is ever there' (तुच्छ प्राण्या, तूं मरणालाच भितोस ना? ते तर अटळ आहे.) मन आपला वैरी होऊं लागलें, तर त्याला जागे केलें पाहिजे कोणत्याहि गुण-दोषांचा न्यायनिवाडा करण्याच्या कामांत न पडतां, इतकें खरें आहे ना, की, परिस्थिती बदलत नाही? मग ती बदललीच पाहिजे असा आग्रह कां? ती बदलली तर देव मिळेल का? साधन चांगलें होईल कां? परमार्थ वाढेल कां? नाहीं; कदाचित् मनाची टोचणी गेल्यानें कमीच होईल. व मोह वाढेल, परमार्थाला आवश्य तें आहे, विपुल आहे, केवळ sentimental होऊन काळाचा व्यय उद्विग्न अवस्थेंत राहण्यात कां करावा? गुरुदेवांनीं १९१४ मध्यें एकाला लिहलेलें वाक्य लिहून पत्र संप-वितों. पत्र वाचून तें Unsympathetic आहे, असें वाटणार ना? 'Do not entertain morbid ideals which you can never achieve" (जी कधीही साध्य होणार नाहींत, अशी रोग ध्येयें कधींच मनांत धरूं नका) हीं Ideals (ध्येयें) स्वार्थविषयक असोत की परमार्थ विषयक असोत. ती विसरणेंच योग्य.

आपला

x x x

पत्र नं २६

श्री

२९-१२-६२

सा. न. वि. वि.

आपलें कार्ड पोहोंचलें.

कार्डांतील तुकारामांचें अवतरण पाहून आनंद झाला. हीच वृत्ति अवश्य आहे. 'देवाचें निर्माल्य कोण शिवे यांतें,' असें देहाबद्दल तुकारामानीं ह्मटलें आहे. हें ध्येय म्हणून डोळ्यापुढें असावें. म्हणजे कांहीं प्रमाणांत ती वृत्ति आचरणांतहि येते. Not failure but low aim is crime. (अपयश हें पाप नाहीं; क्षुद्र ध्येय हें पाप) आमची महत्त्वाकांक्षा हिमालयापेक्षांहि मोठी आहे. सर्व आकाक्षांचा शेवट करणारी ती आहे. मग अपयश आलें–ह्मणजे यश लवकर आलें नाहीं-(कारण अपयश शक्यच नाहीं). तर निराश होण्याचें कारण काय? पुन्हां: ही महान् आकांक्षा केवळ दारिद्र्याचें मनोराज्य ह्मणून आम्ही स्वीकारली नाहीं. 'तुका ह्मणे आम्ही सुदैवाचीं बाळें।' यांत शंकाच नाहीं. तेव्हां हें करंट्याचें मनोराज्य नाहीं. समर्थ सद्गुरुंनीं ज्याच्या यशाची ग्वाही दिली आहे, असें हें महान व्रत आहे. 'पडो झडो परि वाढो तान्हे।' हेंच मातेचें प्रेम आमच्या सद्गुरुंचें आहे. त्यांची शक्ति तर अमर्याद आहे. ती आमच्या पाठीशी उभी आहे. आम्ही दुर्बळ असूं; पण आमच्यावर सद्गुरूंच्या जीवनाचें कलम केलें आहे. तेव्हां त्यांच्याच रसाचें व सत्त्वाचें आमचेंहि जीवन होईलच. त्यांनीं Potentiality (बीजरूपता) दिली आहे. त्यांची Actuality (अभिव्यक्ति) आम्ही करावयाची आहे. त्यांच्या कृपेनें ती होत आहे; पूर्ण होईल. पण 'प्राप्तकाल घडी आल्याविण', हें घडत नाहीं. तोपर्यंत धीर धरावा लागतो, सबुरी ठेवावी लागते. हा देवाचा नियम आहे. तो पाळला पाहिजे. तोपर्यंत संघर्ष आहे; कष्ट आहेत. कष्टावांचून कांहींच मिळत नाहीं. मिळालें तरी

त्याचें महत्व वाटत नाहीं. म्हणून 'रात्रंदिन युद्धाचा प्रसंग, मन आणि मनासवें' आहे. तरी सद्गुरुनीं दिलेल्या नामाच्या बळें भावधीयांची तोंडे काळीं करतां येतील.

Your heroic attitude is contagious (आपली वीरवृत्ती इतरांना प्रेरणा देणारी आहे.) म्हणून सहज वरील वीर वृत्तीच्या वचनाचें स्मरण झालें. ती आपल्याला सादर केलीं. हे एकच पत्र कोणी वाचलें, तर यांत उद्धर्ष दिसेल. पण तसा तो नाहीं. दुर्बल देह–मन खचूं पाहतात. संतांच्या वचनांनीं त्यांना आश्वासून हृदयदौर्बल्य सोडण्याचा उपदेश केला म्हणजे तो उपयुक्त ठरतो. आपल्या मनाला प्रत्येकानें हें सांगावयाचें असते. तेच मोठ्यानें सांगितलें कीं सहज ऐकणाऱ्यालाहि उपयुक्त होतें.

आपला क्षेम समाचार कळवावा.

आपला

x x x

पत्र नं. २७

श्री

२४–७–६३

सा. न. वि. वि.

सध्या आम्ही येथें ज्ञानेश्वरी वाचतो. तेथें सर्वत्र एकच सूत्र दृष्टीस पडते. आत्म्याकडे वाटचाल व संसारांतून मुक्तता; या एकाच प्रक्रियेच्या दोन बाजू आहेत. पारमार्थिक ग्रंथ कोणताहि असो, हें मुलभूत तत्व-सत्य- सर्वत्र दृष्टीस पडणारच. 'प्रपंच ओसरो। चित्त तुझे पायीं मुरो'।।; हीच देवाकडे सतत वाटचाल. सध्यां अमानत्वादि सद्गुणांच्या विचारांचा भाग चालू आहे. त्यांत आत्मानुभवानें अहंपरभाव नष्ट झाल्यावर, अमानित्वादि सद्गुण

प्रगट होऊं लागतात. हें स्पष्ट केलें आहे. मांन, दंभ,अक्षमा, अहिंसा हीं जीवभावांतून–आपपरभावांतून–आपपर यांतून– जन्मास येतात; त्यांचे मूळच खुडल्यावर हीं कोठ्न उरणार? या तात्विक विवेचनाची साधकाला फार उपयुक्तता आहे. आत्मनिरीक्षण करीत जीवभाव किती शिल्लक आहे, हें त्यानें पहावें.मग देव कां दूर आहे, याचें उत्तर आपोआपच मिळतें. जीवभावांतील कांहीं आवडता भाग, आहें तसा ठेवून, आपण देव मिळवूं पाहतो. तें कसें घडणार ? जीवभावाबद्दलचा हा मोह नष्ट झालाच पाहिजे. प्रथम, बुध्दीनें तो नष्ट होईल, नंतर साधनानें व आत्मानुभवानें. परंतु हा मोह इतका सूक्ष्म व खोल गेलेला आहे, कीं त्याला दृष्टी पोहोंचत नाहीं व क्वचित् पोहोंचून त्याला धक्का लागला, तर जीव कासाविस होतो. हें साह–जिकच आहे; पण उपेक्षणीय मात्र नाहीं. प्रकृती बिघडल्यावर दुष्ट खाणें खावेसें वाटणें हें साहजिकच आहे, पण उपेक्षणीय नाहीं, तसें यावर उपाय ईश्वरा–वरील श्रद्धा सर्वस्पर्शी–सर्वव्यापी–करणें.बुध्दीनें 'माझ्या सर्व कल्पना चुकीच्या असणें शक्य आहे. माझें व माझ्या आप्तांचें हित, मी ज्यांत समजतो त्यांत आहेच असें नाहीं; नैतिक सिध्दांत म्हणून मी जे दृढ धरले आहेत, ते सत्य आहेतच असें नाहीं. मी अल्पज्ञ, अल्पबळयुक्त, मोहभ्रांत आहे. सत्य एक देवालाच कळतें. तो सर्वज्ञ, त्याचे अनंत गुण; तो सर्व समर्थ; त्याचे इच्छेनें जग चालतें; त्याला शरण गेलें कीं तो कृपा करतो इ. सर्व प्रकारांनीं I am Naught; Thou art, oh, Lord! '(मी कांहीं नाहीं; देवा! तूं सर्व कांहीं आहेस.)ही भावना जागृत ठेवून वाढवीत गेले पहिजे. नामस्मरण तर केलेंच पांहिजे. म्हणजे शरणागतीची वाटचाल हळूं हळू वेगवती होईल. गेले कांहीं दिवस हा विचार मनांत वरचेवर येतो,कीं ईश्वराचें भव्योदात्त अनंतत्व जितकें प्रत्ययास (बुद्धीच्या तरी निदान) येईल व स्मृती समोर राहील,तितकें स्वतःचें क्षुद्रत्व पटेल, अहंकाराची घृणा वाटेल व इतर लोकांशी स्वतःच्या गुणांची व स्थितीची तुलना करून, अहंकार वाढवून समाधान मानण्याच्या वृत्तीला आळा बसेल. ज्या परम विनम्रतेच्या वृत्तीचें वर्णन 'तुझें दारींचा कुतरा। नको मोकळूं दातारा।।' असें केलें आहे, ज्याला ख्रिश्चन तत्व

ज्ञानांत Creature feeling (क्षूद्रतेचा भाव) असें म्हणतात, ती येण्याला ईश्वराचें सर्वांगीण अनंतत्व बुद्धीच्या तरी प्रत्ययाला आलें पाहिजे. नाहींतर 'बैसूनि थिल्लरीं। बेंडुक सागरा धिक्कारी,' अशीच अवस्था होणार. कारण 'सागर नाहीं पाहिला, ना ठावा'–, मग माझें डबकेंच सागरापेक्षां विशाल ही वृत्ति जाणार कशी? भाग्यानें ईश्वरस्वरूपी सद्‌गुरुंचें दर्शन–स्पर्शन–संभाषण लाभलें आहे; त्याचें अनंतत्व बुद्धीला पटलें आहे. तेंच सतत हृदयांत धरणेचा प्रयत्न करीत, नामस्मरण करीत राहण्यानें योग्यती पारमार्थिक वृत्ती खास निर्माण होईल. अखंड जागृति मात्र पाहिजे, हेंच आपण ध्यानांत धरुं या

आपला

x x x

पत्र नं. २८

श्री.

९–१०–६३

सा. न. वि. वि.

मागील गुरूवारी ह. पा. शेवटचा अभंग (२७) सुरूं झाला होता. त्यांतील पहिले कांहीं चरण 'सर्व सुख गोडी। सर्व शास्त्र निवडी। रिकामा अर्ध घडी राहुं नको॥ लटिका हा व्यवहार। सर्व संसार। वाया येरझार हरीवीण॥ ------- रामकृष्ण संकल्प धरूनी राहि।------- इंद्रिया सवडी लपो नको॥'

विवेक–जागृति, वैराग्य उत्पन्न करण्याइतकी उत्कट जागृति, ही परमार्थाला अत्यंत अवश्य आहे. ही जागृति करून घेण्यासाठीं 'सर्व शास्त्रांचा विचार कर. अर्थात् थोर पुरुषांच्या वचनाचा विचार कर आणि खरें सुख कशांत आहे ते ठरव,' असें वर सांगितलें आहे. साक्षात्कारी पुरुषांच्या वचनांचा व उपदेशाचा विचार आवश्यक आहे. नाहींतर ऐहिक सुखापलीकडे

बुद्धी जाणारच नाहीं. फार तर सात्त्विक सुखापर्यंत ती पोहोंचेल, कारण ती तेथपर्यंत जाऊं शकते. म्हणून, उत्तम सुख कोणतें, हें ठरवितांना संतांचा उपदेशच मुख्यतः विचारांत घेतला पाहिजे. मग संतांनीं सांगितलेलें आत्मसुखच खरें सुख, इतर सर्व अडनांवांचीं सुखें, हें पटलें, तर मात्र 'रिकामा अर्ध घडी राहुं नको,' त्या 'सुखाच्या' प्राप्तीचा प्रयत्न क्षणभरहि विसरुं नको. जी गोष्ट मोलाची म्हणून पटते, बुद्धीला पटून मनांत उतरते, तिच्या प्राप्तीच्या प्रयत्नांत कोणी हयगय करीत नाहींच. परंतु बऱ्याच गोष्टी अशा असतात कीं, त्या बुद्धीला पटतात, किंबहुना लोकलाजेस्तव त्या चांगल्या आहेत असें आम्हीं म्हणतो, परंतु अंतरीचें प्रेम अन्यांतच असते. श्री महाराजांनीं एका पत्रांत म्हटल्याप्रमाणें " वरवर परमार्थावर प्रेम-भक्ति दाखवितो; परंतु अंतरीं विषयींच गोडी असते, म्हणून प्रयत्न तोटका पडतो." यासाठीं श्रवण-मनन-चिंतन, यांनीं अखंड श्रद्धा दृढतम करीत गेले पाहिजे. याला संतसंगती फार उपयोगी असते. संसार व्यवहार लटका, व्यर्थ येरझारा. येरझारा म्हणजे जन्म-मृत्युचे चक्र हा अर्थ सोडला तरी 'अपूर्ण कामीं मनहें विटेना।' ही येरझार नव्हे का? ही तर प्रत्येकाला पटली पाहिजेच. सुखाची उत्कंठा-मिळाल्यास तृप्ति-वीट-पुन्हां अल्पसुखाचीउत्कंठा-मिळाल्यास तृप्ति-वीट-असें चक्र,ही येरझार चालूंच आहे त्यांतून अपेक्षित इच्छा पूर्ण न झाली-आणि एकंदर वासनाराशींपैकी अपूर्णांचेच बहुमत असणार- तर होणाऱ्या यातना विचारूं नका. पुन्हा लोकांना ती निराशा दिसूं द्यावायची नाहीं. उपाशी पोटी मिशांना तूप लावून फिरावें लागतें. या सर्वांचा विचार केला तर त्याबद्दल थोडा फार निर्वेद उत्पन्न होऊन परमार्था बद्दल अधिकाधिक ओढ वाटूं लागेल आणि मग रिकामा वेळ जावूं नये अशी तळमळ लागेल.असें होणे म्हणजेच. 'रामकृष्णीं संकल्प' दृढावत जाणे. तोच सत्य, तोच आनंदाचें स्थान, त्याचेंच स्मरण करावयाचें; सारांश तोच एकमेव आश्रय.ही अनन्यता म्हणजे रामकृष्णीं संकल्प धरुन रहाणें. परंतु मनुष्य इंद्रियांच्या सवडी लपतो **Finds excuses** (सबबी काढतो) 'देह आहे,देहाला हें नको काय?' असें म्हणुन 'हे' चे क्षेत्र इतकें विस्तृत-विशाल करतो कीं त्यामुळें देवाला जागाच राहात नाहीं. ही आत्मवंचना तो करतो.

'साधक-संवाद'

ती करु नको असे, ज्ञानेश्वर सांगतात, हा महत्त्वाचा इशारा आहे-देहाला 'हे' पाहिजे खरें, पण ते Minimum कर, Maximumकरुं नको. निर्वाहापुरतें अन्न-आच्छादन किंवा 'एक शेर अन्नाचाड' हे Minimum चें स्वरुप 'एका दुर्भरा कारणें साहेबांस लोटांगण जाणें', त्यांतील दुर्भराचें हें Maximum स्वरुप. त्यांत मग Standard of Living, dignity of family, Taste and Culture(१)सर्व कांहीं आलें. प्रत्येक खरें आहे पण त्याचा Excess (अतिरेक) खोटा आहे. घातक आहे. Excess (अतिरेक) कडे सहजप्रवृत्ति आहे. तेव्हां स्वतःला MINIMUM(किमान) कडे आधीच खेचणें हा Golden mean(सुवर्ण मध्य) साधण्याचा एकमेव उपाय आहे. इकडे क्षेम आहे. पत्र यावें.

(१)उच्च जीवनमान, कुलाचें मोठेपण, संस्कृतीची उंची

आपला

x x x

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
...... दि: ......
...... नों दि: ......

पत्र नं २९

श्री

१५-१०-६३

सप्रेम न. वि. वि.

स्वामी विवेकानंदांच्या कर्मयोगांतील एक सुंदर विचार--

"मनुष्यानें परोपकारादि सत्कर्म निष्कामपणें करावें, तें स्वतःचे लाभासाठीं म्हणजे निरहंकृति व दया, नम्रता, आपणांमध्यें निर्माण व्हावीं म्हणून; आपली सद्‌गुण-वृद्धी करून आपल्याला परमार्थाला योग्य करण्याची ही संधी देवानें दिली व ज्याच्या उपयोगी आपण पडतो तोहि त्या संधीचा एक घटक झाला, म्हणून दोघांबद्दलहि-ईश्वर व उपकृत व्यक्ति-आपण कृतज्ञता

धरावी, त्याचें उपकार मानावें. उपकार केल्याचा अभिमान तर घातकच; कारण अहंकार नष्ट करण्यासाठीं जें करावयाचें, त्यानें तोच नेमका वाढला तर Remedy is worse than the disease (रोगापेक्षा औषधच घातकच) असें होईल.उपकृत व्यक्तीच्या दृष्टीनें पाहिलें तरी, आपले उपकार वस्तुतः व्यर्थ आहेत.त्याचें भवितव्य देवानें ठरविलें आहे, तूं नाहींस.तूं कांहींहि केलेस, न केलेंस तरी देव करील तेंच होणार आहे. अर्जुनानें मारण्यापूर्वी किंवा न मारण्यापूर्वीच कौरव मेलेलेच होते. अर्जुन निमित्तमात्र होता. त्याचप्रमाणें, प्रत्येक कार्यांत,जगाचे हिताच्या दृष्टीने तूं निमित्तमात्र आहेस. तुझ्या अध्यात्मिक हिताचे दृष्टीनें मात्र तुझ्या कार्याला महत्व आहे.तुझें हिताहित भल्या-बुऱ्या कार्यामुळें होईल ह्मणून चांगलें कर्म कर. मात्र जगावर उपकारासाठीं नव्हे–स्वात्महिताय." कर्ता ईश्वर आहे, परंतु आपलें अात्मिक हिताहित करण्याचें स्वातंत्र्य त्यानें मनुष्याला दिलें आहे.या दोन सिद्धांताच्या Rock bottom (अभेद्य) पायावर वरील उपदेश आधारित आहे. स्वामी विवेकानंद आणखी ह्मणतात, "विश्व पडूं लागलें आहे. आणि त्याला तूं दोन हातांनी सांवरणार वा बुडविणार असें नाहीं. Carlyle म्हणतो त्या प्रमाणें take care of thyself and leave the world to its maker (स्वतःचें खरें हित पहा; जगाची काळजी देव घेईल.) याचा अर्थ स्वार्थी हो, small (लहान) नव्हे.तर परमार्थदृष्टया big (मोठा स्व) हो.मोठा स्वार्थ परोपकाराशिवाय घडूंच शकत नाहीं. त्यांत परोपकार अंतर्भूत आहेच; मग कोणी तो actively (क्रियाशीलतेनें) करील, कोणी Passively (तटस्थतेनें) करींल. कारण निस्वार्थता प्राप्त करून घेण्याच्या प्रयत्नांत परोपकार घडेलच." सारांश श्री भाऊसाहेब महाराजांनीं एका पत्रांत म्हटल्याप्रमाणें "दुसऱ्याच्या सुखसंतोषाकडे लक्ष असलें म्हणजें आपल्या स्वतःच्या लाभ–तोटयाकडे मन जात नाहीं." हा परोपकाराचा फायदा आहे.

वरील विचार जर सतत मनापुढें राहिले तर उपकृत व्यक्तीच्या आचरणाचा मनुष्य विचारच करणार नाहीं. मग त्यानें उपकार जाणलें

नाहींत म्हणून रागावणें अगर त्याला तुच्छ लेखणें दूरच राहो. मग परोपकार संतापाला कारण न होतां, परमार्थोपकारक होईल. कर्मयोगाच्या कल्पनेंत हे सर्व विचार अंतर्भूत आहेत. पण इतक्या स्पष्टपणें मांडलेले माझ्या पाहण्यांत नव्हते. साधारणतः कर्म-योगाचें सिद्धांत सांगतांना "कर्माचा जगाला किती उपयोग" इकडेच लोकांचें लक्ष असतें.'ईश्वरकर्ता' ही भूमिका फारच थोड्यांची असते. वादांत 'ईश्वरकर्ता' हें मान्य करतील; पण त्यांचा heart beat (खरीभावना) मानवकर्ता हेंच सांगत असतो. म्हणून कर्म-योग हा मानवांच्या पलीकडें पाहीनासा झाला आहे. त्यासाठींच The कर्मयोग of Geeta was-theo-Centrico (गीतेच्या कर्मयोगाचा पाया ईश्वर आहे.) असें. गुरुदेवांनीं लिहिलें असावे. क. लो. अ. ही वि.

आपला

x x x

ता. क. श्री. xxx व श्री. xxx यांचीं पत्रें आली. परमार्थाला अनुकूल प्रारब्ध घेऊन आलेल्या या मंडळींना आपण योग्य मार्गदर्शन केलें याबद्दल त्यांना फार कृतज्ञता वाटते. आपण तें स्वात्महितासाठींच केलें; पण ते कृतज्ञता मानतात. यांत त्यांचाहि नैतिक लाभ आहे.

नं ३० पत्र

श्री

२१-१०-६३

सविनय न.

आज श्री. ××× एक निष्ठावंत साधक येथें आहे. आपलीं दोन्हीं पत्रें त्यांना दाखविली. आपण त्यांना लिहिलेलीं पत्रें त्यांनीं मला दाखविलीं.

एका गोष्टीबद्दल तळमळ म्हणजे दुसऱ्या गोष्टीबद्दल निर्वेद हें सहजच

आलें. जो पर्यंत इतर गोष्टींत रुची आहे, तो पर्यंत तळमळ होणार नाहीं. मनाला दु:ख नको; तें पटकन् सुखद गोष्टीकडे वळेल; म्हणूनच, 'प्रपंच–परमार्थ संपादीन दोन्ही। एक हि निदानीं न सांपडे।।' असें म्हटलें आहे. प्रपंच करण्यांत मन फार गुंतलें, कीं त्याला परमार्थाची गोडी कमी, हें उघड ठरतें. गोडी वांचून कोणतें कार्य होऊं शकेल? प्रपंच सहज होईल तेवढा करूनहि–सहज करून-प्रारब्ध योगानें तो चांगला होईलहि; परंतु, 'मी प्रपंच संपादीन,' हा अभिनिवेश आला कीं परमार्थ कमी पडणारच. कारण मुख्य जीवनमूल्य प्रपंच ठरलें तें आतां बुद्धीनें तरी कमी झालें आहे, होत आहे. सत्यत: बुद्धीनें तें कमी झालें, कीं मनांतूनहि तें कमी होऊं लागतें व मनबुद्धि मागे अहंकार जातो, या नियमानें तें अहंकारांतूनहि (जवळ जवळ–Sub-Conscious) (अर्धज्ञातमन) दूर होऊं लागते. ती प्रक्रिया सुरूं झाली आहे, तिचा टेंपोहि वाढतो आहे व या प्रमाणें प्रपंचांतून रिकाम्या होण्याऱ्या वृत्तीला नामस्मरणाचें काम मिळत आहे. सर्व चांगलेंच आहे. 'जिंकावा संसार। येणें नांवें तरी शूर।। येर काय ती बापुडी। चिर अहंकाराची घोडी।।' या कडक निर्भर्त्सनेनें आपल्या डोळ्यांत अंजन नाहीं का घातले? प्रपंच्याच्या बाबतींत (We have caught a Tarter.) (आपण त्याच्या पूर्ण पाशांत पडलो.) तो आपल्याला सोडीत नाहीं; मन त्यानेच व्यापलेले असते व तें करूं म्हटलें तरी रिकामें होत नाहीं. पण आम्ही मात्र, 'तें काम आम्ही स्वेच्छेनें करतो,' असें मानतों, तें Voluntary (ऐच्छिक) असते तर स्वेच्छया सोडतां आलें असतें. कां सुटत नाहीं? आम्ही अहंकाराची घोडी म्हणून. देह भावाचाच प्रभावी पैलू-झोप, आजार वगैरे-येतो व पहिले विचार घालवितो. म्हणून दुसरा धनी, पहिल्या धन्यापासून हा गुलाम बळजबरीनें घेतो. गुलामाला मात्र वाटतें, कीं स्वेच्छेनें गेलों. हें आतां सर्व समजूं लागलें आहे, गुलामगिरीचा कंटाळा आला आहे. तेव्हां योग्य मार्गानेंच सर्व चालूं आहे. भविष्यकाळ आपला आहे. तरी त्याला भूतकाळाचीं बंधनें आहेतच. तीं सोडण्याचें कार्य नामस्मरण, विवेक, संत-संगती–यांनीं होत आहे. कार्य सूक्ष्म, मोठें, कालावधी लागणारे आहे, हें ध्यानांत ठेवलें, म्हणजे निराशा होण्याचें कारण नाहीं.

'साधक–संवाद'

Understanding and sympathetic (जाणता व सहाननुभूतियुक्त) मित्र प्रवास किती झाला पहातात; किती राहिला आहे, इकडे पाहत नाहींत. त्यांना कापलेलें अंतर स्पष्ट दिसत आहे. वरील दोन गुण नसणाऱ्यांना तें दिसणार नाहींत. त्यामुळें आम्ही निराश होण्याचें काय कारण? तळमळ चढती-वाढती आहे, हें चांगलेंच आहे. 'ज्ञानास मूळ अग्नी' किंवा झिजेपर्यंत आच सोसलीच पाहिजे. अर्थात् आपण त्याला सिद्धच आहांत. परवां. . श्री.–यांनी ज्ञानेश्वरीतील एक ओवी सांगितली, ती याच अर्थाची. 'देवाबद्दल आर्ति (आर्तता) देखील विषयांचा विसर पाडते. ती आर्ति देखील एक प्रकारे सुखदायकच आहे. क· ही. वि.

आपला

x x x

नं ३१ पत्र

श्री

६–११–६२

सप्रेम सादर नमस्कार

"अतां होई माझे बुद्धींचा जनिता। आवरावें चित्ता पांडुरंगा" ।।

हा. सा. प. दु. पृ. ८९ वरील पहिला चरण साधकांना फार उद्बोधक आहे. कळतें, पण वळत नाहीं, अशा साधकांना' दीर्घ काळ राहणाऱ्या व पुनःपुनः येणाऱ्या अवस्थेंत देवाला विनवून, सर्व दोष तूंच दूर कर, असें सांगणें याशिवाय दुसरा मार्गच उरत नाहीं. स्वतःचे प्रयत्न अपुरे पडतात, प्रयत्न कसें करावे, कां करावें, हेंच कळत नाहीं; तेव्हा देवाला शरण जाणें येवढाच मार्ग उरतो. मानसशास्त्राच्या दृष्टीने यांत निरहंकार आहे. त्याचप्रमाणें देवाचें अखंड स्मरणहि आहे. तेव्हां अवशतेने आलेली ही प्रवृत्ति साधकाला फार उपयोगी पडते. ही वृत्ति दृढ झाली कीं त्याच्यावरचा भार उरतला.

'साधक-संवाद'

मग मनांत विकार येतात याचीहि तळमळ त्याला फार वाटणार नाहीं.भार देवावर टाकल्यामुळें देवाचें स्मरण सतत राहीलच. तें राहिलें नाहीं, तर भार त्याच्यावर टाकला असें होतच नाहीं,त्याच्यावर भार टाकून आपण नामस्मरण सोडून इतर गोष्टीत रमून जावयाचें, प्रपंचांत गढून जावयाचें,हें अर्थातच अभिप्रेत नाही.

तें करणें म्हणजे प्रपंचातील ताण (Pressure) दूर करण्याचा तात्कालिक उपाय असा शरणागतीचा अर्थ होईल; हा तर क्षुद्र Escapism होय. देवाचें अखंड चिंतन, इतर सर्व गोष्टी बद्दल अनासक्ति, हें ध्येय ठरवून, तें आचरणांत आणण्याचा प्रयत्न करीत असतां, आपल्या दुर्बलतेनें कल्पना व वासना त्या कार्याच्या आड येतात; त्यामुळें मन त्रस्त होतें. या त्रासांतून सुटून पुन्हा नामस्मरणाकडे लागण्यासाठीं, कल्पना दूर करण्याचें कार्य देवानें करावें, अशी त्याची काकुळती करावयाची. तेवढाच भार हलका होतो. तो देवावर सोपविण्याची सवय वाढत जाते. अहंकार ओसरूं लागून नम्रता वाढू लागते. नैतिक अपूर्णतेच्या जाणिवेनें नम्रता आल्यावाचून कशी राहील? वरचेवर अशी काकुळती करावी लागते; म्हणून देवाशीं अधिक जवळचें जिवंत नातें निर्माण होतें. आतां, देव म्हणा वा गुरू म्हणा त्यांत भेद नाहींच "यथा देवे तथा गुरौ।" तेव्हां दुर्गुण–त्याग देवानेंच घडवून आणावा या भावनेंत व त्यासाठी केलेल्या काकुळतींत साधक–जीवनाच्या विकासाचा एक महत्वाचा टप्पा दृष्टीस पडतो, असें नाही कां? जीवन अखंड आहें, साधक–जीवनहि अखंड आहें. त्यातील प्रत्येक अवस्थेचा मागील पुढील भागांशीं असलेला संबंध समजला, तर साधनाला उपयोग होऊं शकतो. क्षेम समाचार कळवावा.

आपला

x x x

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५२२६
(स्थळ प्रत)

पत्र नं ३२

श्री

६-२-६३

सादर सा. न.

साधकाच्या मनांत कधी कधी फार निराशेचे विचार–पारमार्थिक जीवनाविषयीं–येतात. कधीं फार आशादायक वृत्ति असते. मागे १–२ वेळां लिहिल्याप्रमाणे फाजील निराशा व फाजील आशा दोन्ही परमार्थांत अंतराय होत. विचारी, आत्मनिरीक्षण करणाऱ्या साधकाला, या दोन वृत्तीपासून मुक्त होण्यासाठीं भिन्न भिन्न विवेक करावा लागतो. फाजील आशेच्या वेळीं आपल्या दोषांचा व गुरुदेवांच्या थोरवीचा विचार उपयुक्त होतो. निराशेच्या वेळीं काय करावें हा प्रश्न पडतो. अशाच निराशेच्या भरांत सावनसिंग महाराजाना एका साधकानें तळमळीनें पत्र लिहिलें आहे. त्यांत तो विचारतो, "माझ्या सारख्या नालायक माणसाला आपण शिष्य करुन घेतलेत तरी कशाला?" महाराजांचें उत्तर उद्बोधक, आशादायक आहे. त्याचा सारांश देत आहे. ते लिहितात.

"बाळा, नाम देण्यासाठीं व्यक्तीची निवड करतांना सद्गुरू कधींही चूक करीत नाहींत. ज्यांना निज घराला परत न्यावयाचें आहे, त्यानांच ते नाममार्गाचे मर्म सांगतात.

सद्गुरुचें कृपेचें पहिले लक्षण हें कीं त्या मुमुक्षूला ऐहिक जीवनांतील दैनंदिन चक्राचा निर्वेद, कंटाळा येतो, त्याबद्दल असमाधान वाटतें व सत्यशोधनाची उत्कंठा उत्पन्न होते. त्या कृपेचें दुसरें लक्षण म्हणजे त्याची व सद्गुरुंची भेट होते आणि तिसरें लक्षण असें कीं, ते त्याच्यावर कृपा करुन त्याला नाममंत्र देऊन कृतार्थ करतात. नंतर मुमुक्षूचा साधक होतो व तो अंतःकरणपूर्वक, श्रद्धेनें, साधन करुं लागतो. हें सद्गुरुंकृपेचें चौथें लक्षण ही सर्व लक्षणें तुझ्या ठिकाणीं दिसत असतांना, तूं स्वतःबद्दल अशी घृणा कां

बाळगतोस? नैराश्य कां अंगिकारतोस?

जगांत कामक्रोधादि वाटमाऱ्याबरोबर अज्ञानानें जीव आनंदानें संगति धरतो व स्वतःचा नाश करुन घेतो. या वाटमाऱ्यांना ओळखून,त्यांच्या–पासून मुक्त होण्यासाठीं ज्यानें सद्‌गुरुमार्ग धरला तो भाग्यवान होय. तो मार्ग तूं धरला आहेस. घरधनी आतां जागा झाला आहे, दक्ष आहे. त्यानें–नामानें–घर भरण्यास सुरुवात केली आहे. आतां त्या बाटमाऱ्यांना पळून जावेंच लागेल. श्रद्धेनें, नेमानें, नामस्मरण कर. सर्व विकार पळून जातोल. धीर धर, धैर्य धर. परमार्थात अपयश नाहींच. निजघराचा रस्ता माहीत आहे, रस्त्यानें चाल सुरुं झाली आहे, मग निजघरीं पोहोंचू यांत शंका कसली? ”

सर्वांना सा. न.

आपला

x x x

पत्र नं. ३३

श्री.

१९–२–६४

सा. न. वि. वि.

आपल्या पत्रांत माझ्या पारमार्थिक प्रगतीबद्दल आपण ईश्वराला प्रार्थना केलीत त्याला 'तस्थातु' म्हणून मीहि तशीच प्रार्थना करतों.

परमार्थाच्या सूक्ष्म पण दृढ सूत्रानें गुरुदेवांनीं आपणांला जोडले आहें. तें सूत्र अखंड दृढतर–तम होत जावो, हेंच त्यांच्याजवळ मागावयाचें आहें. त्यांत सर्व आलें.

परमार्थमार्गाला लागतांच 'मी–माझे' सोडण्याला सुरवात करावी

लागते व होतेही. परंतु खोल रुजलेल्या वासना, अपेक्षा, आकांक्षा यांना आघात होऊं लागला म्हणजे ' मी–माझें' टाकण्याचें कष्ट जाणवूं लागतात. ध्येयवादी मनुष्य प्राथमिक त्याग उत्साहानें करतो, त्यांतही कांहीं अभिमानाचा अंश असतोच. परंतु खणतांना भुसभुशीत मातीच्या खाली जाऊन क्रमानें मुरुम, खडक लागूं लागले म्हणजे जीव बेजार होतो, पूर्वीचा अल्पकालीन उत्साह मावळतो आणि साधक हतबुद्ध होतो. म्हणून प्राथमिक उत्साहाला फार महत्व नाहीं. त्यांत टिकाऊपणा किती आहे, त्यावर त्याचें मूल्य आहे. "विरळा पावे, विरळा पावे । अवघड गोवे शेवटींचे" ।। यासाठींच " केला नेम चालवी माझा " आणि " तुझें कृपें सिद्धी जावो, " अशी देवाला अखंड प्रार्थना करावी लागते. कांहीं आकांक्षा व अपेक्षा रेशमाच्या धाग्यांनीं बद्ध करणाऱ्या असतात. प्रथम, त्या सहज तोडूं असें वाटतें, पण तोडतांना भावना कळवळतात. बाह्य जगाला त्याचें महत्व कांहींच वाटत नाहीं. पण ज्याचें त्याला दुःख असह्य होतें; –अज्ञानानें–मोहानें, काष्ट कोरणारा भ्रमर कमलदल भेदूं शकत नाहीं, ही कवीची उक्ति जाणतच आहां. यावर मार्ग एकच.सद्गुरुंच्या वचनांवर दृढ श्रद्धा ठेवून,ईश्वर हें एकच मूल्य,त्याची प्राप्ति हें एकच ध्येय व नामस्मरण हें एकच कर्तव्य, या सत्यांची मनाला अखंड जाणीव देऊन, या सत्यांची चित्तांत अखंड जागृति ठेवून, अखंड नामस्मरण करीत राहण्याचा प्रयत्न करणें. दुसरा उपाय नाहीं. सत्संगति अत्यंत उपयोगी आहे. तरीही नामस्मरण स्वतःच करावयाचें आहे. वरील उल्लेखिलेलें रेशमी मायापाश तोडण्याचें कष्ट एकटयानेंच सहन करावयाचें आहेत. " एका पाउलाची वाट । कुणा सांगावा बोभाट ।। " ते तोडल्यावर मात्र स्वकीयांसकट स्वतःला शांति लाभेल, यांत शंका नाहीं. कारण, मग साधक भूतदयेनें सर्व करतो, तेथें " ममता " नसते. स्वतःचें सुख हा हेतु जाऊन इतरांचें सुख हा हेतु उरतो.

क्षेम कुशल कळवालच.

आपला

x x x

' साधक–संवाद '

पत्र नं. ३४

श्री

४-३-६४

सा. न. वि. वि.

आपल्या कन्येचा विवाह उत्कृष्ठ स्थळीं ठरला या घटनेचा पारमार्थिक दृष्टया, ईश्वरावरची श्रध्दा वाढून, सर्व त्याच्यावर सोपविण्याला, शरणागतीला मन अधिक तयार व्हावें, असाच झाला पाहिजे ना? तसा आपणा उभयतांचा होत असेलही; परंतु तो तसा झाला पाहिजें, या दृष्टीनें जागरूक राहून मनाला शिकवण दिली पाहिजे. अशी महाराजांच्या पत्रांत सदैव शिकवण आहे. देवाची कृपा प्रत्ययाला आली कीं कृतज्ञतेनें अहंभाव कमी होऊन, भक्ति व शरणागति वाढली पाहिजे. नाहींतर प्रपंचांत आणखी मग्न होण्यामध्यें यशाची परिणती होईल. हें दैवानें दिलें आहे, यांत हें 'underline' करावयाचें नसून 'देवानें दिलें' हें underline (अधोरेखित) करावयाचें आहे. या कृपेमुळें विवेकानें वैराग्य-वाया जें आहे त्यावर राग-व विरक्ति (वीर्य धरून युक्तीने काम करणें) हे गुण वाढविले पाहिजेत. प्रपंचांत राहून ईश्वरचरणीं मन ठेवल्यानें, अलिप्तता आली पाहिजे. कारण 'तो सर्व करतोच आहे;' हा विश्वास वाढण्याला आणखी एक उदाहरण झालें. प्रपंचांत प्रत्येकाला चिंता आहेच. ती देवाच्या पायीं बांधलीं कीं आपण भक्ति करण्याला मोकळें होतो. एकनाथांनीं भल्या भल्यांना धडक देणाऱ्या एडक्या मदनाला असेंच सद्गुरू पायीं बांधून टाकलें. चिंता त्या एडक्याचीच कन्या आहे. ती जबरदस्त आहे. "फिकिर सबको खा गई। फिकिर सबका पीर"॥ तिलाही सद्गुरु चरणीं बांधून टाकलें पाहिजें. नाहींतर गुरुकृपेचा परिणाम, मागणीचा Que लावण्यांत होईल व बहुतेकांचा होतोही. परंतु 'प्रपंच आधींच नासका,' तो ज्यांना विवेकानें नेटका करावयाचा आहे, ते त्यापासून दूरच होऊं पाहतील. प्रपंच-परमार्थ

दोन्ही ईश्वरकृपेनें चांगले होतात, हा सिध्दांत–अगदीं सत्य सिध्दांत– मानवाच्या दुर्बलतेची दखल घेऊन सांगितला आहे. दोन्ही उत्तम करणें हा आदर्श नसून compromise or concession (तडजोड वा सवलत) आहे. चार्टर नव्हे. चार्टर ‘नर करणी करे तो नारायण होय’ व त्यासाठीं ‘बध्यो बधिक पण्यो पुण्य जल उलटी उठायी चोंच” हा आदर्श.

आपला.

x x x

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

पत्र नं. ३५

श्री

११–३–६४

सा. न. वि. वि.

सावनसिंगजी महाराजांच्या एका पत्रांत लिहलें आहे:– “ परमार्थ ज्याचा त्यानें करावयाचा आहे. येथें ज्याचा तो, Every one unto himself (ज्याचा तो वाली) कारण अंतर्मुख होऊन विषयचिंतनाच्या ऐवजी, नामस्मरण करणें, चित्ताचा ओघ बदलून तो ईश्वराकडे वळवीत राहणें, पुढें नाद तेज वगैरे अनुभव येऊ लागल्यावर मन त्यांना जोडणें, त्याचें अनुसंधान करणें, हें दुसरें कोण करणार? ज्याचें त्यानेंच हें केलें पाहिजे.” इतरांकडून मार्गदर्शन होईल, अडचणी दूर करण्याविषयी सूचना मिळतील. अनुकुल वातावरतण मिळेल. पण प्रत्यक्ष ध्यान व अनुसंधान स्वतःच करून, हळुहळु जीवभावाचा शिवभाव करीत राहिलें पाहिजे. या साठीं सर्व दृष्टींनीं विचार करून ईश्वरप्राप्ती हें एकच जीवनमूल्य हा निश्चय झाला पाहिजे. सद्गुरुवर श्रद्धा ह्मणजे त्यांनी सांगितल्या प्रमाणें २–३ वेळां नामस्मरण करणें व पथ्य पाळणें, येवढीच पुरी होत नाहींत. हेहीं आपल्या हातून होत नाहीं; इतकें करणारेही श्रेष्ठ, हें मला मान्य आहे. पण तात्त्विक

दृष्टीनें पाहता सद्‌गुरुंचें जीवनमूल्य तेंच आपलें जीवनमूल्य झालें पाहिजे. ह्मणजे श्रद्धा बृद्धिनिष्ठ व प्रभावी ठरेल. मग बुद्धी, भावना, क्रियाशक्ति–ह्मणजे अखिल जीवन–ती श्रद्धा व्यापून टाकील. बुद्धीनें ईश्वर हेंच जीवन–मूल्य ठरल्यावर त्याबद्दल व त्याच्या प्राप्तीच्या साधना बद्दल प्रेम–भक्ति निर्माण होईल,व will (इच्छा शक्ती) तें कार्य अविश्रांतपणें करीत राहील.श्रद्धेचें स्वरूप असें खोल व विशाल आहे. ह्मणून श्रद्धेला इतकें महत्व आहे. "ठेवी जाणीव गुंडून। येथें भावचि कारण।।" यांत, केवळ जाणीव पुरी पडत नाहीं, तिची परिणती भावांत व क्रियेंत–साधनांत–झाली पाहिजे. हें सांगावयाचें आहे. सारांश सद्‌गुरुवर श्रद्धा व प्रेम ह्मणजे गुप्तरूपावर श्रद्धा व प्रेम होय सावनसिंगजी महाराज हेंच सांगतांत–शद्बधुन–अनाहतनाद हें सद्‌गुरुंचे खरें स्वरूप, त्याला चिकटुन राहणें ही सद्‌गुरूंची खरी सेवा, समर्थाचा स्वरूपीं राहणें हा स्वधर्म, शंकराचार्यांची भक्ति ह्मणजे स्वरूपानुसंधान...

पत्रोत्तर यावें

आपला

x x x

पत्र नं ३६

श्री

२५–३–६४

सा न. वि. व.

आपण फार अस्वस्थ झालेले दिसता; पण संयम राखला पाहिजे.

"तुज दिला ह्मणतो देह। अजुनी वागवितो संदेह ।। ऐसा विश्वास घातकी । घडली कळतां हे चुकी" ।। असें सर्वांचेंच. केलेला निश्चय टिकत नाहीं. घरांतील गोष्टी सर्वांना सुखाच्या होतील, त्याप्रमाणें करण्याची त्यांना स्वतंत्रता द्यावयाची, स्वतःला त्यात अमूकच व्हावें अशी उत्कंठा

असण्याचें कारण नाहीं, असली तरी तिला पायबंद घालावयाचा; हें ठरल्यावर त्याप्रमाणें सर्व होऊं द्यावें. परंतु तेंच नेमकें करतां येत नाहीं. अहंकार व पूर्वसंस्कार आड येतात. हीच सावध राहण्याची वेळ आहे. येथें विवेक व नामस्मरण यांचा आश्रय घेतला पाहिजे. त्यावांचून दुसरा मार्ग नाहीं.

प्रपंचांत जें व्हावें असें आपल्याला वाटते तें तरी निश्चित उत्तम आहे कां? तें उत्तम आहे असें आपल्याला वाटतें, पण त्या मताच्या सत्यतेला प्रमाण काय? असें स्वतःलाच प्रश्न विचारले म्हणजे अस्वस्थता कमी होते. sense of proportion (तारतम्य) जागृत होते. आतांपर्यंत आपल्या इच्छे-विरूद्ध गोष्टी घडल्या असतील; त्यावेळीं या घटनेमुळें नुकसान होणार असें वाटलें असेल. पण तसें झालें का? बहुधा नाहीं. कालाच्या उदरांत चांगलें, वाईट, सर्व सपाट, समान होत असतें. याचाच अर्थ त्यांना चांगलें–वाईटपण आपल्या कल्पनेमुळें आलेलें होतें. ती कल्पना ओसरली, त्याबरोबर चांगले–वाईटपणाची तीव्रता ही गेली. काल हा दुःखाचा वैद्य आहे; पण आपण त्याच्यावरच कां अवलंबून रहावें? पुन्हां, कालानें एक दुःख हलकें केलें, तरी दुसरीं तेथें उभी राहतात. विवेकानें मात्र सर्व दुःखांतून मुक्तता होते; आपण स्वतंत्र होतो. " सर्वं दुखं विवेकीनाम् ।" त्यामुळें ईश्वर या दुःख–रहित वस्तूशिवाय इतर कशाचीही तो चिकित्सा करीत नाहीं. सर्वच गोष्टी सारख्याच उपेक्षणीय म्हणून तिकडे पाठ फिरवितो. तेंच यथाशक्ति प्रत्ये–काला करावयाचें आहे; आणि करणें शक्य आहे.

तें केलें नाहीं आणि न करण्याला कांहीही सबब मनाला सांगि–तली तरी त्यापासून होणारा मनस्ताप चुकणार नाहीं. Nature's (God's) laws are inexorable (निसर्गाचे (देवाचे) कायदे क्षमा कर–णार नाहींत.) तेव्हां अटळ गोष्टी टाळण्याचा प्रयत्न करण्यांत अर्थ नाहीं.

'साधक–संवाद'

शक्य तितका सतत विवेक जागृत ठेवून नामस्मरण करणें हेंच श्रेयस्. पत्रोत्तर येईलच.

आपला

x x x

पत्र नं. ३७

श्री

१०-३-६४

सा. न. वि. वि.

"इंद्रियांची दीनें। आम्हीं केलो नारायणें"। या उक्तीचें स्मरण वारंवार होतें. दाह झाल्यानें, मला झोप येत नाहीं. Insomnia (अनिद्रा) हा गुरुदेव वर समजत. झोंप न आली कीं नाम चांगलें होतें ही त्यांची दृष्टि. बाबा म्हणत, "देह मेलें तर मेलें". रात्रीं २ वाजतां एका शिष्याला आपल्याबरोबर पाणी पी असें ते म्हणालें, "मध्येंच उठावें लागेल म्हणून मी पीत नाही," असें त्यानें सांगितल्यावर श्री बाबा म्हणाले, "अरे, जागे व्हावे, झोप फार लागू नये म्हणून तर पाणी प्यावयाचें, उठलें कीं नेमाला बसावें." विनोदच पण किती उच्च. जीवनाची दृष्टिच किती परमार्थमय. आम्हाला मात्र त्यांचा हा उपदेश म्हणजे, "रोटी नहीं मिलती तो घी शक्कर क्यों नहीं खाते"; असा वाटतो. ते 'परमार्थी' म्हणून राज्यधारी; आम्ही परमार्थ नाहीं. म्हणून भिकारी.

एकदां डेक्कन कॉलेजमध्ये रे. टिळकांचें व्याख्यान झालें. ते त्यावेळीं 'ख्रिस्तायन' लिहीत होते.परंतु लोकांच्या भेटीचा त्रास होऊन कालव्यय होई. त्याचा उल्लेख करुन ते म्हणाले. "मला कांहीं महिने सरकार तुरूंगांत टाकील तर बरें होईल, ख्रिस्तायन पुरे करण्याला एकांत मिळेल". गुरुदेव व्याख्यानाला हजर होते. ते रात्रीं म्हणाले, "ह्यांना ख्रिस्तायन पुरें करण्यासाठीं वेळ

हवा म्हणून कारावासही पत्करण्यास ते तयार आहेत' मग नेमासाठीं एकांत मिळावा म्हणून तीव्र मुमुक्षूला किती तळमळ लागत असेल?" गणिताच्या–नियमानें अर्थ कळला. पण तीव्र मुमुक्षुतेचा अनुभव नसल्यानें त्या तळमळीचें Psychological contents (मानसिक स्वरुप) मात्र दिसलें नाहीं असो.

"उपजला भावो।तुझे कृपें सिद्धीं जावो"।। ही काकुळती करणें हेंच आमचें भांडवल. सर्वांना नमस्कार.

आपला

x x x

पत्र नं. ३८

श्री

८–४–६४

सा. न. वि. वि.

माझी प्रकृति साधारणच आहे. उन्हाळ्याचा त्रास मात्र नाहीं. अमरावतीस महारोग्यांची सेवा–संस्था पहाण्यास गेली होतो. तें कार्य अन–मोल आहे. तेथें परमार्थ व सेवा हा प्रश्न चालकांनीं अतिनम्रपणें काढला. हें सर्व लिहिण्याचें कारण हें कीं, त्यांच्या त्यागाचें, कार्याचें, भूतदयेचें महात्म्य पूर्णपणें पटून देखील व व्यक्तिशः आपल्यापेक्षां ते थोर आहेत, आपलें जीवन स्वार्थी व सुखलोलुप आहे, याची पूर्ण जाणीव असूनही, परमार्थं हेंच उच्चतम जीवनमूल्य याबद्दल क्षणभरही संदेह निर्माण झाला नाही. त्यांना हें आग्रहानें सांगितले नाहीं; कारण त्याचा उपयोग नव्हता; तसें सांगण्याचा अधिकारही नाहीं. पण अंतःकरणांत यत्किंचित्ही संदेह निर्माण झाला नाहीं. श्री बाबुराव म्हसकर एकदां म्हणाले त्याप्रमाणें "In actuality I am nothing but potentially I am every

thing" (साध्य कांहींच झालेलें नाहीं, पण बीजरूपानें सर्व कांहीं आहे.)

अर्थात्, परमार्थ हें ध्येय अत्यल्प प्रमाणांत साध्य केलेलें असलें, तरी तें ध्येय उच्चतम होय यांत शंका नाहीं. या त्यागी पुरुषांचे सर्व सद्‌गुण आम्ही आदरानें अंगीं आणले पाहिजेत, हें खरेंच आहे. ते लोक परमार्थाकडे वळले तर त्यांचे कार्यही अधिक चांगले होईल, त्याना परमार्थहि लाभेल. तेव्हां हें कार्य व परमार्थ यात विरोध किंवा संघर्ष नाहीं. परमार्थाचा कोण-त्याही चांगल्या गोष्टीशी विरोध असणें शक्य नाहीं असे त्यागी, परमत्यागी लोकही मनाला विरंगुळा म्हणून काव्य, शास्त्र, विनोद, कांहीं social life (सामाजिक जीवन) इत्यादि गोष्टींचा आश्रय करतात; व त्यांत अयोग्य कांहीच नाहीं. त्या ऐवजीं देवाचा आश्रय केला म्हणजे त्यांच्या जीवनांत परमार्थ आला. परमार्थाला किती पूर्ण त्याग करावा लागतो, त्यांत त्याग हाच स्थायी भाव (ऐहिक मूल्यांच्या दृष्टीनें) आहे, हें याव-रून दिसून येईल. परमार्थी मनुष्य सर्व गोष्टी देवाच्या प्रेमाच्या भूमिकेवरून करतो." आत्मनस्तु कामाय सर्व प्रियं भवति ।" ही त्याची धारणा असते. देवाशिवाय विरंगुळा मिळविण्याचें स्थानच त्याला उरत नाहीं, व कार्यही तो देवाच्या प्रेरणेनें करतो. संस्थाचालकांचीं वृत्ति अत्यंत निरहंकाराची आहे. बुद्धीनें जितकें निरहंकारी राहतां येईल तितकें राहण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. तरीहि परमार्थ साधनानें येणारी निरहंकृति elimination of the self ('मीं'चा त्याग) ही उच्चतम आहे. 'आहे ऐसा कांहीं आठवचि नाहीं' अशी ती अवस्था आहे. " मजहि शरण रिघिजे । आणि जीवित्वेचि असिजे । धिग्बोली इया न लजे । प्रज्ञा केवी ॥" हा संतांचा बाणा आहे. या सर्व गोष्टीबरोबर 'कर्ता देव, सुखदुःख तोच निर्माण करतो, त्याच्या इच्छेनें होईल तेंच होणार, मी निमित्तमात्र, ही त्याची भूमिका असते. या तत्त्वज्ञानाचा उपयोग आपल्या स्वार्थाचें समर्थन करण्यासाठीं करावयाचा नाहीं, तर परमार्थाचें मूल्य दृष्टीआड होऊं नये, येवढ्यासाठीच करावयाचा. नाहीं तर 'निरूपणमिषें निंदा

चडे ' असें होईल. नसलेला मोठेपणा स्वतःकडे घेण्याचें पाप घडेल. क.

आपला

x x x

पत्र नं. ३९

श्री

२८-७-६४

सा. न. वि. वि.

परमात्मप्राप्ति हें साध्य. त्या अवस्थेंत अहंकार, देहात्मभाव, विषयवासना यांचा पूर्ण अभाव असतो व ईश्वराच्या प्राप्तीनें ईश्वरत्व लाभून सर्वात्मभाव, 'मीच विश्व ही अनुभूति निर्माण होते. या अवस्थेकडे साधकाला हळुहळु जावयाचें असतें. अर्थात् साधकाला जे गुण अवश्य म्हणून सांगितले आहेत, त्यांचा हेतू वरील निरहंकार-निर्विषय-सर्वात्मभावाकडे त्याला नेण्याचा आहे. त्या सद्‌गुणांत ही तीनही साध्यें अंतर्भूत असली पाहिजेत. या दृष्टीनेंच भगवद्‌गीतेंत ज्ञानाची, भक्ताची लक्षणें, दैवी संपत्ति, त्यांत सद्‌गुणांचा निर्देश केला आहे. अमानित्व, अदंभित्व, नीतिमानता यांनीं 'अहंकार' -'मी'-कमी होतो. वैराग्य, तितिक्षा, क्षमा, आसक्ति यांनीं वासना कमी होतात. आणि दया, समता, दान, करुणा, अहिंसा यांनीं सर्वात्मभावाची वृत्ति वाढते. तत्वज्ञान, अध्यात्मज्ञान, भक्ति यांची प्रत्यक्ष ईश्वरप्राप्तीला जरुर आहे. असा सद्‌गुणांच्या ध्येयाशीं कारण-कार्य संबंध आहे.

सत्य-असत्य तात्विक दृष्टीनें कांहींही अर्थ असला तरी मनुष्याला प्रत्यक्षांत सुखदुःख सत्य आहे; म्हणून सुखदुःख देणारे जग येवढेंच त्याला सत्य आहे. त्याच्या भोंवतींच त्याचें मन फिरत असतें. Conversely (उलटपक्षीं) जग खरोखरच असत्य, असार आहे हा अनुभव हवा असेल, तर त्याच्याशी असलेला सुखदुःखाचा, सोयर सुतकाचा संबंध सुटला

पाहिजे. वैराग्याचें महत्व येथें होतें. सुखाचा संबंध जगाऐवजीं देवाशी जडला पाहिजे; म्हणजे देव सत्य व जग असत्य झालें. तोपर्यंत तो केवळ बौद्धिक सिद्धान्तच राहील. क. ही वि.

आपला

x x x

पत्र नं. ४०

श्री

८–१२–६४

सा. न. वि. वि.

मनाला सतत परमार्थपर विचारांत गुंतवून ठेवणें म्हणजे भक्ति किंवा गीतेंतील यज्ञ. गुरुदेव सांगत त्याप्रमाणें यज्ञाच्याही गुणवत्तेप्रमाणें प्रति किंवा पायऱ्या आहेत, व या सर्व पाय-यांचा अवलंब साधकाला रोज करावा लागतो. कारण, मनाचें चांचल्य, त्याची उच्चतम पायरी म्हणजे स्वरूपानुसंधान,नादानुसंधान,नामानुसंधान.यांत प्रत्यक्ष देवाचा हातच साधक धरतो.ही कांहीं प्रमाणांत–एकाग्रतेच्या प्रमाणांत–अद्वैत भक्ति.हिची उत्कटता वाढवीत अभेद दर्शनाचें शक्य तें उच्चतम शिखर गांठावयाचें आहे, अर्थातें येथेही approximation (वाटचाल) आहेच; म्हणूनच भक्ति हा शद्ब तरी वापरतां येतो,असो. परंतु या रूप, नाद, नाम–अनुसंधानाच्या भूमिकेवर राहातां येत नाहीं. गुरुदेव देखील म्हणाले कीं,अखंड नेमांत राहतां येत नाहीं, मग त्याच्या खालची भक्तीची पायरी श्रवण-किर्तन, नंतर पूजन, पादसेवन, वंदन, दास्य यांपैकी एक एक अवलंबावी लागते. कारण, त्यांचा अप्रत्यक्षपणें कां होईना देवाशीं संबंध आहे, देवाकडे पाठ फिरविली जात नाहीं. ही सर्व सगुणभक्ति, अनुसंधान ही निर्गुण भक्ति. सत्संगतीत परमार्थचर्चा हिचाही श्रवण–कीर्तनांत अंतर्भाव होईल. याप्रमाणें सर्व जीवनाची व्यवस्था

ईश्वरोन्मुख राहण्याच्या दृष्टीनें साधकानें केली पाहिजे. आणि हेंच आपल्या आदर्शानें सर्व संतांनीं उपदेशिलें आहे.

श्री भाऊसाहेब पहाराज, बाबा, गुरुदेव यांचें जीवन असेंच आखलेलें होतें. नेम, नंतर पोथीवाचन, नंतर पोथी सांगणें वा सिटिंग, पुढें भजन यानंतर, अगदीं अवश्य तेवढा व्यवहार संपविल्यावर, पुन्हा दुपारचा नेम–भजनादि हाच कार्यक्रम व रात्रींही तोच. यामुळें त्यांचे १०–१२ तास ईश्वरोन्मुख वृत्तींत प्रयत्नपूर्वक जात असत व त्याचा परिणाम **Reaction** **(प्रतिक्रीया) or Inertia** उरलेले १२ तास रहात असे. १२ तास परमार्थांत नेमभजनादि सर्व कार्यांत गेले, म्हणजे २४ तास परमार्थांत गेल्याप्रमाणें होतात असें श्री भाऊसाहेब महाराजांचें वचन श्रीगुरुदेव सांगत असत. हा आदर्श आमचे पुढें ठेवून महाराजांनीं आपणांवर किती उपकार केले आहेत! क. ही. लो. उत्तर येईलच.

आपला

x x x

पत्र नं. ४१

श्री

२३–१२–६४

सा. न. वि. वि.

श्री xxx व श्रीxxx या दोन निष्ठावंत सूज्ञसाधकाकडे आपण जाणार असाल तेव्हां मी अवश्य येईन त्यांच्या संगतीचा सर्वांनाच फार उपयोग होईल.

विवेकी व निष्ठावंत सज्जन साधक असें त्यांचें वर्णन करतां येईल. कंपनी फार मोठी नसावी, तशी फार लहानही नसावी–म्हणजे अगदीं

दोघांचीच. कारण त्यांत चर्चा फार वेळ टिकत नाहीं. फार मोठी असल्यास चर्चेला अनिष्ट फाटे फुटतात.

देहभावाचा व अभिमानाचा विसर अशा संगतींतच पडूं शकतो; व त्याची आवश्यकताहि मनाला पटते. तुकारामानीं स्वतःच्या मनाला "फजित-खोरा मना" या सार्थ नांवानें संबोधून बाह्य गोष्टीतून मन काढून देवाकडे लावण्याचा उपदेश केला आहे. त्यांतही "योगीराज एका ठिकाणीं बसून रहात नाहींत कां? मग तूंच असें सारखे फिरत कां रहावेस?" असा प्रश्न विचारला आहे.साधकांच्या संगतींत मन निरभिमानी रहातें.या अनुभवावरून-ही तें निरभिमानी होणें शक्य आहे; मन देवाने भरण्याची युक्ति मात्र साधली पाहिजे, हें कळून येतें. मन देवानें भरणें,हें पारमार्थिक व नैतिक जीवनाचें मुख्य सूत्र आहे. साधक–संगतींत तें अनायासें होतें. कर्मयोगाचा उपदेश करतांनाही ज्ञानेश्वरांनीं, " मन आत्मस्वरुपी ठेव, आत्मसुख अंतरीं विसंबू नको व फळाशा सोडून कर्म कर ; " असा, Positive–Negative (विधी-निषेधरूप) बाजू दाखवून, उपदेश केला आहे.बरेच लोक कर्मयोगाची व नीतीचीही spiritual positive बाजू लक्षांत घेत नाहींत. केवळ Negative सांगतात. पण व्यवहारतः साधकाला नुसती Negative कशी आचरावी ही अडचण येतेच.तेव्हां देवानें देह भरणें हें मुख्य कार्य आहे, हें सतत लक्षांत ठेवलें पाहिजे. नाहींतर, त्यांतल्या त्यांत चांगल्या विचारांनीं वाईट विचार टाकणें,परोपकारार्थ स्वार्थ टाकून कर्म करणें,येथपर्यंतच पोंचतां येईल. ईश्वर–प्राप्तीचा संबंधच त्यांत येणार नाहीं.ती केवळ नीतीं म्हणूनच अपूर्ण राहील. "देवाचें निर्माल्य, कोण शिवे त्यासी", अशी परमार्थाचें एक साधन हीं एक भूमिका सोडून अन्य दृष्टीनें देहाबद्दल पूर्ण उपेक्षा, भक्ति-वाचून करतां येणार नाहीं. आणि या उपेक्षेंत सुध्दां,"देहाचे देव करील,तेंच माझ्या खऱ्या हिताचें," ही डोळस शरणागति आहे.

सर्व कुशल आहे.

आपला

x x x

' साधक–संवाद '

पत्र नं. ४२

श्री

२९-१२-६४

सविनय नमस्कार

आजचें अपूर्ण मानवी जीवन व ईश्वरप्राप्तीनें त्याला येणारी पूर्णता या दोन बिन्दूंना जोडणाऱ्या रेषेंत सर्व परमार्थाचे आचार विचार बसतात. हें अंतर सरळ रेषेंत गेलें तर सर्वांत कमी–अर्थात् अंतर कालानें मोजावयाचें आहे. परंतु अशा सरळ रेषेनें जाणारे ज्ञानदेव–महाराज, गुरुदेव क्वचित्. इतर तुमच्याआमच्यासारखे वळणें घेत, चुकत मार्गावर येत, उभें अंतर कापतात. चाल मैलांची होते, उभें अंतर फुटांचें तुटतें, याचें कारण "मी देह आहे" या चुकीच्या ज्ञानानें, अनुभूतीनें वाढलेला अहंकार व विषया–सक्ति, हे दोन शत्रू माणसाला केव्हां झपटतात, रेषेपासून दूर नेतात व दूरच रेंगाळत ठेवतात, तें कळून यावयाला वेळ लागतो. मग परत रेषेवर येऊन पुन्हां एखादें पाऊल टाकावें, तो पुन्हां या शत्रूंचा हल्ला आहेच. यांचे सैन्य अफाट व प्रभावी आहे. बरेच वेळां ते स्वतः न येताच सैन्यच पाठ–वितात. सर्व विकार, सर्व कल्पना, विकल्प व संशय हें त्यांचें सैन्य. यातील एकेकही दीर्घकाळ जिवाला अडकवून ठेवतो. त्यांत कांहीं हितशत्रु. ते जवळ आले कीं मित्र वाटतात पण कालांतरानें नाश करतात. मग उमजतें; पण पुष्कळ काळ व्यर्थ जातो. दर्पाला "विश्वासें मारितां रिपु" असें ज्ञाने–श्वरांनीं म्हटलें आहे. Self deception (आत्मवंचना) आत्मवंचना कराव–याला लावणारी प्रभावी शक्ति म्हणजे दर्प. तो नेहमी "आपले अवगुण गुण असें भासवितो." मोह हा देखील हेंच करतो. सुखलालसेनें केल्या जाणाऱ्या गोष्टींना तो कर्तव्याचें रूप देतो.

हें सर्व खरें असलें तरी नामाच्या रुपानें, या सर्वांना नष्ट करण्याचें शस्त्र, सद्‌गुरूनीं हातीं दिलें आहे. त्याचा उपयोग मात्र केला पाहिजे. बला–सारखा रिपूही ध्यानखड्गाचा घाव साहूं शकत नाहीं; अशी ज्ञानेशांची

प्रतिज्ञा आहे, ती पूर्णतः सत्य आहे. पराभव होईल,तो पत्करावा लागेल, परंतु अंतीं जय ठरलेला आहे, या श्रद्धेनें आणि धैर्यानें तो पराभव पत्करुन साधन सुरुं ठेवलें पाहिजे "England loses the battles but wins the war," (इंग्लड लढायांत हरतें पण महायुद्ध जिंकतें). हें साधकाचें ब्रीद वाक्य होय. या अर्थी कबीरांचें वचन चिंतनीय आहे. "उमगे दल बादल काम घटा। गुरु ग्यानका बान समालो।। कदली बनसे हाथी आया। दे अंकुस फिर मारो।। कहे कबीर सुनभाई साधो। तुम जीती बाजी हरो" वीरास लागणारे सर्व गुण आवश्यक पण तें ईश्वरप्राप्तीला वापरावयाचे; म्हणून वीराचें रुपक ज्ञानेश्वरांनीं योग्याच्या पारमार्थीक यात्रेचें वर्णन करतांना योजिलें आहे.
सर्वांना सा. न.

आपला

x x x

पत्र नं. ४३

श्री

१३-१-६५

सप्रेम सादर सा. न. वि. वि.

महाराजांच्या पत्रांत तिळगुळाविषयीं ३-४ उल्लेख आहेत. त्यांत नामस्मरणानें रज-तम कमी होऊन सत्त्वगुण वाढत जातो व शेवटीं सत्त्वही जाऊन निस्त्त्रैगुण्य लाभते, ही कल्पना आहे. विशेष म्हणजे, तत्त्वमसीच्या महाराजांच्या अर्थाप्रमाणें गुणानुरूप वर्ण-साक्षात्कार-वस्तूंत दिसतात व चित्तशुद्धि होत जाते, तसें ते वर्ण बदलतात, हा महत्वाचा सिद्धांत त्यांत आहे. हा इतरत्र कोठे पहावयास मिळत नाहीं. व्यावहारिक गोष्टी करीत असतांनाहि परमार्थजागृति देऊन शिष्याला हुषार करण्याचें कार्य करण्यास महाराज विसरत नसत, किंबहुना त्यांच्याकडून तें सहज घडत असें. इतके ते

पारमार्थिक जीवनाशीं एकरुप झाले होते. शिष्यांच्या ऐहिक सुखसमाधानाची ते व्यवस्था करीत असतच, पण त्यांचें लक्ष मुख्यत्वें शिष्याच्या पारमार्थिक उन्नतीकडे असें; कारण त्यांना पारमार्थिक जीवनच सत्य होतें इतर असत्य. “ जरि तव चरणीं चित्त न जडलें । जन्मुनि केलें काय रे ।” (गुरोरंघ्रिपद्मे) मनश्चेन्न लग्नं । ततः किं । ततः किं । ततः किं । ततः किं ।। श्री. शं.)

संक्रांतीच्या गोड सणाच्या दिवशीं आपणही आपल्या जीवनाचा व वस्तूचा वर्ण बदलून दोघांनाहि शुध्द सत्व बनविण्याचा प्रयत्न करूं, असा निश्चय करूंया. किती निश्चय केले, किती फसले, हें जरी खरें असलें, तरी पुन्हां करावें. थोडे दिवस तरी त्यांचा परीणाम म्हणून जोरानें साधन होईल, पुन्हां मंदावेल. पण मिळालें तेवढेच सई; नाहींतर इतकेंही घडलें नसतें. हा पुनः पुनः संकल्प सोडण्याचा उपयोग आहे. पूर्ण हातीं आलें नाही म्हणून अपूर्ण टाकणें चुकीचें आहे.भजन, प्रवचन, सप्ताह निंबाळचा वा इतर सत्संग या प्रसंगांत मन वरच्या पातळींत असते. परंतु ही “निरुपणीं झालेली सदबुध्दी” “ स्थल–त्याग होतां सवेंचि जातें”। हें खरें. तरीही, ती कायमची इतक्या वरच्या पातळीवर राहिली नाहीं तरी जीवनाची उंची थोडी कायमची चढते. म्हणून कोणत्याही निमित्तानें Battery re-charge (बॅटरी चार्ज)करणें चांगलें. पत्रें लिहिण्याचें कारणही महाराजांनी असेंच लिहिलें आहे, “ हा नरदेह पामर, याला विसर फार ” म्हणून सतत स्मरण–करणें-देणें (Remember) अवश्य असतें. जीवन स्मरणानें बदलतें व बदलावयाचें आहे. निश्चय करणें–जोरानें स्मरण देणें. सर्वांना सादर नमस्कार.

आपला

× ×

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

पत्र नं. ४४

श्री

२०-१-६५

सा. न. वि. वि.

ज्ञा. अ. १८ मध्ये कर्मांत राहून अलिप्त रहाणाऱ्या पुरुषांची लक्षणें सांगण्याच्या निमित्तानें संत्संगतीचें व संतचरित्र चिंतनाचें महत्व दाखविलें आहे. ज्ञानेश्वर ह्मणतात, "मुक्तांच्या लक्षणांचें चिंतन केल्यानें साधकाला आपलींच मुक्तता लाभते. आरसा घासून स्वच्छ केला कि आपलेंच मुख स्वच्छ दिसते. दिवा घेतला तर आपलीच हरवलेली वस्तु सांपडते; ह्मणून पूर्ण साक्षात्कार होईपर्यंत संत्संगती व संतगुण-चिंतन हा दिवा कधीच दूर करूं नये." किती खोल व उद्‌बोधक विचार आहेत हे! ईश्वरत्व आपल्या हृदयींच आहे. परंतु त्याची जाणीव नाहीं; ह्मणून त्याच्याबद्दल प्रेम नाहीं, त्याच्या प्राप्तीचा प्रयत्न नाहीं; असला तरी तो तीव्र, प्रभावी नाहीं. या अनिष्ट परंपरेचा दुवा-आपल्या ईश्वरत्वाचें अज्ञान किंवा विस्मरण-हा तोडला तर यांतून बाहेर पडतां येईल. गुरुदेव सांगत त्याप्रमाणें 'साधकांत बीजरू-पानें ईश्वरत्व आहे, तें सद्‌गुरूंत व्यक्त रूपानें आहें.' तेव्हां संत व सद्‌गुरू यांच्या ठिकाणीं ईश्वराच्या भव्योदात्त पावित्र्याचा व आनंदाचा, सर्वभूती प्रेमाचा, विषय वैराग्याचा व निरहंकाराचा स्पष्ट प्रत्यय साधकाला होऊं शकतो. या सद्‌गुणांचे प्रभावी दर्शन त्याला होऊं शकते. ग्रंथ वाचून, किंवा संताखेरीज इतर चांगल्या मानल्या गेलेल्या व्यक्तीत, तें अस्पष्ट, अप्रभावी असतें. हें दर्शन दैवयोगानें प्रभावी ठरले, अर्थात् त्या गुणाबद्दल प्रेमादर उत्पन्न होऊन, हेंच जीवन मला पाहिजे अशी इच्छा-हीच मुमुक्षा-उत्पन्न झाली, तर मनुष्य परमार्थाला लागेल. परमार्थ-पथावरील साधकाला साधन करण्यांत उत्साह वाढत्या प्रमाणांत वाढूं लागेल. प्रपंचांत असल्यानें परमार्थाचें विस्मरण होते, त्याला मालिन्य येतें. तें दूर होईल, म्हणून

संताच्या गुणांचें चिंतन करावें, असें ज्ञानेश्वर सांगतात. उलट, साधकांच्या दोषांची चर्चा केली तर परमार्थाबद्दल अनादर वाटूं लागतो. स्वतःचा अहंकार वाढतों. साधनाची उपेक्षा होतें; म्हणून कोणाचेही गुणदोष न पाहणें हा अतिश्रेष्ठ सद्गुण असें एकनाथांनीं म्हटलें आहे. साधकांचे व संताचे दोष न पांहणें हे फार अवश्य. गुरुदेवांनीं कॉलेजमध्यें तुकारामांचा एक अभंग सांगितला होता, त्याचा आशय, " संताजवळ फार दिवस राहूं नये, त्यांचे गुणदोष दिसूं लागतील." (अज्ञानामुळें त्यांच्या जीवनाचें मर्म कळणार नाहीं, गुणदोष मात्र अंगी येतील.) " मग तया दोषा नाहीं परिहार। वज्रलेपाकार होऊ पाहे ।" उत्तर यावें.

आपला

××

पत्र नं ४५

श्री

२६–१-६५

सा. न. वि. वि.

एकनाथी भागवतांत शद्बज्ञान व अपरोक्ष ज्ञान यांतील भेद एका सुंदर मार्मिक दृष्टांतानें सांगितला आहे. एका गृहस्थाला आपल्याला पूर्वेला जावयाचें आहे हें माहीत असतें, 'मी पूर्वेला जात आहे, मला पूर्वेला जावयाचें आहे, असें तो सांगत असतो. पण दृग्भ्रम, दिशाभूल, झाल्यानें पश्चिमेला पूर्व समजून त्याची वाटचाल पश्चिमेकडेच सुरूं असतें. देहासक्ति व विषयासक्ति यामुळें अशी आत्मवंचना होतें व ती झालेली कळत नाहीं, कारण, शद्बज्ञानाचा, पांडित्याचा अभिमान होऊन, मला ज्ञान झालें आहे कीं नाहीं याचा संशयही येत नाहीं. तुमचें आमचें नेमकें हेंच होतें. नाहीं कां? अहंकार व सुखलोलुपता, असत्य जीवनमूल्यें, यांचा त्याग करावयाचा आहे हे आम्हांला

„मजतें, तसा त्याग आम्ही करीत आहों, असें वाटतेंही, परंतु कांहीं सूक्ष्म, सापेक्षतेनें उच्च, परंतु ईश्वर प्राप्तीच्या तुलनेनें असत्य, अशा सत्य–शिव–सुंदर या ऐहिक मूल्यांना आम्हीं चिकटलेले असतो. तीं अत्यंत हीन नसतात, हें खरेंच आहे. पण त्यामुळेंच त्यांचें मिथ्यात्व ध्यानांत येत नाहीं. गुरुदेव म्हणत असत. " Satan is dangerous when he appears in a saint's garb." (सैतान साधूचा वेष घेऊन आला तर तो घातकच ठरतो) तेंच नेमकें येथें होतें व देवाचा मार्ग त्या मध्येंच आडविला जातो. " अहंकार जितका सूक्ष्म तितका त्यागावयास कठीण, " हें गुरूदेवांचें वचन याच अर्थी आहे. म्हणून संतांचा व सद्‌गुरूंचा आदेश शद्बशः पाळणें, त्याचा अर्थ स्वतः करीत न बसणें, हे फार आवश्य आहे. कारण अर्थ करूं लागले की तो अनुकूल-सिंधूच्या आधारें केला जाण्याचा संभव फार. तेव्हां " सर्वं धर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज." हा एकच आदेश मानला पाहिजे. क. ही. वि.

आपला

× × ×

पत्र नं ४६

श्री

३–२–६५

सप्रेम नमस्कार

आदर्श नामस्मरण कसें असावें हें श्री. बाबा सांगत असत. अर्थात परमोच्च साक्षात्कारानें राग–द्वेष, हवे–नको इत्यादि द्वंद्वें नष्ट झाल्यावरच तें शक्य आहे. त्यांच्या शद्बातच द्वंद्वाचा नाश अभिप्रेत आहे. ते सांगत असत, " मी चांगला आहे याचें स्मरण असूं नये, उगाच नाम ध्यावें; मी चांगलें करतों असें स्मरण नसावें, वाईट करतों असें स्मरण नसावें,

उगाच नाम ध्यावे." यांत मी–माझें याचेंच विस्मरण अभिप्रेत आहे. पुढचीं पायरी म्हणजे गौरीशंकरचें शिखर. " मी नाम घेतों याचें स्मरण नसावें, घेत नाहीं याचेही स्मरण नसावे, उगाच नाम चालावें." हीच बाबांची उन्मनी अवस्था आणि श्रीगुरुदेवांचे " पहा तुकें भुंकविलें."

यांत प्रयत्न संपला. सहजता आली. सर्व वासना, कल्पना मी–माझे जळून गेल्यानें नाम बंद पाडणारें कांहीं उरत नाहीं. म्हणून तें अखंड राहतें. " ऊठत बैठत टूटत नाहीं, ऐसी तारी लागी." नाम व आत्मानंद हेच जीवन बनतें हें बाबांनीं शिकविलेलें ध्येय होय. क. ही. वि.

आपला

x x x

पत्र नं ४७

श्री

१०–२–६५

सा. न. वि. वि.

एकनाथी भागवत अ. १३ मध्यें " सत्त्वेनान्यतमौहन्यात् सत्त्वं सत्त्वेन चैव हि । " या प्रसिद्ध श्लोकावर सुंदर भाष्य आहे. पुढें सत्त्वोत्कर्षाचे उपाय सांगितले आहेत. त्यांचें चिंतन साधकाला फार उपकारक ठरेल. (अ. १३ श्लोक ४ वरील भाष्य पहा) ते उपाय :– " सद्‌गुरूचे चरण–तीर्थ हेंच पवित्र–पावन तीर्थ, त्याचे सेवन अर्थात गुरुभक्ति, संतांची संगती, श्रवण–कीर्तन यांत काळ व्यतीत करणे, जयंत्यादि महोत्सव साजरे करणें. (यांत आनंदानें संतसंगांत व श्रवण–कीर्तनांत, नामस्मरणांत काळ जातो. एरवी ही संधी लाभत नाहीं.) सद्‌गुरूपासून नाम–मंत्राची दीक्षा घेऊन, नामस्मरण करणें या एका दीक्षेनें अविद्येचा नाश होऊन साधक

मुक्त होतो. सद्‌गुरूचे ध्यान; सद्‌गुरु म्हणजे पंचभूतांच्या मुशींत ओतलेला ब्रम्हरसच. (गुप्तरूपगुरू) त्याचे अनुसंधान करावें. या ध्यानाचें पर्यवसान ईश्वरप्राप्तींत होतें. शैव-वैष्णव मंत्राचा जप, अर्थात् गुरुकडून मिळालेल्या नामाचा जप, " असे उपाय सांगून शेवटीं संस्कार हा संग्राहक उपाय दिला आहे. संस्कार याचा अर्थः- " मनांत संकल्प उठूंच देऊं नये, तो उठलाच तर विवेकाच्या बळानें ठेचून टाकावा, याप्रमाणें मन संकलपशून्य करावें-" " सदा सर्वदा मोकळी वृत्ति राहे." परमात्म्यावर निष्ठा ठेवून मनाचें संकल्प विकल्पादि व्यापार मोडून टाकावें. यासाठीं मन नामस्मरणांत व स्वरूपानुसंधांनांत गुंतवून ठेवावें. मनाला अर्ध घटिका देखील कल्पना करण्याला उसंत देऊं नये. श्री बाबाः- " श्रावणांत तुम्हांला कल्पना करण्याला उसंतच मिळूं नये असा कार्यक्रम ठेवतों. नामांवर नाम घ्यावें, मग कल्पना करण्याला फुरसतच मिळत नाहीं. वैराग्याच्या बळानें मन जिकावें. मनाच्या भयाने, ते इतरत्र भटकेल व आपला नाश करील या भीतीनें, नाम-चिंतन करावे. दासी मालकाच्पा वचनांत रहाते. त्याप्रमाणें मनाला स्मरणाच्या स्वाधीन करावें. इंद्रियांना नाना पदार्थ दिसलें तरी मनाला देवाशिवाय व नामाशिवाय कांहीं दिसूं देऊं नये. जागृति, स्वप्न, सुषुप्ति, सर्व अवस्थांत हरिस्मरण करावें. याचे नांव आत्मसंस्कार, या आत्मसंस्कारानें संस्कृत मन निमिषोन्मेषी हरिचिंतनांत ठेवावें. चालतां बोलतां स्वासोच्छासी सोऽहं वृत्तींत राहावे. हा स्वाभाविक स्मरणादर म्हणजे आत्मसंस्कार. "
सर्व क्षेम

आपला

x x x

पत्र नं. ४८

श्री

२५-२-६५

सा. न. वि. बि.

खरोखरीच श्रीमंत राजेसाहेबांचे ठिकाणीं परमार्थाला उपयुक्त असे अनेक सद्‌गुण होते विशेषतः "परांतरासी न लावावा ढका। ऐसे वर्म चुको नका।" आणि 'जे परांतरासी दुःख करी। जळो जळों ते वैरवरी।' ही समर्थांचीं वचनें जणूं कांहीं राजेसाहेबांची ब्रीदवाक्यें होती.

हा त्यांचा सद्‌गुणही भूतदयेचा परिणाम होता.एकूण सर्वात्मभावाचा निर्देश असलेले हे गुण, परमार्थाला फार उपकारक असतात. अमानित्व, अदंभित्व, अहिंसा, क्षमा, दया भूतेषु, इत्यादि ज्ञानाचीं लक्षणें म्हणजे जणूं, कांहीं देहतादात्म्यरुपी घन आवरणाच्या झिजलेल्या, झिरझिरत झालेल्या भागांतून बाहेर पडणारा सर्वात्मभावाचा, आत्मतत्त्वाचा प्रकाशच होय.

हा कार्यकारण भाव जरी अशा सद्‌गुणी पुरुषाला कळला नाहीं, तरी तो सत्य आहे. आणि त्याच्या पारमार्थिक प्रगतीला तो उपयोगी पडतो. त्याची मुमुक्षा तीव्र होते, यावरुनच त्याची सत्यता सिद्ध होते. हें वाचातप आचरतांना अहंकाराचा व गर्वाचा किती संयम करावा लागत असेल, आवड निवड, हवे नको, याचे कंगोरे किती बोथट व्हावे लागत असतील, हे सहज लक्षांत येण्यांसारखें आहे. या तपानें याप्रमाणें अहंकार व हवे-नकोपण यांचें काठिण्य विरुं लागलें म्हणजे प्रक्षोभ कमीं होतो,द्वेष-मत्सर कमी होतात, नेमाला अनुकूल अशी चित्ताची समता लाभते. म्हणूनच शेवटीं शेवटीं, परमार्थाची वाढती तळमळ श्रीमंत राजेसाहेबांचे ठिकाणीं स्पष्ट दिसे. स्वतःच्या परमार्थ-प्रेमामुळें त्यांनीं आपल्या ऐश्वर्याचा उपयोग अनेकांच्या परमार्थ विकासांसाठीं केला. याचेंच गुरुदेवांना कौतुक वाटे."ज्या ज्या मज कांहीं होतील बा शक्ति त्याही हा श्रीपती अलंकारू।।" अशा वृत्तीनें कांहीं प्रमाणांत ते वागले, हेंच तुम्ही आम्ही शिकावयाचे. पत्रोत्तर यावे.

'साधक-संवाद'

पत्र नं ४९

श्री

१०-३-६५

सादर नमस्कार

परमार्थांत आपण आत्मवंचना किती करतो याविषयीं एकाशी काल बोलणें निघालें होतें. सरळ मनाची माणसें देवानें जें चांगलें दिलें, सुख दिलें त्याबद्दल प्रामाणिकपणें त्याला कृतज्ञ राहतात, काहीं हवें असेल तर काकुळतीनें त्याचीं प्रार्थना करतात. दुसरीं आपल्या निष्कामतेच्या अभिमानांत, कांहीं चांगलें झालें तर तिकडे दुर्लक्ष केल्याप्रमाणें वागतात, त्याला किंमत देत नाहींत. देवाबद्दल कृतज्ञताहि निर्माण होत नाहीं. वस्तुतः ते निष्काम, विरक्त नसतात. तें न लाभलें तर त्यांना दुःखही होतें. परंतु आत्मवंचना होते; दंभ नव्हे. आतून चडफडत असतात. परंतु थोड्या प्रमाणांत त्यावर संयम ठेवूं शकतात. कांहीं हवें असेल तर देवाजवळ मागत नाहींत कारण ती सकाम भक्ति म्हणजे गौण. पण त्याच्या प्राप्तीसाठीं व्यवहारिक प्रयत्न चालू असतो. या आत्मवंचनेमुळें निष्कामतेचा, नसलेल्या निष्कामतेचा, अहंकार वाढतो. कृतज्ञतेनें येणाऱ्या चित्ताच्या मार्दवाला आपण मुकतो. या संबंधीं गुरुदेवानीच एकदां, प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणें सांगितलेला मधला मार्ग हा. "चांगलें झालें तर देवाच्याच कृपेनें, मागावयाचें तर देवाला, पण वाईट झालें तर माझ्या प्रारब्धानें, अंतीं माझ्या हितासाठीं, मागुन न मिळालें तर देवावर राग नाहीं, हे माझ्या हितासाठीं झालें, ही भावना", अशी वृत्ती असावी ह्मणजे आत्मवंचना, सकामतेची वाढ किंवा अकृतज्ञता, कोणताच दोष घडत नाहीं. नम्रता, कृतज्ञता, मार्दव, आत्मपरिक्षण हे गुण जोडतात.

साधकबंधुनी जो प्रेमाचा सद्भाव, जी आपुलकी दाखविली, त्यामुळें माझें मन कृतज्ञतेनें भारावून गेलें. ईश्वरच त्यांना त्याचें फळ देवो मी काय

देणार? देवालाही मी प्रार्थना करणार; एवढेंच माझें सामर्थ्य.

खुशालीचें पत्र यावें.

आपला

x x x

पत्र नं. ५०

श्री

१३–७–६५

सप्रेम सादर नमस्कार

कृतज्ञता हा फार मोलाचा गुण आहे. त्याला जपलेंच पाहिजे. अकृतज्ञता हा अभिमान–दर्पाचा प्रबल आविष्कार आहे. अर्थात् कृतज्ञतेचा उच्चार कारणपरत्वें होतो. उच्चार अवश्यच आहे असें नाहीं, परंतु तो कधींच झाला नाहीं, तर न जाणता कृतज्ञताही लोपेल, तिवा उच्चार करण्याची लाज वाटणें ही अकृतज्ञताच होय. उपकारकर्त्याला आपण केल्याचें स्मरण नसावें, हे योग्य व उत्तम; असा देणाराघेणाऱ्याचा धर्म आहे. अकृतज्ञता म्हणजे कृतघ्नतेच्या अलिकडील पायरी.

तुकारामानीं अव्दैत व खरें ब्रम्हज्ञान म्हणजे काय, हें एका अभंगांत सांगितलें आहे. साधन–प्रक्रिया व तिच्यापासून मिळणारा आनंद–नित्त्यानंद म्हणजे ब्रम्हज्ञान व अद्वैत. शद्वज्ञान निरूपयोगी, असें ते सांगतात. सहज लिहिताना तर्कशुध्द साधन प्रक्रिया कशी येतें, याचें साश्चर्य कौतुक वाटतें. स्वानुभवानें विचार अगदीं पक्व झाल्यानें, हें घडतें. इंद्रीयांचा जय, वासनांचा क्षय; त्यामुळें संकल्प करण्याचें कारण उरत नाहीं. मनुष्य निःसंग होतो, मी–माझे उरत नाहीं, हेंच चित्ताचें निर्मळपण; यानेंच चित्त निश्चळ होतें. अर्थात् यासाठीं अखंड नामस्मरण व अनुसंधान पाहिजेच, हेंच अभंगांत “राही रे निश्चळ,” “संकल्पावर येऊं नको,” या शद्वांत अप्रत्यक्षपणें म्हटलें

आहे. नाम–अनुसंधान यांवाचून चित्त अन्यत्र निश्चळ राहूंच शकत नाहीं. चित्ताला कशाचा तरी आश्रय घेतलाच पाहिजे. त्याला स्वतंत्र उभें रहातां येत नाहीं. देवाशिवाय इतर सर्व चंचळ, "अरे जो चंचळासी ध्यायील, तो चंचळचि होईल । जो निश्चळासी ध्यायील, निश्चळचि तो ॥" या समर्थांच्या वचनाप्रमाणें, निश्चळ राहण्यासाठीं देवाचें नामस्मरण व अनुसंधान हा एकच उपाय आहे. त्यानें साक्षात्कार होऊन चित्तांत 'आनंदाचा थारा" होईल. मग तो स्थिर आनंद हेंच साधकाचें स्वरूप होतें. दुसरें कांहीं, उरत नाहीं, त्रिपुटीचा लय होतो. हीं अनुभूति म्हणजे ब्रम्हज्ञान; हें अद्वय आहेच. याची सुरवात मात्र इंद्रींयांचा जय, वासनेचा क्षय आणि निश्चळाचें चिंतन यांत आहे. वासनाक्षय मुख्यतः नामस्मरणानेंच होतो ' परंतु विवेकानें इंद्रीयांना विषयनिवृत्त केले म्हणजे वासना कमी होऊं लागतात. त्यांच्या परिपूर्तीनें त्या वाढतात; ("न जातु कामः कामानां etc ।") शमदमानें कमी होतात. तेव्हां विवेक–वैराग्ययुक्त नामस्मरण हा "आनंदाचा थारा" करण्याचा उपाय सतत चालूं ठेवण्यानें खरें ब्रम्हज्ञान, अद्वैत लाभेल. दुसरा मार्ग नाहीं, असें तुकाराम सांगतात. सर्वांना सा. न.

आपला

x x x

पत्र नं. ५१

श्री

२९–६–६५

सा. न. वि. वि.

काल एक साधक ह्मणाले, "एखादी अडचण आली तर १–२ तास नेमाला बसल्यावर तिच्यातून मार्ग सुचतो. हें अगदी बरोबर कसें आहे हें मी त्यांना स्पष्ट करून सांगण्याचा प्रयत्न केला आणि त्यांना पटलेंहि.

'साधक–संवाद'

नामस्मरणाला बसण्यापूर्वी मनांत कांहीं विकार असतात. अडचण वाटते याचें कारण आळस, लोभ, मत्सर, द्वेष असा कांहींतरी विकार असतो. त्यामुळें जें करावयास पाहिजें तें करण्यास मन तयार होत नाहीं. कोणाला भेटावयाचें असल्यास अभिमान आड येतो. यामार्गातील अडचण दूर होण्या–सारखी नसेल तर चुकीच्या जीवनमूल्यामुळें त्या अडचणीचें महत्त्व वाजवी–पेक्षां जास्त मोठें वाटतें आणि आंता जणूं सर्वनाशाचा प्रसंग आहे अशी भीति वाटतें, कोणाचा तरी, त्या अडचणीला कारण ह्मणून, संताप येतो, मन विकार-युक्त झाल्यानें बुद्धिही नीट विचार करूं शकत नाहीं. मनाच्या विकाराचा तिच्यावर परिणाम होतो व त्यामुळें बुद्धीला चुकीचा निर्णयच योग्य वाटतो. जीवनमूल्य चुकण्याचे कारणहि पुन्हां विकारच. अभिमान, क्रोध, द्वेष, लोभ या विकारांमुळें प्राप्त अडचणीचें भय फार वाटतें. या विकारांच्या आहारी गेल्यामुळें, त्या अडचणी पासून होणारी हानी फार मोठी होऊन दिसते. मज्जातंतूचा विकार झालेल्या लोकांचें असें फार होते ना? नामस्मरणांत १–२ तास गेल्यावर विकारांचा जोर कमी होतो, ज्या चिंतनानें मनुष्य विकार वाढवित होता, त्याचा ओघ नामाकडे गेल्यानें विकार कमी होतात. त्यामुळें बुद्धिही शांतपणें विचार करूं शकते.

Mind is Purified, intellect is clarified, soul is Sanctified (मन शुद्ध, बुद्धि प्रसन्न व आत्मा दिव्य होतो) असें गुरुदेवांनीं भगवद्‌गीतेवरील ग्रंथांत ह्मटलें आहे. या प्रक्रियेला मनाच्या Purification पासून सुरवात होते. अभिमान, लोभ, क्रोध यांचा जोर कमी झाला कीं तारतम्यानें विचार करणें बुद्धीला सोपें होतें. विकार कमी होणें ही चित्त–शुद्धि, त्यामुळें विकाररहितपणें विचार करणें, ही बुद्धिची clarity. (प्रसाद) मग त्या अडचणींतून पार पडण्याला अवश्य तो प्रयत्न मनुष्य करूं शकतो. प्रयत्न–साध्य ती नसेल तर तिच्या परिणामाची योग्य कल्पना आल्यानें, ती सहन करूं शकतो. नामस्मरणांत विकारांचा जोर कमी होऊं लागल्यावर सद्विचारहि सुचूं लागतात. मागें ऐकलेली, वाचलेंली उपदेशपर वचनें

'साधक–संवाद'

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
... दि: ...
... नों: दि: ...

आठवतात, आणि बौद्धिक विचाराला त्यांचें साह्यच होतें. उच्च जीवन-मूल्यांच्या भूमिकेवरून त्या अडचणीकडे मनुष्य पाहतो. असा प्रभावी मानसिक पालट १-२ तासाच्या नामस्मरणानें तात्पुरता तरी होतो. "महत्वाचीं पत्रेंहि मी नेमांतून उठल्यावर लिहितो," असें गुरुदेव एकदां म्हणालें. त्याचेंहि रहस्य हेंच होय.नामस्मरण म्हणजे मनबुध्दीला घातलेलें स्नान होय.क.ही वि.

आपला

x x x

पत्र नं. ५२

श्री.

६-७-६५

सा. न. वि. वि.

मनुष्याला अनेक पातळीवरच्या प्रेरणा असतात; इंद्रियांच्या, मनाच्या, बुद्धीच्या, आत्म्याच्या. प्रत्येक प्रेरणा प्रभावी होण्याचा प्रयत्न करीत असतें. या प्रेरणा मनाला व देहाला विचार-आचार करावयाला लावतात. यांत आत्मप्रेरणा ही नैतिक दृष्टीनें उच्चतम होय. परंतु इतर प्रेरणा तिला प्रभावी होऊं देत नाहींत. अनेक वर्षांच्या, जन्मांच्या संवयीनें त्याच प्रबल बनलेल्या असतात. आणि त्यामुळें बौद्धिक प्रेरणा (विवेक) दुर्बल ठरते. "कळतें पण वळत नाहीं," ही अवस्था होते. बौद्धिक प्रेरणाहि, आत्मविचाराची जागृति होईपर्यंत अपूर्णच रहाते. कारण जीवनमूल्यांचे तिला अर्धवट ज्ञान होतें, आध्यात्मिक मूल्य दिसतच नाहीं, मग निवड करतांना तें विचारांत कसें घेतलें जाणार? सर्व पारमार्थिक साधन म्हणजे आत्मप्रेरणांना प्रबल करुन इतर प्रेरणा तिच्या आधीन ठेवण्याचे उपाय होत. इंद्रियांना, मनाला, बुद्धीला होणाऱ्या प्रेरणा आत्मप्राप्तीला उपयुक्त अशाच असल्या पाहिजेत. इतकी आत्मप्रेरणा प्रभावी होणें अवश्य आहे." धृत्या यया धारयते मनः प्राणेंद्रिय-

क्रियाः। योगेनाव्यभिचारेण सा धृतिः सात्त्विकी मता"।। या गीता वचनांत हाच विचार आहे. नामस्मरणाच्या दीर्घकाल अभ्यासानें ही धृति लाभते. नामस्मरणाला, श्रवण–मनन–निदिध्यास, यमनियम इत्यादिकांची जोडहि द्यावी लागते. नामस्मरण व या इतर गोष्टी यांत परस्परोपकारिता आहे. आपण सामान्यजन मात्र याच्या उलट वागतो. मन व बुद्धि यांच्या प्रेरणा इंद्रिय-प्रेरणाच्या साहाय्याला देतो. आत्मप्रेरणा तर 'भूमिगत'च झालेली असते, म्हणून जीवन मूलतः बदलणें अवश्य आहे. आत्मप्रेरणेचे हे शत्रु अखंड जागृत आहेत; तितकेच आपण जागृत राहिले पाहिजे. आजच्या प्रेरणा पूर्वसंस्कारांनीं बनलेल्या आहेत, त्याला उपाय नाहीं; परंतु मनुष्य ज्या प्रेरणेला साह्य करील ती वाढेल, हे स्वातंत्र्य मनुष्याला आहे. तेव्हां त्यानें भूतकालचा विशेष विचार न करतां भविष्याचा, आज काय करावयाचें त्याचा, विचार करून तें केलें पाहिजे. अर्थात् नामस्मरण न चुकतां दीर्घकाल करणें हाच मुख्य उपाय. त्यांत कर्तव्याचेंहि, ध्येयाचेंहि स्मरण, आहेच; जागृति आहे.
क. ही. वि.

आपला

x x x

पत्र नं. ५३

श्री

१४–७–६५

सा. न. वि. वि.

जीवाची उत्क्रांती कांहींशी राज्याच्या सारखी आहे. सार्वभौम राजा आपल्या सत्तेंतील कांहीं अधिकार व कर्तव्यें मांडलिकांना देतो. तो समर्थ आहे तोपर्यंत त्या अधिकारांचा वापर तीं कर्तव्यें करण्यांसाठीं केवळ केला

जातो. पुढे तो किंवा त्याचे वंशज दुर्बल झाल्यावर त्याचे प्रतिनिधी स्वतंत्रपणें ते अधिकार स्वार्थासाठीं वापरून आपलीं राज्यें स्थापतात. पेशवाई, मोंगलाई यांत हेच झाले.

इंद्रियें, मन, बुद्धि यांच्या प्रेरणा मूळच्या आत्म्याकडूनच आहेत. आत्मतत्त्वाशिवाय दुसरें कांहींच नाहीं. मग प्रेरणा दुसऱ्या कोठून येणार ? परंतु पुढें त्या प्रेरणा, हीं सर्व, स्वतंत्रपणें, आत्म्याचा हुकूम मोडून, आपल्या इच्छेप्रमाणें वापरूं लागतात. "इंद्रियांतहि वासना आहे," असें ज्ञानेश्वरींत स्पष्ट म्हटलें आहे. इंद्रियांना प्रत्येकवेळीं वासना मनाकडूनच घ्यावी लागत नाहीं. त्यांच्या सहजप्रवृत्ति म्हणजे कामना. त्या इतक्या प्रबल होतात कीं त्या मनाला खेचून आपल्या कार्यांत साह्य करण्यास भाग पाडतात. मनाचें सामर्थ्य कमी पडतें. "ऐसें बळकटपण आहे। इंद्रियांचें ॥" म्हणूनच यम.–नियम पाळण्याचा निश्चय करणाऱ्या मुनींनाहि त्या कासावीस करतात. विषयप्राप्तीची शक्यता कळतांच इंद्रियांचें बळ वाढतें, ते अप्राप्य असतील तर तें वाढत नाहीं; मग संयम सोपा होतो. यावरून "शिजेपर्यंत थांबता येतें पण निवेपर्यंत थांबणें कठीण."किंवा "What passes for morality is only absence of opportunity (मोहाचा प्रसंग येत नाहीं म्हणून चांगले राहणारेच फार) या म्हणी रूढ झाल्या आहेत. साधकाला यांचा आदेश हा, कीं इंद्रियें विषयांपासून दूर ठेव. मग मन त्यांना जिंकू शकेल. "Father, drag me not into temptation" (देवा, मला मोहांत पाडूं नको.) हीच साधकांची प्रार्थना असावी. "तोंवरी तोंवरी वैराग्याच्या गोष्टी। जंव सुंदर वनिता दृष्टि देखिली नाहीं ॥" हे विसरतां कामा नये. सर्वच मोहाना हा नियम लागू आहें. मोहापासून दूर राहिलें म्हणजे मन इंद्रियामागें खेचलें जात नाहीं. त्याला बुध्दि लगाम घालूं शकते. विवेक–वैराग्य समर्थपणें कार्य करू लागण्याला इंद्रियनिग्रहापासून–वैराग्यापासून सुरवात होतें. ही क्रिया सुरूं करावी ही प्रेरणा मात्र विवेकापासून घ्यावी लागतें. इंद्रियें–मन, बुध्दि जेव्हां एक आत्म्याचीच आंज्ञा मानूं लागतात–

निमित्त मात्र होतात–तेव्हांच परमार्थ नीट मार्गाला लागतो. अर्थात् हळूहळूच हें होतें. त्याची सुरवात नामस्मरणापासून होतें. संतांनीं दिलेलें नाम ही आत्मप्रेरणा आहे, ईश्वर प्रेरणा आहे. "संत ते देव, संत ते देव, निमित्तमात्र प्रतिमा." पत्रोतर यावें.

आपला.

x x x

पत्र नं. ५३

श्री

२१-७-६५

सप्रेम नमस्कार

आज आपण ज्या गोष्टी महत्त्वाच्या आणि चांगल्या मानतों, त्यांचा आपल्याला इतका मोह असतो, कीं "ईश्वरांसाठीं इतर गोष्टींचा त्याग करावयाचा, 'सत्यं–शिवं–सुंदरं' त्यांच्याकडे दुर्लक्ष करून नामस्मरणाकडे शक्य तितका वेळ द्यावयाचा, त्यापेक्षां अधिक महत्त्व कशालाहि द्यावयाचे नाहीं," ही कल्पना कष्टद वाटतें. 'दुर्विचार व दुराचार टाक' हें वचन कष्टद वाटत नाहीं. ते सुटत नसले, तरी त्यांच्या त्यागाचा उपदेश पटतो. आपणहि तसा त्यागाचा प्रयत्न करीत असतो, त्यांचे वर्चस्व आपणाला नकोसें वाटतें. परंतु ज्याला आपण चांगलें मानतो. –ज्याला ज्ञानेश्वर पुण्यात्मक पाप म्हणतात–त्याचा मोह सुटत नाही. याचें कारण उघड आहे. ईश्वरप्राप्ति हें या सर्वांपेक्षां किती मोठे, उच्च, भव्य, आनंदमय, पवित्रपावन ध्येय आहे, याची नीट कल्पनाच येत नाहीं. त्यामुळें लहान गोष्टीचेंच महत्व वाटतें. एकदां गुरुदेव म्हणाले त्याप्रमाणें "Small minds can understand only small things."

'साधक–संवाद'

(लहान मनांना लहान गोष्टींच फक्त समजतात.)' ज्ञानेश्वर म्हणतातः— " जो देव झाला नाहीं, त्याला देवच नाहीं,—देवाचें खरें अनंत स्वरूप त्याला कळत नाहीं.—मग तो भक्ति कशी करणार ? देव या नांवाखालीं तो दगडा धोंड्यांची, क्षुद्र देवांचीच भक्ति करूं शकेल. असें लहान गोष्टीचें महत्त्व कां वाटतें ? हें केवळ बौद्धिक अज्ञान आहे कां नैतिक दौर्बल्यहि आहे ? दोन्ही, पण नैतिक दौर्बल्य मुख्य. त्यानें बुद्धि मंदावते, तिला सत्यज्ञान होत नाहीं. विषयांचें महत्त्व कां वाटतें ? ते महान् कां वाटतात—आणि सत्यं–शिवं–सुंदरं शेवटीं सात्त्विक विषयच आहेत—याचें विश्लेषण ज्ञानेश्वरींत फार सूक्ष्म असें केले आहे. " इंद्रियांनीं वारंवार विषयांचा आस्वाद घेतल्यामुळें त्यांना ते महत्त्वाचे, मोलाचे वाटतात आणि त्यांच्या मोठेपणांचा डांगोरा इंद्रियें पिटतात." अर्थात् इंद्रियांना ते तुच्छ वाटलें म्हणजे त्यांचें महत्त्व सपलें. त्यांची तुच्छता शास्त्रें व संत यांच्या वचनावरून प्रथम बुद्धीला समजतें. तिनें तें लोण मनाच्या मार्फत इंद्रियांपर्यंत पोहोचवावयाचें असतें. हा साधनमार्ग होय. तो नेहमींचाच विषय आहे. एकाचें अमृत ते दुसऱ्याचें विष कां होतें, याचे कारण इंद्रियांच्या आवडींतील विविधता. दारु व गोमांस ख्रिश्चनला अमृत, ब्राम्हणाला विष. " Things are neither good nor bad; thinking makes them so. " (गोष्टींचा चांगलें वा वाईट स्वरूप मन देतें. वस्तुतः सर्व गोष्टी चांगल्या—वाईट कांहींच नसतात.) केवळ विचार नव्हे तर इंद्रियांची आवड–नावड त्यांना तशा करतें. विवेक–वैराग्य दोन्हीं परमार्थाला अवश्य आहेत, याचीं कारणें वरील सत्यें. एका बाजूनें " हें प्रेयस आहे पण श्रेयस नाहीं," असें मन–इंद्रियांना बुद्धिनें सांगत राहिले पाहिजे; हा विवेक; त्याच बरोबर will नें इंद्रियाँना विषयांपासून दूर ठेवून, त्याची आसक्ति आग्रहानें कमी केली पाहिजे. मग ती कमीकमी होऊं लागेल. ही दोन्हीं इंजिनें वेगवान झाली म्हणजे गाडी परमार्थावर प्रगति करूं लागते. तुमच्या आमच्याजवळ विवेक आहे, पण त्याला will चे साह्य पुरेसें नाहीं म्हणून वैराग्य गतिमान होत नाहीं;

' साधक–संवाद '

मंद राहतें. परमेश्वराची कृपा भाकणें ही सर्वांवर तोड आहे. तीच भाकूं या. मग तों " न्यून तें पुरतें " करीलच.

आपला

x x x

नं ५४ पत्र

श्री

११-८-६५

सा. न. वि. वि.

साधकांच्या सहवासांत साधनाचा जोर वाढतो, याचे कारण एका इंग्रजी ग्रंथात आले आहे. Man wants to expand, wants to belong to a group and transcend his personality by uniting with the group-consciousness. He feels strong and warm as a member of a group (मनुष्याला विशाल व्हावेसें वाटतें. एखाद्या संघटनेंचा घटक होऊन संकुचित व्यक्तित्वाच्या पलिकडे जावे असें वाटतें. अशा संघटनेच्या जीवनाशी एकरूप झाल्यानें आपण समर्थ व उत्साही झाल्यासारखें त्याला वाटतें.) हा मनुष्याचा स्वभाव धर्म असल्यानें देश,समाज, धर्म, जाती अशा एकाद्या group शीं तो एकरूप होऊं पाहतो. अर्थात् तो पारमार्थिक group शीं एक झाला तर त्या नैसर्गिक प्रवृत्तीचें समाधान होऊन देव जोडल; उच्चतम जीवनमूल्य साध्य होईल. group मध्ये जाणें, त्याच्याशीं एकरूप होणें, हें मानवी स्वभाव-धर्मामुळें अटळ आहे, पण त्यांत निवड करणें शक्य आहे. ती निवड करून संतसंगति धरावी. हा मार्ग संत दाखवितात. " मना संग हा सर्व संगास तोडी," असें सत्संगाचें वर्णन समर्थानीं केलें आहे. संग, आशा, कर्म, विचार सर्व बंधक आहेत. पण यांतीलच एक एक तोच बंध तोडण्यास

उपयुक्त नव्हे तर आवश्यक आहे. असा मौजेचा विरोधाभास मानवी जीवनांत आहे. अनुक्रमे सत्संग, निष्कामकर्म, देवाची आशा व देवाचा विचार (कल्पना) यावरील बंध तोडतात. बंध घालणाऱ्या शक्तीनेच त्यांतून मुक्त होण्याचा मार्ग बंधातच ठेवला आहे. मात्र बंधातून पार पडेल, त्यांनाच तो दिसतो, समजतो आणि त्यांच्याकडून इतरांना समजतो. अशी ही सतत प्रवाही योजना आहे. " Pure souls create of pure souls according to the universal Law of re-production", (निसर्गाच्या सामान्य नियमाप्रमाणें शुद्ध आत्मे शुद्ध आत्म्यांना जन्म देतात.) असें कोणीतरी ख्रिश्चन संतान ह्मटलें आहे. मानसशास्त्राचें संशोधन वाढेल तसें पारमार्थिक शिकवणीतील सिद्धांताचें आधिकाधिक स्पष्टीकरण होईल यांत शंका नाहीं क. लो. अ. ही वि.

आपला

x x x

पत्र नं. ५५

श्री

१७-८-६५

सा. न. वि. वि.

आपली प्रकृती बरी नाहीं हें समजून काळजी वाटते.

"भोगा आलें तें करितो। तुझें नाम उच्चारीतो ।। आतां माझ्या भावा। अंतराय नको देवा ।। " हीच आतां देवाला काकुळतीनें विनवणी करावयाची आहे. नामस्मरण भक्तिप्रेमपूर्वक चालावें, त्यांत व्यत्यय न येण्याइतकी प्रकृति बरी असावी, हें देवाशिवाय कोणाजवळ मागावयाचें? हे मागण्यांत त्याचें स्मरण, आणि तेंहि भावनापूर्ण, कळवळयानें, होतें. तेव्हां तेंच वरचेवर करणें योग्य आहे. एका काळीं, बरेच दिवसांपूर्वी, देवाजवळ कांहीं

मागावयाचें नाहीं ही वृत्ति होती. त्यालाही कारण होतें; वृथाभिमान नव्हे. देवाजवळ मागून त्यानें दिलें नाहीं तर कदाचित श्रद्धा ढळेल, म्हणून तीं वृत्ति धरली होती. परंतु पुढें त्यांतील दोष दिसून आला. देवाजवळ मागितलें नाहीं, तरी वासना असतातच. मग, "पडतां जडभारीं" देवाजवळच कृपायाचन केलें, तर त्याचें स्मरणहि होतें. व निंबरगी महाराजांच्या वचनांत म्हटल्या-प्रमाणें, इच्छेला अयोग्य वळण लागत नाहीं, त्यांतून मत्सरादि विकार निर्माण होण्याची शक्यता कमी होते. देव देईल वा न देईल परंतु इतर कोणीहि देऊं वा न देऊं शकत नाहीं, ही वृत्ति वाढली तर निराशेबद्दल इतरांना–माण-सांना–दोष देणें व मत्सर वाटणें ही शक्यता कमी होते. कर्ता ईश्वर, तोच देता, नेताही तोच, ही श्रद्धा वाढविली म्हणजे माणसांच्याकडे या बाबतींत लक्ष जात नाहीं. तुकारामांनी म्हटलें आहे, "स्त्री पुत्र बंदीजन । नारायण आठविती ।। " तहानभुकेच्या निमित्तानेंहि त्याचें स्मरण व्हावें, अशी वृत्ति वाढवावी, त्याबरोबरच न मिळालें तर त्यांत माझें अंतिम हित आहे; म्हणून त्या कृपाघनानें तें दिलें नाहीं, ही श्रद्धा वाढविली म्हणजे अश्रद्धा होण्याचा धोका टाळतां येईल. या विचारसरणीनें, काय मागावयाचें तें देवाजवळ, ही वृत्ति धरावी. सारांशः "आठवे देव तो करावा उपाय "।।

प्रकृतीविषयीं पत्रोत्तर यावें.

आपला

x x x

पत्र नं ५६

श्री

३१-३-६५

सादर सा. न.

सादर सा. न. वि. वि. आपणाला स्वप्नांत गुरुदेवांचें दर्शन झालें हा शुभयोग होय.

शरीर विकृतीमुळें पडणारीं स्वप्नें सोडलीं तर ती कांही तळमळ लागल्यावरच पडतात. उदाहरणार्थ परीक्षेच्या रिझल्टविषयी किंवा खुद्द परीक्षेबद्दल स्वप्नें, परमार्थाबद्दल तळमळ वाढून गुरूदेवांचें स्मरण जागृतींत उत्कटतेनें झालें म्हणजे स्वप्नें पडण्याची शक्यता होते. ही स्मरणाची उत्कटताच साधकाला वाढवावयाची असते. स्वप्न हें ती वाढत असल्याचें एक गमक आहे. अर्थात् त्यांचाच ध्यास धरावयाचा नाहीं. तुकारामांनीं एका अभंगांत म्हटलें आहे, "देवा स्वप्नांत देखील मला तुझें दर्शन होत नाहीं. असें कां?" "आत्मवत् पराव्यातें। लेखीत जावे ॥" हा परमार्थातील सिद्धांत सर्वमान्यच आहे. नीतिनिष्ठ नास्तिकहि त्याला नीतिशास्त्रांत मान्यता देतात. "Do unto others as them wouldst be done by them." (इतरानीं आपल्याशी जसें वागावें असें आपणाला वाटतें, तसें आपण इतराशीं वागावें) असें बायबल सांगतें. परंतु हें किती अवघड आहे, हें लवकर ध्यानीं येत नाहीं. चांगले introspeetion असेल तरच हें समजतें व तेंहि धक्के खाऊन झाल्यावरच.

आपला

x x x

पत्र नं ५७

श्री

६-४-६५

सादर नमस्कार

---- पुष्कळ काळ परमार्थांत घालवूनहि, परमार्थ कोणत्या मुख्य हेतूनें करावयाचा याविषयीं साधकांत गोंधळ आढळतो. मनानें देहभाव व प्रपंच यांतून सुटणें अत्यंत कठीण हें खरेंच; परंतु बुद्धीचा तरी यांतून सुटण्याचा निश्चय होणें परमार्थ साधनाला अवश्य आहे. परवा, सोलापुरांस एका साधकानें प्रश्न विचारला, "लोक म्हणतात परमार्थ करणारे दैन्य-दुःख भोगतात, न करणारे, नीतिहि न पाळणारें, ऐश्वर्यानंदांत असतात, मग परमार्थाचा काय उपयोग?" या प्रश्नाचें उत्तर आपल्याला माहीतच आहे. परमार्थ हा ऐहिक ऐश्वर्यांसाठीं नाहीं; त्यामुळें ऐश्वर्य मिळेल वा दैन्य जोडेल असा कार्यकारण भाव नाहीं. जनक-शुक दोघेही परमार्थी होते. त्याचप्रमाणें अ-परमार्थी, अनीतिमान, ऐश्वर्यांत वा दैन्यांत असेल, असाहि कार्यकारण भाव नाहीं. दुसऱ्या वर्गांतील कोणी ऐश्मर्यांत तर बरेच कारगृहांत आहेत. ऐश्वर्य वा दैन्य यांचें कारण सांगता येत नाहीं. येवढे मात्र निश्चित की साधकानें दोन्हीहि समभावानें लेखिलीं पाहिजेत.

परमार्थ हा उच्च, पारमार्थिक नित्यानंदासाठीं, ईश्वर प्राप्तिसाठीं, पूर्ण स्वातंत्र्यासाठीं करावयाचा असतो. एकमेव व उच्चतम ध्येय म्हणजे परमार्थ. त्याचें समीकरण दुसऱ्या कोणत्याहि ध्येयाशीं करणें चूक होईल. भक्तावर ईश्वर कृपा करतो,याचा अर्थ पारमार्थिक कृपा असाच केला पाहिजे. तो ऐश्वर्यहि देईल; पण त्याची आसक्ति वाढू वा वाटू देणार नाहीं. गुरुदेवांना शेवटच्या १५-२० वर्षांत चांगली सुस्थिति लाभली. बाबांचीहि,

स्थिती थोडी सुधारली. पण त्याचा उपयोग उभयतांनी केवळ परमार्थ वाढविण्यासाठीं केला, विलासासाठीं नाहीं. क. लो. अ. ही. वि.

आपला

x x x

पत्र नं. ५८

श्री

२८-४-६५

सप्रेम नमस्कार

आपण येथे असतांना कल्पनांची Intensity, frequency, duration. (उत्कटता, पुनरावृत्ति व कालावधि.) कमी झाली असे दिसलें तर ही पारमार्थिक प्रगतीच होय, हा विषय चर्चिला गेला. त्याचप्रमाणें वरचेवर, दीर्घकाल, जोरानें ज्या कल्पना येतात, त्यावरुन आपला कोणता विकार प्रभावी व म्हणून परमार्थाला घातक आहे, हें Introspection नें (आत्मनिरीक्षणानें) समजतें; असेंहि आपण पाहिलें. आपण गेल्यावर श्री xxxनी हीच चर्चा चालू ठेविली होती. त्यांनाही हे सर्व विचार उद्बोधक व परमार्थाला उपकारक वाटलें. या दृष्टीनें पूर्वीचा नेम व सध्याचा नेम यांतील फरक त्यांनीं सांगितला. "पूर्वी नेमांत एकाग्रता होण्यास वेळ लागे, आतां नेमास बसतांच नेमाकडे मन एकाग्र होते. कल्पना कमी तीव्र होण्याचा हा परिणाम आहे म्हणजेच पहिल्या सिद्धांतापासून निघणारा हा उपसिद्धांत आहे. गुरुदेव म्हणत असत, "आतां बैसत खेवों (नेमाला बसल्याबरोबर) सर्व कल्पना पळून जातात, व मन अनुभवांत व आनंदांत लीन होते." ज्ञानेश्वरांनी म्हटल्याप्रमाणें " इंद्रियांची कसमस मोडे.। मनाची घडी घडे। हृदयामाजी ॥" अर्थात गुरुदेवांचा उच्च अनुभव व त्याचा आनंद अखंड असे. त्यामुळें त्यांना 'बैसतखेवों' एकाग्रता जोडत असे तितकी एकाग्रता आपली होणें शक्य

नाहीं. तरी त्या दिशेनें अतिमंदगतीनें तरी वाटचाल सुरूं असली पाहिजे. कारण सद्गुरूंचे actual (व्यक्त) स्वरूप (पारमार्थिक अवस्था) हेंच शिष्याचे Potential बीजरूप आहे.त्या Potential ची actual च्या दिशेनें वाटचाल सुरू नसेल तर त्याला Actual होण्याची आशाच काय उरली? हें होण्याला शिष्याच्या सर्व जीवनाचीच वाटचाल सद्गुरूंच्या जीवनाकडे राहिली पाहिजे. जीवन बदलींत राहिल्यावाचून केवळ १/२ तास नेमानें पुरेशी प्रगति होणार नाहीं. जीवन व नेम यांच्या प्रगतींत, Reciprocal Causation (परस्परोपकारिता)आहे. क्षेम कळवावें.

आपला

x x x

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
.... दि: ....
.... दि: ....

पत्र नं. ६९

श्री

९-६-६५

सा. न. वि. वि.

गुरुदेवांच्या पुण्यतिथिच्या निमित्तानें खालील ओव्यां मनांत येणें स्वाभाविक आहे. "जे मुक्तीतें निर्धारितां। लाभे आपलीच मुक्तता। जैसी दीपें पाहतां। आपली वस्तु।। तैसें हरपले आपणपें पावें। तें संतातें पाहतां गिंवसावे। ह्मणोनी वानावे। ऐकावे तें।।" गुरुदेव एकदां ह्मणाले, The शिष्य is in potential what the गुरु is in actual." (सद्गुरु-मध्यें जे व्यक्त झाले आहे तें शिष्यांत बीजरूप आहे.) हाच सिद्धांत वरील ओव्यांत अभिप्रेत आहे.मनुष्य मूलतः मुक्त, ब्रह्म आहे,परंतु मायेनें तें ब्रह्मत्व झाकलें आहे. तें व्यक्त, उघडें करून घ्यावयाचें आहे. गुरु हें उघडें ब्रह्म आहे. तेव्हा त्याचा आदर्श पुढें ठेवूनच साधकाला त्यांच्यासारखे उघडे होता येईल.

'साधक-संवाद'

"संताना वानावे, ऐकावे" याचा अर्थ अखंड त्यांच्या जीवनाचें चिंतन करून, त्यांच्याशीं स्वतःच्या जीवनाची तुलना करावी, स्वतःचें जीवन त्या जीवनाशीं मिळतें- जुळतें, एकरुप, तत्सदृश कसें करतां येईल याचा सतत विचार करावा.हें न करतां केवळ स्तुति करीत म्हणजें स्तुतिस्तोत्रें पाठ म्हणत राहिले तर विशेष उपयोग होणार नाहीं. आपली मुक्ति हें लक्ष्य ठेवून प्रत्येक गोष्ट साधकानें केली पाहिजे. गुरुस्तवनही याच दृष्टीनें झाले पाहिजे. आपलें जीवन गुरुरुप करणें हीच मुक्ति. गुरुदेवांनीं नेमावलीच्या प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणें, शक्य तर गुरुच्या संगतींत राहून, एरव्ही त्यांच्या स्मरणग्रंथवाचनाने, त्यांच्या प्रत्येक कृतीचें सूक्ष्म अवलोकन करून, त्यांतील मर्म जाणून घेतले पाहिजे; त्यांत अंतर्भूत असलेल्या गुणांचे दर्शन घडलें पाहिजे. मग ते गुण अंगीं आणण्याचा प्रयत्न करतां येईल, तो केला पाहिजे. निस्पृहता, अनासक्ति, भुतदया, शिष्यप्रेम, साधनोत्कटता, निश्चय इत्यादि अनेक गुण त्यांच्या चिंतनाने जाणून अंगीं बाणविले पाहिजेत. मग या गुणांच्या सहाय्यानें साधन केल्यावर आत्मप्रचीति लाभेल व "शनैः पन्थाः शनैः कंथा", या न्यायानें हळूहळू आपली मुक्तता लाभेल. या कारणानें सद्गुरुंचें जितकें पूर्ण रूप मनावर ठसेल तितके ठसविण्याचे प्रंसग साधून तो प्रयत्न केला पाहिजे. उत्सव, पुण्यतिथी यांचा हाच हेतु आहे.

इकडं सर्व कुशल आहे .

आनला

× ×

पत्र नं. ६०

श्री

१५-६-६५

सप्रेम नमस्कार

गुरुदेवांचे कर्माविषयी विचार आपणाला माहीत आहेत. कर्माचा नियम हा बंधक नसून मोचक आहे. मागील कर्मानें आपण बांधलेले आहों, आपल्या स्वातंत्र्याला कांहीं मर्यादा पडल्या आहेत; परंतु पुढें कोणतें कर्म करावयाचें, याचें स्वातंत्र्य मनुष्यमात्राला आहे; आणि योग्य कर्माची निवड करुन तें केलें म्हणजे त्याला मुक्त होतां येईल; मूळच्या ईश्वरत्वाचा लाभ होईल. हाच विचार " An Idealistic view of Life, " (जीवनाचा ध्येयवादी दृष्टीनें विचार) या ग्रंथांत डॉ. राधाकृष्णाननीं विस्तृतपणें मांडला आहे. ते म्हणतात, ' आत्म्याच्या कायद्यानें वागणें म्हणजे मुक्ती, याच्या उलट वागणें हा बंध. मनुष्याला बुद्धि आहे; will आहे; अंतर्मुख होऊन आत्मनिरीक्षण करण्याची शक्ति आहे. म्हणून त्याला आत्म्याच्या इच्छे-प्रमाणें वागणें शक्य आहे. तो तसें न करील तर त्याच्या परिणामाला तो जबाबदार राहील. मूळचें ईश्वरत्व मिळविणें हें शेवटीं त्याच्या प्रयत्नानें होणार आहे; तें मिळविण्याचें स्वातंत्र्य ईश्वरानें दिलें आहे, शक्ति दिली आहे. पण तें आयतें हातांत दिलेलें नाहीं, दिलें जाणार नाहीं; मनुष्य प्रयत्नच श्रेष्ठ आहे, त्याची दिशा ठरवून तो कटाक्षानें केला पाहिजे." या सर्व विचारांत संतांचे जगावर किती उपकार आहेत हेंही दिसून येतें. त्यांच्याशिवाय आत्म्याच्या कायद्यानें कसें वागावयाचें हें कोण सांगणार ? मनुष्याला तें अन्य कोणत्याच मार्गानें कळणें शक्य नाहीं. ते स्वानुभवानें सांगतात कीं, जीवभाव टाकून शिवभाव येण्यासाठीं नामस्मरण कर; कल्पनेमुळें, विषयचिंतनामुळें जीवभाव आलेला आहे. अहंकार-देहतादात्म्य वाढला आहे. "सदा विषयो चिंतिता जीव जाला । अहंभाव अज्ञान जन्मासि आला । विवेकें सदा स्वस्वरुपीं भरावें । मना ऊगमीं जन्म नाहीं स्वभावें ॥

' साधक-संवाद '

(म. बो. १४५) जीवभाव दत्तक आहे; औरस नाहीं. विषयाऐवजीं नामाचें चिंतन केलें म्हणजे शिवभाव लाभेल, इतर आचरणही देहतादात्म्याच्या, "मी जीव" या भूमिकेवरून न करतां, आत्मतादात्म्याच्या, सर्वत्र आत्म-भावाच्या, भूमिकेवरून कर. अर्थात् अमानित्व, अदंभित्व, अहिंसा, दया करुणा हें अभेद वाढविणारे सद्गुण वाढव, भेद वाढविणारे द्वेष, गर्व, दंभ, हिंसा, कठोरता हे दोष टाक." कर्माचा कायदा शेवटीं या साधनाचा—सद्‌गुणाधिष्ठित नामस्मरणाचाच—आदेश देतो. क्षेम.

आपला

x x x

पत्र नं ६१

श्री

१-६-६५

सा. न. वि. वि.

भक्ति, ज्ञान, वैराग्य यांचा संबंध दाखवणाऱ्या एकनाथांच्या अभंगा-वर टिपण आपल्या इच्छेप्रमाणें खालीं देत आहे. भक्ति हें मूळ, ज्ञान हें फल व वैराग्य हें फूल. भक्तीनें ज्ञानाला जन्म दिला. व त्याचे महत्व वाढ-विले, असें नाथ सांगतात. यांत ज्ञान म्हणजे साक्षात्कार, तो भक्तिवाचून अशक्य आहे., हाच महत्वाचा सिद्धांत आहे. ज्ञानाचें म्हणजे शब्दज्ञानाचें महत्त्वहि भक्तीनें वाढविलें, याचा अर्थ भक्तीच्या साधनानें साक्षात्कार मिळविलेल्या, संतांच्या परंपरेमुळें वेदांत-सिद्धांताचे महत्त्व राहिलें, नाही तर ते अर्थशून्य शब्दच उरले असते. इतकेंच काय, पण वेदांतसिद्धांतच अशा पुरुषांच्या - ऋषींच्या - अनुभवावर आधारलेले आहेत. तेव्हां शब्दज्ञानाची माताहि भक्तिच आहे. भक्ति-प्रेम, ध्याता व ध्येय यांत ऐक्य निर्माण करूं शकते मग भक्तीवांचून अद्वैत साक्षात्कार कसा होईल ? त्याचप्रमाणें भक्ती

वाचून सर्वस्वाचा त्याग करून दीर्घकाल निरंतर ईश्वरप्राप्तीचा प्रयत्न कसा होईल ? व्यवहारांतहि,. ऐक्य व त्याग ही प्रेमांतूनच निर्माण होतात. तेव्हां ईश्वराविषयीं चढतेंवाढतें प्रेम हे दीर्घकाल साधनाला अवश्य आहे; भक्ति वैराग्याला,सदगुण संपादण्यासहि आवश्यक आहे. थोडयाफार वैराग्या–वाचून भक्ति सुरू करणें, नामस्मरणाला सुरवात करणेंच अशक्य आहे; हें खरें. परंतु दुर्गुणांचा शास्त्रशुद्धरीतीनें नाश व सदगुणांचा उत्कर्ष भक्ति–साधनावाचून होत नाहीं. कारण नाम-नाद-स्वरूपानुसंधान-प्रधान भक्तींत चित्त ईश्वरानें भरून जाऊं लागतें, व त्यातून दुर्गुण, अनात्म्याचे विचार, पूर्णतः दूर होऊ लागतात. "मग जे जें का निमिख। देखेल माझें सुख। तें तुलें अरोचक। विषयी घेईल ॥ तैसें भोगा आंतूनि निघता । चित्त मजमाजीं रिघतां। हळु हळु पंडुसुता। मीचि होशील ॥" ओव्यांत भक्तिसाधनानें वैराग्य व साक्षात्कार परस्परोपकारिकतेच्या नियमानें वाढ–तात. हें दाखविलें आहे. विवेक, निष्कामकर्म, व यमनियम यामुळें सत्त्वगुण वाढतो; पण गुणातीत होतां येत नाही; सत्त्वगुणहि बधनच आहे. अर्थात अन्य उपायांनी पूर्ण वैराग्य लाभत नाहीं. तेव्हां नामानें चित्तशुद्धि व साक्षात्कार दोघांचीहि वाढ होते. इतके नामभक्तीचें सामार्थ्य आहे. सर्व क्षेम

आपला

× ×

पत्र नं ६२

श्री

३१–३–४७

सप्रेम नमस्कार

इतर कामांच्या मानानें परमार्थाचें ध्येय अनंत पटीनें मोठें आहे, हें

नीट ध्यानांत ठेवा. सृष्टिकर्ता, सर्वसमर्थ अनंत, अजेय, सर्व विरोधांचे आगर, आनंदकंद, अमृतत्त्व-दानी इ. इ. अशा परमेश्वराला–आत्म्याला प्रत्यक्ष डोळयांनीं त्याच्या अनंत गुण-ऐश्वर्यासकट पहावयाचा आहे. नुसता विचार केला तर बुद्धि भ्रमूं लागतें, मग प्रत्यक्ष साधन करूं लागल्यावर अडचणींचे डोंगर पुढें उभे राहिले तर आश्चर्य कसले? "क्षुरस्याधारा निशिता दुरत्यया दुर्गं पथस्तत्कवयो वदन्ति–" मार्ग वस्तऱ्याच्या धारेप्रमाणें कठिण आहे. नामदेव, तुकाराम इत्यादि संतांनीं देवासाठीं सोसलेल्या मानसिक यातनांची मी तुम्हाला आठवण करून दिली पाहिजे असें नाहीं. मग आम्हालाच मन अनावर म्हणून निराश होण्याचें कारण काय? आम्ही क्षुद्र आहो; पण आमचे पाठिराखे सद्गुरु प्रत्यक्ष परमेश्वर आहेत. या एकाच श्रद्धेवर सर्व मार्ग आक्रमावयाचा आहे... जवळजवळ सर्वच साधकांची ही स्थिति आहे. मन स्वच्छ करण्याचें काम सुरूं झाले आहे. धाणीचे थरावर थर आहेत. आजपर्यंत वरचाच थर दिसत होता. आतां खालचे अनेक थर दिसूं लागले आहेत. घाण संपेपर्यंत–अनंत जन्मींची घाण–उपसली पाहिजे. मग प्राईज मात्र फार मोठे आहे. प्रत्यक्ष आत्मदर्शन हेंच प्राईज त्याला ही किंमत काय फार झाली ? खास नाहीं. आध्यात्मिक आनंद होऊं लागला म्हणजेच कल्पना थांबतील. तोपर्यंत थांबणार नाहींत; मगच न तुटतां नाम चालेल. न तुटतां नाम चालणें ही तुम्हांस वाटतें तितकी अलीकडची पायरी नाहीं. सतत वस्तु, नाद व आनंद राहतील तेव्हांच नाम अखंड चालेल. मी ऐकीव ज्ञान सांगतो आहे. माझा अनुभव नव्हे. तो अनुभव येण्याचें भाग्य मला लाभलेले नाहीं. ज्ञानी म्हणून नव्हे, तर निगरगट्ट साधक या नात्यानें मी तुम्हाला लिहीत आहे. गैरसमज होऊं नये म्हणून मुद्दाम लिहितो. शूर म्हणा, धीर म्हणा, निगरगट्ट म्हणा, पण निराश न होतां, यश अत्यल्प आलें तरी, वर्षानुवर्षे, मरेपर्यंत नाम–स्मरणच करावयाचें; दुसरे कर्तव्य मला नाहीं; व श्रीसद्गुरुंच्या कृपेनें याच साधनानें जीवित साफल्य होईल, याच निष्ठेनें साधन केले पाहिजे. नाहींतर होणार नाहीं. परमार्थातील फार मोठे अनुभव कळले हे वाईट झाले म्हणता ? कां ? त्यामुळें

'साधक–संवाद'

उतावळेपणा न वाढतां फार काल, फार श्रमांचे हें काम आहे, असें का वाटूं नये ? ज्यांचे अनुभव आपण ऐकले त्यांच्या तपस्येचा काल लक्षांत आहे ना?... गु. रामभाऊंच्या सारखे आत्मदर्शी संत आपल्याला मदत करण्याला उभे आहेत. निराश न होतां प्रयत्न चालू ठेवा. "अल्पमपि अस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्." जें मिळेल तेंच, थोडें वाटले तरी, फार महत्वाचे आहे असें सर्व तज्ञ सांगतात. त्यावर श्रद्धा ठेवा. पत्रोवर द्यावें. क. हे. वि.

आपला

x x x

पत्र नं ६३

श्री

२६-११-५०

सा. न. वि. व.

श्री बाबांच्या आठवणींतील आंधळयानें दोरी वळण्याप्रमाणें साधन करावें, हें महावाक्याप्रमाणें सिद्धांतवाक्य नसून, साधकाच्या विशिष्ट मनोवृत्तीमध्यें उपयोगी पडणारे एक मानसशास्त्रांतील तत्त्व आहे. ध्येय जितकें उच्च, कठीण व पूर्णत्वानें कधींच साध्य न होण्यासारखें असतें, तितक्या प्रमाणांत ध्येयापेक्षां साधनावरच विशेष जोर द्यावा लागतो. साधनाचे मागें ध्येयाचें स्मरण केव्हांही असणारच व कांहीं झालें तरी, साध्याच्या आपण किती जवळ आलो याचा आढावा मनुष्य घेणारच. परंतु या दोन गोष्टींची तीव्रता मनांत फार वाढली, तर साधकाचे धैर्य नष्ट होतें व निराशेच्या भरांत साधन सुटण्याची शक्यता असते. उंच डोंगरांवर फिरणारे लोक नेहमीं सांगतात कीं डोंगरावर चढतांना त्याच्या माथ्याकडे पाहूं नये; तिकडे पाहिल्यास चढण पाहून ऊर भरून जातो. खालीं पाहून चालावें, म्हणजे

माथा गांठला जातोच. व ऊरहि दडपत नाहीं-- मुद्गल फिरवीत रहावें छाती आपोआप वाढते; पण वरचेवर छातीकडे पाहूं लागलों तर मुद्गल थांबेल व पुढें छातीही वाढत नाहीं.

सारांश, मनाची तळमळ वाढल्यावांचून प्रयत्नाला तीव्रता येत नाहीं; त्याचप्रमाणें ध्येय कधीं प्राप्त होईल या तळमळीचा अतिरेक झाला, तर धैर्य खचून साधनच सुटतें. म्हणून तळमळीचा सुवर्णमध्यबिंदु साधावा लागतो व तो साधण्याची एक बाजू-म्हणजे एका बाजूची मानसिक क्रिया-या आठवणींत दिली आहे. या आठवणीचें दुसरें महत्त्व असें कीं सद्गुरु व नाम यावर ज्यांची पूर्ण श्रद्धा आहे, त्याला नामस्मरण करतांना ध्येयप्राप्तिसंबंधी शंकाच येणार नाही. तसेंच ईश्वरप्राप्तीच्या पूर्ण आनंदाशिवाय देखील नामस्मरणांत अनेक समाधानाच्या जागा असतात. त्याचा आधार साधक-दर्शेत घ्यावा लागतो. त्या जागा म्हणजे आपण एक चांगली गोष्ट करीत आहोत ही जाणीव, शरीराला व मनाला मिळणारी शांति, मनोबुद्धि यांची वाढणारी शक्ती, दुर्गुणांचा क्रमानें नाश, व सद्गुणांची वाढ, इत्यादि केवळ ध्येय प्राप्तीची तळमळ प्रमाणाबाहेर असेल, तर या समाधानांना आपण मुकूं व साधन रूक्ष व रखरखीत वाटेल, कोणतेहि कर्तव्य करीत असतांना त्यातील कामानें होणाऱ्या आनंदाकडे न पाहतां नुसत्या फलाचा विचार केल्याप्रमाणें होईल ... मी इतक्या दिवसांत ध्येय गाठीन, हा विचार मात्र पूर्णपणें सोडून दिला पाहिजे. यश देवाच्या कृपेवर अवलंबून आहे. व त्याची कृपा कशानें होईल हे पूर्णतः आपल्याला माहीत नाहीं. नेम करणें एवढेंच आपण जाणतों व ते शक्य तितकें करीत जावें, इतकेंच आपल्या हातांत आहे. येथें कर्तृत्वाचा अभिमान पूर्णपणें सोडला पाहिजे. कळावें.

आपला

x x x

'साधक-संवाद'

पत्र नं. ६४

श्री

४-८-५३

सादर सा. नमस्कार

साधन हेंच गुरुकृपा प्राप्त करून देईल. दुसरा उपाय नाहीं. परंतु, साधन चांगले होण्याला विचार व आत्मनिरीक्षण सतत पाहिजे; त्यासाठीं सत्समागम, श्रवण, वाचन यांची आवश्यकता आहे. नामस्मरण होत नसेल तेव्हां मन कोणत्या गोष्टींत मग्न असतें, इकडे बारीक नजर ठेविली असतां मन कशांत गुंतलें आहे, हें थोडें फार समजून येईल, कूटस्थांतील भाव-अगदीं खोल मोह-काय आहे, तें कळलें म्हणजे साधन फलद्रूप कां होत नाहीं हें ध्यानांत येईलसें वाटतें. मला तर स्पष्ट दिसत आहे; कां? मला देवावाचून अनेक गोष्टींची इच्छा आहे. व त्यामुळें साधन उत्तम होत नाहीं. या वासना सुटल्यावर देव दूर नाहीं. पण त्या सुटत नाहींत. साधनानें सुटे पर्यंत सबूरी धरली पाहिजे, हेंच खरें. मनांत व देहांत रोमरोमीं वासना ठरल्या आहेत. त्यांचा नाश दीर्घकाळ साधनानेंच होईल. आज भाव अनन्य नाहीं, याचा प्रत्यय आत्मनिरीक्षणानें येईल. मग देवावर आमचे काय claims (हक्क) आहेत? तेव्हां कूटस्थांतील भावाचें निरीक्षण करून, त्यांतून सुटण्याचा प्रयत्न करावा. देवाशिवाय कांहीं नको, असें झाल्या-शिवाय उच्च अनुभव येणार नाहींत. सर्व कुशल आहे.

पत्रोत्तर यावें

आपला

x x

'साधक-संवाद'

पत्र नं ६५

श्री

१८-१२-५६

सप्रेम नमस्कार

आजाराचें कांहीं फायदे निश्चित होतात. विवेक जागृति, अंतःकरणाचें मार्दव, करुणा व नम्रता वाढतात; देहाची दुर्बलता व नश्वरता जाणवून मनावर वैराग्य बिंबतें; अभिमान व वृथा आत्मविश्वास कमी होतो. या सर्व गोष्टी परमार्थाला पोषकच आहेत; देहभाव कमी होत जातो असें थोडक्यांत म्हणतां येईल---------" देहेदुःख ते सूख मानीत जावें," ते यासाठींच श्रीगुरुदेव एकदां म्हणाले होते, " The day of sickness is the day of God." (आजाराचा दिवस हा ईश्वरस्मरणाचा दिवस) तापाच्या जोरांत देहभाव विसरतो, एक तऱ्हेची गुंगी येऊन इतर सर्व विसरतें, मात्र भाग्य असेल तरच नाम आठवूं शकते. आतां आपल्या प्रश्नांचीं उत्तरें.

१) जग निर्माण कां केलें हें कोणालाच कळलें नाहीं. आत्मदर्शनानंतर, तें स्वप्न आहे एवढें मात्र निश्चित समजते. यापेक्षां अधिक कोणी कांहीं सांगूं शकलें नाहीत. जीवनाच्या सार्थकतेच्या दृष्टीनें त्याची आवश्यकताहि नाहीं. स्वप्नांतून जागृत होणें ही सार्थकता, त्याचा जन्म कळत नाहीं. वळणें महत्वाचें नाहीं.

"आप मरे पीछे डुब गयी दुनिया," हें वचन जगाचा आपला फार थोडा संबंध आहे; त्याच्या मोहांत पडूं नये; मेल्यावर जगाशी काय संबंध, इतकाच आहे. एक मुक्त झाला कीं विश्व संपतें असा त्याचा अर्थ नाहीं. मुक्त मनुष्याला तें असत्य वाटूं लागतें इतकेंच. या पलीकडे कोणालाच कांहीं माहीत नाहीं. जग कां झालें या स्वरूपाचेंच तें न उलगडणारे कोडें आहें. गुरुदेवांनीं "सर्व-मुक्ति" हा सिद्धांत सोडून परिवार-मुक्ति मान्य केली आहे, हें लक्षांत असेलच. "सह परिवार तरे."

'साधक-संवाद"

(३) ईश्वरांत मन बुडालें, विरलें कीं जीव दिक्कालातीत होतो; तो-पर्यंत नाहीं. अन्य लयांत त्याचें थोडें अस्पष्ट दिग्दर्शन होतें. Space (दिक्) मध्यें Past, present, future (भूत–वर्तमान–भविष्य) आपण पहात नाहीं; Space (दिक्) मुळें त्याचें बौद्धिक आकलन होतें. ताऱ्यांचा प्रकाश पूर्वीं निघाला तरी तो आपण आपल्याला पोहोचेल तेव्हांच पाहातों. वस्तू होणें म्हणजे मुक्त होणें. तात्त्विक प्रश्नांचीं उत्तरें मिळतात कीं नाहीं न कळे; एकादें उत्तर पाहिजे असेल, तर तें देवाकडून मिळते असें श्री गुरुदेव म्हणाले होते. उत्तरांची आवश्यकता वाटणार नाहीं, हें मात्र खरें. कारण त्या आनं-दांत गरजच उरत नाहीं.

४) 'गजेंद्रमोक्ष' हे काव्य आहे; सत्य नव्हे.

आपला क्षेम समाचार कळवावा.

आपला

x x x

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ग्रंथालय
अनुक्रम ९९२०५ ... दि. ...
क्रमांक २७०५ ... नों. दि. ...

पत्र नं. ६६

श्री

२८–३–५७

सादर सप्रेम सा. न. वि. वि.

परमार्थांत प्रगति व्हावी, पुष्कळ प्रगति व्हावी, अल्पसंतुष्टता नसावी हें अगदी खरें. त्याच बरोबर फार असंतोषहि नसावा. अल्पसंतुष्टतेनें आळस येतो, तर, अति असंतोषानें धीर खचतो. धीर तर परमार्थाचा पाया. "आंधळयानें दोरी वळल्याप्रमाणें नामस्मरण करावें." हें खरें. पण थोडेंतरी प्रोत्साहन वाटल्यावांचून तें शक्य नाहीं. ह्मणून काय मिळवावयाचें आहे व राहिलें आहे, याबरोबरच काय मिळालें हेंहि पहावें; मग ताळेबंद बरोबर

येईल. खालील गोष्टींत कांहींच फरक पडला नाहीं कां? (१) मन ईश्वरा-विरहित गोष्टींत राहण्याची उत्कटता व काल (२) त्यांतहि अनुक्रमें सत्त्व-रज- तम या गुणांनी युक्त अशा कल्पनांत राहण्याची उत्कटता व काल (३) पूर्वीचे गोडीचे विषय व आतांचे Interest (गोडीचे) याच तीन गोष्टी दुसऱ्या शद्बांत सांगावयाच्या तर पंचकोशापैकी कोणत्या कोशांत आपण पूर्वी किती वेळ रहात असूं व आतां राहतो. (४) जीवनाची रोजची average level (सरासरी पातळी) पूर्वीपेक्षां अधिक वरची, शांति-समतेची व थोड्यातरी आनंदाची (Exaltation) ची असते किंवा नाहीं. (५) पूर्वीचे Lowest (किमान) व Highest (कमाल) यातील अंतर तितकेंच आहे कां? पूर्वीचें Lowest (किमान) व आजचें Lowest (किमान) तवेंच पूर्वीचें Highest (कमाल) व आजचें Highest (कमाल) हीं एकच आहेत कां ? (६) मित्र-जनांच्या Selection (निवड) मध्यें व आहेत त्यांच्याबद्दल प्रेमामध्यें कांहीं फरक झाला आहे कां? (फार सूक्ष्म, किचकट विचार करीत आहे, असें वाटेल.) पण साधक सूक्ष्म दृष्टीचा पाहिजेच ना? (७) वाचनाच्या आवडींत कांहीं फरक वाटतो कां? (८) "अलक्ष्यासी लावी लक्ष। ह्मणूनि साधू महादक्ष।" तर मग साधकहि दक्षच पाहिजे; तोहि अलक्ष्यासी लावी लक्ष. या सर्व गोष्टींचा विचार करून काय वाटते तें पहा. सर्व क्षेम

आपला

××

पत्र नं ६७

श्री

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५२२६
ग्रंथ शाखा १९-४-५७

सप्रेम सा. न.

......" गजस्तत्र न हन्यते " या संबंधीचें आपले विचार, Theory (उपपत्ती) च्या दृष्टीनें अगदीं बरोबर आहेत. पण Theory (उपपत्ती) ला Practical (प्रयोग) बाजू असतेच. तशी असेल तर Theory (उपपत्ती) ची किंमत, या Practical (प्रयोगाच्या) बाजूचा विचार करूं लागलें म्हणजे Limitations (मर्यादा) कबूल करणें भाग आहे. " जीवो ब्रम्हैव नापरः।" हें पारमार्थिक सत्य म्हणून खरें आहे. पण व्याव-हारिक दृष्टीनें = जीव (अ) + साधनकाल (ब) = ब्रह्म. असें समीकरण आहे. यांत (ब) Varying factor (बदलणारी संख्या) आहे. त्याचा अंत लागत नाहीं. मोजमाप कळत नाहीं. विशेषतः जीवनाच्या सरत्या टोकाशीं पोचलेल्या माझ्यासारख्या वृद्धाला या Limitations (मर्यादा) स्पष्ट जाणवतात. प्रयत्नानें कांहींहीं impossible (अशक्य) नाहीं; पण impro-bable (असंभाव्य) पुष्कळ गोष्टी आहेत, इतकाच माझ्या लिहिण्याच अर्थ होता.

निराशा न होण्याइतकी यशाची व अभिमान न वाढण्याइतकी अप-यशाची जाणीव हें प्रमाण ठेवणें अवश्य आहे. दुसरी जाणीव आपल्याला उत्तम प्रकारें आहे. पण तिला पहिलीची जोड दिली पाहिजे. ती जाणीव वस्तूच्या वाढीनें होत नसेल-तशी होणें कठीण हें मी सांगावयाला नको-तर त्या वाढीची दुसरीं गमकें ओळखून त्यांच्या निकषावर आपली मनोवृत्ति घांसून पाहिली पाहिजे. या दृष्टींनें मी सर्व प्रश्न सुचविले होते. त्यांचीं उत्तरें अनुकूल आहेत; तेव्हां प्रगती होत आहे. Minimum (किमान) मिळालें पाहिजे ही ओढ, तळमळही आहे; तीहि अवश्य आहे. पण All work and

no play (केवळ काम–खेळ नाहीच.) हेंही नको. बुद्धि, भावना, क्रियाशक्ती, याची इष्ट वाढ झाली, हें समाधांन आपल्याला साधनप्रवण व मुदित, ठेवण्याला उपयोगी पडेल; त्याचा फायदा घेतला पाहिजे. अर्थात् तुम्हाला हें माहीत नाहीं असें नाहीं; तुम्ही निराश झाला असाल असेंहि नाहीं. परंतु पत्रांत एकच बाजू दिसली म्हणून दुसरी दाखवली इतकेंच. कारण अवसाद (खिन्नता) व उद्धर्ष (फुगणें) हे दोन्हींही साधकाला वावडे आहेत. “ जगांत जें उत्तम म्हणून करणें शक्य आहे तें करण्याचा मी प्रयत्न करीत आहे; फल देवाहातीं;” या श्रद्धेच्या भक्कम पायावर साधकाचें जीवन आधारलेलें असावें. मात्र यामुळें प्रयत्नांत शैथिल्य येऊं नये. तसें आले तर तो अभिमान आला. गुरुदेवांनीं लिहिल्याप्रमाणें Arrogance or complacency (अभि–मान वा अल्पसंतुष्टता) हीं दोन्हीं टाकून मधल्या मार्गानें जावयाचें आहे. Approximation (ध्येयाकडे वाटचाल) हें त्याचें तत्त्व, लो. टिळकांच्या भाषेंत, “दिलेलें उजव्या हातानें घेऊन आणखी मागावयाला दुसरा हात पुढें करावयाचा.”

सवडीनें उत्तर द्यावे

आपला

x z x

पत्र नं. ६८

श्री.

७–७–५७

सप्रेम नमस्कार.

श्रीगुरुदेवांची पारमार्थिक स्फूर्ति आतां त्यांच्या स्मृतींतून व नामस्मरण, वस्तुदर्शन, सत्संगति व त्यांच्या ग्रंथांचें वाचन–मनन यांतूनच मिळविली पाहिजे. परमार्थाचा प्रसार, नवे नामधारक होण्याच्या दृष्टीनें

थांबला, हें दुर्दैव. पण ईश्वर करतो तें योग्यच म्हटलें पाहिजे. त्याची काय योजना असेल ती खरी. त्याच्या कृतीला बरें वाईट म्हणणारे आपण कोण? आपल्या प्रचितीवरून आपली आध्यात्मिक योग्यता ठरते व आध्यात्मिक योग्यतेच्या प्रमाणांत प्रचिती येतें असें मी म्हटलें होतें. नाद, प्रकाश, वर्ण, रुपें, ज्याप्रमाणांत ऐकूं येतात, दिसतात, तितकी आपली योग्यता. ह्यांचें प्रमाण एकच नसतें. निरनिराळ्या साधकांचे अनुभव कमी अधिक असतात. ह्याचें कारण त्यांच्या आध्यात्मिक पायरींतील भेद, पातळीतील उच्च-नीचपणा, प्रत्येकाचे अनुभव हळुहळु वाढतात. ह्याचें कारण साधनानें आध्यात्मिक पातळी वाढते. गुरुदेवांची कृपा सदा आहेच. ती नामांतच सांठविलेली आहे. तिचा साक्षात्कार करून घेणें आपल्या भावावर, व प्रयत्नावर (नामस्मरणाच्या) अवलंबून आहे. त्यांनीं आपलें आध्यात्मिक कृपेचें सर्वस्व आमच्या हातीं नामाच्या रूपानें एकदांच दिलें आहे. त्याच्या साहाय्यानें आपल्याला गुरुरूप होता येईल. पण कांहीं गुण सोनाराचा व कांहीं सोन्याचा. आमचे प्रयत्न व भाव कमी पडतात. सर्व क्षेम.

आपला

x x x

पत्र नं. ६९

श्री

१३-५-५८

सा. न. वि. वि.

आपण सर्व साधक आपल्या आध्यात्मिक प्रगतीसाठीं साधन करीत आहोंत. त्याचा परस्परांना उपयोग होतोच. कारण मानवता एकच आहे. Social impact (सामाजिक संस्पर्श) चें तत्त्व येथें आहे. सत्संगांतहि तेंच मूलभूत तत्त्व आहे; त्या सिद्धांताचा सत्संग हा आपल्याला उपकारक असा

उप-सिद्धांत आहे. यांतून एखादा वृक्ष तरी मोठा होईल कां, हें ईश्वराच्या इच्छेवर आहे. अशा बीजरुप अधिकाराचें रोपटें असेल तर त्याला इतर साधकांच्या साधनाची, सत्संगांच्या दृष्टीनें मदत होईल, हें खास. परंतु प्रत्येक स्वतःच्या निःश्रेयासाठीं प्रयत्न करीत आहे, हें मात्र खरें. या उच्च स्वार्थांत दुसऱ्याच्या परमार्थाला साह्य होण्याचा परार्थहि ईश्वरी नियमानें सामावलेला आहे. हाच गुरुदेव सांगतात तो स्वार्थ–परार्थाचा मधुर समन्वय, असें मला वाटतें. कारण ते एकमेकांत मिसळलेलेच आहेत. शरणागति व approximation (वाटचाल) या दोन सिद्धांतांतून त्यांचें उत्तर शोधतां येईल. शरणागतींतच नव्हे, तर जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत approximation (वाटचाल) आहे; पूर्णता कोठेंहि नाहीं. एका बैठकी मध्यें तें म्हणाले होते, "पूर्ण शरणागत कोणीच होऊं शकत नाहीं. approximation (वाटचाल) होते." अर्थात जेवढें मानवत्व संतांमध्यें उरतें, तें भूतदया व सत्त्वगुण यांचें बनलेलेंच उरतें. रज–तम नष्टप्रायच होतात. या (भूतदया व सत्त्वगुण) दोहोंतूनच मानवतेवर, शिष्यगणावर, भूतमात्रावर प्रेम व त्यांच्यावर उपकार उत्पन्न होतात, किंवा आविष्कृत होतात म्हणणे अधिक बरें. "Illumination is a process not an event which is never complete" (साक्षात्कार ही एका क्षणीं घडणारी घटना नसून प्रवाही प्रक्रिया आहे.) म्हणून या process (प्रक्रिया) बरोबर सात्त्विक कर्महि होऊं शकतें, हा गीतेंत त्यांनीं मांडलेला सिद्धांतहि हेंच दाखवत नाहीं का? "तुका म्हणे उरलों उपकारापुरता।" शिष्यावरील व परमार्थावरील प्रेम सर्वांत श्रेष्ठ. कारण तें जवळ जवळ सत्त्वगुणातीत, याच दृष्टीनें देश, समाज, दीन, दुर्बल यांचेंहि चिंतन संतांच्या मनांत येतेंच. मात्र या कोणत्याहि विचारानें तें परमार्थसाधनापासून विचलित होत नाहींत. परमार्थप्रसाराच्या उच्च कार्यासाठींहि ते आपल्या नेमांत व्यत्यय येऊं देत नाहींत. उपाधी वाढवीत असतांहि उपाधींत न सांपडणें, हा श्रीमहाराजांचा श्री गुरुदेवांनीं वर्णिलेला गुण सर्व संतांमध्यें असतोच. तेव्हां "पहिलें तें ईश्वर भजन। दुसरें (खूप अंतरावर) ते राजकारण"। वगैरे. नित्य नेमावलींत गुरुदेवांनीं महारा–

जांच्या गुणांचें उत्कृष्ट वर्णन केलें आहे. त्यावरूनहि संतांचा जगाशीं सत्त्व-गुणपूर्ण संबंध कसा राहतो व त्यामुळें जगाचें कल्याण कसें होतें तें कळून येईल. एवंच ८० टक्के परमार्थ व उरलेल्या २० टक्क्यांत सात्त्विक समाज-कल्याण, जगदुद्धार हा त्यांचा ढोबळ गणिताच्या भाषेंत जीवनप्रकार असतो.

"क्ष" ची मुख्य तक्रार "आत्मा अगर वस्तु" याची व्याख्या त्यांना कळली नाहीं; किंवा त्याचें स्वरूप त्यांना कळलें नाहीं, ही नसून पुढील वाक्यांत आहे. "आणि त्यांनीं जी व्याख्या दिली आहे, ती सर्व तत्वज्ञानी मान्य करतीलच असें नाहीं." ती व्याख्या मान्य न करणाऱ्या तत्वज्ञापैकीं एक ते आहेत. (हाच त्यांच्या व त्या सांप्रदायांतील इतर विद्वानांचा) व गुरुदेवांचा मतभेदाचा प्रश्न------- आपण ज्याला वस्तु म्हणतो तसें कांहीं नाहीं असें त्यांचें म्हणणें नाहीं; तर तें परतत्त्व किंवा आत्माब्रह्म नव्हे, असें त्यांचें मत आहे; आणि हें मत बदलणें शक्य नाहीं. आपण तरी वस्तु म्हणजे ब्रह्म हें गुरुदेवांच्या व गुरुदेवांनीं उद्धृत केलेल्या संतांच्या वचनावरूनच मान्य करतो ना? वस्तूंतील ईश्वरत्वाचा आपल्याला अनुभव नाहीं, परंतु गुरुदेवांवर विश्वास आहे. तो त्यांचा नाहीं, मग त्यांचे मत कसें बदलणार?

सतत जागृत विवेकालाच शंका उत्पन्न होतात. पत्रांतील मनःस्थिती सध्याच्या युद्धामुळें अनेकांची होणें स्वाभाविक आहे. पण त्यांतून देशभक्ति व परमार्थ यांचा समन्वय कसा करावयाचा हा प्रश्न फार थोडयांपुढें उत्पन्न होणार. त्या समन्वयाचा मुख्य मुद्दा आपण दिला, तोच आहे. आपण शक्य तितक्या उत्कटतेनें, निष्ठेनें, नेटानें, दीर्घकाल नामस्मरण करावें हेंच, प्रत्येक साधकाचें कर्तव्य आहे. गुरुदेवांनीं सुचविल्याप्रमाणें "It is our duty spiritually to will that Desert and fruit should have no disparity शद्ब बरोबर नाहींत. विचार आपल्याला आठवेलच. (P. G. H. L. Page 18 lines 13 to 22) हें करण्याचें साधन नामस्मरणच होय. कारण देवाची कृपा संपादन करणें, त्याचें अंतःकरण हालवणें, याचें एकच साधन-नामस्मरणानें येणारी शरणागति, म्हणजे ईश्वराशी अभेद,

अहंवृत्तीचा व्यक्तित्वाचा त्याग.

आपल्या इतर सर्व प्रश्नांचा विचार एकत्रच करतों. आता स्वत:चीं पत्नि माता, पुत्र यासाठीं गुरुदेवांनीं कां देवावर भार घातला नाही? याचीं दोन उत्तरें असूं शकतील. देवाच्या मनांत त्यांनीं जावें असें आहे, हे निश्चित कळल्यामुळें, सामर्थ्य असूनही, देवाच्या इच्छेउलट करावयाचें नाहीं. हा ख्राईस्ट सारखा 'Thy will be done' (तुझ्या इच्छेप्रमाणें होवो) हा बाणा. दुसरी शक्यता, यांत स्वसुखाचा प्रश्न होता. स्वसुखाच्या आसक्तितून दूर राहणें अवश्य; नाहींतर मायेंत ओढले जाऊं,या भावनेनें ते दूर राहिले असतील. चि. सौ. शकूताईच्या पहिल्या प्रसूतीच्या वेळी तिला त्रास होऊं लागला तेव्हां गुरुदेवानीं शेजारच्या खोलींत नेम केला व तिची सुटका झाली. यावेळीं देवाची इच्छा 'प्रयत्नसाध्य' या स्वरुपाची असेल. अर्थात् हे सर्व तर्क आहेत. प्रत्यक्ष काय ते गुरुदेवानांच ठाऊक.

मला वाटतें यथामती आपल्या सर्व प्रश्नांचीं उत्तरें यांत चर्चिली गेलीं आहेत. निश्चित उत्तर कांहींच नाहीं. फक्त Thinking aloud (मोठ्याने विचार करणें) उच्च साक्षात्कारानंतरच हे प्रश्न सुटणार.

आपला

x x z

पत्र नं. ७०

श्री

२५-३-६२

सा. न. वि. वि.

बुधवारी येथें प्रो. G. N. Joshi (तत्वज्ञान) यांचें 'यंत्रयुग व आध्यात्म' या विषयावर उत्कृष्ट व्याख्यान झालें. त्यांत अमेरिकेंत (१)

Vaccum व (ii) Frustration मुळें मेंदूच्या विकाराचे रोगी वाढत आहेत, असें त्यांनीं सांगितले. त्यावरून, नामस्मरणामुळें या दोन्ही दोषांपासून आपण कसे मुक्त राहतो, व त्यामुळें Mental विकृति कशी दूर राहते, हा विचार मनांत आला. obsession नें (एकच विचार अटळपणें मनांत भरून राहिल्यानें)व कोणत्याहि मार्गानें तो विसरतां न आल्यानें किंवा त्याचा जोर कमी न करतां आल्यानें Mental विकृति होते. त्याचा त्रास तर नेहमीं होतो; हें आपण नेहमीं अनुभवतोच. obsession झालें म्हणजे सर्व मेंदू एकाच विचारानें भरून राहतो, तो विचार डोक्यांत वरपर्यंत चढतो, कांही केल्या उतरत नाहीं. ही त्याची शारीरिक प्रक्रिया आहे. जोपर्यंत विकार वा विचार वरपर्यंत थेट चढत नाहींत, तोपर्यंत तो आपल्या ताब्यांत असतो; आपण अलिप्तपणें त्याचा विचार करूं शकतो. तो वर चढल्यावर आपण त्याच्या आधीन होतो. तो विकार उत्पन्न करील तेच आपले विचार, तेच आचार. विवेक-जागृतीला जागा उरत नाहीं. नामस्मरण करूं लागलें म्हणजे जीवन- शक्ति नामाच्या दिशेला वळते; वर चढलेले विचार उतरावेच लागतात. त्यांनीं मेंदू पूर्णपणें व्यापला असेल व त्यांत ते घनीभूत झाले असतील तर उतरण्यास वेळ लागेल; पण त्यांना उतरावे लागेलच. ' परि ध्यान खड्गाचा घावो । साहेल कैसा॥' आपण दोनतीन वेळां नेम केला तर सर्व विकार, विचार तीन वेळां तरी दूर होतील; निदान बरेच दुर्बळ होतील आणि मन:शांतींत कांहीं वेळ जाईल. नामस्मरणाचा हा लाभ किती मोठा आहे. ईश्वरप्राप्ति हाच त्याचा मोठा लाभ, परंतु हे त्याचे (by product) सहज होणारें दुसरें उत्पादनहि किती मोलाचे आहेत. नामस्मरणांत साक्षात्काराच्या वाटेवर शारीरिक, मानसिक, बौद्धिक आरोग्याचा सहज लाभ होतो. महाराजांनीहि एका पत्रांत असें म्हटलें आहे; नाम हे जीवनाच्या मुळाला – आत्म्याला–जाऊन पोहोचतें; त्याला जागृत करतें. (आपल्या बद्धावस्थेच्या अपेक्षेनें; एरव्ही आत्मा सदा जागृतच असतो. आपल्या जाणीवेवर आलेली झापड दूर करण्याचा प्रयत्न म्हणजे आत्मा जागृत करणें.) म्हणून मुळाला पाणी घातल्यावर सर्व झाड बहरतें, तसें

नामस्मरणानें सर्व जीवन बहरतें. समर्थांच्या शद्बांत 'तो वडील (आत्मा) जेथें चेतला। तो भाग्य पुरुष भला। अल्पचेतनें तयाला। अल्प भाग्य ।। सर्व कुशल आहे.

आपला

× ×

पत्र नं ७१

श्री

४-४-६२

सा. न. वि. वि.

आपण आल्यानें ३ दिवस काल आनंदांत गेला.

प्रापंचिक हितसंबंध इतके दृढ झालेले असतात कीं, त्यांतील एखादा काळजीचा विचार उद्‌भवल्यावर विवेकाचा जणुं विसर पडतो. तो विचार आला कीं, 'कर्ता ईश्वर आहे; त्याचें इच्छेनें होईल तें होवो,' या विवेकाचा प्रभाव पडत नाहीं. कांहीं काळ मन अस्वस्थ होतें. हा आवेग ओसरल्यावर, विवेक उपयोगी पडून, मनःस्वास्थ्य लाभते. अर्थात् विवेक-जागृति राहते; थोडा वेळ ती प्रभावी ठरली नाहीं, तरी पुढे तशी ठरते. हाच आजपर्यंतच्या साधनांचा व विचाराचा लाभ आहे. नाहींतर त्या अवस्थेंतून बाहेर पडण्याला मार्गंच नव्हता. असला तर पत्ते, क्लब, सिनेमा, Sleeping pills वगैरे. यावरून 'अहं'प्रत्यय किती खोल शिरला आहे, हें कळतें. तसेंच 'टाकी तूं माप। सळ धरिली विठ्ठलें।।' या वचनाची सत्यताहि पटते. नामस्मरण व्यर्थ जाणार नाही, ही श्रद्धा वाढते, तीच वाढली पाहिजे. दुसरी गोष्ट, अस्वस्थता सुद्धा विशेष जिव्हाळयाच्या प्रश्नाशिवाय उत्पन्न होत नाहीं. 'आपण व देव या दोघांचाच खरा संबंध, इत-

यांचा संबंध अत्यल्प,' ही जाणीव राहून, मन क्षुद्र गोष्टीकडे दुर्लक्ष करूं शकतें. तुकारामानीं एका अभंगांत म्हटलें आहे; 'प्रत्येकाला आपला प्रपंच आहे; इतरांकडे पाहायला इच्छा व फुरसत आहे कोठें ?' हें किती खरें आहे, हे प्रत्येकाला स्वतःवरून चांगलें समजेल. ज्याला स्वतःचें कांहीं Interest नाहीं, (स्वार्थ नव्हे–जगांत कोठेहि कांहींहि Interest) तोच इतरांवर प्रेम करूं शकेल. असा एक ईश्वर किंवा सद्‌गुरु; इतराकडून प्रेम अंशानींच मिळणार; कारण त्यांचें प्रेम इतर ठिकाणीं वाटलेलें असतें. देव–सद्‌गुरु मात्र प्रत्येक शिष्याला, भक्ताला, पूर्ण प्रेम देऊं शकतात, इतकें तें अनंत असतें. प्रत्येक साधक कांहीं प्रमाणांत ईश्वरोन्मुख झालेला असतो, व अशा दुसऱ्या ईश्वरोन्मुख साधकांवर तो प्रेम on principle करूं शकतो. तेव्हां खरा आप्त देव व गुरु; त्याच्या खालोखाल साधक बंधु; इतरांच्या मताकडे व वागण्याकडे लक्ष देण्याचें कारण नाहीं. मग लहान त्रासांतून मोकळें होऊन वाचलेला वेळ तरी देवाकडें लावतां येईल; मोठ्यां–तून मुक्त करण्यासाठीं देवाला विनवावें. सर्वांत अटळ अवस्था देहदुःखाची. त्यापुढे इतर सर्व फिके. गुरुदेव म्हणत "१०१.५ पर्यंत ताप आला तरी नेम होतो. त्यापुढे गेला कीं संपलें. मग देवाला सांगावयाचें–आतां तुझा नेम तूंच सांभाळ." उत्तर द्यावें.

आपला

x x x

पत्र नं. ७२

श्री

९-५-६२

सप्रेम सा. न. वि. वि.

आमच्या गांवीं देवाचे दर्शनाला गेलों होतों. मानसशास्त्राच्या दृष्टीनें एक अभिनव अनुभव आला, अर्थात् Mystically नव्हे. देवासमोर कापूर लावल्यावर ज्योतीवर वस्तु दिसूं लागली. मनांत भावनापूर्णं विचार आला, तों तेथील मूर्तीला उद्देशून (कारण बालपणीं मला ती मूर्तिच देव होती.) 'देवा, तुझ्या भूमींत भक्तीचा मोड बालपणीं फुटला, अगदीं कोंवळा, अस्पष्ट असा तो होता; पण भक्तीचा होता खास. त्याचे आज वस्तुदर्शनांत रूपांतर तुझ्या समोरच होत आहे. काशीला रामेश्वराची कावड नेऊन घालावी, तशी माझ्या गुरुंच्या कृपेनें प्राप्त झालेली परमार्थाची कावड मी तुला घालीत आहे, या विचारानें अंतःकरण भरून आलें. अंगावर रोमांच आले. देऊळ लहान सौंदर्यशून्य आहे. पण बालपणीं अधिक चांगलें व मोठे कांहीं न पाहिल्यामुळें, तें भव्य उदात्त वाटे. विशेषतः काल भैरवाष्टमीच्या (कार्तिक व. ८ मी) रात्रीं १२ ला भैरवजन्म (देव भैरवच आहे) होतो. त्या उत्सवकाळीं गांवाचें सर्व वैभव तेथें माझ्या बालपणीं एकत्र होई; त्यावेळीं उद्भवणाऱ्या सर्व भावना जागृत झाल्या. देऊळ प्रत्यक्ष लहान व सामान्य असूनही, त्यांत वैभव भरलेलें दिसलें. समोरची मूर्ती पाषाणाची आहे, हे बुद्धी सांगत असूनहि, बालपणीं (६-९ वय) मला तेथें देव, जागृतदेव, आहे असें वाटें, तीच भावना अंतरीं जागृत झाली होती. त्यावेळीं देवाची कल्पना अगदीं संकुचित होती, तरी बालमन आदर, भक्ती, श्रद्धा, यांनीं भरून जाण्याला ती पुरेशी होती. आतां ती कल्पना जणूं मर्यादातीत झाली आहे, तरी तिनें मन पूर्वी इतकेंच भरून गेलें. हें मी पांचसात मिनिटेंच अनुभवलें; पण त्याचा परिणाम अद्याप आहे. बालपणीं

चांगले खोल संस्कार होणें, किती आवश्यक आहे, तें किती खोल जाऊं शकतात, याचें प्रत्यक्ष प्रत्यंतर आलें. पुढे, आस्तिक नसलेल्या शिक्षकाचे सानिध्यांत आस्तिकता कमी होत गेली, ही केवढी हानी झाली, असें वाटले. त्यानीं विवेक शिकविला, परंतु आस्तिकता वाढवीतहि तो शिकविता आला असता. अर्थात त्यांना योग्य वाटलें तेंच त्यानी केलें. पण अपूर्ण ज्ञानाचे लोक सद्भावनेनें देखील, मुलांचे अर्थात समाजाचें, किती नुकसान करतात, असें वाटलें. नवव्या वर्षानंतर, गुरुदेवांची भेट दैवानें होईपर्यंत, इतके खोल शुभ संस्कार झाले नाहींत, ही हानी मोठी नव्हे कां? या भावनात्मक अनुभवानें माझीrational attitude (बुद्धिनिष्ठ दृष्टी) मुळीच बदलली नाहीं, ती दृढतर झाली. साक्षात्कारानंतरहि ज्ञानदेवादि संत 'विठ्ठल व पंढरपूर' या नांवाच्या जादुमुळें कां भारून जात,हें मी कल्पनेनें नामदेवावरील पुस्तकांत लिहिले आहे, त्याची सत्यता, अनुभवानें पटली व सगुण-भक्तीचे रहस्य थोडे स्पष्ट झाले.Association of ideas हा फार मोठा law आहे. त्यांचा परमार्थातही फार उपयोग आहे. त्यांत सगुणभक्तीचें रहस्य आहे.सगुण देहधारी मनुष्य Association of ideas(कल्पनांची संबद्धता) च्या law च्या बंधनात रहाणारच. त्याचा उत्कृष्ट उपयोग ह्मणजे सगुण भक्ती 'सगुणाचेनि आधारें । निर्गुण पाविजे निर्धारें।।' देवाच्या Associations (संबद्धता) ज्या सद्गुणांशीं झाल्या असतील, त्यांच्या दर्शनचिंतनानें त्यांचे दृढीकरण करणें, हें साधनाचें महत्वाचें अंग आहे. ह्मणून साधकांचा विरह जाणवणें यांत अयोग्य कांहीं नाहीं, योग्यच आहे. 'माझीये जातीचे मज भेटो कोणी।' (तुकाराम)
क. लो. अ. ही. वि.

आपला

x x x

पत्र नं ७३

श्री

४-६-६२

सा. न. वि. वि.

पत्रांना इतकें महत्व देण्याचें किंवा त्याबद्दल इतकी उत्सुकता वाटण्याचें कारण नाहीं. 'Emotions are nearer to Life than reason; but they must be controlled by reason', (भावनांचा जीवनाशी अत्यंत निकट संबंध आहे; पण त्याच्यावर बुद्धीचें नियंत्रण पाहिजे). हा श्री गुरुदेवांचा सिद्धांत. परमार्थाला भावनांचा जितका उपयोग होईल, व ज्यांचा उपयोग होईल, त्या भावना तितक्या प्रमाणांत ठेवणें जरुर आहे. नाहीं तर भावना म्हणजे नुसता Sentimentalism. (उथळ उत्साह). होईल. भावनांच्या उत्कर्षाचा पारमार्थिक जीवनावर कांहींतरी टिकावू परिणाम झाला पाहिजे; हा महत्वाचा मुद्दा. एखाद्या गोष्टीबद्दल उत्कंठा वाढविणें ती तृप्त झाल्यावर समाधान वाटणें, ही एक Psychological Luxury (मानसिक चैन) पुष्कळांना आवडते; पण त्यांत सत्त्यार्थानें उन्नति थोडी होते. काकड आरतीचे वेळीं देवळांत दर्शनाची उत्कंठेने वाट पहात बसणें व पडदा दूर झाल्याबरोबर कांहीं क्षण कृतार्थता वाटणें, हा त्यातील एक प्रकार आहे. पुष्कळ सांप्रदायांत या मानसशास्त्राच्या नियमाचा फायदा घेऊन लोकांना झुलवितात. अशीं अनेक उदाहरणें लौकिक धर्मश्रद्धेंत आपल्याला दिसतात. आपल्याला साक्षात्कार या "ध्येयावर लक्ष" सदा केंद्रित करुन, त्याला जें जितके अनुकूल तितकीच त्याला किंमत द्यावयाची आहे. Sense of proportion (तारतम्य) राखणें अवश्य आहे. क. ही. वि.

आपला

x x x

' साधक-संवाद'

पत्र नं. ७४

श्री

७–८–६२

सा. न. वि. बि.

आजारी असतांना व आजार काळजाचा असतांना आपलीं दोन्हीं पत्रें शांतविचारांनीं भरलेलीं पाहून आनंद वाटला.

एका दृष्टीनें आपण उभयतांहि या प्रसंगीं निर्बल आहा. पैसा, आप्त, कीर्ति या सर्वांचा आजच्या संकटांत प्रत्यक्ष कांहीं उपयोग नाहीं. निर्बलाचें बल राम, तोच आज आपलें बल आहे. We must confess defeat and failure and then alone we sincerely turn to God for consolation and help. (आपण पराजय व अपयश कबूल केलें पाहिजे. तरच आपण सत्यार्थानें, समाधान व साह्य मिळविण्यासाठीं देवाकडे जाऊं.) परंतु, खरोखर अवश झाल्यावाचून आपण हार मान्य करीत नाहीं; म्हणून सामान्य बाबतींत स्वतःला त्रास करून घेतो. मोठ्या बाबतींत हार मान्य करण्याला लाज वाटत नाहीं. अशीं संकटें न यावींत; परंतु आलींच तर हार मान्य करण्यास आपण शिकतो; त्यामुळें चिंता शमली नाहीं, तरी धडपड थांबते, व देवावर भार टाकून स्वस्थ बसल्यानें ओझें कसें उतरतें, हेंहि कळतें. आत्मनिरीक्षण करणाऱ्या साधकाला या अनुभवाचा फायदा होतो. 'जो प्रभु कीन्हो सो भल कर मानो,' ही वृत्ति वाढविण्याचा आपणा उभयतांचा प्रयत्न आहेच. तोच या वेळीं सहाय्यक होईल, झाला आहे, हें आपल्या पत्रावरुन स्पष्ट दिसत आहे. संकटकाळीं दुसरा उपाय नसल्यानें, दुसरें कांहीं सुचत नसल्यानें, मन सतत देवाकडे राहतें. कितीहि त्रास झाला तरी मन, सामान्यतः, दुसऱ्या गोष्टींत रसच घेऊं शकत नाहीं. चिंता व ईश्वर इकडेच मन लागतें. ज्याना ईश्वराकडे मन लावण्याचें माहीत नाहीं, त्यांना केवळ चिंतेचेंच चिंतन करावें लागते. सद्‌गुरुकृपेनें तें दुर्दैव आमच्या

वाटायाला उरलें नाहीं. कुंतीसारख्या अनन्य भक्तानें 'आपदः सन्तु नः शश्वत्' हें कठोर दान कां मागितलें असेल, तें अशा संकटामुळें कळते. या पामर मानवी मनाला संकटाचे बेडींत घातल्याशिवाय ते चंचलता सोडीत नाहीं.

खऱ्या चिंतेच्या समयी मन इतकें शांत राहिलें ही गुरुदेवांची कृपाच होय. पत्रोत्तर लवकर यावें.

आपला
x x x

पत्र नं ७५

श्री

२२-८-६२

सा. न. वि. वि.

आपल्या संकटकाळीं ईश्वरानें खरोखर कृपाळूपणें आपलें अल्प-धारिष्ट पाहिलें.

अत्यंत संकटामधें समर्थांनीं अल्पधारिष्ट पाहिलें. 'देवाचे इच्छेनें वर्तावें। देव करील तें मानावें। मग सहजचि स्वभावें। कृपाळु देव ॥,' हे इतक्या लवकर अनुभवाला येतेंच असें नाहीं. कदाचित् कृपाळुपणाचें प्रत्यंतर शारीरिक-मानसिक पातळीवर न येता, आध्यात्मिक पातळीवर येतें; म्हणजे शारीरिक-मानसिक क्षेत्रांत निराशा होऊन, पुढें दीर्घ काळानें आध्यात्मिक अनुभव आल्यावर, मागें वळून-पाहतां, पूर्वीची निराशा हें अनुभवांच्या फळासाठी वापरलेले खत होतें, असें समजतें. ही परिक्षा फार कठीण, दु:सह. "प्रपंचांत, परमार्थात देतां, घेतां, करतां तोच आहे;" तेव्हां संसाराचा भार त्याच्यावर टाकून 'भागा आलें तें करितो। तुझें नाम उच्चारितो'॥ या वृत्तिनें परमार्थ करणें, हीच साधकबोधांत महाराजांचीं शिकवण आहे.

'साधक-संवाद'

गुरुकृपेच्या प्रत्येक प्रसंगानें श्रद्धा वाढून resignation to His will in supreme faith in His benevolence and omnipotence (ईश्वर परमकृपाळु व सर्व शक्तिमान आहे,या भव्योदात्त श्रद्धेनें सर्व त्याच्या इच्छेवर सोपविणे) ही शरणागति झाली पाहिजे. पुढील पत्र लवकर यावें

आपला

x x x

पत्र नं. ७६

श्री

२१-८-६२

सा. न. वि. वि.

'भावेवीण भक्ति। भक्तीवीण मुक्ति। बळेवीण शक्ति। बोलो नये' ॥ भाव, भक्ति, मुक्ति, या परमार्थातील अत्यंत महत्त्वाच्या कल्पना. भक्ति-वीण मुक्ति नाहीं. कारण, गुरुदेवांच्या तत्त्वज्ञानाप्रमाणें, भक्तीचें शिखर पराभक्ति म्हणजेच मुक्ति-जीवनमुक्ति; जीवनमुक्ति म्हणजेच सायुज्य-मुक्ति, ब्रह्मपद. मग भक्तीशिवाय मुक्ति-भक्तीच्या पर्वतावर हळूंहळूं चढत गेल्याशिवाय तिचें शिखर गांठणें- हें कसें शक्य आहे? पराभक्ति, ज्ञानोत्तर, साक्षात्कारोत्तर भक्ति, साक्षात्कारानंतरच होऊं शकते, म्हणून पराभक्तींत साक्षात्कार आला. व उच्च साक्षात्कार (स्वरूपदर्शन त्याच्या आनंदानें मन भरून जाणें, त्यांत 'बंदा खुदा' दोन्ही विसरणें) म्हणजेच गुरुदेवांचे मतें मुक्ति. आतां, भावावीण, दृढ श्रद्धेवीण 'दीर्घकाळ,नि रंतर, सत्कारयुक्त' भक्ति, नामस्मरण, स्वरुपानुसंधान, नादानुसंधान शक्य नाहीं. "नामस्मरणानें साक्षात्कार निश्चित होईल. साक्षात्कार हेंच जीवनसाफल्य. इतर सर्व व्यर्थ. इतकेंच नव्हें तर घातक. "अवघी चोरे।

एक हरिनाम सोयरे ।। " ही श्रद्धा खोल, दृढ नसेल तर, 'मध्ये पडती आघात.' तें सहन करून भक्ति, वरील सूत्राप्रमाणें, कशी करतां येणार ? असा भाव-भक्ति यांचा संबंध आहे.

आपलें पत्र पोहोंचलें. गुरुकृपेचा प्रत्यय ज्याला आला त्याला संकट तरी कसें म्हणावें ! तो वरच नव्हे कां ? तहान भुकेनें देव आठवतो ; तेव्हां तहानभुकेचा उपकारच मानावा असा तुकारामांचा एक अभंग आहे. क. लो. अ. ही. वि.

आपला

x x x

पत्र नं ७७

श्री

५-९-६२

सा. न. वि. वि.

आपलें कालचें पत्र वाचून आनंद झाला.

सद्‌गुरुसारखा पाठीराखा असल्यावर इतरांचा लेखा (हिशोब) कोण करील ? श्री महाराज म्हणतात ते पुन्हा एकदा प्रत्ययाला आलें. " प्रपंचांत आपली चिंता व आपलें लक्ष व्यर्थ आहे. कारण कर्ता परमेश्वर आहे. आपली चिंता त्यांचे चिंतन करण्याकडे व लक्ष अलक्षाकडे असावें. मग तो भक्तवत्सल आपलें कर्तव्य करीतच आहे." " यासाठीं त्याच्या इच्छेनें जेव्हां, जेथें व ज्या स्थितींत राहण्याचा प्रसंग येईल तेथें, तेव्हा व त्या स्थितींत नाम-नाम-नाम असें नामाचे पुरश्चरण व्हावें. म्हणजे असा प्रसंग भक्तांवर पुन्हां येणार नाहीं; अशी कृपा देव करील." या दोन्ही गोष्टी आपण केल्या; इतकेंच नव्हे तर देव करील तें मानण्याची, मग तें कितीहि तापदाक असो,

मनाची सिद्धता ठेवली. यामुळें हा संकटाचा प्रसंग व काळ परमार्थाला उपकारकच ठरला व आणखी ठरेल. मग याला संकट तरी कां व कसें म्हणावे ? ईश्वराच्या कृपेचा अनुभव येऊन भाव वाढविणारी घटना म्हणजे त्याची कृपाच होय.

काल. ज्ञा. अ. १४ चा शेवटचा कांहीं भाग वाचीत असतां, आत्म-स्वरूपी अर्थात् आत्मदर्शनाच्या आनंदात स्थिर झाल्यावर मनुष्य त्रिगुणातीत होऊं शकतो, दुसरा उपाय नाहीं, हा सिद्धांत ज्ञानरायांनी तेथें मांडलेला दृष्टीस पडला. गुरुदेवांनींहि आपल्या गीता-दर्शनांत हेंच मत मांडलें आहे. गुणातीतत्त्वाची प्राप्ती साक्षात्कारानेंच होऊं शकेल. जशी स्थितप्रज्ञता या नैतिक मूल्याची, तशीच. त्यातील कांहीं सुंदर ओव्या खाली देत आहे.

' किंबहुना पांडुसुता । ऐसा तो माझी सत्ता (ईश्वरत्व)। पावे जैसी सरिता । सिंधुत्वा गा ॥ ३०१ ॥ म्हणून देह अहंतेचा वारा । आतां वाजी ठेला वीरा । तँ ऐक्यवीची सागरा । जीवेशा हें ॥ (याप्रमाणें देहाहंकार संपल्यावर तरंगरूपी जीवाचें शिवरूपी सागराशीं ऐक्य झालें.)

' हा ठायवरी । नेहटोनि ठेविले अंतरीं । आतां कायवर्ते शरीरीं । कांहीं नेणें । (आंतरतम अशा आत्मस्वरूपांत नेटानें शिरून स्थिर झाल्यानें देहावस्था विसरला-आत्मस्वरूपांत शिरला-आत्मानंदांत शिरलाच.)

' पै स्वरूप समरसें । तयाहि गा जाले तैसें । तेथें किं धर्म हे कैसें । नेणें देह ॥ ३१४ ॥ तैसी देह बुद्धि जाये । जें आपणया आठौ होये । (आत्मस्वरूपाचें स्मरण होतें)तँ आन कांहीं आहे । ते वाचून ' ॥ तेव्हां विश्वच बम्हस्वरूप होते; दुसरें कांहीं उरतच नाहीं, ३१७ । ही अवस्था प्राप्त होते. पत्रोत्तर यावें.

आपला

x x x

पत्र नं ७८

श्री

८-९-६२

सप्रेम सादर नमस्कार

आपणा उभयतांची कार्डें पोहोंचलीं. या प्रसंगी आपलें अंतकरण सद्‌गुरूविषयीं प्रेमादर कृतज्ञता या भावनांनीं भरून येणें साहजिक आहे.

'आतां देवा एवढा करी उपकार। देहाचा विसर पाडी मज' ।। (तुकाराम) 'देहाचा विसर पाड, तुझ्या चरणीं मनासहित सर्व वृत्ति राहुं दे,. काम-क्रोधादिकांचा संबंध तोड व 'नाममुखीं, संतसंग' दे. ही तुकारामाची प्रार्थना आहे. ईश्वराकडे जाण्याची क्रिया अशी दोनरुपीच आहे. एक टाकणें व एक धरणें, हे एकाच नामचिंतनाच्या व ईश्वर ध्यानाच्या क्रियेंत घडतें. नामस्मरणाशिवाय देहाचा विसर पडणें शक्य नाहीं, कारण देवाशिवाय इतर कोणाचेहि स्मरण, हे देहाचेच , देहभावाचेंच स्मरण आहे. मग तें कितीहि उच्चविषयाचें असो. तें फार तर देहाच्या सात्त्विक भावाचें असेल, इतकेंच. तें त्रिगुणातीताला पोंहोंचविणार नाहीं.विस्मरण प्रयत्नांनीं साध्य होत नाहीं. दुसऱ्या कशाचें तरी उत्कटतेनें स्मरण करून व ठेवून पहिल्याचे विस्मरण साधावें लागते. वृत्तिसहित मन देवापाशीं राहिले तर स्मरणाची पराकाष्टाच झाली. तेथें देवाचें विस्मरण अशक्य होतें, देहाची पूर्ण विस्मृति होते. श्री महाराजांनीं म्हटल्याप्रमाणें 'शिव शिव म्हणण्यांत 'मी-माझे' विसरणें हा संन्यास.' विस्मरण ही Negative गोष्ट आहे ती करतां येत नाहीं. स्मरण Positive आहे. ते प्रयत्नसाध्य आहे. गुरुदेवांचा सर्व मार्ग Positive आहे. वासनानाश म्हणजे मोक्ष नव्हे, आत्मानंद हा मोक्ष. वासनानाश हा त्याचा सहज परिणाम आहे. साधूला आत्मानंद अपेक्षित आहे; वासनानाश नाहीं. वासनानाश असून त्यांची त्याला जाणीवही नसेल. आंनंदाचीं जाणीव मात्र असलीच पाहिजे. त्या आनंदाच्या आड येतें म्हणून वासना नको; या दृष्टिनें साधकावस्थेत वासनानाशाकडे लक्ष जातें इतकेच.

'साधक-संवाद'

'आत्मदेवाच्या भेटीचा मार्ग दृश्यानें अडविला आहे.' असें ज्ञानेश्वरींत म्हटले आहे.

देहाचा विसर व ईश्वराचे स्मरण हें त्याच्या कृपेचें फळ आहे. आपण प्रयत्न करीत राहून तें सफल करण्यासाठीं देवाचीच प्रार्थना करावी लागते. असे प्रार्थनेचें व मागणीचे नामदेव –तुकारामाचे अनेक अभंग आहेत. 'केला पण चालवी माझा "उपजला भाव़ो । तुझ्या कृपें सिद्धि जावो ।" ' नामदेव तुकारामांनाहि करूणा भाकावी लागली मग तुम्हां आम्हां सामान्यांचा काय पाड ? सर्व क्षेम.

आपला

× ×

पत्र नं. ७९

श्री

२४-१-६२

सादर सा. न. वि. वि.

आजच्या प्रवचनावरून कांहीं विचार सुचतात, ते असे. गुरुदेव म्हणत असत कीं, अनुभवाशिवाय भाव वाढून शरणागतीपर्यंत जाणें अशक्य आहे. हे अनुभव प्रांपंचिक व पारमार्थिक, दोन्ही प्रकारचे, असले पाहिजेत. प्रपंचांत देवच कर्ता आहे, त्याची भक्ति केली, तर तो संकटमुक्त करतो ; अंत:करणांतील दोष त्याच्या कृपेनें नष्ट होतात; ज्ञानहि तोच देतों; विवेक जागृत करतो ; सारांश, मनुष्याला जें तें अभिप्रेत आहे, तें तो देतों, असा वेळोवेळीं अनुभव आल्यावाचून अंत:करणापासून शरणागति कशी होऊं शकेल ? त्याचप्रमाणें, नामस्मरणानें त्याचा साक्षात्कार होऊन जीवन धन्य, पूर्ण होण्याच्या मार्गाला लागतें ; हे अनुभवाला आल्यावर त्याच्या प्राप्तीचा

ध्यास लागून, तें एकमेव ध्येय ठरेल आणि इतर सर्व जीवनमूल्यें व्यर्थं ठरतील ; त्यांच्याबद्दल ओढहि वाटणार नाहीं. मग शरणागति ही सोपी होते. इतकेंच नव्हे तर मनुष्य आनंदानें तिच्यामागें लागतो, शरणागति हेंच त्याचें ध्येय ठरतें ; कारण ती साक्षात्काराच्या अलीकडची पायरी आहे. साक्षात्कारानंतर तर तिची पूर्तता अभेदांत–जीवब्रम्हैक्यांत–होते. तेव्हां शरणागति व भाव अनुभवाबरोबर हळूं हळूं वाढत जातात. विवेकानें प्रथम ती निर्माण करावी लागतात, हें खरें ; पण तो उगम होय ; वाढ अनुभवाच्या प्रमाणांत होणार ; विवेकहि संतांच्या उपदेशावर आधारलेला असावा; म्हणजे तो Secondary अनुभव तरी असतो. नुसता तार्किक तत्त्वज्ञानांचा उपदेश किंवा त्यांचे सिद्धांत काय कामाचे ?

'अंधेनैव नीयमानायथांधा।' असें होईल. तशी वस्तुस्थिति असल्यानें, 'सर्व देव देतों,' असें समजल्यावरच तुकारामांचा भक्तिभाव दुप्पट होत गेला असे दिसते. ते म्हणतात. 'जाऊं देवाचिया गांवा। देव देईल विसावा॥ देवा सांगो सुखदुःख। देव निवारील भूक॥ घालूं देवासीच भार। देव सुखाचे सार॥ राहो जवळी देवापासी। आतां जडोनि पायाशी॥ तुका म्हणे आम्हीं बाळें। त्या देवाची लडिवाळें, '॥ क. ही. वि.

आपला

x x x

पत्र नं. ८०

श्री

१४–११–६२

सा. न. वि. वि.

स्वामी जैमलासिंगांच्या पत्रांत ते लिहितात–

'अनाहत नादावर प्रेम बसून मन त्याच्याशी एकरूप झालें, म्हणजे

साधक 'सच्चखंडाला (परमब्रह्माला) जाऊन पोहोंचतो व मुक्त होतो. परंतु देहधारी सद्गुरुंच्या सगुणदेहाबद्दल प्रथम प्रेमादर वाटला पाहिजे ; तो वाटला नाहीं, तर परमार्थांत एक पाऊलहि पुढें पडणार नाहीं. कारण (ब्रह्मच) सत्यपुरुषच संतरूपानें अवतरतात." निरनिराळ्या प्रकारांनीं हाच सिद्धांत सर्व संतानी प्रतिपादला आहे. व तो सत्यच आहे. 'गुरु परमात्मा परेशु। ऐशा ज्याचा दृढ विश्वासु॥ देव तया घरी संचला। सदा संचला तया घरी॥' (एकनाथ). 'लोक गेले विसरुनि खऱ्या देवा॥' (तुकाराम) ज्ञानेश्वरांनी तर निवृत्तीनां चित्सूर्यंच म्हटलें आहे. कबीरांना 'गुरुगोविंद दोनो खडे' असतांना गुरुचरणींच शरण जावेसें वाटतें.

आतां या सिद्धांताचें मर्म काय ? गुरुदेव देवाचा अवतार मानीत नाहींत. गुप्तरुप म्हणजे गुरु; केवळ देह गुरु नव्हे. मग सगुणाला इतकें महत्त्व कां ? 'सगुणाचे नि आधारें। निर्गुण पाविजे निर्धारें॥' असे रामदास कां म्हणतात. याचें कारण असें दिसतें, कीं शिष्याला निर्गुण, गुप्तरूप वा सद्गुरुंची अंतरस्थिति कळत नाहीं. साक्षात्काराचें परिणाम–शारीरिक मानसिक, बौद्धिक, नैतिक–हें कांहीं प्रमाणांत कळतात. तो सद्गुरूंच्या या गुणावरून साक्षात्कारानें त्यांच्यावर झालेल्या परिणामानी आकर्षित होऊन त्यांच्याकडे वळतो. तेच गुण जर त्याला अत्यंत प्रिय असतील तरच तो परमार्थ- मार्ग स्वीकारील व साधन उत्कटतेनें करील. त्याला देव शब्दाचा अर्थ सद्गुरुंचे अनेक थोर गुण. बुद्धिनें वेदांत समजला तरी, त्याच्या भावनांना चालना देणारा देव म्हणजे सद्गुरूंचे गुण, कारण, ईश्वरप्राप्तीनें ते गुण लाभतील, या उत्कंठेनें तो परमार्थाला लागणार. आतां, या गुणाबद्दलच जर नितांत आदर, अनन्य प्रेम नसेल, तर तें परमार्थावर तरी कसें जडेल ? तो परमार्थ अनन्यभावानें कसा करील ? ज्या इतर गुणांवर व गोष्टीवर त्याचें अधिक प्रेम आहे, त्यांच्या प्राप्तीचेंच प्रयत्न त्याच्याकडून घडतील. आतां सद्गुरूंच्या गुणावर प्रेम बसण्याला, विवेकानें आपलें ध्येय स्पष्ट होत गेलें पाहिजे. नाहींतर अनेक तथाकथित गुरुंचें आंधळे भक्त, एखाद्या चम–

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम .... दि ....

त्कारानें किंवा एखाद्या अलौकिक गुणानें वा दुसऱ्यानीं केलेली अवास्तव स्तुति ऐकून, त्यांच्या चरणी लागतात व शेवटीं फसतात, तसें होईल. तेव्हां सगुणा-वर (सद्‌गुरूंच्या) प्रेम बसण्यालाहि विवेक-वैराग्य उच्च प्रतीचें लागतें. वैराग्य नसेल तर प्रेम विषयावरच राहील. विवेक-वैराग्यांच्या सामर्थ्यानें सद्‌गुरुंच्या गुणांची जाणीव होऊन, त्यावर प्रेम बसलें, कीं पुढील मार्ग पुष्कळ सोपा होतो. तुमचें आमचें सद्‌गुरु प्रेम असें डोळस-शुद्ध आहे कां ? हा प्रश्न प्रत्येकानें स्वतःला विचारावा. अर्थात् नामस्मरण, त्यांची कृपा यानींच सगुणावर प्रेम बसणार, त्यांतहि क्रमयोगानेंच वाढ होणार. क. लो. अ. ही. वि.

आपला

x x x

पत्र नं ८१

श्री

२५-३-५७

(टीप: एका निष्ठावंत, सज्जन साधक बंधूच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नींना लिहिलेलें हें पत्र.)

श्री. ताईना सा. न. वि. वि.

आपले ता. x x चे हृदयस्पर्शी पत्र वाचून अंतःकरण व डोळे भरून आले. पत्र लिहितांनाही तेंच होत आहे. आपली व कै. ×× ची आठवण वरचेवर होते. माझ्या पत्नि आपणास पुण्यास भेटल्या. त्यांच्या-कडून याची थोडी कल्पना आपणास आली असेल. इतके असूनहि आपल्या पत्राचें उत्तर देतांना कांहीं कठोर सत्येंच लिहिलीं पाहिजेत. ती लिहिण्याचा प्रसंग न येता तर सर्वांनांच आनंद होता. पण देवाची तशी इच्छा नव्हती.

आतां कठोर आत्मसंशोधन व आत्मनिरीक्षण करून पुढील जीवनाचा मार्ग चोखळला पाहिजे. तुम्ही वीरकन्या वीरपत्नी, वीरस्नुषा आहांत; आता वीरमाता झालें पाहिजे.

श्री बाबांच्या ज्या आठवणींचा उल्लेख आपण आपल्या पत्रांत केला आहे; तो एका शिष्याच्या प्रथम पत्नीच्या मृत्युसंबंधी आहे, हें कदाचित आपणाला ठाऊक असेल. त्यावेळीं त्यांनी एक गोष्ट सांगितली. "समर्थानीं सगळ्या शिष्यांना विचारलें," तुझी माया काय करील ?" सर्वांनी माया शब्दाचा अर्थ माय (आई) असा करून, 'माझ्यावर प्रेम करील,' वगैरे सांगितले. एकटे कल्याण म्हणाले, "माझी माया-(मोह) रडवील; दुसरें काय करणार!" हीच आपली सर्वांची अवस्था आहे. एक ईश्वरावाचून ज्या ज्या गोष्टीवर आपण प्रेम करतो, तें प्रेम आपणाला रडवणार हे उघड आहे. तेव्हां आतां देवाची भक्ति व प्रपंचांत कर्तव्य म्हणून काम, या दोनच गोष्टी करावयाच्या, अशा वृत्तीने राहिलें पाहिजे. आतां प्रपंच कर्तव्यापुरतें पण मुख्यतः भक्ति करतां जगावयाचें आहे. जितक्या लवकर मनुष्य ही वृत्ति स्वीकारतो, तितका तो दुःखाचे आघात सहन करू शकतो. कबीर म्हणतात "दुःखमे सुमिरन सब करे, सुखमें करे न कोय। जो सुखमें सुमिरन करे, तो दुःख कायेसा होय ॥"

सुखाची वर्षानुवर्षे भराभर निघून जातात, त्यावेळीं त्याची नश्वरता उमगत नाहीं. व त्यांत आपण अधिकाधिक आसक्त होतो. जितकें खोल दूर जावें, तितकें परत येणें कष्टाचें होतें. हें प्रत्येकाचेंच होते. तरीहि तुम्ही नाम घेऊन नामस्मरणहि केलें आहे. त्यामुळें प्रप्रंचापासून मनानें दूर राहण्याची संवय नकळत झाली आहे. या दारूण आघाताची तीव्रता काळानें कमी कमी होत जाईल, तसतसें आपलें पुढील कर्तव्य स्पष्ट होत जाईल. मात्र तसे होण्यासाठीं, आम्हीं चालू परिस्थितींत, नामस्मरण, वाचन, चिंतन सुरु ठेवलें पाहिजे. नाम घेतांना, आपण म्हणतां त्याप्रमाणें, शेवटच्या सर्व आठवणी येणारच, त्या आल्यातरीं प्रयत्न चालू

'साधक-संवाद'

ठेवावा, त्या दुःखाच्या प्रवाहांतच नामाचा प्रवाह मिसळावा. सर्व गोष्टींना शेवट आहे. तसा दुःखालाही आहे.दुःख अमर नाहीं. आपण त्याच गोष्टींच्या चिंतनानें तें वाढवितो. चिंतन सोडतां येत नाहीं पण नामस्मरणाच्या प्रयत्नानें तें चिंतन कमी तीव्र होतें, पुढें पुढें सुटते. म्हणून प्रयत्न चालू ठेवावा. यश येत नाहीं असें वाटले तरी प्रयत्न करावा. ती यशाकडे वाटचाल आहे. दुःखाचे चिंतन सोडणें म्हणजे कांहींतरी वाईट, पतिद्रोह, कर्तव्यच्युति अशी भावना होतें व म्हणून आपण तें घट्ट धरतो. पण ही चक आहे. दुःख विसरणें म्हणजे मृताला विसरणें, कर्तव्याला विसरणें नव्हें; उलट मृताचे स्मरण ठेवून त्या संबंधी पूर्ण कर्तव्य करण्याला दुःखाची परिणती अनासक्तींत झाली पाहिजे. देहभावासंबंधी अनासक्ति व शिवभावसंबंधी आसक्ति व्हावी. यांतच खरें कर्तव्य आहे. त्याचीच आपल्या पतींनी आपल्याकडून अपेक्षा केली असती. हें सर्व नामस्मरणानें व विवेकानेंच होणार आहे. तरी विवेकानें व नेटानें प्रयत्न करावा.

"देवाविण जें जें आस । तें तें जाणावी नैराश्य।।" श्रीमहाराजांनी दुःख शद्वाचा अर्थ निवृत्तिपर दिला आहे. दुःख म्हणजे काळजी खरी दूर झाली. 'दुःखाच्या आघातानें, एका देवाशिवाय सर्व खोटें अशी वृत्ति होऊं लागली पाहिजे. हा विवेक उत्पन्न झाला कीं दुःखाचें दुःखपण गेले, काळजी संपली, असा निवृत्तिमार्गानें दुःख शद्वाचा अर्थ आहे.' दिवंगत व्यक्तीचे पुढें काय झाले असेल, अशी तळमळ आपल्याला लागणे अगदी स्वाभाविक आहे. परंतु तें कोणाला कळत असेल की नाहीं कोण जाणे! श्री. बाबानां एका शिष्याचा मृतपत्नीसंबंधी तशी तळमळ लागली, तेव्हां त्याना शद्व झाले, "ती सद्‌गतीला गेली." प्रत्यक्ष तिचें काय झाले हें त्यांनी पाहिलें नाहीं. या बाबतीत ईश्वरावर दृढ विश्वास व तो करतो तेंच उत्तम अशी श्रद्धा, हाच आपला आधार आहे. ईश्वर एकमेव कर्ता, दुसरा कोणीहि कांहींहि करू शकत नाहीं; तो सर्व समर्थ आहे. तसाच तो परम दयाळू परम कृपाळू आहे मग तो करील तें वाईट कसें असेल, तें उत्तमच असले पांहिजे,. आपल्याला

त्या पासून दुःख होतें, याचें कारण आपलें अज्ञान, आपली अदूर दृष्टी व दुर्बलता. अशाच श्रद्धेनें राहिलें पाहिजे. "जो प्रभू कोन्हो सो भला कर मानो। यह सुमति साधूसे पाई" "Thy will be done देव करील तें मानावें" हें सर्व संत शिकवतात.रडत,अवशतेनें नव्हे,तर यातच सर्वांचें अंतिम हित आहे, या श्रद्धेनें मानावे. आपल्या पतीसारख्या सज्जनास सद्‌गती मिळाली असली पाहिजे. आता ते योग्यांच्या कुलांत जन्म घेऊन पुढील वाटचाल झपाट्यानें करतील, व "आपण तरूनि विश्व तारा"या पदवीला जातील,अशी आमची तरी दृढश्रद्धा आहे. सेन्ट आगस्टिन हा पूर्व वयांत थोडा वांड (नैतिक दृष्टीनें) होता. तेव्हां त्याची धर्मशील आई फार रडे.तिला तिचे गुरु म्हणाले, "बाई काळजी करू नको; अशा पवित्र अश्रूंचा मुलगा वाया जाणार नाहीं." पुढे तो मोठा संत झाला.आपल्या पतीनां तर किल्मिशाचा स्पर्शच झाला नाहीं. त्यांच्या व सेंट ऑगस्टीनच्या गोष्टींत साम्य अश्रूंचें. त्याच्या अनेक साधक मित्रांनीं व गुरुदेवांनीहि त्यांच्या गुणांच्या स्मरणानें अश्रु ढाळलें, ढाळीत आहेत. त्यांची पवित्र मातापिता, तुमच्या सारखी साध्वी पत्नी तर तेंच करीत आहांत. मग त्यांना सद्‌गती मिळाली असेल, यांत काय संशय? तरीहि आपण आपल्या मनांत आलेल्या प्रश्नाचें उत्तर देण्याचीं श्रीगुरूदेवांना अवश्य विनंति करावी. पत्र लिहिण्यास काहींही हरकत नाहीं. आपणाबद्दल त्यांच्या मनांत शुद्ध वात्सल्यभावच आहे. कदाचित उत्तर येणार नाहीं. कारण पत्र लिहिण्यास प्रौढ मनुष्य त्यांचेजवळ कोणीही नाहीं. तरी तुम्ही पत्र लिहा.मी जूनमध्ये किंवा त्यापूर्वी त्यांना भेटल्याकर, त्यांना विचारून तुम्हाला जरूर लिहिन. पत्राचें उत्तर त्यांचेकडन आलें नाहीं तरी, गैरसमज करून घेऊ नका; किंवा वाईटही वाटून घेऊ नका.

वरील सर्व लिखाणांत आपल्या पतींना देवाने आणखी आयुष्य कां दिले नाहीं याचें उत्तर आलेच आहे. तें उत्तर म्हणजे "त्याची लीला तोच

जाणे, मानवाला ती अगाध आहे." मनुष्यानें आपल्या बुद्धीची पणती पेटवून कितीही मोठी केली तरी त्याच्या पणतीला देवाची लीला कळणार नाहीं. केवळ श्रद्धेला तिचे थोडेसें ज्ञान होईल; व ते इतकेच कीं ईश्वर सर्व समर्थ, सर्वज्ञ; तोच दयामय आहे; तो योग्य तेंच करील. आम्हाला तें वाईट वाटलें तर ती आमची चूक आहे.तेव्हां तो करील तेच योग्य या वृत्तीनें राहावें. ही बुद्धीची नम्रता शिकलीच पाहिजे." "आपल्या मनोगताकारणें। देवावरी क्रोधास येणें। ऐसी नव्हेत कीं लक्षणें। सख्य भक्तिची ।।" रागास येणे तर राहोच; पण हे कां केलें अशीं शंका घेणेंहि सोडले पाहिजे. तुम्ही उभयतांनी एकत्र परमार्थाची वाटचाल करावयाची ती केली. आता त्यांचा मार्ग निराळा झाला. ईश्वर त्यांना मार्गदर्शन करील, तुम्हालाही करील. यापलिकडे आतां विचार करणें शक्य नाहीं. त्यांना प्रचिती होती व ती शेवटपर्यंत आली असणें अगदीं शक्य आहे. ती ज्योत प्रचीतीची असली पाहिजे यावरूनही त्यांना सद्‌गती मिळाली असेहि म्हणता येईल. यापुढें देव त्यांच्या आत्माचें व सर्वांच्या आत्माचें कल्याण करील त्यासाठीं त्या त्या आत्माला ज्या परिस्थितीतून जाणे अवश्य आहे,त्यातून तो ईश्वराच्या इच्छेनें जाईल, येवढेंच आपण म्हणूं शकतो. याच श्रद्धेनें ईश्वर करील तें योग्य मानून, आपला परमार्थाचा मार्ग आपण आक्रमावयाचा आहे. म्हणजे ज्यांचें उत्तर कधींच मिळणें शक्य नाहीं, ते प्रश्न मनांतयेऊन, मन नामस्मरणापासून चलित होणार नाही. "जो जो गये बहुरी नहि आवे। पठवत नही संदेश ।।" (जे जे गेले ते पुन्हा त्याच देहानें परत येत नाहींत किंवा निरोपहि पाठवीत नाहींत.) हे कबीरांचें रोकठोक वचन श्री गुरूदेवानी दिले आहे, व परलोक विद्या, प्लँचेट यांत कांहीं अर्थ नाहीं असें बजावले आहे.एकाची पत्नी गेल्यावर बाबा त्याला म्हणाले, "गेले ते गेलेच गेले, पुन्हा येत नाहीं. मग ते कां गेले, कां गेले असा व्यर्थ विचार करून काय उपयोग ? तो सोडून द्यावा."

पत्र पुष्कळ लांबलें. पुरे करतो. तुमच्या पत्रानें मला कधीच त्रास

वाटणार नाहीं. अत्यल्पअंशानें तुम्हाला समाधान देता आलें तर हजार शद्व मी आनंदाने लिहीन. पण ते शक्य नाहीं याचेच वाईट वाटतें. केव्हाही पत्र लिहिलेत तरी उत्तर अवश्य पाठवीन. तें माझे पवित्र कर्तव्य आहे. पण उपदेश करण्याचा अधिकार मात्र नाहीं. तुमची मनस्थिती मला कळतें. त्या सारख्या दुःखांतून मीही गेलो आहे. हें पत्र कठोर सत्यांनी भरलें आहे. तें वाचण्याइतकें आपलें मन आज सुदृढ नाहीं. ते हळवे, नितांत हळवे, बनलें आहे. तेव्हा हें पत्र वाचून तुम्हाला आणखीच वाईट वाटेल, अशी मला प्रत्येक ओळ लिहितांना भिती वाटत आहे. लिहूं नये असें क्वचित वाटतें; कारण समाधान देणें अशक्य, दुःख खास होणार. मग विस्तारशः न लिहिता लौकिक दृष्टया समाधानाचें चार शद्व लिहून, संपविलेले काय वाईट असें मनांत येते; पण तेंही अयोग्य. तुम्ही व तुमचे पती याच्यासंबंधी वाटणारा जिव्हाळा, तें करू देत नाहीं; म्हणून शेवटीं हें सर्व लिहिलें.सत्य कठोर आहे. तें लिहिण्याचा प्रसंग येऊ नयें, तो आला आहे.मग दुसरे काय करू? तुमच्या मनाला दुःख दिलें त्याबद्दल क्षमा करा. पण अंती या पत्रांत लिहिलेल्या विचारांत व श्रद्धेंतच परमहित, परमार्थ आहे याबद्दल संशय नाहीं." देव भक्तालागी करू नेदी संसार। अंगे वाशवार करूनि ठेवी"। असें तुकारामांचें वचन आहे.

मुलांना वडिलांकडून कौतुक करून घेण्याचे भाग्य नाहीं, असें आपण लिहिले. फार फार खरे आहे.हे दुःख माझ्या मुलांच्या प्रत्येक परीक्षेतील यशाचे वेळीं होऊन हे त्यांच्या मातोश्रीसंबंधीं शल्य टोचून, माझे डोळे ओले झालेले आहेत. अशी अनेक शल्यें आहेत. यथाक्रम तीं हालणार आहेत. पण त्यांच्यातून शहाणपण शिकावयाचे आहे.

"प्रपंच आधींच नासका। विवेकें करावा नेटका।
नेटका करितां फिका। होत जातो."॥ (दासबोध)

क्रमाक्रमानें प्रपंच मनाला फिका वाटेल असा तो करणें, अलिप्ततेनें, सुखाशा सोडून कर्तव्य म्हणून करणे. नासक्या-स्वभावतः नासक्या-प्रपंचातील

किती म्हणून शल्ये दूर करणार! असो पुन्हा एकदां अयोग्य वेळीं दुःख दिल्याबद्दल क्षमा मागून पत्र संपवितो. सर्व मुले यांना स. आशीर्वाद. परमेश्वर आपणाला सर्व सोसण्याला धैर्य देवो व आपला परमार्थ दृढ करो अशी त्याला प्रार्थना आहे.

पत्र नं ८२

श्री

६-२-५७

(टीपः- मागील पत्रांत उल्लेखिलेल्या गुरुबंधूंच्या वडिलांना पत्र)

ती. xxx यास सादर सप्रेम सा. न. वि. वि.

आपणावर झालेल्या वज्राघाताचे वर्तमान सकाळ मध्ये वाचले. चार दिवस कोल्हापूरला गेलो होतो. परत येईपर्यंत आपले सविस्तर पत्र येईल, ही अपेक्षा होती. ते आले नाहीं; तेंव्हां चिंता वाटू लागली. आजच पत्र पाठवणार होतो. तो 'सकाळ'नें नको ती बातमी दिली.

आपल्याला काय लिहूं? आपले व आपल्या सज्जन पत्नी, गुणसंपन्न पण आतां शोकसागरांत पडलेली जेष्ठ सून, दुसरा मुलगा व सून, पितृविहीन नातवंडे, यांना किंचित् तरी समाधान देण्याचें सामर्थ्य ईश्वराशिवाय कोणा-मधें तरी आहे कां? इतका सद्‌गुणी, आनंदी, परोपकारी, निष्ठावंत पापभिरु, बुद्धीमान, किती विशेषणें आठवून लिहूं-डोळें अश्रुनी भरून येत आहेत; मग आपली सर्वांची काय अवस्था होत असेल! कल्पना करवत नाहीं. कित्येक वर्षांत मला इतकें दुःख झालेलें नाहीं. गेल्या मे मध्यें एक दिवस सकाळी सहा वाजतां, आपले हे दिवंगत पुत्र माझ्याकडे पुण्यास आले; व आपले मन शुद्ध नाहीं ते शुद्ध कसे होईल, विकार कसे जातील, असें म्हणून माझ्या खांद्यावर मान टेकून अश्रु ढाळूं लागले. इतकें अनागस तें बालमन होतें. तशी त्यांची व माझी ओळख अलिकडें ५-७ वर्षांतीलच; पण त्यांच्या

अनेक गुणांनीं, अनेकाप्रमाणें मलाही मुग्ध केले. हें सर्व वाचून आपलें दुःख द्विगुणित होईल. पण इतका थोर पुत्र कांहींतरी वर्षें लाभला–फार थोड्यांच्या वाट्याला, हे भाग्य येते, दुर्दैवानें हें दुःखहि येते; यानें थोडे तरी बरे वाटेल. मृत्यु सर्वांनाच आहे. परंतु तो आलाच तर मृताच्या स्मरणानें अनेकांनी अश्रुंची अंजली समर्पण करावी व त्याच्या स्मरणानें स्वतःच्या जीवनाला प्रकाशित करावें, हेही एक भाग्यच.''तनु त्यागिता कीर्ति मागे उरावी'' असा तनुत्याग आपल्या पुत्रानें केला. कीर्ति दिगंती गेली नसेल, पण जितक्या अंतःकरणांचा तिनें वेध घेतला, त्या सर्व ठिकाणीं ती विमल प्रकाश पाडीत राहील. त्यांत हिणकस अंश नव्हताच. आपण, व आपणामुळें सर्व कुटुंब, त्यागाचे प्रतीक आहांत; धीर वृत्तीचें आहांत.मी काय लिहावे? दुःख झालें तरी काल थांबत नाहीं; कर्तव्यें थांबत नाहींत. नातवांना मार्गाला लावणे, सुनेला धीर देणे, हे इतर सर्वांचे मुख्य कर्तव्य आहे. जाणतच आहां. दादांच्या पत्नि वीर कुळातल्या आहेत. त्यांच्या धीर गंभीर काकांचा आदर्श त्यांच्यासमोर आहे. सर्व कर्तव्यें आपणा सर्वांच्या सहाय्यानें त्या उत्तम प्रकारें पार पाडतील.त्यांचीं मुलें म्हणजे आपल्या पित्याच्या मूर्तिच निपजतील व त्यांचें दुःख हलके करतील. या भविष्य कालावर व उच्चतम कर्तव्य जी देवाची भक्ति त्यावर सर्वांनी लक्ष ठेविलें पाहिजे. Thy will be done (देवा,तुझ्या इच्छे प्रमाणें होवों.) असे म्हटले पाहिजे. आज आपणाला कळलें नाहीं तरी जें घडलें त्यांत सर्वांचेंच अंतीम हित असले पाहिजे; नाहींतर दयाळू व सर्वसमर्थ देव ते करणार नाहीं, या श्रद्धेचा कटु घोट गिळिला पाहिजे. तोच शेवटीं सर्वांना तारक होईल.

आपण वडील. पायरी सोडून लिहिलें. उपदेश नव्हे. मनांतील स्वतःशी चाललेले विचार कागदावर उतरले इतकेंच. मी व माझ्या सारखे अनेक क्षुद्र जीव आपल्या व आपल्या कुटुंबियांच्या दुःखांत सहभागी आहेत. येवढेंच लिहतो. पण यांनी काय समाधान होणार! योग्य वाटल्यास हे पत्र सुनबाईना दाखवावे. गेल्या चार वर्षांत आपल्या घरीं कोणत्या आनंदानें आलो व आतां

येईन तेव्हां कोणत्या वातावरणांत व मनस्थितीत येईन याचा विचार मनांत येऊन पोटांत कालवाकालव होते.

आपला दु:खित

x x x

पत्र नं. ८३

श्री

२०-११-६२

सा. न. वि. वि.

सद्‌गुरुबद्दल नितांत प्रेमादराची भावना कां पाहिजे यासंबंधी मागच्या पत्रांत कांहीं विचार लिहले होते. त्याच्याच पुढें, त्यांचें सतत स्मरण ठेवलें पाहिजे, हें क्रमप्राप्तच आहे. ज्याचें वारंवार स्मरण होत नाहीं, त्याच्याबद्दल वाटणारा प्रेमादर उथळ, मामुली, असेंच खरें. तो जीवनांत खोल, अंत:करणातल्या अंत:करणांत रुजला नाहीं. स्वामी जैमलसिंगांच्या पत्रांत या सतत सद्‌गुरुस्मरणाबद्दल पुन:पुन्हा सांगितले आहे. श्री भा. म. नींहि "मी गुरुपुत्र' आहे याचें सतत स्मरण असावे," अशी सूचना दिली आहे. नेमाला बसण्य:-चेवेळीं सद्‌गुरुंच्या सगुणरुपांचें स्मरण करावें, असें श्री जैमलसिंग सांगतात. हे फार उपयुक्त आहे, असें मला वाटलें. मनांत चाललेल्या प्रापंचिक कल्पना, नेमाला बसण्याचा कंटाळा, विकल्प, हे सर्व सदृगुरुंच्या स्मरणानें transfer scene प्रमाणें दूर होतात व आपलें कर्तव्य नेम करणें, ही चित्तांत जागृति होऊन, नम सुरु होतो. पुढें कल्पना येतात, ही गोष्ट निराळीं. प्राथमिक Inertia दूर करण्याला सद्‌गुरुस्मरण फार उपकारक ठरतें. कांहीं थोडें चांगलें वाचून किंवा म्हणून नेमाला बसावें, असें सांगतात तें चांगलेच आहे. पण वाचण्यापूर्वी सदगुरुस्मरण करून, मग वाचावें व नेमाला बसावें, हे अधिक उपकारक ठरतें, असें मला आढळून आलें. हाच विचार आपल्या

'साधक-संवाद'

बरोबर Share करीत आहे. सद्‌गुरुस्मरणाबरोबर association of ideas (कल्पनांची संबद्धता) च्या नियमानें, सर्व परमार्थच डोळयापुढें उभा रहातो; निदान हळूं हळूं अभ्यासानें राहिला पाहिजे. अर्थात ईश्वरप्राप्ति हें मुख्य जीवनमूल्य; त्याचें साधन म्हणून नामस्मरण हें मुख्य कर्तव्य, इतर सर्व विनाशी; गौण, ही जीवनमूल्याची कल्पना सद्‌गुरुस्मरणानें मनांत उद्‌भवली, पुन्हां जागृत झाली, म्हणजे साधन करण्याला मन प्रवृत होते· Inertia दूर होतो. कांहीं प्रापंचिक अडचणींची चिंता लागून राहिलेली असली तर 'समर्थच काय ते करतील, त्यांचीच कृपा भाकली पाहिजे,' ही शरणागतीच्या शिकवणीची आठवण होईल व नेम करावासा वाटेल. 'निर्विकल्पासी कल्पावे। कल्पना मोडे स्वभावें'।। या नियमाचा उत्कृष्ट नमुना म्हणजे सद्‌गुरु-स्मरण होय. त्यामुळें जितक्या प्रकारांनी व जितक्या मानसिक अडचणींत स्फूर्ति दर्शन होईल, तितकें इतर 'निर्विकल्पांच्या कल्पनेनें' होणें कठीण. मानसशास्त्राच्या दृष्टीनें साधनाचें विश्लेषण व विवरण करण्यामुळें, साधनोपकारक म्हणून सांगितलेल्या प्रत्येक उपायाचा मनावर कसा परिणाम होतो, व तो साधनाला कां उपकारक होतो,इकडे अधिक लक्ष जातें. त्याचा नेमाच्या वेळीं उपयोग होतोच. त्यासाठींच हे विश्लेषण करावयाचें.

पत्रोत्तर यावें.

आपला

x x x

पत्र नं ८४

श्री

११-१-६३

सा. न. वि. वि.

पावसला 'स्वरूपानंद' या विषयावर अर्धा तास प्रवचन झालें. या दोन शद्बाना तत्त्वज्ञानांत किती महत्व आहे, हें सांगितलें. स्वरूप-साक्षात्कारानें जीव स्वरूप होतो. त्या साक्षात्काराच्या आनंदानें जीव आनंदी होतो. तेव्हां स्वरूपानंदत्व किंवा आनंद-स्वरूपत्व (दोन्ही एकच), हीच जीवनाची पूर्णता व कृतार्थता; त्यासाठीं नरदेहाची महती. हीच जीवन-मुक्ति व या मुक्तींत सायुज्यमुक्ति अंतर्भूत आहेच; ही ब्राह्मी-स्थिति; म्हणजेच आत्मानंदानें तृप्त झाल्यामुळें सहज अशा वासनात्यागानें येणारी स्थितप्रज्ञता; ही जिवंत असतांनाच प्राप्त झाल्यावर, ती अंतीं सिद्ध आहेच. मरणा ऐलीकडे देवाला मिळाल्यावर मृत्यूनंतर भक्त दुसरीकडे कोठे व कसा जाईल?

सर्व क्षेम

आपला
x x z

पत्र नं ८५

श्री

२२-१-६३

सा. न. वि. वि.

आपलें पत्र पोहोंचलें. त्यांतील "आपल्या दुश्चिततेमुळें इतरांच्या नेमांत व्यत्यय आला, याचें वाईट वाटलेंच, पण आनंदहि झाला," हा विचार अगदी नवीन सूक्ष्म व सत्य आहे. कारण 'त्यांत स्वतःला, कांही योग्य वाट-

...मंथालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम .... दि: ...
क्रमांक .... नों. दि: ...

णाऱ्या मित्रांच्या मतें, महत्त्व आहे हा प्रत्यय आला,' हें आपण म्हटले आहे. हा फार मोठा विचार आहे. नतिक, अध्यात्मिक प्रगतीचें हें मूळ आहे. यातून दुसऱ्याच्या संतोषाकरतां जगण्याची वृत्ति निर्माण होते.व egocentric मन Hetero – centre होतें. हा Hetero– किंवा 'अन्य' जितका उच्च असेल तितकी इष्ट व दिव्य क्रांति जीवनांत घडते. पण egocntric (देहभाव केंद्रित) वृत्ति सुटणें हें पहिले कार्य होण्याला, लहान heteros (अन्य) ही उपयूक्त होतो. पुढे तो heteros सद्गुरु वा देवच होतो. व 'देवाच्या इच्छेनें वर्तावें' या शरणागती पर्यंत इष्ट प्रवास घडतो; शेवटी हा Heteros म्हणजे ego (आत्मा) असें वर्तूळ पूर्ण होतें. Self (जीवात्मा) चा Self (परमात्मा) बनतो. मानसिक प्रक्रियेची ही पहिली पायरी आहे. व तें Credit ती पायरी चढणाऱ्याच्या मनाला आहे. पायरीला नाहीं. दारिद्रय ही तुकारामांच्या व पत्नि ही तुळसीदासांच्या आध्यात्मिक जीवनांतील पहिली पायरी होती. त्यांत मोठेपण तुकाराम तुळसीदासांचें आहे; पायऱ्यांचें नाहीं.

'हालवूनि खुंट। आधी करावा बळकट। मग तयाच्या आधारें। करणें जे अवघे बरें॥'

ईश्वरप्राप्ति या ध्येयावरील श्रद्धा पक्की करून घ्यावी; खुंट परिस्थिति हालवित असते तो स्वत:हि हालवावा. याचा अर्थ,आपल्या पारमार्थिक अवस्थेचा कस परिस्थिति पहात असते, प्रसंगाला आपण किती टिकतो,हें पाहण्याचें प्रसंग येतातच; त्याचबरोबर आत्मनिरीक्षणानें आपणहि तें पहावें.

'आपले अंत:करण साक्ष ठेवुन भक्ति करावी;'आपली परीक्षा घ्यावी; म्हणजे 'आम्ही जाहलों', असा अहंकार उत्पन्न होत नाहींच. परंतु मुळांत, महाराज म्हणतात, त्याप्रमाणें 'वर वर भक्ति व आंत स्वार्थ,' आहे कीं काय, हेंहि समजतें. हें करीत करीत मन ईश्वरचरणीं स्थीर झालें, 'ईश्वरावाचूनि कोणी नाहीं,' असे सांगणारी सद्वुद्धि निर्माण झाली, म्हणजे बरेच स्थैर्य आलें. मग मुख्य लक्ष त्या ध्येयावर ठेवून त्या आधारानें इतर गोष्टी

–प्रापंचिक–कराव्या. अर्थात परमार्थाला उपकारक व आवश्यक तें करावें,इतर शक्यतो टाळावें. असा साधकांसाठीं या वचनाचा अर्थ होतो. सिद्धाचा अर्थ निराळा. देव प्राप्त करुन घेऊन देव व्हावें; मग त्याच्या सत्तेनें देह वर्तू द्यावा. पण हें आपल्याला काय उपयोगी? साधकाचा अर्थच आपण घेऊं.

क्षेम कुशल कळवावें.

आपला

x x x

पत्र नं ८६

श्री

२६–२–६३

सप्रेम सा. न.

'भावबळें आकळें' (येरव्ही नाकळें) या विषयावर विचार. भाव हा जीवनाला सर्व स्पर्शी होणें अवश्य आहे. तसा तो झाला म्हणजे देव दूर नाहीं. कारण तो तितका विशाल होणें म्हणजे देवा शिवाय कोठेंच मन न जाणें; शरणागति हीं भावाची पराकाष्टा व परिणती. त्यांत 'मी' चा अस्त अर्थात् 'तूं' चा अखंड उदय. या दृष्टीनें शरणागति झाली पाहिजे.म्हणजे देव जोडेल, याचा अर्थच 'देव जोडल्यावर देव जोडेल' असा करतां येईल. परंतु ती Process आहे, या दृष्टीनें तिचा विचार करावयाचा आहे व केलेला. आहे. म्हणून वरील अर्थशून्यतेचा आरोप त्या सिद्धांतावर करतां येत नाहीं. हळूं हळूं 'मी' चा त्याग करीत मनांत 'तूं' भर, हें सांगण्यावर भर आहे.

दुर्गुण त्याग व सद्‌गुण संपादन, जीव भावाचा त्याग व शिवभावाची प्राप्ती, ही negative- positive (त्याग–प्राप्तीरूप) अशी एकच प्रक्रिया आहे. त्या दोन नाहींतच. त्यामुळें संतांनी कधी negative (त्याग) वर

म्हणजे जीवभावाचा त्याग शरणागति यावर भर दिला आहे; कधीं भक्ति-भावावर, positive (प्राप्ति)भावावर भर दिला आहे, कधीं मुर्खा सारखा वागूं नको असें सांगितलें आहे; कधीं शाहण्यासारखा वाग असें सांगितलें आहे; आपण साधकांनी मात्र हीं द्विविध अशी एकच प्रक्रिया आहें, हें सतत लक्षांत ठेविलें पाहिजे. कोणत्याहि एका भागावरच केवळ लक्ष ठेऊन चालणार नाहीं. नाहींतर अवश्य ती नैतिक पूर्णता नामस्मरणांवाचून मिळविण्याचा प्रयत्न होईल. तो सफळ होणार नाहीं. (यथा mere moralists केवळ नीतिवादी). किंवा दुर्गुणांची दखल न घेतां, कर्मठ-हट्टानें भक्ति वाढविण्याकडे प्रयत्न व्यर्थ जातील. म्हणून दोन्हीकडे लक्ष पाहिजे; अर्थात् अनिष्ट विचार मध्यें आलें कीं विवेक व साधन यांचा अवलंब केला पाहिजे. त्याच बरोबर सद्गुरूंचें अनंत सद्गुण सतत दृष्टीसमोर ठेवून, त्या तुलनेनें आपलें क्षुद्रत्व ध्यानीं आणलें पाहिजे व त्याचा परिणाम नम्रभावांत झाला पाहिजे. अहंकाराचा जोर कमी होण्याचा हा उत्तम मार्ग होय. स्वतःची थोर पुरुषाबरोबर तुलना केली कीं, तो मावळतो. व 'कान मीट, डोळे मीट, तोंड मीट, उगाच नामस्मरण कर' ही वृत्ति निर्माण होते. सारांश, विवेक, वैराग्य व ध्यान यांचा आश्रय एकाच वेळीं करून शत्रूंचा नाश व मित्रांची जोड दोन्हीं साधली पाहिजे, असें ज्ञानेश्वरानीं 'राजयोगी वीराच्या' रूपकानें सांगितलें आहे.

क. लो. असावा ही विनंति.

आपला

x x x

पत्र नं. ८७

श्री

१३–६–६३

सादर नमस्कार

आपलें मला आलेलें व श्री. ना आलेलें, दोन्हीं पत्रें वाचून आनंद झाला. प्रत्येक पत्रांत आपली परमार्थाविषयीं आस्था स्पष्ट दिसत आहे व त्याबद्दल तीं पत्रें वाचणाऱ्यला सादर कौतुक वाटतें. ही चढती वाढती आस्था हाच प्रगतीचा एक निकष नव्हे कां? ह. भ. प.– म्हणतात, कि देवाबद्दल व नामाबद्दल प्रेम वाटूं लागणें,हाच अनुभव. या संबंधी आमचें पूर्ण मतैक्य अर्थात नाहीं. अनुभव या शद्बाला या पेक्षां स्वतंत्र, निराळा असा अर्थ आहे. त्या अनुभवानेंच सत्यार्थानें प्रेम–भक्ति वाढणार आहे. तरीही,वाढती प्रेमभक्ति हाहि एक निकष आहे, यांत शंका नाहीं. "प्रपंच वोसरो। चित्त तुझे ठायीं मुरो" व 'ईश्वरीं प्रेमाअधिक। प्रपंच संपादिगें लौकिक॥' हीं साधकाची लक्षणें जर स्वतःच्या ठिकाणीं वाढतांना दिसली, तर आपला साधनाचा प्रयत्न व्यर्थ जात नाहीं, हें निश्चितपणें मानतां येईल. दुःखेष्वनुद्विग्न मनाः सुखेषु विगत स्पृहः॥ हें पूर्णपणें झालें नाहीं; तरी सुख दुःखांच्या (प्रापंचिक) भावनांचा पूर ओसरूं लागला आहे. तो पूर्वी प्रमाणें मर्यादेबाहेर जात नाहीं; म्हणजे नामाचा विसर पाडूं शकत नाहीं; किंबहुना नामाचें कृतज्ञतेनें वा अवशतेनें स्मरण देतो, इतकें झालें तरी थोडे नाहीं. सुखाच्या प्रसंगीं, त्याच्या कृपेनें तें लाभलें म्हणून कृतज्ञतेनें, दुःखाच्या प्रसंगीं तेंच संकटमोचक आहे, या श्रद्धेनें, स्वतःच्या दुर्बलतेच्या जाणिवेनें, स्मरण व्हावें व होतें, हीच समर्थांची कृपा.

सर्व क्षेम

आपला

x x x

पत्र नं. ८८

श्री

२०-३-६३

सा. न. वि. वि.

सध्यां ज्ञानेश्वरीचें वाचन सुरू आहे,

ज्ञा· ९ व्या अध्यायांत ज्ञानाचें वैभव श्रीकृष्णानीं ४।५ ओव्यांत दिग्दर्शित केलें आहे. ज्ञान प्राप्तीनें, साक्षात्कारानें लाभणारें हें प्राईज सूज्ञ साधकांनें सदा दृष्टीसमोर ठेविलें तर, त्याच्या प्रयत्नाला जोर येईल, या हेतूनें तें सांगितलें आहे, हें उघड आहे. त्या ओव्या चिंतनीय असल्यानें मुद्दाम खालीं उद्धृत करीत आहे—तैसें जें जाणिवले या साठीं। संसार संसाराचिये गाठीं। लाऊनि बैसवी पाटीं।। मोक्षश्रियेच्या। जें जाणणें या अवघियांचा गांवीं। गुरूत्वाची आचार्य पदवी। जे सकळ गुह्यांचा गोसावी। पवित्रा रावो।। आणि धर्माचें निजधाम तेंविचि उत्तमाचें उत्तम। पैं जया येता नाहीं काम। जन्मांतरांचे।। मोटके गुरुमुखें उदैजत दिसें। आणि हृदयीं स्वयंभचि असें। प्रत्यक्ष फावो लागे तैसें। आपैसया।। तेवींचि पैं गा सुखाचां पाउटीं। चढतां येईजे जयाचिया भेटी। मग भेटल्या कीर मिठी। भोगणेंयाही पडे।। परि भोगाचिया अैलिकडलिये मेरे। चित्त उभे ठेलेचि सुखाभरे। ऐसें सुलभ आणि सोपारें वरि परब्रह्म।। पैं गा आणीकहि एक याचें। जें हाता आलें तरी न वचे। आणि अनुभवतां कांही न वेचे। वरी परब्रह्म।। तरी पवित्र आणि रम्य। तेवीचि सुखोपाये गम्य। आणि स्वसुख परि धर्म्य। वरी आपणपां जोडे।।

त्याच्या प्राप्तीनें संसारापासून मुक्त होऊन साधक मोक्षश्रियेच्या सिंहासनावर बसतो. सर्व ज्ञानांत याला आचार्य—पदवी, श्रेष्ठत्व आहे. इतर ज्ञानें,पापनाश व आत्यानंद प्राप्तीचा मोक्ष मिळवून देऊं शकत नाहींत.ह्मणून तीं ज्ञानें, ह्मणजे मोराच्या पिसाचे डोळे; आंधळें. पावित्र्याचा राजा ह्मणजे ही अवस्था. यांत वासना व त्रिगुण यांचा अत्यंत अभाव असतो. ह्मणूत तेथेंच

तेंच, खरें पावित्र्य. 'पुण्य परब्रह्म उरलें। दृश्य पाप ओसरलें।' येथें अलक्ष लक्षावें लागतें. म्हणून हेंच परम गुह्य. ईश्वर-प्राप्तीचें साधन ह्मणजे धर्म; या नियमानें धर्माचें निजधाम हेंच ध्येय नसेल तर साधन कुठलें? देव नसेल तर धर्म कुठला? जन्ममरणाचा फेरा चुकविणारें हें ज्ञान अंतरीच आहे; परंतु गुरु-कृपेनें जागृत होते; त्यावाचून नाहीं. दुधांतील घृत काढण्याला विरजणाचा थेंब लागतो; तसा गुरु-शद्ब. मग तें वाढत वाढत पूर्णतेला जाते. त्याला जाऊन पोहचण्याच्या पायऱ्यावर सुखाचा गालिचा-रेड कार्पेट आहे; वाटेंत सुद्धां कांहीं प्रमाणांत सुख; प्रत्यक्ष भेटीत साधक सुखी नव्हे सुखच बनतो. स्वतः 'आपणचि सुख होवोनी राहे।' त्याच्या समोर उभा आहे; अद्याप द्वैत आहे, तोच सुखानें भरून जातो; त्या भरून जाण्यानेंच शेवटी 'सुख' होतो. "आनंद नाहाया; बंदा खुदा दोनो विसराया," असें सुलभ, सोपें पण क्षुद्र नव्हे. सुलभ सोप्या गोष्टी-हॉटेल मधला चहा, सिनेमा क्षुद्र असतात; पण हें सुलभ सोपें असून प्रत्यक्ष परब्रह्म आहे. पुन्हां 'चोर न लुटे, न खरचत तुटे। दिन दिन बढत सवाई ॥' त्याच्या ठिकाणी दुर्लभ असें विरोधी सद्‌गुण आहेत. रम्य व पवित्र, या दोन गुणांचे एकत्र दर्शन कठीण. गुरुदेव ह्मणत रम्य, सुंदर हें बहुधा शृंगाराच्या सेवेत राबतात. सुखोपायें गम्य, ते बहुधा क्षुल्लक असतें. याचा विचार वर आला आहे. स्वाधीन सुखाच्या बाबतीत मनुष्य बहूधा धर्माधर्म पाहात नाहीं. पण हें स्वसुख असून धर्म्य, धर्माचे निजधाम आहे. पुन्हां आपल्या ठिकाणीच मिळते, परावलंबित्व नाहीं; वशिला खुशामत कांहीं नाहीं. असें हें उत्तमाचें उत्तम आपल्याला लाभावें ह्मणून गुरुदेवांनीं नामाची कृपा केली आहे. क्षेम समाचार कळवावा.

आपला

× ×

'साधक-संवाद'

पत्र नं ८९

श्री

२७-३-६३

सा. न. वि. वि.

आपण तीन दिवस येऊन गेलांत, त्यामुळें आनंद झाला. सत्संगा-वाचून परमार्थ प्रगति अशक्यप्राय, या गुरुदेवांच्या वचनाचा अधिकाधिक प्रत्यय येत आहे. ज्यांच्या संगतींत देवा वाचून अन्य गोष्टींचें स्मरण होत नाहीं; आपोआप देवाचें स्मरण होतें व टिकतें, तें संत, एवढीच त्या शद्वाची मर्यादित व्याख्या केली पाहिजे. गुरुदेवांच्या सारखा सत्संग सतत कसा लाभणार? भाग्यानें लाभला त्याचाच कृतज्ञतापूर्वक आनंद मानला पाहिजे. **What is lost in depth must be gained in breadth,** (खोलीच्या दृष्टीनें झालेला तोटा, रुंदींतून भरून निघतो.) असें आमचें एक शिक्षक सांगत असत. परमार्थांत ते किती खरें आहे!

ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायांतीड कांहीं भागाची संगती दाखविणारे विचार लिहून कळवावें, अशी इच्छा आपण दर्शविली होती. तो प्रयत्न खालीं केला आहे. (१) प्रथम ज्ञानाचें-साक्षात्काराचें-वैभव सांगितलें आहे. याचा थोडा सविस्तर विचार मागील पत्रांत आहे. त्याची पुनरुक्ति करीत नाहीं. या वर्णनानें साक्षात्कार हेंच ध्येय, ही श्रध्दा दृढतर होत जाते, त्याबद्दल प्रेमादर वाढतो व तो साधन करण्याला उत्साह प्राप्त करून देतो. निरुत्साहाच्या काळीं या ओव्या वाचल्या, तर ते मालिन्य दूर होऊन नेम करावासा वाटेल, अशा त्या आहेत. मागील पत्रांत त्या मुळांतच दिल्या आहेत. (२) ईश्वराचें सत्य स्वरूप कळल्यावाचून त्याची खरी भक्ति करतां येणार नाहीं; म्हणून त्याचें सत्यस्वरूप पुढें सांगितलें आहे. हें विवेचनहि बुध्दींतील भ्रम घालवून, तिचें खऱ्या भक्तीला योग्य साह्य व्हावें, या साठीं आहें. ईश्वर निर्गुण-निराकार-अनंत आहे; तो विश्वाच्या उत्पत्तीचें-लयाचें एकमेव कारण असला, तरी तो स्वतः कांहीं करीत नाहीं. तो केवळ अध्यक्ष

आहे; त्याच्या दर्शनानें प्रकृति सर्व करीत असते. तो कर्मानीं लिप्त होत नाहीं. सूर्य व आकाश याप्रमाणें सर्व प्रवृत्तीचें कारण असूनहि सर्वांपासून अलिप्त आहे. त्याच्या या शुध्द केवळ स्वरूपाचें ध्यान करून साधकाला त्याच्याशी एकरूप व्हावयाचें आहे. अर्थांत त्याला सर्व उपाधींतून दूर होऊन केवळ शुध्द झालें पाहिजे. हें या सर्व वर्णनाच्या आधारें शिकविलें आहे. (३) यानंतर,हें स्वरूप न ओळखल्यानें भक्ति कशी सदोष व चुकीची होते, हें दाखविलें आहे. देवाला देहधारी व मर्यादित कल्पून,सर्व मानवी धर्म अज्ञानी जनांकडून त्याला लावण्यांत येतात. त्यांचा देव याप्रमाणें anthropo mo-rphic (created after the form of man) (माणसानें स्वतः सारखा बनविलेल देव) बनतो. तो खरा देवच नव्हे. ही चूक झाल्यावर स्वतःचे सर्व गुण–दोष (सुष्ट–दुष्ट) त्याच्यावर लादून,अनर्थ परंपरा निर्माण करून भक्त आपल्या परमार्थाचा नाश करून घेतो. स्वतः प्रमाणें त्याला राग–द्वेष, शत्रु–मित्र, लोभ–मत्सर आहेत, या कल्पनेनें, त्याला प्रसन्न करून त्याच्या प्रेमाचा फायदा घ्यावा, शत्रूंचा नाश करावा, अशा भल्याबुऱ्या वासनांनी त्याची भक्ति करतो.या केवळ सकाम आणि रजो तमो गुणी भक्तिमुळें त्या भक्ताच्या वासनाहि वाढत जातात. त्याबरोबर दुर्गुण बळावतात व परमार्थाचा नाश होऊन मानव जन्म व्यर्थ जातो. (४) पुढें खऱ्या भक्ताची अर्थात् साक्षात्कारी पुरुषांचीं लक्षणें दाखवून, ‘ हें चित्र पहा व तें चित्र पहा ’ आणि choose (निवड कर) असेच, जणूं ज्ञानेश्वरांनी सांगितलें आहे. हे पुरुष शांतीचें नव पल्लव,ते निजले असतांहि वैराग्य त्यांची सेवा करतें ते विवेकाचा ओलावा, आनंदसागरांत चुबकळोनी भरलेलें कुंभ, त्यांच्या सर्वां–गांवर शांतीचे अलंकार असतात. हें त्यांचें वैभव आहे. हा आदर्श डोळ्यापुढें पाहिजे; म्हणजे चित्त स्वतःचे दोष पाहण्यांत जागृत राहील. नाहींतर स्वतःच

स्वतःचा आदर्श ठरवून, आपण नेहमी आपली पाठ थोपटून घेतच असतो (५) पुढें या भक्तांचा जगाला किती उपयोग होतो, त्याचे वर्णन अप्रत्यक्षपणें आलें आहे. क. लो. अ. ही, वि.

आपला

× ×

पत्र नं. ९०

श्री

१०-४-६३

सादर नमस्कार

आपलें कार्ड पोहोंचलें. तीन दिवस विशेष विचार न होतां नेमच झाला, हें चांगलेच झालें. विचार मागाहून सावकाशीनें होईल. नेमासाठीं विचार आहे; विचारासाठीं नेम नाहीं. तरी त्यांत परस्परोपकारिता आहे, Reciprocal causation (परस्पर-उपकारिता,) हे हि तितकेंच खरें आहे. सध्यां येथें वाचनांत असणाऱ्या अ. ९ मध्यें (ज्ञा.) ईश्वर प्राप्तीचें साधन, तेंच पुण्य; -इतर सर्व पाप- त्यांतील फार तर कांहीं पुण्यात्मक पाप-इतकेंच, असें निःसंदिग्धपणें सांगितलें आहे. 'देव जोडे तरी करावा अधर्म। नातुडे तो धर्म न आचरावा॥' यांत धर्म याचा अर्थ पुण्यात्मक पाप हाच अभिप्रेत आहे. त्याला पुण्यात्मक पाप म्हणण्याचें कारण, ज्ञाने. नीं दिले आहे! तें हें कीं त्यामुळें देव दुरावतो-अु. स्वर्ग प्राप्त्यर्थ केलेला यज्ञ. या दृष्टीनें, आपल्या पाप-पुण्याचा, अर्थात् जीवन मूल्यांच्या कल्पनांचा आपण सतत फेर विचार करुन, त्यांना वरील निकषावर घासून, शुद्ध त्यांचा स्वीकार, व इतरांचा त्याग करणें, अवश्य आहे. या परीक्षेंत, आपण उराशीं बाळगलेल्या राष्ट्रीय, सामाजिक, कौटुंबिक जीवन-मूल्यांचें सत्यस्वरूप आपणाला कळून येईल. अर्थात्,

आपल्या मोहाचें स्वरुप उघडें दृष्टीस पडेल. असत्य जीवनमूल्यें याचाच साध्या मराठींत अर्थ मोह, अज्ञान; हा मोह आत्मनिरीक्षणानें, अंर्तमुख होऊन प्रत्ययाला आला, म्हणजे त्या पासून उद्भवणारे विकार हि कमी होतील. कारण, बुद्धीला त्या मूल्यांचें वैफल्य पटलें, म्हणजे भावनावरहि त्यांचा विशेष प्रभाव पडणार नाहीं. तीं जीवनांतील आपलें योग्य तें दुय्यम व्यावहारिक स्थान धरुन बसतील. उच्च जीवन मूल्यांच्या सिंहासनावर हक्क सांगणार नाहींत. अंर्तनिरीक्षण सुरुं झालें, म्हणजे 'मी हें सर्व इतरांच्यासाठीं करतों, माझा यांत स्वार्थ वा मोह नाही,' या आत्मवंचनेलाहि जागा उरणार नाही. कर्तव्याच्या नेमक्या मर्यादा समजणें सोपें जाईल; मोहाला कर्तव्य हें सोज्वळ नांव दिलें जाणार नाहीं. म्हणून परमार्थाधिष्ठित विवेक हा नामाच्या जोडीला सतत असला पाहिजे.

पत्रोत्तर यावें.

आपला
x z x

पत्र नं. ९१

श्री

१७–४–६३

सप्रेम नमस्कार

आपलीं दोन्हीं पत्रें वाचून समाधान वाटलें. ईश्वरा–वांचून अन्य गोष्टींचा विचार केला तर त्रास होतो, काळ व्यर्थ जातो, शांति नष्ट होते, असा अनुभव येऊं लागल्यावर, मनुष्य साहजिकच इतर प्रक्षोभक गोष्टी दूर ठेवण्याचा प्रयत्न करतो. त्यांत सर्वांनाच स्वास्थ्य लाभतें आणि आपल्या व इतरांच्या परमार्थाला अनकूल वातावरण मिळतें. चांगल्यातून चांगले जन्माला येतें; वाईटांतून वाईट जन्माला येतें, असा हा निसर्गाचा

नियम परमार्थाला हि लागूं आहेच. एका ख्रिश्चन संत स्त्रीनें म्हटले आहे, 'Good and pure souls create similar souls' (ईश्वर व शुद्ध आत्मे हे शुद्ध आत्मे निर्माण करतात.) अर्थात् 'create' (उत्पन्न करतात) या शब्दाचा येथें अलंकारिक अर्थ आहे.'आपणा सारिखे करिती तात्काळ।' किंवा 'तुम्हां गुण, चंदनाचे अंगी। तैसें तुम्ही जगीं संतजन।।' असा 'create' या शब्दाचा भाव आहे. तुकाराम तर स्पष्टच सांगतात, 'देव होसी तरी आणिकातें करिसी। संशय ये विषयीं घेऊं नको।। दुष्ट होसी . . . ।।' तुमच्या आमच्या सारख्या सामान्य साधकाला इतक्या मोठ्या गोष्टी करतां येणार नाहींत, हें खरें; तरी ज्या प्रमाणांत आपण कळकळीनें परमार्थ करूं, त्या प्रमाणांत या गोष्टी घडणारच; Conversely (उलट दृष्टीनें) आणि (हेंच कटाक्षानें परीक्षिलें पाहिजे), ज्या प्रमाणांत या गोष्टी घडतील त्यावरून आपल्या पारमार्थिक कळकळीचें प्रमाण ठरतें. आपणाला पाहून कणसावरचें पक्षी उडून गेलें, तेव्हां सर्वात्मभाव माझे ठिकाणीं नाहीं, या जागृतीनें तुकारामांना दुःख झालें. आत्मपरीक्षणाचें, हें उत्कृष्ट उदाहरण आपल्या पुढें आहे.

'कर्त्यासी ओळखावें। त्यास विवेक म्हणावें।।' या दृष्टीनें श्री.–सदाच विवेकी आहेत. अशी वृत्ति बाणल्यावर मनुष्याचे उपकार वा अपकार योग्य प्रमाणांतच मानले जाणार. माणसाचे उपकार–अपकार मानण्यांत देव दृष्टी आड होणार नाहीं. मग केवळ निमित्तमात्र म्हणूनच मनुष्याचा विचार होईल. हा फरक उपकाराच्या बाबतींत बाह्य जगाला कळणार नाहीं. व्यावहारिक कृतज्ञता प्रकट होईलच; अंतरीं मात्र हा विवेक राहील.

आपलें कुशल कळवावें.

आपला

x x x

पत्र नं ९२

श्री

२४-४-६३

सप्रेम सा. न.

'मन्मना भव मद्भक्तो मद्याजीमांनमस्कुरु। मामेवैष्यसि युक्तैवमात्मानं मत्परायणः ॥' ज्ञा. ९ अ. च्या अंत्य श्लोकावरील भाष्यांत ज्ञानेश्वर म्हणतात -'तूं मन हें मीचि करी। माझ्या भजनीं प्रेम धरी। सर्वत्र नमस्कारी। मज एकाते॥ माझेनि अनुसंधानें देख। संकल्पु जाळणें निःशेख। मद्याजी चोख। याचि नांव॥ ऐसा मिया आथिळा होसी। तेथें माझियाचि स्वरूपा पावसी। हें अंतःकरणीचें तुजपासी। बोलिजत असे॥ (५१०-१९)

देवाचें म्हणजेच नामाचें, स्वरूपाचें, नादाचें अनुसंधान करुन संकल्प निःशेष जाळणें, इच्छा-वासना, कल्पना यांचें पूर्ण विस्मरण होणें, हा खरा यज्ञ; हा यज्ञ केल्यावरच ब्रह्मरूपता लाभतें, साधक ब्रह्मरूप होतो. याचा सरळच अर्थ असा होतो कीं, नेमाच्या वेळींच काय पण केव्हांहि देवाला विसरावयाचें नाहीं, इतर कांहीं स्मरावयाचें नाहीं. तेव्हां नेमाचे वेळीं प्रापंचिक गोष्टीचें चिंतन करावें, असें कोण म्हणेल? प्रश्न येवढाच कीं "मन-मांजराच्या" गळयांत ही घंटा कोणी व केव्हां बांधावयाची? विशेष चिंता किंवा महत्वाचा प्रश्न नसतांना सुद्धां अनेक क्षुद्र, हास्यास्पद कल्पना नेमाच्या वेळींहि मनांत येतात. एखादें 'लोकूर' बाबा सारख्यानांहि त्रस्त करतें. मग प्रपंचांतील काहीं मोठा प्रश्न किंवा देह विकृति असेल, ती नेमाच्या वेळीं पाठ पुरवीलच. पण ही दुर्बलता आहे. आपण मुद्दाम त्या गोष्टींचा विचार करीत नाहीं. त्या टाळण्याचाच प्रयत्न करतो. तरीहि त्या प्रबळ होऊन डोक्यावर बसतात. त्याला इलाज नाहीं. नेम दीर्घकाळ, निरंतर करून, देवाच्या कृपेनें त्या जातील तेव्हां जातील. तरी, याचा अर्थ असा नव्हे कीं नेमाच्या वेळीं त्याना आपण आमंत्रण द्यावयाचें किंवा त्या आल्यास सत्कारपूर्वक त्यांचें स्वागत करावयाचें. असें करण्यास कोणहि सांगणार नाहीं. आपण प्रपंचांतील

कांहीं गोष्टींचा आस्थेनें विचार करावा अशी कोणाची–मित्रांची व आप्तांची –इच्छा असेल तर, नेमाव्यतिरिक्त हें करण्याला काय थोडा वेळ आहे? वाटेल तितका वेळ प्रपंच करण्यास आहे. अगदीं ८(आठ) तास रोज नेम झाला. आठ तास झोप झाली तरी आठ तास प्रपंच चिंतनाला आहेतच. मग नेमाच्या वेळींच प्रपंच चिंतन–करावें हा आग्रह कोण धरील? परमार्थविरोधी व्यक्ति हें करील. कारण त्याला परमार्थांत काळ घालविणें, हा लावण्या म्हणण्यापेक्षांहि कालापव्यय, ही दारू, अफू, असें वाटत असते. अशाना आपण एकदांच नमस्कार करून ठेवला आहे. तेव्हां आपला प्रश्न मला नीट कळला नाहीं, हेंच खरें.

मागील पत्रांत कांहीं खाजगी मजकूर लिहण्याचें आपण विसरला, असें आपण लिहिलें आहे. त्यांत कांहीं बिघडलें नाहीं. परमार्थ विचाराचें पत्र लिहतांना असें होणें अगदी साहजिक आहे. असो.

आपला

x x x

ग्रंथ संग्रहालय

पत्र नं ९३

श्री

१–५–६३

सादर सा. न.

आपलें पत्र पोहोंचलें. आपला प्रश्न होता, "नेमाचे वेळीं साधकानें लक्ष–सर्वस्व देवाकडें न देण्याचें पाप करुं नये. मी देवाचा म्हणावयाचें व प्रपंचाकडेच लक्ष असावयाचें हा आत्मघातच नव्हें काय?" याबद्दल दुमत असणें शक्य नाहीं; असें माझें उत्तर होतें. आज 'पुढें गेले त्यांचे, शोधीत

मार्ग । चला जाऊं माग घेत आम्ही '।। या अभंगावर प्रवचन आहे. संतांचें उमटलेलें एक पाऊल असें: 'पवित्र सोंवळीं तीच एक भू मंडळीं ।। ज्यांचा आवडता देव । अखंडित प्रेमभाव ।। तीच भाग्यवंते । सरती पुरती धनवित्तें ।। तुका म्हणे देवा । केली पावें त्यांची सेवा ।। गुरूदेवानीं म्हटल्याप्रमाणें, संत हें आपले आदर्श; १०० मार्कांचा म्हणजे शंभर मार्क मिळालेला असा, लिहलेला पेपर–उत्तरपत्रिका. तो पाहून, वाचून, पाठकरून आपणाला आपली उत्तर-पत्रिका लिहावयाची आहे. मग त्यांत काय १०।२० मार्क मिळतील ते मिळोत. यांत सर्वांनीं सर्वत्र प्रतिपादलेली अनन्य भक्ति, हीच मुख्य गोष्ट सांगितली आहे; आणि देवाबद्दल आवड, प्रेम, त्याच्या चिंतनांत सुख, आनंद उत्पन्न झाला पाहिजे; यावर भर आहे. प्रेमभाव हाच अत्यंत महत्वाचा, असें गु. दे. नीं अनेक ठिकाणीं सांगितलें आहे. असा प्रेमभाव हेंच भाग्य, हेच धनवित्त, यावाचून इतर सर्व गोष्टी हे दारीद्रयच. "परमार्थी तो राज्यधारी । परमार्थ नाहीं तो भिकारी " ।। (रामदास). संतांच्या या गुणाच्या चिंतनानें व या उप-देशानें बुद्धि ऐहिक मूल्यापासून दूर होऊन निश्चयानें ईश्वराकडे वळली, तर तिच्यामागे हळूं हळूं मन व शरीर वळेल. 'रस्सिखेच' चालेलच पण आत्म्याचें व will चें बळ बुद्धीला मिळालें, म्हणजे शेवटी यश तिलाच येईल. मन व शरीर बुद्धीला आपल्या मागें खेचून नेतात, हें खरें आहे. रोज तेंच घडत असतें. मन–शरीर यांना 'प्रिय'तेंच मूल्य असें म्हणण्याइतकी बुद्धि अवनतीला जाते. याचें कारण तिला आत्म्याचें बळ मिळत नाहीं. अवनत आत्मा (ego) (जिद्द) आणि will (इच्छाशक्ती) मन–शरीर यांनाच साह्य-भूत होतात. मग एकटया बुद्धीचें चालत नाहीं. म्हणूनच कांट (Kant) म्हणतो त्याप्रमाणें will to be good (चांगलें होण्याची इच्छा) असल्या-शिवाय कोणतीच चांगली गोष्ट करतां येणार नाहीं. सद्गुरु–कृपेनें ती उत्पन्न झाली आहे. सतत ती जागृत नसते. मधून विकारांचे मेघ तिला झाकळतात. तिला जागृत ठेवण्यासाठीं संतवचनांचें व गुणांचें सतत चिंतन करावयाचें. केवळ ज्ञान मिळविण्यासाठीं नाहीं. तें will ला दिलेले चाबकाचे फटके असावे, 'मी

असा नाहीं' अशी तळमळ ती वचनें वाचून उत्पन्न व्हावी; म्हणजे त्यांचा खरा उपयोग. आपले कुशल आहें ना?

आपला

x x x

पत्र नं. ९४

श्री

१७-५-६३

सप्रेम सा. न.

हरिपाठ (ज्ञान.) अभंग २४ मध्यें नियमानें नेम करणारा प्राणी दुर्लभ असें ह्मटलें आहे, तें किती खरें आहे. संसारी जीवनाच्या अनेक मोहांत परमार्थाची आठवण होणें कठीण; बायका-मुलें, मानवता यांची सेवा करावी, हीच देवाची सेवा नव्हे कां, असें स्वार्थाला व सुखलोलुपतेला सोज्वळ स्वरूप, कळून न कळून, देण्याची मनाचीं प्रवृत्ति फार; कांहीं थोडे तळमळीनें मानवतेची सेवा करतातहि; परंतु त्याच्या मर्यादा व आपलें दौर्बल्य कळत नाहीं. "कर्ता देव, कोणालाही सुख-दुःख तो देणार; आपण सेवा व परोपकार करावयाचा तो आपला स्वार्थ कमी होण्यासाठीं, चित्त शुद्ध होऊन नामस्मरणाला थोडेफार योग्य होण्यासाठीं," हा महाराजांचा बोध, अंतरी ठसत नाहीं. ज्यांचें परमार्थाकडे लक्ष जातें, त्यांना (तुमच्या आमच्या सारख्यांना) नामस्मरणाचें महत्व कळूनहि, पटूनहि, तें उत्कटतेनें होत नाहीं. कारण 'दृश्यानें आडविली वाट परमार्थाची.' दृश्यात मन अडकतें. सद्गुरु विषयी वाटणाऱ्या प्रेमादराची परिणति चढत्या वाढत्या नेमांत झाली पाहिजे ती होत नाहीं. त्या प्रेमाला कांहींसे सगुण भक्तीचे स्वरूप येते. सगुण भक्ती आवश्य आहेच. पण ते निर्गुण भक्तीचे-नामस्मरणाचें-साधन ह्मणून. आणखी एक कारण हें

कीं, साक्षात्कानें–उच्च साक्षात्कारानें–जी भव्योदात्त धन्यता प्राप्त झाल्याचे संतांनीं सांगितले आहे, त्यानें डोळें दिपतात. आपल्या आवाक्या बाहेरचे हें आहे; आपल्याला हे कसचें लाभणार; 'गजस्तत्र न हन्यते,' असा inferiority complex (न्यूनगंड) निर्माण होऊन depression (नैराश्य) येते. त्यावेळीं 'टाकीं तूं माप, सळ धरिली विठ्ठलें।' 'नहि कल्याण कल्याणकृत् कश्चित् दुर्गति तात गच्छति।' या व अशा वचनांची कास धरावयाची. "हें वैभव मनुष्यमात्रासाठीं आहे; कोणाला आतां लाभेल, कोणाला वेळ लागेल. आपण प्रयत्न करीत रहावें," हें धैर्य टिकत नाही; त्याच प्रमाणें, 'अल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्।' 'नाम हें beginning of the end (पूर्णतेची सुरुवात) आहे. ही श्रद्धाहि धीर देत नाहीं. यामुळें नेमानें नामस्मरण करणें कठीण होतें. अर्थात् वरील सर्व श्रद्धांचें बळ बांधून, ते केलें पाहिजे, हाच निष्कर्ष यावरून काढावयाचा. पत्रोत्तर यावें. क.

आपला

x x x

पत्र नं ९५

श्री

४-६-६३

सा. न. वि. वि.

हरिपाठात 'वाचेसी सगद्गद जपे आधीं,' असें वचन आहे. हें होण्याला भावनांचें किती उदात्तिकरण, चित्ताची किती ईश्वरोन्मुखता झाली पाहिजे, याचा विचार मनांत आला, म्हणजे या सूत्रमय वचनाचें महत्व कळते. देवाबद्दल परमप्रेम, त्याच्या प्राप्तीची तळमळ असल्यावाचून नाम सगद्गद कसें

जपता येईल? मायेवाचून कढ नाहीं, रडू नाहीं, हा व्यवहारांतील सरळ अनुभव आहे. सगद्गद होण्याचें पुन्हा दोन प्रकार आहेत. अेक दुःखानें, अेक आनंदानें. प्रथम दुःखानें, तळमळीनें, विरह असह्य झाल्यानें, कंठ गद्गद झाला, अश्रू वाहुं लागले, म्हणजे चित्त शुद्ध होऊन, (विकारांचा विसर, विषयांचा निर्वेद येऊन, – हीच चित्त शुद्धी) ईश्वराचा अनुभव येईल. ‘ ज्ञानास मूळ अग्नि.’ तेव्हां, प्रथम तळमळीनें सगद्गता; मग साक्षात्कार. आणि उच्च साक्षात्काराचा भाग्यानें लाभ झाला, तर आनंदानें सगद्गद– आनंदाश्रू, रोमांच इ. अष्ट सात्विक भाव–दुःख व आनंद याचें physical– expression एकच असते, ही किती चमत्कारीक गोष्ट वाटते! पण तें सत्य आहे. श्री बाबा म्हणत, दुःखाश्रु कढत, खारट असतात; आनंदाश्र थंड, मधूर असतात. अष्ट सात्विक भावांतील अश्रूंचा मला अनुभव नाहीं. मग आनंदाश्रूबद्दल मी काय लिहीणार? भावनांचा आध्यात्मिक जीवनाशी व प्रगतीशी किती निकट सबंध आहे हें मात्र यावरुन स्पष्ट होते. म्हणूनच भावाला, भावनांना गुरुदेव इतकें महत्व देत असत. हें इतकें उघड असून भक्तिमार्गाव्यतिरिक्त ईश्वर–प्राप्तीचे मार्ग आहेत, असें लोक म्हणतात, हें आश्चर्य नव्हे काय?

आपण प्रतिवर्षी सप्ताहाला येत होता. यंदा आला नाहीं; म्हणून सर्वांनाच वाईट वाटलें. परंतु नाइलाज होता. क. ही. वि.

आपला

x x x

पत्र नं. ९६

श्री

११-६-६३

सप्रेम नमस्कार. माझी प्रकृति एकंदर ठीक आहे.

ज्ञाने. अ. ९ मध्यें 'यान्ति मद्याजिनोऽपि माम् ।' यावर भाष्य करतांना 'जे डोळ्यांनीं मलाच पाहतात, कानांनीं मलाच ऐकतात, चित्तांत माझीच भावना करतात, मनांत माझेंच चिंतन करतात, माझ्यासाठीं जन्माला येतात, मलाच जीवन अर्पण करतात; जे माझ्या लोभानें लोभी; माझ्या प्रेमानें प्रेमी, माझ्या वेडानें वेडे व 'माझें' या अभिमानानें अभिमानी असतात, ते मद्याजी' असें विवेचन केलें आहे. अनन्य, अव्यभिचारिणी भक्तिच ईश्वर प्राप्ति करून देईल, दुसरा मार्गच नाहीं, हें ज्ञानेश्वरांनी अनेक ठिकाणीं अनेक प्रकारें सांगितलें आहे. त्यापैकींच हा एक अत्यंत सुंदर उतारा आहे. असें असतां ज्ञान-ध्यान-कर्म इ. भिन्न मार्ग सांगण्याचें धाष्टर्य विद्वानहि कसें करतात समजत नाहीं. ईश्वराविषयी नितांत प्रेमाशिवाय जीवभावाचा त्याग करण्यास कोण तयार होईल? कनक-कामिनी-कीर्तींचा दुर्दम्य मोह मनुष्याला आहे.. त्याचा पाश तोडणें अत्यंत कठीण. परमेश्वराविषयीं प्रेमच तो तोडण्याला प्रभावी ठरेल. बौद्धिक ज्ञान व विवेक केव्हांहि अपुरेच पडतील. अर्थात् ईश्वरी प्रेमाचें, त्याच्या गुण-चिंतनानें, बीजारोपण करण्याला तें ज्ञान अवश्य आहे. पण 'ती अखेर नव्हे.' अन्य क्षेत्रांत, प्रेमाचा प्रभाव आणि त्याग करण्याचें त्या मुळें येणारें सामर्थ्य; अहमहमिकेनें वर्णन करणारे, या परमार्थाच्या क्षेत्रांत अनेक मार्ग आहेत, असें प्रतिपादन करतात. देश-प्रेम शृंगारिक प्रेम, ज्ञान-कला यांचे प्रेम काव्यपूर्ण भाषेंत वर्णिलें जातें. त्यांत, ज्ञान-ध्यान-कर्म असे भिन्न मार्ग कोणी सांगत नाहींत. पुत्राचे पोषण-कार्य प्रेमानें होतें; तसें ज्ञान-ध्यान-कर्म यानेंहि होतें, असें कोणी सांगत नाहीं. परंतु ईश्वराच्या प्राप्तीचें मार्ग अनेक सांगतात. व्यक्ति तितके मार्ग असेंहि सांगितलें जातें; पण हें मानसशास्त्राला विरोधी आहे. कोणत्याहि ध्येयाच्या

प्राप्तीचें अचाट प्रयत्न प्रेमानेंच होऊं शकतील. ज्ञान–ध्यान–कर्म हीं त्या प्रयत्नांना उपकारक होतात व अवश्य आहेत. पण प्रेमाचें-भक्तिचें–अभावी त्यांचा काय उपयोग ? म्हणून ज्ञानेश्वरादि तत्त्वज्ञ–संतांनींहि ऐकांतिक भक्तिच प्रतिपादिली आहे. प्रकांड पंडीत गुरुदेव शेवटीं शेवटीं कांहीं वर्षे तत्वज्ञानाविषयीं विशेष न बोलतां भक्तिभाव व अनन्यता हींच भक्तिचें शिखर होत म्हणून तसें स्पष्ट सांगत-लिहीत. या भक्तींत विषयाला तिलां–जलि, प्रवृत्ति-बंधन या गोष्टी अंतर्भूत आहेतच (ज्ञा. ८/१२४–३२). त्या केल्या नाहींत तर भक्तीला ऐकांतिकता येणार नाहीं. परंतु देवाला हृदयीं धरून त्याचा आनंद भोगणें, त्या आनंदात शब्द–रूप–गंधादि विषयच नव्हे, तर क्षुधा–तृषाहि विसरणें, हें ध्येय मुख्यत्वें करून ज्ञा. नीं सांगितलें आहे. हे साधलें तर देवच भक्ताची परिचर्या करतो, ही सनद त्यांनीं दिली आहे. आपल्याला ती मिळेल काय? छापील फार्म तयार आहे. पण त्यावर योग्य किंमतीचा स्टँप आम्ही कोठून लावणार? त्यागाचा? गुरुदेवच तो देतील. सर्वक्षेम.

आपला

x x x

पत्र नं. ९७

श्री

१९–६–६३

सा. न. वि. वि.

दा. बो. द. ३ स. १० त्यांत वैराग्यनिरूपण आहे. असले समास प्रथम महत्वाचें वाटत नाहींत. एक सांप्रदायिक प्रकार–जगाचें नश्वरत्व सांगण्याची वहिवाट–आहे,असें वाटतें. परंतु आत्मनिरीक्षण करू लागल्यावर

त्याचें महत्व मनावर ठसतें. प्रपंची–जनाविषयीं त्यांतील विचार जणूं कांहीं आम्हालाच अनुलक्षून लिहिले आहेत असें वाटतें. 'माथा प्रपंचाचें ओझें। घेऊन म्हणे माझें माझें। बुडताहि न सांडे फुंजें। कुलाभिमानाचें ॥ पडिले भ्रांतीचें अंधारें। नागविलें अभिमान चोरें। आलें अहंतेचें काविरें। भूत-बाधा ॥' यांतील एकएक अक्षर सत्य नाहीं काय? यावर उपायहि तेथें सांगितला आहे 'जयास भगवंत आवडे। त्याचें देवासी सांकडें। संसार दुःख सकल उडे। निजदासाचें ॥' अर्थात् सर्व संसार सुखाचा होईल असे नाहीं; पण त्या दुःखांतील दुःखपण जाईल. दृष्टी ईश्वर–प्राप्ती या मूल्यावर खिळेल व इतर गोष्टी तुच्छ वाटतील. परंतु वरील वाक्याचा असा अर्थ मनुष्य करीत नाहीं. प्रपंच पूर्ण सुखाचा होईल असाच अर्थ करतो. कारण खरी आवड प्रपंचाची आहे; देवाची मामुली; म्हणजे 'जयासी देव आवडें' ही Condition च पूर्ण केली जात नाहीं. मामुली भक्ति करून फलमात्र अनन्यभक्तीचें मागावें, हा आपला स्वभाव आहे; पण देव थोडाच फसणार आहे!

वस्तुतः, अनन्यभक्त म्हणवून घेऊन, प्रपंचाची काळजी करणें, हा 'वदतो व्याघात' आहे. परंतु हें लक्षांत येत नाहीं. अशा अनन्य भक्तालाहि जडभारी पडणें शक्य आहे. व ते पडल्यावर तो हरीची आठवण करील, हें ही योग्य आहे. परंतु आम्ही जडभारी पडल्यावरच त्याची आठवण करतो, मामुली दुःखें व संकटें सहन करतो, असें होत नाहीं; आमच्या दुर्बल संसारास सर्वच 'जडभारी' 'सहन तितकें जीवन,' हें निंबर्गी–महाराजांचें वचन अंतरी उतरतच नाहीं. 'इंद्रियाची दीनें। आम्ही केलों नारायणें', तोच त्यांतून बाहेर काढील. "भावें भजनीं जें लागले। तें ईश्वरीं पावन झाले।." केवढें हें भाग्य! परंतु त्या साठीं संसाराचें दुःख परमसुख वाटलें पाहिजे. पढतमूर्ख होऊन संसारात लोभून पडतां कामा नये. मग "जयाचा ईश्वरी जिव्हाळा। ते भोगती आनंद सोहळा। जयांचा जनावेगळा। ठेवा अक्षै ॥ अक्षै सुखें सुखावले। संसार दुःख विसरले। विषय रंगी वोरंगले। श्रीरंग रंगीं" ॥ हे चित्र पहा, तें चित्र पहा असें समर्थ आम्हांस सांगत आहेत. पण आम्ही पाहून तुलना करूं का?

'साधक–संवाद'

आपण लहान प्रमाणांत पुण्यतिथि साजरी केली हें वाचून आनंद झाला. प्रा. दामले यांचें प्रवचन चांगलें होणारच. त्यांची विद्वत्ता, परमार्थ प्रेम व परमार्थाचा सखोल विचार या बद्दल सर्वांचें ऐकमत्य आहे.

पत्रोत्तर यावें. क. ही. वि

आपला

x x x

पत्र नं. ९८

श्री

२५–६–६३

सादर सा. न. वि. वि.

दास. १३–७ मध्यें 'सर्व सांडोनि शोधा मजला। ऐसें भगवंतचि बोलिला। लोकीं शद्ब अमान्य केला। भगवंताचा।। म्हणोनि नाना दुःखें भोगिती। सर्व काळ कष्टी होती।----, असे तुमच्या–आमच्या सारख्या लोकांच्या दुःखाचें निदान करुन त्यावर उपाय योजनाहि सुचविली आहे. 'शहाण्यानें ऐसें न करावें। हित तरी खरेंच करावें। देवांस धुंडीत जावें। ब्रम्हांडावरते'।। कारण उदंड सुख देवाला लागलें आहे; त्याला सांडलें, त्याला चुकलें, तर सुख शोधीत असतां दुःखच पदरीं येणार. येथें मनुष्याच्या सुख प्राप्ती या मूळ प्रवृत्तीलाच आवाहन केले आहे व या सुखेच्छीची पूर्तता ईश्वरांवाचून–त्याच्या दर्शनावाचून शक्य नाहीं; म्हणून भक्ति करा, असा भक्तीचा शरीरधारी मनुष्याच्या मूलभूत प्रवृत्तीशी असलेला जिव्हाळयाचा संबंध स्पष्ट केला आहे. जीवनमूल्याच्या शोधासाठीं ब्रम्हांडापलीकडे–दृश्य–विश्वातीत असलेल्या ईश्वरालाच–शोधीत गेलें पाहिजे. इतकें दूर जाण्यानें पाय दुखणार नाहींत, कारण ब्रम्हांडापलीकडचे ठिकाण आंत, अंतरींच आहे.

'साधक–संवाद'

ब्रम्हांडहि अंतरांत, त्याच्या पलिकडचें ठिकाण–स्थान–ब्रम्हांडापेक्षांहि आपल्याला आंतरतर आहे. आत्मा हेंच तें स्थान. याच समासांत, हें उच्चतम जीवनमूल्य चुकून इतर जीवनमूल्ये आमच्या अंतरीं कशीं दृढमूळ झालीं, यांचे स्पष्टीकरण सुंदरपणें केलें आहे. अर्थात् ही चूक दुरुस्त करावयाची म्हणजे ज्या Process नें चूक झाली; ती retrace करावयाची; रस्ता चुकून ज्या वाटेनें पुढें गेलों, त्याच रस्त्यानें, तितकेंच अंतर उलट चालून करावयाची 'अर्था सारिखा आत्मा होतो। जिकडे नेला तिकडे जातो।।नवरसिक अर्थ चाले। श्रोते तद्रूप झाले। चाटपणें होऊन गेले। चाटचि अवघे।। उत्तम अन्नें बोलत गेले। तरी मन अन्नाकार झालें। लावण्य स्त्रियेचें वर्णिलें। मन तेथेंचि बैसें।। जें जें देखिलें आणि ऐकिलें । तें हृदयीं दृढ बैसलें। हित अनहित परीक्षिले। परीक्षावंती।। या कारणें सर्व सांडावें। एक देवासी धुंडावे।।' जें ऐकावें पहावें ते अंतरीं दृढ मूळ होते, या नियमाचा फायदा घेऊन, जे दृढ मूळ करायाचें असेल तेंच पहावें–ऐकावें, हें उघड आहे. हेंच परीक्षावंत संत करतात. कारण आपलें हित कशांत आहे, हें त्यांना माहीत आहे. नाम–नाम नाम असा नामाचा ध्यास ते धरतात. नामस्मरण करणें मनाला व शरीराला अशक्य झालें, म्हणजे अन्य प्रकारानें देव पहावा, ऐकावा, कथावार्ता त्याच्याच कराव्या, हा मार्ग अवलंबतात. सारांश ज्ञाने. अ. ९ मध्यें सांगितल्याप्रमाणें ते 'मद्‌याजी' होतात., मीचि डोळां देखिला। मीचि कानीं ऐकिला। मीचि मनीं भाविला। वानिला वाचा।। जे अभिमान वाहत आंगीं। माझे भूषवावया जगीं। ----- जे माझेनि कामें सकाम। माझेनि प्रेमें सप्रेम।---- वगैरे वगैरे, हें त्यांचें जीवन. आपलें कुशल आहे ना ? क.

आपला

x x x

पत्र नं. ९९

श्री.

५-७-६३

सा. न. वि. वि.

"मननें अर्थांतर काळी"; संतांच्या खोल विचाराचें मर्म अधिक अधिक समजण्याचा प्रयत्न म्हणजे अर्थांतर काढणें. याचें एक उदाहरण:-

श्री, गुरुदेवानीं उपनिषद् रहस्यांत म्हटलें आहे-: 'देव अंतःकरणांतच प्रतीत होतो; म्हणून नैतिक शुद्धता वाढवीत, नामस्मरणानें त्याचा साक्षात्कार करून घेण्याचा मार्ग समर्थनीय ठरतो.' याचा विचार करतां दिसतें कीं, देव बाहेर पहावयाचा असतां, भौतिक शास्त्राप्रमाणें त्याचें संशोधन बाह्य विश्वांत करावयाचें असतें, तर आत्यंतिक चित्त शुद्धीची अवश्यकता पडली नसती. बुद्धि स्थिर राहण्याइतकी चित्त शुद्धि पुरी होईल. परंतु देव अंतरीं पाहणें, Not-self (अनात्म्या) चा consciousness (जाणीव) आहे, तो self-consciousness (स्वसंविद्) करणें, याला अंतःकरण Not-Self (अनात्म्या) पासून पूर्णतः मुक्त झालें पाहिजे. नाहींतर तें पूर्णतः self conscious (स्वसंविद्) होणार नाहीं. अशी पराकाष्ठेची चित्तशुद्धि-मनाचें उन्मन-झाल्यावांचून आत्मसाक्षात्कार शक्य नाहीं. याच सिद्धांताचे उप-सिद्धांत म्हणजे देवच पुण्य, इतर सर्व पाप; देवच त्रिगुणातीत, इतर सर्व माया. तेव्हां देवाशिवाय इतर कशाचेंही चिंतन करावयाचें नाहीं म्हणूनच एक श्वासहि नामाशिवाय दवडावयाचा नाहीं; कारण "आठव तो ब्रह्म, नाठव तो भवभ्रम।" त्याचप्रमाणें

"ईश्वरं ध्यायते पुंसो भक्तिस्तस्मिन् प्रजायते।
भक्त्या वै दर्शनं तस्य दर्शनात्सुखमुत्तमम् ॥
आत्यानंदाच्चित्तलयो लयात् शांतिरनंतरम्।
सैव सायुज्यता मुक्तिस्तदेवं परमं पदम् ॥

सर्व क्षेम.

आपला

x x x

'साधक - संवाद'

पत्र नं. १००

श्री

१०-७-६३

सप्रेम नमस्कार

'तरी विरक्ती वाचूनि कांहीं। ज्ञानासी तगणें नाहीं॥'

असा विरक्ती व साक्षात्कार यांचा संबंध दाखवून ज्ञाने. नी १५/३९ मध्यें विरक्तीचें स्वरूप दाखविलें आहे. "ऐसी संसार या समस्ता। जाणिजे जै अनित्यता॥" ही अनित्यता अंतःकरणांत ठसल्यावाचून वैराग्य शक्य नाहीं. नित्यानित्य विवेकाचें इतकें महत्व आहे. परवा छोटी प्रभा, एक पद ह्मणाली; त्यावरून वरील सर्व विचार झाला. 'सारखा काळ चालला पुढें। कुणाचे काय कुणास्तव अडे। ' हें पालुपद असून रामकृष्ण। गेले, पण कुणाचे अडलें नाहीं; श्री. तांब्यांच्या ह्मणण्याप्रमाणें नित्य सुतक कोणी धरलें नाहीं. या सर्व गोष्टी पटतात; पण तपशीलाचा प्रसंग आला ह्मणजे हें सर्व विसरतें. आपल्याला एकाद्या गोष्टीनें सुख वा दुःख, राग वा द्वेष निर्माण झाला, तर त्या गोष्टीचें महत्व, टिकाऊपण किंवा आयुष्य, त्याप्रमाणेंच त्या सुख-दुःखाचें वा राग-द्वेषाचें आयुष्य किती अल्प आहे, शद्बशः 'न श्वोऽपि तिष्ठति।' अशीं ही सर्वं 'अश्वत्थ' आहेत. याचें भान व स्मरणच राहात नाहीं. कारण मन विकार-वश झालेलें असते. या अनित्यतेचें स्मरण झाले, तर विकार ओसरतील, कृतींत तरी उतरणार नाहींत. हेंच ज्ञानेश्वरांच्या वरील ओव्यांत ह्मटलें आहे. बुद्धीला अनित्यता पटली, तरी ती चित्तांत उतरत नाहीं, स्वभाव बनत नाहीं, सतत तिचें स्मरण राहात नाहीं. 'अंतःकरणास मूळ मन' या महाराजांच्या वचनाप्रमाणें हें स्मरण सतत मनांत राहिलें, तरच तें अंतःकरणांत उतरेल, स्वभाव बनेल व वैराग्य त्यांतुन सहज उद्भवेल. I die daily (मी रोज मरतो) असें एका ख्रिस्ती संतानें ह्मटलें आहे. मरणाचें स्मरण असावें। हरी भक्तीस सादर व्हावें॥ महाराज सांगत "जगांत फजीती, देहाला कष्ट व

मरणाचें स्मरण असलें ह्मणजे साधन चांगलें होते." त्यातहि अनित्यतेचें स्मरणच आहे. त्या स्मरणाचा विसर पाडण्या इतकें सौख्य मिळूं शकलें नाहीं ह्मणजे स्मरणाचा विसर पडत नाहीं. धर्म, गौतमबुद्ध यानीं या नित्यानित्य विवेकानें 'सर्वं दुःखं विवेकिनाम्' या वचनाप्रमाणें 'उदासीनवत् आसीत' राहून परमार्थ साधन केलें—परम सुखाच्या अवस्थेंतहि केलें. परंतु तुमच्या आमच्या सारख्या सामान्य जनांना परमार्थासाठीं 'आपादः संतु नः शश्वत् यासु संस्मर्यते हरिः।' हेंच दान मागावे लागेल. तितकें मन घट्ट आहे का? अर्थात् नाहीं. याचा अर्थ आपण मंद अधिकारी आहों. नामस्मरण करीत रहावें, जागृत असावें, सद्गुरूची दया भाकावी; श्रवण–वाचन मनन-करावें; या मार्गानें तीव्र वैराग्यव मुमुक्षता येईल, दुसरा मार्ग नाही.

'तुका ह्मणे नाहीं चालत तातडी.।'

आपला क्षेम समाचार कळआवा.

आपला

x z x

पत्र नं. १०१

श्री

१७–७–६३

सादर सा. न.

आपली समस्या कठीण आहे हें खरें. त्याविषयीं अधिक चर्चा प्रत्यक्ष भेटींत करूं. श्री. गुरुदेव सांगत असत तशी Contemplative reading (चिंतन पूर्वक वाचन)ची संवय करावी. तुकारामाचा एकादाच अभंग घेऊन, त्याचेवर सखोल विचार करून, त्यांतून अर्थांतर काढणें, हें सर्वच दृष्टीनें उपयुक्त होईल. श्री. गुरुदेव एकदां म्हणाले.' मी १९०९–१० मध्यें आजारी असतांना रोज तुकारामांचे ५–६ अभंग वाचून त्यावर चिंतन करीत असें, तें संर्वात उत्तम वाचन झालें. आपल्या पारमार्थिक जीवनाला जें उपयोगी, तें

पत्र नं. १००

श्री

१०-७-६३

सप्रेम नमस्कार

'तरी विरक्ती वाचूनि कांहीं । ज्ञानासी तगणें नाहीं ॥ '

असा विरक्ती व साक्षात्कार यांचा संबंध दाखवून ज्ञाने. नी १५/३९ मध्यें विरक्तीचें स्वरूप दाखविलें आहे. "ऐसी संसार या समस्ता। जाणिजे जै अनित्यता॥" ही अनित्यता अंतःकरणांत ठसल्यावाचून वैराग्य शक्य नाहीं. नित्यानित्य विवेकाचें इतकें महत्व आहे. परवा छोटी प्रभा, एक पद ह्मणाली; त्यावरून वरील सर्व विचार झाला. 'सारखा काळ चालला पुढें। कुणाचे काय कुणास्तव अडे। ' हें पालुपद असून रामकृष्ण। गेले, पण कुणाचे अडलें नाहीं; श्री. तांब्यांच्या ह्मणण्याप्रमाणें नित्य सुतक कोणी धरलें नाहीं. या सर्व गोष्टी पटतात; पण तपशीलाचा प्रसंग आला ह्मणजे हें सर्व विसरतें. आपल्याला एकाद्या गोष्टीनें सुख वा दुःख, राग वा द्वेष निर्माण झाला, तर त्या गोष्टीचें महत्व, टिकाऊपण किंवा आयुष्य, त्याप्रमाणेंच त्या सुख-दुःखाचें वा राग-द्वेषाचें आयुष्य किती अल्प आहे, शद्बशः 'न श्वोऽपि तिष्ठति।' अशीं ही सर्व 'अश्वत्थ' आहेत. याचें भान व स्मरणच राहात नाहीं. कारण मन विकार-वश झालेलें असते. या अनित्यतेचें स्मरण झाले, तर विकार ओसरतील, कृतींत तरी उतरणार नाहींत. हेंच ज्ञानेश्वरांच्या वरील ओव्यांत ह्मटलें आहे. बुद्धीला अनित्यता पटली, तरी ती चित्तांत उतरत नाहीं, स्वभाव बनत नाहीं, सतत तिचें स्मरण राहात नाहीं. 'अंतःकरणास मूळ मन' या महाराजांच्या वचनाप्रमाणें हें स्मरण सतत मनांत राहिलें, तरच तें अंतःकरणांत उतरेल, स्वभाव बनेल व वैराग्य त्यांतुन सहज उद्‌भवेल. I die daily (मी रोज मरतो) असें एका ख्रिस्ती संतानें ह्मटलें आहे. मरणाचें स्मरण असावें। हरी भक्तीस सादर व्हावें ॥ महाराज सांगत "जगांत फजीती, देहाला कष्ट व

मरणाचें स्मरण असलें ह्मणजे साधन चांगलें होते." त्यातहि अनित्यतेचें स्मरणच आहे. त्या स्मरणाचा विसर पाडण्या इतकें सौख्य मिळू शकलें नाहीं ह्मणजे स्मरणाचा विसर पडत नाहीं. धर्म, गौतमबुद्ध यानीं या नित्यानित्य विवेकानें 'सर्वं दुःखं विवेकिनाम्' या वचनाप्रमाणें 'उदासीनवत् आसीत' राहून परमार्थ साधन केलें–परम सुखाच्या अवस्थेंतहि केलें. परंतु तुमच्या आमच्या सारख्या सामान्य जनांना परमार्थासाठीं 'आपादः संतु नः शश्वत् यासु संस्मर्यते हरिः।' हेंच दान मागावे लागेल. तितकें मन घट्ट आहे का? अर्थात् नाहीं. याचा अर्थ आपण मंद अधिकारी आहों. नामस्मरण करीत रहावें, जागृत असावें, सद्गुरूची दया भाकावी; श्रवण–वाचन मनन-करावें; या मार्गानें तीव्र वैराग्यव मुमुक्षता येईल, दुसरा मार्ग नाही.

'तुका ह्मणे नाहीं चालत तातडी.।'

आपला क्षेम समाचार कळआवा.

आपला

x z x

पत्र नं. १०१

श्री

१७–७–६३

सादर सा. न.

आपली समस्या कठीण आहे हें खरें. त्याविषयीं अधिक चर्चा प्रत्यक्ष भेटींत करूं. श्री. गुरुदेव सांगत असत तशी Contemplative reading (चिंतन पूर्वक वाचन)ची संवय करावी. तुकारामाचा एकादाच अभंग घेऊन, त्याचेवर सखोल विचार करून, त्यांतून अर्थांतर काढणें, हें सर्वच दृष्टीनें उपयुक्त होईल. श्री. गुरुदेव एकदां म्हणाले.' मी १९०९–१० मध्यें आजारी असतांना रोज तुकारामांचे ५–६ अभंग वाचून त्यावर चिंतन करीत असें, तें सर्वांत उत्तम वाचन झालें. आपल्या पारमार्थिक जीवनाला जें उपयोगी, तें

Contemplative reading (चिंतन पूर्वक वाचन).मननें अर्थांतर काढी । या नांव साधक'।। (दा. बो. द. ७-स ८-ओ १-४९) मध्यें श्रवणाचे परिणाम सांगितले आहेत, तें सर्व Contemplative reading नें होतात व ते होतील या पद्धतीनें केलेलें वाचनच Contemplative होय. श्रवणाचे सर्व परिणाम साधकाला उपकारक आहेतच. त्याच प्रमाणें वाचन हें नुसतें करमणूकीचें साधन, येवढेंच न राहता साधक जीवनाचें व साधनाचें एक महत्वाचें-मुख्य-उपसाधन व्हावें.

वरील समासांत ससर्थ सांगतात–श्रवणानें भक्ति व विरक्ति जोडतें; विषयासक्तता, माया, अभिमान, संशय तुटतात; चित्त शुद्धि, दृढबुद्धि, निश्चय व समाधान बाणतात. इतर अनेक परिणाम आहेत. वरील परिणामांचाच विचार केला, तरी श्रवणाचें स्वरुप काय असावें, हें कळतें. ईश्वराचे अनेक गुण व त्याचें वैभव, संतांची भक्ति, साक्षात्कार व भव्योदात्त सद्‌गुण आणि प्रपंचाचें अनित्यत्व व वैय्यर्थ्य, मानव देहांत ईश्वरप्राप्ति होतें, हें संतांचें निःसंदिग्ध आश्वासन, हेंच श्रवणाचे व वाचनाचे विषय असावे. म्हणजे विषयांचे ओढे तुटून विवेक व सद्‌बुद्धि जागृत होईल व 'मन भगवंतासी मागे' –'देव हवा दुसरें कांहीं नको,' ही वृत्ति निर्माण होईल. ईश्वर प्राप्तीच्या उत्कंठेनें साधनांत तीव्रता येईल, मनाचा मोह दूर होईल. म्हणून चिंतनपूर्ण वाचनांत अधिक वेळ घालविण्याचा अभ्यास करावा. त्यांतूनच कांहीं लिहिण्याची इच्छा उत्पन्न होईल. कांहींहि योजना न करतां मनास वाटेल तें लिहून काढावें, त्यांतून पुढें काय निघेल तें पाहता येईल. नाहीं निघाले तरी चिंतनाचें टिप्पण तयार होईल. चिंतनांतील प्रगतीचे टप्पे स्वतःला पाहतां येतील. चांगल्या प्रकारें काळ जाण्याला उपयोग होईल. सत्संगती शक्य तितकी मिळविली पाहिजे. त्यायोगें काळ पारमार्थिक आनंदात जाईल. अशा रीतीनें कार्यक्रमाचा हळू हळू जम बसेल.

क. लो. अ. ही. वि.

आपला

x x x

' साधक – संवाद '

पत्र नं. १०२

श्री

६-८-६३

सप्रेम नमस्कार

हरिपाठांतील २१ वा २२ वा अभंग- 'नित्य नेम नामीं ते जन दुर्लभ। लक्ष्मी वल्लभ तया जवळी ।।' या दुर्लभ लोकांत आमचा अंत-र्भाव नाहीं. याचें कारण? योग्य श्रद्धेचा व अवश्य त्या वैराग्याचा अभाव. नित्य नेमानें नामस्मरण करण्याला, त्याचें जीवनाचे दृष्टीनें महत्व समजलें पाहिजे. ज्या गोष्टींमध्यें आपण मन रमवितो, त्यांचें वैय्यर्थच नव्हे तर त्यांची घातकथा, नामस्मरणाच्या योगानें होणाऱ्या लाभाचें भव्योदात्त वैभव, हीं मनांत ठसून, सतत स्मरणांत राहिल्यावांचून, नामस्मरण तरी कसें व कां होणार? थोडक्यांत म्हणजे परमार्थ-शास्त्राची सर्व महत्वाचीं तत्त्वें अंतरीं बिंबली पाहिजेत. 'ईश्वर आहे, त्याचा साक्षात्कार अनेक संतांना झाला आहे व त्यामुळें त्यांचें अंतःकरण नित्यानंदानें भरून गेलें, सर्व वासना नष्ट झाल्या, भूतदयेनें कळवळा येऊन तोच नित्यानंद आम्हाला प्राप्त व्हावा म्हणून त्यांनीं नामस्मरणाचा मार्ग जगाला सांगितला, अखंड नामस्मरणानें त्यांच्या वैभवाचा व कृतार्थतेचा लाभ आम्हालाहि होईल;' अशी श्रध्दा बाणली पाहिजे. इतर विचार मनांत येतांच या सिध्दांताचें स्मरण होऊन, आपण आपला काळ व्यर्थ घालवीत आहोत, ही बोच उत्पन्न झाली पाहिजे. येथें थोडया फार वैराग्याची गरज-जरूरी-असते. कारण ज्या गोष्टींत मन आसक्त आहे, ती गोष्ट, तो विकार व विचार मनाचा असा ताबा घेतो, मनाला इतकें मुग्ध करतो, कीं तो दूर करण्याची कल्पनाच येत नाहीं. जणू कांहीं सर्व जीवित त्या विचारावर अवलंबून आहे, असें वाटतें व त्याचा जोर ओसरून सुविचार सुचण्यापूर्वीं, कधीं कधीं नकी तें उच्चार व आचार घडून जातात. हा पश्चात्ताप क्रमप्राप्त आहेच. त्यांत आणखी काळक्षेप. त्या उच्चार-आचाराचे परिणाम अनिष्ट व दुःखद झाले, तर त्या प्रक्षोभांत पुन्हा

काळापहरण अशी दुष्ट परंपरा निर्माण होते. म्हणून विवेकाची परिणति वैराग्यांत झाली पाहिजे. इतकी सामुग्री फार थोडया साधकांजवळ असते. म्हणून, ' नित्य नेमनामी ते दुर्लभ असतात, म्हणले आहे. असो. contemplative reading (चिंतन पूर्वक वाचन) कसें असावें, याचीहि यावरून थोडी कल्पना येईल. आपलें कुशल कळवावें.

आपला

x z x

पत्र नं. १०३

श्री

१६-८-६३

सादर सा. न.

ज्ञा. ९ अ. चा अनन्यभक्ति हा एकमेव विषय असून तो अनेक प्रकारें उत्कृष्टपणें प्रतिपादलेला आहे. 'अपिचेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक्' हा श्लोक व त्यावरील भाष्य साधकांना व मुमुक्षूना हि अत्यंत आश्वासन व धीर देणारें आहे. ईश्वर प्राप्तीच्या प्रयत्नावाचून जें जें कर्म केलें जातें, ज्या कर्माचें (शारीरिक वा मानसिक) साध्य ईश्वर-प्राप्ति हें नाहीं, तें सर्व पाप. 'वरि मी जेणें पाविजे। तें शुद्ध पुण्य॥' अशी ज्ञानेश्वरांची पाप-पुण्याची व्याख्या आहे. या मुळें ईश्वर प्राप्तीचा प्रयत्न न करणारे सर्व 'दुराचारी' या वर्गात पडतात. परंतु साधकहि, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें ईश्वर प्राप्तीला उपयुक्त असें सोडून जें जें करतात (आणि असें आपण पुष्कळच करतो) तें हि दुराचाराच्या सदरांत जमा होतें. तेंव्हां साधकहि या दृष्टीनें दुराचारी आहेच. तो 'सम्यग्व्यवसित' झालेला असतो. पण सम्यग्व्यवसाय पश्चात्ताप पूर्वक पथ्य पाळण्याची शपथ घेऊन नामस्मरण करणें-हाहि यथा तथाच घडतो. अखंड नामस्मरण व वस्तूचें अनुसंधान होत नाहीं. तेंव्हां उच्चतम

साक्षात्काराला जो पोहोचला तोच दुराचारी या वर्गातून वेगळा पडला, असे ज्ञानेश्वर सांगतात. हें तत्त्वज्ञानाचेंहि सूत्र आहे, Approximation (साक्षात्काराकडें अखंड वाटचाल) अर्थात् संपूर्ण दुराचाराच्या त्यागाकडे अखंड वाटचाल सूरू असतें. थोडासा देहभाव उरला तरीं तो 'पापच' 'पापाचें वळलें शरीर। पापचि घडे निरंतर.' पुण्याची व्याख्या इतकी भव्योदात्त आहे. सारांश, देव हें एकच पुण्य आणि हें पुण्यमय पद साध्य करण्याच्या मार्गावर मंद वा तीव्र गतीनें गुरुकृपेनें आपण सर्व यथाशक्ति चालत आहोंत.

क. ही. विनंति.

आपला

x x x

पत्र नं. १०४

श्री

२-९-६३

सा. न. वि. वि.

शनिवारीं भजन झालें त्यांत खालील भावपूर्ण अभंग होता. तो ऐकतांना अंतःकरण भरून, गहिंवर आला. साधे शद्ब व विचार; नामदेवाचे मुलीचा अभंग; पण त्यांतील आर्तता व तळमळ, तशीच अनन्यता हृदयस्पर्शी वाटली.

'तारी मज आतां रूक्मिणीच्याकांता। पंढरीच्या नाथा मायबापा।। अनाथाचा नाथ आयकिले कानीं। सनकादिक मुनी बोलियले ।। तयांच्या वचनापासोनि विश्वास। धरियेली कास पांडुरंगा।। नामयाची लेकी आऊ म्हणे देवा। कृपाळुवा देवा सांभाळावें।। या मुलीचा इतिहास आपणाला ठाऊक नाहीं. परंतु इतकी आर्तता वाटून तिनें देवालाच कां आळवावें?

आपलें दु:ख सांगावयाला व परिहार करण्याला तिला आप्तेष्ट नव्हते कां? या सर्व आश्रयांचा त्याग करून ती ईश्वर चरणी अनन्य कशी व कां झाली? असे अनेक प्रश्न त्या वेळीं मनांत आले त्याचें उत्तर पूर्वीच्या जन्मीच्या व या जन्मांतील नामदेवासारख्या संतांच्या संगतीच्या पुण्याईनें उत्पन्न झालेलें विवेकवैराग्य हें वाटले. जगाचे वैयर्थ्य, त्याची अनित्यता,दु:खमूलत्व,सारांश, त्याची असत्यता, उपजतच अंत:करणाला पटली. त्या साठी बुद्धीचें सहाय्य घ्यावें लागलें नाहीं. त्याच प्रमाणें त्या असत्य, दु:खमूल, विनाशी संसारांतून मन बाहेर काढून नित्यानंदमय दिव्यजीवन प्राप्त करून देण्याचें सामर्थ हि देवाशिवाय कोणाजवळ नाहीं. हें हि उपजत बुद्धीनेंच या साध्वीला प्रतीत झालें असलें पाहिजें. म्हणून मुलानें दु:ख परिहारार्थ आईजवळ जाऊन रडावें त्याप्रमाणें तिने सहज टाहो फोडला. या उपजत विवेक–वैराग्याला संतमु–नींच्या विषयीं आदर व त्यांच्यावरील श्रध्दा, याचीहि अमोल जोड मिळाली, या पोरवयी आऊपेक्षा संतांचीं व ऋषींची वचनें आम्हाला चांगली ठाऊक-आहेत. नित्यानित्य विवेकावरील ग्रंथहि वाचले आहेत. परंतु ती आर्तता, ती श्रध्देची तळमळ आमचे ठिकाणी नाहीं.याचें कारण वैराग्य नाहीं.मन प्रपंचा पासून दूर होत नाही. अगदी होत नाही, असे नाहीं. परंतु त्या उत्कटतेनें त्याचा निर्वेद यावा तो येत नाही. दु:खाचें वेळीं निर्वेद येतो; परंतु पुन्हा कांही चांगलें झालें, कीं मन पुन्हा त्यांत रंगतें. त्यापेक्षा, कांहीं गोष्टींची काळजी करणें सुटत नाही; याचाच अर्थ ती गोष्ट प्रिय वाटतें. त्या काळ–जीचे वेळी देवास भार घालण्याऐवजी स्वत:चे कर्तृत्वावर भर दिला जातो नकळत प्रपंचापासून न सुटण्याची निमित्तें सोज्वळ नावांखाली आम्ही शोधतो. रामदास व. मृ.(आ. २)पृष्ठ १४० वर ‘ उपजताचि वैराग्य जोडे। ऐंसे परमार्थी थोडे। असो मगहि अंतर पडे। कीं निमित्ते एके।। येकी प्रपंची लालुचि लागली। एका कुळाभिमानें लाजविली। ह्मणे वृत्ति भूमी बुडाली। तरी नांव जाई वडिलांचे।। एक ते लौकिक राखिती। नारे बा निघून म्हणती। गेली एक ते आधार घेती। जनकादिकांचा।। एक ह्मणती कासयासी जावे। वैराग्य गृहींच करावे। आल्या आतितासी अन्न द्यावे। शेवटी तेहि ठाकेना।।’

‘ साधक – संवाद ’

असे केवळ ह्मशीमुळें घराकढे जाणारे आम्ही वैरागी आहोत, असे रामदास निष्ठूरपणें सांगतात. तरी अशा आम्हीहि, 'वैराग्य ठाकेना। प्रपंच सुटेना। तरी प्रपंची असून वासना परमार्थी ओढावीं ।।' सर्व क्षेम.

आपला

x x x

पत्र नं. १०५

श्री

१८-९-६३

सा. न. वि. वि.

ज्ञा. अ. १५ च्या २२ व्या ओवींत अगदी सूत्रमय असे परमार्थाच्या तपशीलाचें वर्णन आहे. परी संतासवे बसतां । योग ज्ञानी पैसतां । गरुचरण उपासितां । वैराग्येसीं ।। पुढील २ओव्यांत त्याचें फळ आहे.'येणेचि सत्कर्मे । अशेषहि अज्ञान विरमें । जयाचे अहं विश्रामे । आत्मरूपीं ।। ते आपेआप देखोनि देखी । मिया आत्मेंनी सदा सुखी ।' संताची संगती,वैराग्य, गुरुचरण सेवा अर्थात अत्यंत भक्तिप्रेमानें गुरूपदिष्ट नामस्मरणाचें साधन हे सर्व केल्यावर थोडा ज्ञान योगानें होणारा साक्षात्कार पैसतो, वाढतो. त्याच्या वाढीनें अज्ञान नष्ट होऊन चित्त आत्मस्वरूपाचें दर्शनानें आत्मस्वरूपींच स्थीर होते, व आनंद स्वरूपी आत्मा स्थीर झाल्यानें साधक सदा सुखी होतो. चित्त सदा विषयामध्ये रमणें, हे अज्ञान किवा अज्ञानाचें आपणाला स्पष्ट दिसणारें फळ. कारण वेदांताचे दृष्टीनें 'मी ब्रह्म आहे' याचा विसर पडणें हें अज्ञान व "मी देह" ही बुद्धि हें त्याचें स्वरूप. तरीहि त्याचे व्यावहारीक परिणामच आपणाला महत्त्वाचे व ते म्हणजे विषय-चितन, विषयासक्ति. आत्मीं स्थीर झाल्यावर सदा सुख. उलट विषयांत रमल्यानें सदा दुःख. शेवटीं मानवी जीवनांत जिव्हाळयाची भावना म्हणजे सुखदुःख होय.

'साधक – संवाद'

विषयांत, देहभावांत. दुःख नसते तर त्याचा त्याग करण्याचा विचार, आत्म-स्थितींत आनंद नसता तर, तिच्या प्राप्तीचा विचार कोणीच केला नसता. प्रयत्नाची प्रवृत्ती, दुःखनिवृत्ती व सुखाची प्राप्ती या प्रेरणे-पासून होते. अर्थात् विषय दुःखपरिणामी आहेत व देव आनंद परिणामी आहे, हे बुद्धीला पटत नाही, तो पर्यंत वैराग्य पूर्वक परमार्थ प्रवृत्तीच होणार नाहीं. विवेक-वैराग्य यांचे परमार्था वृत्तीशी अत्यंत महत्त्वाचें नातें या प्रकारचें आहे. संत-सहवास, गुरुचरण-सेवा या वांचून सतत वैराग्याची जागृति राहणें कठीण. म्हणून ज्यांना संत-सहवासाची उत्कंठा वाटू लागली त्यांना विवेक-वैराग्याचें महत्त्व कळून, त्यांच्या अखंड जागृतीची उत्कंठा लागली. असा निष्कर्ष एका पत्रीं होता. त्याची वरील ओव्या वाचून आठवण झाली.

क. लो. अ. ही. वि.

आपला

x x x

पत्र नं. १०६

श्री.

२-१०-६४

सा. न. वि वि.

श्री. रामाण्णा मुद्दाम आपल्याकडे येऊन गेले. याचा परिणाम चांगला झाल्याशिवाय राहणार नाहीं, हें मी जाणून आहे. परत आल्यावर त्यांनीहि फार समाधान व्यक्त केले. He never flirted with other ideals when following (परमार्थ करीत असतां इतर ध्येयाशी संबंध त्यांनीं ठेविला नाहीं). परमार्थ, हें त्यांचे वैशिष्ठ्य आहे. इतर सर्व मधून मधून तरी मानवी सत्य-शिव-सुंदर यांतील एकाद्याकडे वळतात. कांहींना तर या त्रयीचें साधन म्हणजे भक्ति व नामस्मरण असाहि भ्रम असतो. There is

no God but God (ईश्वर एकच आहे) हें ध्यानीं येत नाहीं. श्री. रामाण्णानां श्री बाबांचा सहवास लहानपणींच मिळाला. त्यामुळें वृत्ति निःसंदिग्ध झाली. भोंवतालचे सुशिक्षित जग ईश्वरा व्यतिरिक्त मूल्यांना डोक्यांवर घेऊन नाचत असतानां व ईश्वर या मूल्याची उपेक्षा करून, देवाची भक्ति करणाऱ्यांना भेकड, स्वार्थी, पलायन पटू अशा विशेषणांचा आहेर करीत असतांना, 'हाथी चलत है आपने चालसे' असा संथपणें परमार्थ करणें याला मोठी श्रद्धा, धैर्य, निस्पृहता, निःस्वार्थता इ. अनेक गुण लागतात. या सर्वांवर मुकुटमणी म्हणजे दीर्घ साधनाने अनुभव व शांति मिळाल्यावर, संदेहाची शक्यता कमी कमीच होत जाते. तसेंच श्री. चें झाले आहे. त्यामुळें त्यांची संगती साधकांना उपकारक ठरते.

वरील अनेक गुणांचा विचार करतांना सहजच लक्षांत येणारी गोष्ट म्हणजे, कोणताहि सद्‌गुण वा दुर्गुण एकटा वाढत नाहीं; आपल्या परिवा–रासह वाढूं शकतो. 'दैवी संपत्ती' या पदावर भाष्य करतांना ज्ञानेश्वर लिहतात, 'परस्परांना पोषक असे अनेक पदार्थ एकत्र करणें, याला संपत्ती म्हणतात. म्हणून आम्ही या सद्‌गुण-समुच्चयाला दैवी संपत्ती असे म्हटलें आहे.' त्यांत अपैशुन्याचें लक्षण–कितीहि निंद्य व्यक्ति असली तरी आपल्या गुणांनीं तिला चांगली करून मग तिच्याकडे पाहणें. तिच्या दुर्गुणांचें स्मर–णहि न करणें.' हा एकच गुण अंगात येण्याला किती सद्‌गुणांचा विशाल पाया असावा लागतो ! मानवाच्या मूळच्या ईश्वर–तत्त्वावर दृढ श्रद्धा; परांतरासी न लावावा धक्का, ही वृत्ति; परसुखानें सुखी व दुःखानीं दुःखी होणें, सहनशीलता, विनम्रता, आत्मनिरिक्षणानें स्वतःच्या दोषांची जाणीव, (कासया गुणदोष वानू आणिकांचे। मज काय त्यांचें उणें असे।।) निर्भयता (लोकमताची), इ. अनेक गुण असल्यावांचून हें अपैशुन्य कसे लाभेल? मग अनन्यभक्तीला किती गुण संपादन करावें लागतील? सवडीनें उत्तर यावे.

आपला

x x x

' साधक – संवाद '

पत्र नं. १०७

श्री

१९-१०-६३

सा. न. वि. वि.

श्री यानी श्रीगुरुदेवांच्या दोन महत्वाच्या गोष्टी सांगितल्या. १) एकदां निंबाळास पोहतांना पायजम्यांत पाय अडकल्यामुळें श्री बुडण्याच्या बेतात होते, शर्थीनें वाचले. तेव्हां "आपल्या कृपेनें पुनर्जन्म झाला" असें ते गुरुदेवांना म्हणाले. श्रीं गुरुदेवांनी उत्तर दिले. 'हा दुसरा जन्म आता देवाला द्या' खरोखर आपणा सर्वांना हें वचन मार्गदर्शक व उद्बोधक नाहीं का?

२) श्री. बियासचे अनुग्रहीत आहेत. निंबाळास ते असतांना एकदां त्यांच्या मनांत हा विचार आला होता, कीं आपण बियास ऐवजीं निंबाळास फार राहतो. अर्थात गुरुदेवांना ते बोलले नाहीत; तरी त्याच दिवशीं गुरुदेव सहज त्यांच्या जवळ जाऊन म्हणाले, "हे पहा, सांप्रदायाचा विचार करु नये, परमार्थाचा करावा."

या प्रकारें गुरुदेव संदेह निवारण करीत असत. तेथें वाचलेला एक महत्वाचा विचार-"परमार्थ सुरु करणें म्हणजे मनाशीं भांडण काढणें होय. तें यशस्वीपणें शेवटाला नेईल त्यालाच परमार्थाच्या शेवटाला जाता येईल." पत्रोत्तर यावें.

x x x
आपला

पत्र नं. १०८

३-३-६५

सादर सा. न.

सुस्थितींतील सुशिक्षितांना कांहीं ध्येयवादी वृत्ति असेल तर परमार्थविचार हा त्यां ध्येयाचें शिखर किंबहुना सत्यस्वरूप म्हणून सांगता येईल, ज्यांना कांहींच ध्येयवाद नाहीं त्यांना कांहींच सांगता येणार नाहीं. The will to be good (चांगलें होण्याची इच्छा) हीच नसेल, तर काय होणार? ती उत्पन्न करतां येणार नाहीं. ती नसलेल्यांना कांहीं सांगितलें तर ते पुन्हा न भेटण्याची काळजी घेतील. दासबोध वाचनाचे अनेक लाभ सांगून समर्थांनीं स्पष्ट बजावलें आहे, "जयाचा भावार्थ जैसा। तयासी लाभ तैसा। मत्सर करी जो पुसा तयासि तेंचि प्राप्त.।" आतां ध्येयवादी मनुष्याचें ध्येय सत्य-शिव-सुंदर यापैकी एखाद्या वर्गांत पडेल, त्याबाहेर जाणार नाहीं, कारण सर्व मूल्यांचें वर्गीकरण या तीन मूल्यांत आहे. परमार्थाशिवाय यांतलें कोणतेंच साध्य होणार नाहीं, हीं नांवें are the pointers to God (देवाचा निर्देश करणाऱ्या गोष्टी) हा सिद्धांतच ध्येयवादीना परमार्थाकडे वळविण्याची दिशा आहे. त्याचें यश मुख्यत: त्या व्यक्तीच्या ध्येयवादाच्या उत्कटतेवर अवलंबून राहील. आपण सर्वांनीं नामें घेतलीं, श्री बाबा, गुरूदेव यांनींही घेतलीं. त्यांच्या भक्तीची उत्कटता फार म्हणून ते गुरुपदाला पोहोचलें. आम्हीं जीव धरून आहो. परमार्थ स्वीकारणाऱ्यांची प्रगतिहि भक्तीच्या उत्कटतेवर अवलंबून राहते. मग जे तिकडे वळलेले नाहींत, त्यांना ती प्रवृत्ति होणें त्यांच्या ध्येयवादाच्या तीव्रतेवर अवलंबून राहील, हें उघड आहे. "कांहींतरी परोपकाराचें कार्य करावेंसे वाटतें, पण काय करावे कळत नाहीं, मला परोपकार पटतो. परमार्थ पटत नाहीं," असें सांगणाऱ्या एका सज्जन परिचिताला मी म्हटलें "महारवाडयांत शिकवावयाला लागा, क्लब-मध्यें तासाचे तास घालवूं नका. ते घालविता; कारण त्यांत आनंद वाटतो. महारवाडयांत शिकविण्यांत तो नाहीं. ही मनाची स्वार्थी सुखलोलुप वृत्ति

नामस्मरणानें बदलेल तेव्हां चित्तशुद्धीचें साधन या दृष्टीनें तरी तें तुमच्या कार्याला उपकारक होईल". त्यांच्या बुद्धीला तें पटलें, परंतु परोपकार–बुद्धीच प्रबळ नसल्यानें, तो विषय तेथेच संपला. यावरून माझें म्हणणें लक्षांत येईल. प्रत्येक व्यक्तीच्या उत्क्रांतीचा क्रम भिन्न असतो. ज्यांना परमार्थाकडे वळ–ण्याचा काल आला नाहीं, त्यांना आग्रह करणें निरूपयोगी आहे. नीतीच्या बाबतींत एक वाक्य आहे Those whom you call immoral are moral babies; give them time to grow (ज्यांना तुम्ही अनितीमान म्हणतां तीं नैतिक दृष्टया तान्हीं बालकें आहेत. त्यांची वाढ होण्याला वेळ द्या) हेंच परमार्थांतही खरें आहे. कोठल्यातरी ध्येयप्राप्ती वांचून ज्यांचें अडलें आहे, ते परमार्थाला लागणें शक्य आहे.

आपलें कुशल कळवावे.

आपला

x x x

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
अनुक्रम ...... क्र. ......
क्रमांक ...... २६०५ ...... नों. दि. ......
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें
दा. क्र. ९५२२६
संदर्भ शाखा
REFBK-0015226
REFBK-0015226

महत्त्वाच्या चुकांचें शुद्धिपत्र

पृष्ठ : पंक्ति	अशुद्ध	शुद्ध
२ : ८	उर्सी	ऊर्मी
६ : १८	खल्वहं	खल्विदं
२३ : १९ व २०	कर्तव्यासी	कर्तयासी
३९ : १२	वाटणार ना ?	वाटणार नाहीं ना ?
४९ : ६	झिजे	शिजे
६१ : १३	नीतिमानता	नातिमानता
६१ : १८	असत्यतत्विक	असत्य याचा तात्विक
८२ : १७	गोष्टींचा	गोष्टींना
१२६ : १४	आत्माचें	आत्म्याचें
१३३ – २	नास्तिक	नैतिक
१४३ – २	ईश्वर	सद्‌गुणी

पुस्तक कांहींशा घाईनें पूर्ण करावें लागलें. त्यामुळें बऱ्याच लहान - सहान चुका राहून गेल्या. याची वाचकांनीं कृपया क्षमा करावी !